अहवाल क्रमांक : १४९

# पंचायती राज समिती

(२०१५-२०१६)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

नांदेड व औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात

# सातवा अहवाल

सत्यमेव जयते

(सदर अहवाल दिनांक डिसेंबर, २०१६ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर
२०१६

# पंचायती राज समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

नांदेड व औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात

# सातवा अहवाल

## पंचायती राज समिती

(सन २०१५-२०१६)

### कार्यकारी समिती प्रमुख :

१. *श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री.अनिल गोटे, वि.स.स.
३. श्री.विकास कुंभारे, वि.स.स.
४. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.
६. श्री.उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री.समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.
१०. श्री.अनिल बाबर, वि.स.स.
११. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री.हेमंत पाटील, वि.स.स.
१३. श्री.राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१४. ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स.
१५. श्री.बसवराज पाटील, वि.स.स.
१६. श्री.अमित झनक, वि.स.स.
१७. श्री.राहुल मोटे, वि.स.स.
१८. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
१९. श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.
२०. श्री.अनिल तटकरे, वि.प.स.
२१. श्री.संदीप बाजोरिया, वि.प.स.
२२. श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.
२३. श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
२४. **रिक्त
२५. **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय** :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव.
(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी.

---

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची "कार्यकारी समिती प्रमुख "म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

# पंचायती राज समिती

(सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख :**

१. श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री.अनिल गोटे, वि.स.स.
४. श्री.विकास कुंभारे, वि.स.स.
५. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.
६. श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.
७. श्री.उन्मेश पाटील, वि.स.स.
८. श्री.समीर कुणावार, वि.स.स.
९. श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.
१०. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.
११. श्री.अनिल बाबर, वि.स.स.
१२. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१३. श्री.हेमंत पाटील, वि.स.स.
१४. श्री.राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१५. ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स.
१६. श्री.बसवराज पाटील, वि.स.स.
१७. श्री.अमित झनक, वि.स.स.
१८. श्री.राहुल मोटे, वि.स.स.
१९. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
२०. श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
२२. श्री.अनिल तटकरे, वि.प.स.
२३. श्री.संदीप बाजोरिया, वि.प.स.
२४. श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.
२५. श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे,प्रधान सचिव.
(२) श्री. विलास आठवले,उप सचिव.
(३) श्री. प्रदीप मयेकर,अवर सचिव (समिती).
(४) श्री. सचिन बाभळगांवकर,कक्ष अधिकारी.

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'कार्यकारी समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा सातवा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१५-२०१६ करिता समिती दिनांक २५ मे, २०१५ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक २५ मे, २०१५ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Lesgislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत नि:पक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो. शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाई देखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणे देखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णय देखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचना देखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई देखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासन खाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहित देखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २००८-२००९ व २०११-२०१२ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१५-२०१६ साठी गठीत झालेल्या समितीने नांदेड व औरंगाबाद जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने नांदेड जिल्हा परिषदेस दिनांक १३, १४ व १५ सप्टेंबर, २०१५ रोजी भेट देऊन श्री. अभिमन्यु काळे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेस दिनांक १५, १६ व १७ ऑक्टोबर, २०१५ रोजी भेट देऊन डॉ. अभिजित चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१५-२०१६ करिता गठीत झालेल्या समितीने नांदेड व औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी तसेच दिनांक २४ व २५ मे, व १ जून, २०१६ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. दिनेश कुमार जैन, अपर मुख्य सचिव, कृषि विभाग, श्री.विश्वनाथ गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.राजेशकुमार, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,श्री.मुकेश खुल्लर, प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, श्री.संजय कुमार, प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, श्रीमती.सुजाता सौनिक, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. एस.एस.संधू, प्रधान सचिव, सहकार विभाग, श्री. उज्वल उके, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. राजेशकुमार, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, श्री.व्ही. आर. नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, श्री.प्रभाकर देशमुख, सचिव, जलसंधारण विभाग, श्री. ओमप्रकाश बकोरिया, आयुक्त, आयुक्त कार्यालय, औरंगाबाद म. न. पा. तसेच श्री.का.मा.विधाते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच नांदेड व औरंगाबाद जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त व शासनाचे विविध निर्णय व परिपत्रके परिशिष्टामध्ये दिले आहेत.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या नांदेड व औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१५-२०१६ करीता गठीत झालेल्या समितीने दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १३ डिसेंबर, २०१६.

**प्रकाश भारसाकळे,**
कार्यकारी समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | पृष्ठ क्रमांक (४) |
|---|---|---|---|
| | | **जिल्हा परिषद, नांदेड** | |
| (१) | एक | शासनाकडून शौचालयास जोडून स्नानगृहाकरिता अनुदान देणेबाबत | १ |
| (२) | दोन | नांदेड जिल्हयातील नदीकाठच्या काही गावांमध्ये दूषित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याबाबत | ३ |
| (३) | तीन | सन २०१४-२०१५ या वर्षात नांदेड जिल्हयातील शाळा दुरुस्तीकरीता प्राप्त झालेला अपुरा निधी | ६ |
| (४) | चार | नांदेड जिल्हयातील शाळांत मुख्याध्यापक व विषय शिक्षकांच्या रिक्त जागा | ९ |
| (५) | पाच | तेलंगणा राज्याच्या धर्तीवर घरकुलासाठी अनुदान देणे बाबत | १२ |
| (६) | सहा | दलित वस्ती सुधार योजनेच्या निधीतून गावातील रस्ते दलित वस्तींना जोडण्याबाबत | १४ |
| (७) | सात | मौ.भोरड व पांढरी (ता.माहूर) व मांडवी ता.किनवट गावातील गैरव्यवहाराबाबत | १७ |
| (८) | आठ | सन २०१२-२०१३ मध्ये अंगणवाडीसाठी प्राप्त झालेला निधी खर्च करण्याची शासनाकडून परवानगी मिळणेबाबत | १९ |
| (९) | नऊ | कृषि विभागाच्या योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्याबाबत | २४ |
| (१०) | दहा | सन २०१२-१३ या अहवाल वर्षात पंचायत समिती भोकर अंतर्गत दहन/दफन भूमीच्या कामांबाबत | २७ |
| (११) | अकरा | सन २०१२-१३ या अहवाल वर्षात इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुलांच्या कामांबाबत | २९ |
| (१२) | बारा | पंचायत समिती, नायगांव अंतर्गत मौजे कृष्णूर येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील समस्यांबाबत | ३३ |
| (१३) | तेरा | पंचायत समिती नायगांव अंतर्गत मौजे कृष्णूर येथील अंतर्गत रस्त्याच्या कामातील गैरव्यवहार | ३७ |
| (१४) | चौदा | मौजे बेटमोगरा (ता.मुखेड, जि.नांदेड) ग्रामपंचायती मधील गैरव्यवहार | ४० |
| (१५) | पंधरा | मौजे मंडलापूर (ता.मुखेड, जि.नांदेड) अंतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या कामातील गैरव्यवहार | ५१ |
| (१६) | सोळा | जिल्हा परिषदेच्या रकमा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत न ठेवता राष्ट्रीयकृत बँकेत ठेवण्याचा निर्णय घेण्याबाबत | ५३ |
| (१७) | सतरा | नांदेड जिल्ह्यातील सन २००५ ते २०१५ या कालावधीतील पाणीपुरवठा योजनांच्या कामांबाबत जिल्हा परिषद औरंगाबाद. | ६० |
| | | **जिल्हा परिषद, औरंगाबाद** | |
| (१८) | अठरा | ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद अंतर्गत कविटखेडा पाणीपुरवठा योजनांबाबत | ६७ |
| (१९) | एकोणीस | मौजे.फरशी किणवली, ता.फुलंब्री येथील कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधण्यास झालेल्या विलंबाबाबत | ६९ |
| (२०) | वीस | ग्रामसेवक आदी कर्मचाऱ्यांची बायोमॅट्रीक यंत्राद्वारे उपस्थिती नोंदविण्याबाबत | ७३ |
| (२१) | एकवीस | ग्रामपंचायत पाटोदा (गंगापूर नेहरी) ता.औरंगाबाद गावाच्या शेजारी असलेल्या खामनदीतील प्रदुषणाबाबत. | ७५ |

**अनुक्रमणिका----** चालू


| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| (२२) | बावीस | पैठण पंचायत समितीमध्ये पिंक (गुलाबी) पैठण ही नाविण्यपूर्ण योजना राबविण्यात येत असल्याबाबत | ८५ |
| (२३) | तेवीस | वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात होत असलेल्या विलंबाबाबत | ८८ |
| (२४) | चोवीस | शिक्षण संचालकांनी ईको फ्रेंडली पॉलीमर बेंचेस खरेदीचे दर निश्चित केल्याबाबत | ९२ |
| (२५) | पंचवीस | पंचायत समिती, गंगापुर अंतर्गत अपहारीत रक्कमेच्या वसुली संदर्भात | ९७ |
| (२६) | सव्वीस | सर्वसाधारण शिफारशी | ११२ |

**परिशिष्ट**

शासनाचे आदेश व परिपत्रके आणि

समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, नांदेड (प्रशासन)

# शासनाकडून शौचालयास जोडून स्नानगृहाकरिता अनुदान देणेबाबत

समितीने दिनांक १३ ते १५ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नांदेड जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसोबत केलेल्या अनौपचारीक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की,माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी देशाला स्वच्छतेचा संदेश दिलेला आहे. या अनुषंगाने नांदेड जिल्हा स्वच्छतेच्या बाबतीत काम करीत आहे. या बरोबरच जिल्ह्यामध्ये शौचालयांची काही कामे अप्रतिम स्वरुपाची झालेली आहेत. शौचालयाबरोबरच जिल्ह्यामध्ये स्नानगृहाची योजना राबवावयास पाहिजे. कारण जिल्हयात स्नानगृहाची व्यवस्था नसल्यामुळे, स्नानगृह म्हणून शौचालयांचा वापर केला जातो. जिल्ह्यामध्ये शौचालयाचे झालेले काम कायमस्वरुपी टिकविण्यासाठी स्नानगृहाकरिता स्वतंत्र अनुदान देणे गरजेचे आहे. नगरपालिका क्षेत्रात शौचालयासाठी १७ हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. परंतु ग्रामीण भागातील तालुक्यामध्ये एक इंचाचा खडक लागला तरी तो फोडण्यासाठी जास्त खर्च येतो. त्यामुळे शौचालयाच्या अनुदानात वाढ करण्यासाठी समितीने प्रयत्न करावयास पाहिजे.

**यासंदर्भात समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

शासनाकडून शौचालयांना अनुदान दिले जाते. त्याप्रमाणे शौचालयास जोडून स्नानगृहाकरिताही अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचारार्थ आहे काय.

**यासंदर्भात समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

शौचालयासाठी रु.१२००० प्रती लाभार्थी अनुदान देण्यात येते.परंतु स्नानगृहाकरिता अनुदान देण्याची बाब ही महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत मान्यता मिळणेसाठी जिल्हा परिषद, नांदेडने आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर यांचेकडे पत्र क्र.जा.क्र.२०१५/मनेरगा/शौचालय/८८३, दि.०३/१२/२०१५ अन्वये प्रस्ताव पाठविलेला असून त्यावर अद्याप निर्णय होणे बाकी आहे.

**यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून उपरोक्त मुद्दयाची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर शासन स्तरावरुन उचित कार्यवाही करण्यात येईल.

## विभागीय सचिवांची साक्ष

समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शासनाकडून शौचालयांना अनुदान दिले जाते. त्याप्रमाणे शौचालयास जोडून स्नानगृहाकरिताही अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचारार्थ आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, नांदेड जिल्ह्यामध्ये ज्याप्रमाणे शौचालयाची कामे मोठ्या प्रमाणात झाली. तेथे स्नानगृह देखील बांधलेले आहेत. ७० टक्के शौचालयास जोडून स्नानगृह आहेत. त्यामुळे स्वच्छतेमध्ये जिल्हा परिषदेला मोठे यश मिळाले आहे. ज्याप्रमाणे शोचखड्ड्यांचा विषय शासन स्तरावर मार्गी लागलेला आहे, त्याप्रमाणे हा विषय देखील शासन स्तरावर मार्गी लागलेला आहे, ही वस्तुस्थिती आहे. त्यासंदर्भातील प्रस्ताव, आयुक्त, नरेगा तसेच सचिव, रोजगार हमी योजना यांच्याकडे पाठविलेले आहे. यावर उप सचिव, रोजगार हमी योजना यांच्याकडून समितीस असे सांगण्यात आले की, यामध्ये सुरुवातीला दोन प्रस्ताव होते. त्यापैकी एक प्रस्ताव शोचखड्ड्याचे होते. नांदेड जिल्हा परिषदेने ही योजना चांगल्या पद्धतीने राबविल्यामुळे इतर जिल्हापरिषदांनी २५ ते ५० शोचखड्डेएकत्रित घेण्यासंदर्भातील धोरणात्मक निर्णय घेतला होता. काही ठिकाणी स्वत:च्या पैशाने तर काही ठिकाणी एकत्रित निधीतून बांधकाम केले जात आहे. यासंदर्भात त्यांनी विनंती केलेली आहे. आपण केंद्र सरकारकडे तशी विनंती करणार आहोत अशी माहिती देण्यात आली.

## अभिप्राय व शिफारशी

राज्यातील ग्रामीण भागामध्ये उघडयावर शौचास बसण्याच्या सामान्य जनतेच्या सवयीमध्ये बदल करुन गावांमध्ये स्वच्छ व आरोग्यदायी वातावरण निर्माण करणे एवढेच नव्हे तर स्त्रियांचा सन्मान राखला जावा याकरिता वैयक्तिक शौचालय बांधकामाकरीता शासनाकडून प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येत असते. सन १९९९ पासून केंद्र शासनाने स्वच्छता विषयक कार्यक्रम सुरु केलेला असून काळाच्या ओघात या कार्यक्रमाचे नाव संपूर्ण स्वच्छता अभियान, निर्मल भारत अभियान व सद्यस्थितीत "स्वच्छ भारत मिशन" असे बदलले आहे. सन १९९९ पासून आजतागायत मोठ्या प्रमाणात शौचालयांसाठी निधी खर्च होऊनही संपूर्ण राज्यात शौचालय बांधून त्यांचा वापर पूर्णपणे सुरु झालेला नाही ही वस्तुस्थिती आहे.त्यामुळे या योजनेचा प्रसार, प्रचार होऊन जनतेची आरोग्यविषयक निकड लक्षात घेऊन शौचालय बांधकामास प्रोत्साहन देण्याबरोबरच ते चांगल्या प्रकारे बांधले जाऊन त्याचा पुर्णपणे वापर होणे अत्यंत आवश्यक आहे असे समितीचे मत आहे.

शौचालय बांधकाम प्रोत्साहन अनुदान योजनेत ग्रामीण व शहरी भागात प्रोत्साहनपर अनुदान देताना भेदभाव करण्यात येवू नये. याकरीता ज्याप्रमाणे शहरी भागात एका शौचालयासाठी १७०००/-देण्याची तरतूद आहे त्याच आधारावर ग्रामीण भागातही १७०००/- रुपये देण्याची तसेच शौचालयाला जोडून स्नानगृहाच्या बांधकामास अधिकचा निधी देण्याची मागणी समितीला नांदेड भेटीच्या वेळी करण्यात आली. स्वच्छ भारत मिशनची राज्याच्या ग्रामीण व नागरी भागात अंमलबजावणी करीत असताना ग्रामीण भागात वैयक्तिक शौचालयाच्या बांधकामाकरीता १२००० रुपये प्रोत्साहनपर रक्कम तर नागरी भागात त्याच शौचालयाच्या बांधकामाकरीता शासनाकडून १२००० रुपये व चौदाव्या वित्त आयोगाकडून प्राप्त झालेल्या निधीतून नागरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थेने ५००० रुपयांच्या मर्यादेत अधिकचे अर्थसहाय्य द्यावे असे शासनाचे निदेश असून अशा प्रकारे केंद्र व राज्य शासनाकडून एकूण १७०००/- रुपये प्रोत्साहनपर रक्कम दिली जाते.बहुतांश लाभार्थी शौचालयास जोडून स्नानगृह देखील बांधतात परंतू निधीच्या अडचणीमुळे काही अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, अल्प उत्पन्न गटातील व्यक्तींना ते शक्य होत नाही. शौचालयासह स्नानगृहाची तेवढीच आवश्यकता ग्रामीण भागातील नागरीकांना आहे असे समितीचे मत आहे.नागरी भागातील काही स्थानिक स्वराज्य संस्था या आर्थिकदृष्टया सशक्त असून आपापल्या क्षेत्रातील जनतेकरीता दर्जदार शौचालये निर्माण करण्याकरीता काही ठिकाणी १७०००/- रुपयांपेक्षाही जास्त प्रोत्साहनपर अनुदान देण्यात आलेले आहे. शौचालयांच्या दर्जाच्या बाबतीत अधिकातअधिक असा विचार केला असता प्रोत्साहनपर अनुदान किती द्यावे हे त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थांवर सोडणे समितीस इष्ट वाटते. तथापि सद्या अस्तित्वात असलेले अनुदान देखील साहित्याच्या किंमती विचारात घेता शौचालय बांधकामास अपूरे आहे. त्यात लाभार्थ्यांने स्वत: रक्कम खर्च केल्याशिवाय दर्जेदार शौचालयाचे बांधकाम होत नाही. ग्रामीण व नागरी भागात दारिद्र्य रेषेखालील तसेच शेतमजूर व अल्प उत्पन्न गटातील व्यक्ती यांच्यासमोर ह्या अडचणी दिसून येतात.याकरीता केंद्र शासनाने घालून दिलेल्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे या शौचालयांचा कमाल दर्जा किंवा अनुदानाकरीता सिमीत दर्जा ठेवून अनुदान दिले पाहिजे. त्याचबरोबर शौचालयास लागून स्नानगृह देखील असावे असे समितीला वाटते. **नागरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांप्रमाणे चौदाव्या वित्त आयोगाच्या निधीमधून वाढीव ५००० रुपयांचे अनुदान ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्याचे अधिकार, निदेश, सूचना इत्यादी देण्याबाबत विभागाने विचार करावा तसेच अशा निधीत समानता राहावी यासाठी नागरी भागाच्या धर्तीवर ग्रामीण भागास देखील वैयक्तिक शौचालयाच्या बांधकामाकरीता १७०००/- रुपये निधी देण्याबाबत विभागाने शासनाकडे सकारात्मक भुमिका घेऊन प्रस्ताव सादर करावा व शासनाने यावर विचार करुन योग्य तो निर्णय घ्यावा. त्याचप्रमाणे शौचालयास लागून स्नानगृह बांधण्यास सकारात्मक विचार विनिमय करुन शौचालयास स्नानगृह योजना जोडून त्यासंदर्भात वाढीव निधी देण्याबाबत प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात यावा व शासनाने त्यावर सकारात्मक निर्णय घ्यावा अशी समितीची शिफारस आहे.**

**या अनुषंगाने नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागात डास निर्मुलनाच्या कार्यक्रमाचा भाग म्हणून शोषखड्याचा उपक्रम राबविल्याची माहिती प्राप्त झाली. स्नानगृहातील सांडपाणी रस्त्याच्या कडेला शोषखड्यात पाईपद्वारे सोडून त्याचा निचरा करण्यात येतो. यामुळे सांडपाणी उघड्यावर न राहता ते शोषखड्यात साठून राहते किंवा त्यात मुरते व डासांची उत्पत्ती थांबते. या शोषखड्याच्या बांधकामासाठी दोन ते अडीच हजार रुपये खर्च येतो. सदरची योजना ही नाविन्यपूर्ण असल्यामुळे राज्यात जिल्हा परिषदांद्वारे ती राबविण्याबाबत शासनाने योग्य तो शासन निर्णय घ्यावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, नांदेड (प्रशासन)

**नांदेड जिल्हयातील नदीकाठच्या गावांमध्ये दूषित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याबाबत.**

समितीने दिनांक १३ ते १५ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नांदेड जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसोबत केलेल्या अनौपचारीक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की,दूषित पाणी पुरवठा होत असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी मागास क्षेत्र अनुदान निधी (BRGF) योजनेमधून जलशुध्दीकरण संयंत्रे (R.O.Plant) बसविण्याचा निर्णय घेतला. परंतु जिल्ह्यामध्ये जलशुध्दीकरण संयंत्रे बसविण्यासाठी परवानगी मिळत नाही. वास्तविक पाहता ही जलशुध्दीकरण संयंत्रे बसविण्यासाठी निविदा सुध्दा मागविण्यात आल्या होत्या. परंतु अजूनही त्या निविदा उघडणे बाकी आहे. जिल्हा परिषदेची मागणी आहे की, या संदर्भातील अधिकार एकतर ग्रामपंचायतीला द्यावेत किंवा पंचायत समिती वा जिल्हा परिषदेला द्यावेत. दूषित पाण्यामुळे लोकांची हाडे ठिसूळ बनतात. त्यांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. सध्या दूषित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे.

**यासंदर्भात समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

नांदेड जिल्ह्यातील नदी काठच्या काही गावांमध्ये दुषित पाण्यामुळे फ्लोरोसिस इ. आजारांचे प्रमाण जास्त असून संबंधित गावांनी मागास क्षेत्र अनुदान निधी (BRGF) योजनेमधून पाणी शुध्दीकरणाकरिता जलशुध्दीकरण संयंत्रे बसविण्याचा निर्णय घेतला आहे. या कामाच्या निविदा समितीच्या भेटीच्या वेळेपर्यंत उघडण्यात आलेल्या नव्हत्या. परिणामी, दुषित पाण्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून त्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना आखली आहे,

**यासंदर्भात समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

मागास क्षेत्र अनुदान निधी (BRGF) ही योजना पूर्णपणे केंद्र पुरस्कृत असून जिल्ह्यात व महाराष्ट्रात सन २००९-१० या वर्षापासून राबविण्यात येत आहे. सन २००९-१० पासून सन २०१३-१४ वर्षापर्यंत या योजनेतून बहुतांश कामे ही रस्ते, नाली बांधकाम, सोलार लाईट इ.प्रकारची घेण्यात येत होती. परंतू सन २०१४-१५ वर्षात ग्रामपंचायत स्तरावर व्यापक प्रमाणात जागृती केल्यामुळे ग्रामपंचायतीने ग्रामसभांमध्ये नाली व पथदिव्यांचे कामे टाळून ग्रामीण लोकांच्या आरोग्याचा विचार करुन पिण्याचे शुध्द पाणी पुरविण्यासाठी जल शुध्दीकरण सयंत्रे (R.O.Plant) बसविण्याचा निर्णय घेण्यात आला. याबाबतचा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य ग्रामसभा व ग्रामपंचायतींना असल्याने त्या अनुषंगाने जिल्ह्यातील एकूण १३०९ ग्रामपंचायतीपैकी ४९५ ग्रामपंचायतीसाठी जल शुध्दीकरण सयंत्रे बसविण्यासाठीचे कामे सन २०१४-१५ च्या आराखड्यात प्रस्तावित करण्यात आली आहेत.

ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे पत्र क्र.बीआरजीएफ २०१४/प्र.क्र.२९/पंरा-६, दिनांक २० एप्रिल, २०१५ अन्वये ही योजना बंद झाली असून या योजनेची सर्व कामे ३१ मे, २०१५ पुर्वी करुन घेणे व जी कामे सुरु झाली नाहीत ती कामे तात्काळ रद्द करुन त्यांचा निधी जिल्हा स्तरावर जमा करुन घेण्याच्या सुचना दिल्या आहेत. योजना बंद झाल्याने ही कामे करणे शक्य नव्हते. शासनाचे दिनांक २० एप्रिल, २०१५ च्या पत्रामुळे या लोकाभिमुख योजनेचा निधी काम न होता शासनास जमा करावा लागणार होता. तेव्हा ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या प्रधान सचिवांना परिस्थिती समजावून सांगून ही कामे सुरु करण्याची परवानगी देणेबाबत या कार्यालयाचे पत्र क्र. १५०९, दिनांक ७ मे, २०१५ अन्वये विनंती केली. त्या अनुषंगाने शासनाने सदर जलशुध्दीकरण संयत्राची कामे पूर्ण करुन घेण्यासाठी शासनाचे पत्र क्र. बीआरजीएफ २०१४/प्र.क्र.६२/पंरा ६, दिनांक २५ मे, २०१५ अन्वये शासनस्तरावरुन मान्यता दिली आहे.

तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे पत्र क्र. बीआरजीएफ २०१४/प्र.क्र.३०/पंरा-६, दिनांक १९ जानेवारी, २०१६ अन्वये दिनांक ३० जून, २०१६ पर्यंत मुदतवाढ मिळाली आहे. सदरील जलशुध्दीकरण संयंत्राची कामे ग्रामपंचायत स्तरावर ई-निविदा प्रक्रियेद्वारे होत असून प्रशासकीय मान्यता दिलेल्या ४१० ग्रामपंचायतीच्या प्रस्तावापैकी ३०८ निविदा परिपूर्ण आढळून आल्या असून ७४ प्रकरणी पुन्हा निविदा मागविण्यात आल्या आहेत तर २८ प्रकरणे प्रलंबित आहेत. २४४ प्रस्तावाचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत.उर्वरित कामे तात्काळ पूर्ण करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. परिसरातील दुषित पाण्यामुळे

नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये म्हणून जलशुध्दीकरण संयंत्र प्रस्तावित असलेल्या ग्रामपंचायतीकडे ब्लिचिंग पावडर उपलब्ध आहे. तसेच पाणीपुरवठा विभाग, पंचायत विभाग व आरोग्य विभाग यांचेमार्फत नागरिकांच्या आरोग्य तपासणीबाबत वेळोवेळी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

**यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली:-**

ग्रामीण लोकांच्या आरोग्याचा विचार करुन पिण्याचे शुध्द पाणी पुरविण्यासाठी जलशुध्दीकरण संयंत्रे (R.O.Plant) बसविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. शासनाच्या दिनांक २५ मे, २०१५ रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिली आहे. तसेच पाणीपुरवठा स्वच्छता विभागाची दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्राप्त झाली आहे. ग्रामपंचायत स्तरावर ई-निविदा प्रक्रियेद्वारे जलशुध्दीकरण संयंत्रे (R.O.Plant) बसविण्याची कार्यवाही सुरु आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की जलशुध्दीकरण संयंत्रे (R.O.Plant) विषयासंदर्भात सद्यस्थिती काय आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, समितीने भेट दिली तेव्हा जलशुध्दीकरण संयंत्रेची (R.O.Plant) निविदा प्रक्रिया सुरु होती. जलशुध्दीकरण सयंत्राची निविदा (R.O.Plant) काढायला घेतले तेव्हा मुदत संपली होती. त्यासंदर्भात जिल्हा परिषदेने सचिव यांना विनंती केल्यानंतर मुदत वाढवून मिळाली. सदरहू मुदत जून पर्यंतची होती. २४४ प्रस्तावाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले. त्यापैकी जवळपास ५० चे साहित्य येऊन सुरुवात झालेली आहे. झालेले टेंडर येत्या मे महिन्यापर्यंत सुरु होतील. आरओमध्ये आता बऱ्यापैकी प्रगती झालेली आहे. येत्या जून महिन्यापर्यंत ते किमान ३०० हेडला कार्यान्वित होतील. येथून पुढे १४ व्या वित्त आयोगामध्ये जिल्ह्यात ही मोहीम राबवत आहोत. त्यामध्ये प्रत्येक मोठ्या ग्रामपंचायतीमध्ये प्राधान्याने जलशुध्दीकरण संयंत्रे (R.O.Plant) घेतले जाणार आहे. तदनंतर प्रधान सचिव ग्रामविकास यांनी समितीस माहिती दिली की, ग्रामीण भागामध्ये पिण्याचे शुध्द पाणी पुरविण्यासाठी जलशुध्दीकरण संयंत्रे (R.O.Plant) बसविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे याबाबत चांगला फरक दिसून येत आहे. आता मोठ्या प्रमाणात जलशुध्दीकरण संयंत्रे (R.O.Plant) घेतले जात आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी भागात काही लोकांकडे डेबीट कार्ड आहेत. काही लोक खुशीने देत आहेत. कारण यामध्ये त्यांचाही फायदा आहे. ही योजना बरोबर आहे, यासंदर्भात अजून अभ्यास करावा लागणार असल्याचे ग्रामविकास विभाग, प्रधान सचिवांनी विशद केले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, जलशुध्दीकरण संयंत्रे बसविण्यासंदर्भात कालमर्यादा ठरवून दिली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस स्पष्ट केले की, डिसेंबर महिन्यापर्यंत संपूर्ण नांदेड जिल्ह्यात १०० टक्के जलशुध्दीकरण संयंत्रे (R.O.Plant) बसविण्यात येणार आहेत. राज्य शासनाने देखील १४ व्या वित्त आयोगामध्ये जलशुध्दीकरण संयंत्रे (R.O.Plant) बसविण्यास परवानगी दिल्यामुळे सकारात्मक पावले उचललेली आहेत. एक, दोन वर्षामध्ये सर्व जिल्हामध्ये जलशुध्दीकरण संयंत्रे (R.O.Plant) बसविण्यात येणार आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने नांदेड जिल्हा परिषदेला भेट देऊन जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसोबत केलेल्या अनौपचारीक चर्चेच्या वेळी जिल्ह्यातील एकूण १३०९ ग्रामपंचायतीपैकी ४९५ ग्रामपंचायतीसाठी जलशुध्दीकरण संयंत्रे बसविण्याचे काम मागास क्षेत्र अनुदान निधी योजनेतून सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी तयार करण्यात आलेल्या आराखड्यात समाविष्ट करण्यात आली असून जलशुध्दीकरण संयंत्रे बसविण्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदा अद्याप उघडण्यात आल्या नसल्याची व त्यामुळे नागरीकांना शुध्द पाण्यापासून वंचित राहवे लागत असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली.

विकासातील प्रादेशिक असमतोल व विषमता दूर करण्याकरीता शासनाने मागास क्षेत्र अनुदान निधी(BRGF)या योजनेची सुरुवात केली. राज्यातील नांदेड सारख्या मागास म्हणून घोषित केलेल्या जिल्ह्यात उपलब्ध असलेल्या सहाय्यक अनुदानात अधिक भर घालून त्यांचे एकत्रिकरण आणि योग्य पूनर्योजन करण्याकरीता या निधीमार्फत जिल्हा परिषदांना अधिकचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला. जिल्हा परिषदांना नियमितपणे जिल्हा योजनेच्यामार्फत मिळणारा निधी तसेच जिल्हा परिषदांचा स्वनिधी इत्यादी योजनांमधून प्राप्त झालेला निधी पुरेसा नसेल तर विकासाच्या गरजांसाठी यामधून तफावत भरुन काढणे सदरहू योजनेत अभिप्रेत होते.

मागास क्षेत्र अनुदान निधी ही पूर्णपणे केंद्र पुरस्कृत असलेली योजना राज्यात सन २००९-१० पासून राबविण्यात येऊन दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी सदर योजना बंद करण्यात आली. **सदर योजनेअंतर्गत चालू असलेली कामे दिनांक ३१ मे, २०१५ पूर्वी पूर्ण करुन घेणे व जी कामे सुरुच झालेली नाही ती तात्काळ रद्द करुन त्यांचा निधी नांदेड जिल्हा परिषदेने शासनाकडे जमा करणे आवश्यक होते.परंतू ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या प्रधान सचिवांनी सदर जलशुध्दीकरण संयंत्रांची कामे बसविण्याबाबतच्या लोकाभिमुख योजनेस दिनांक ३० जून, २०१६ पर्यंत मुदतवाढ दिली असल्याप्रकरणी समिती समाधान व्यक्त करते. तसेच विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस आश्वस्थ केल्याप्रमाणे माहे, डिसेंबर, २०१६ अखेर संपूर्ण नांदेड जिल्ह्यातील जलशुध्दीकरण संयंत्रे बसविण्याचे काम पूर्ण करावे व केलेल्या कार्यवाहीचा ग्रामपंचायत निहाय अनुपालन अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, नांदेड (प्रशासन)

**सन २०१४-२०१५ या वर्षात नांदेड जिल्हयातील शाळा दुरुस्तीकरीता प्राप्त झालेला अपुरा निधी.**

समितीने दिनांक १३ ते १५ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नांदेड जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसोबत केलेल्या अनौपचारीक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की,तालुक्यातील जिल्हा परिषदांच्या शाळांना दुरुस्ती करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध नाही. जिल्ह्यामध्ये एकूण २२७३ शाळा आहेत. या शाळांच्या दुरुस्तीसाठी केवळ ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. जिल्हा परिषद शाळांच्या इमारती मोक्याच्या ठिकाणी आहेत. जिल्ह्यामध्ये शिक्षणाच्या बाबतीत अनुशेष आहे. ज्या ठिकाणी जिल्हा परिषदेच्या शाळांना इमारती नाहीत त्या ठिकाणी जिल्हा परिषदेने बीओटी (बांधा, वापरा व हस्तांतरीत करा) तत्त्वावर किंवा स्वत:च्या निधीतून इमारती बांधाव्यात. जेणेकरुन त्या शाळांची देखभाल आपल्याला करता येईल.

**यासंदर्भात समितीने साक्षीच्या वेळी शालेय शिक्षण व नियोजन विभागाकडून खालील माहिती मागविली.**

सन २०१४-१५ या वर्षात नांदेड जिल्ह्यातील सुमारे २२७३ शाळांच्या दुरुस्तीकरिता शासनाकडून किती निधी प्राप्त झाला सदर निधी अपुरा असल्यास त्यात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे.

**यासंदर्भात समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

शिक्षण विभाग (प्रा.) या कार्यालयास जिल्हा नियोजन समिती, नांदेडकडून प्राथमिक शाळांची विशेष दुरुस्तीकरीता लेखाशीर्ष-२२०२-३११ अंतर्गत निधी प्राप्त होत असतो. सन २०१२-१३ पासून ते २०१५-१६ पर्यंत जिल्हा नियोजन समिती, नांदेडकडून प्राप्त निधी व दुरुस्ती केलेल्या वर्ग खोली यांची माहिती खालीलप्रमाणे :

| अ.क्र. (१) | वर्ष (२) | प्राप्त निधी (३) | दुरुस्ती केलेल्या वर्ग खोली (संख्या) (४) |
|---|---|---|---|
| १ | २०११-१२ | १,००,००,०००/- | ७२ |
| २ | २०१२-१३ | २,००,००,०००/- | ८५ |
| ३ | २०१३-१४ | ४१,००,०००/- | ३९ |
| ४ | २०१४-१५ | ५०,००,०००/- | ४० |
| ५ | २०१५-१६ | ५०,००,०००/- | ४२ |

जिल्हा परिषद, नांदेड अंतर्गत २२४३ शाळा असून सदरील शाळेच्या दुरुस्तीकरिता सन २०१६-१७ मध्ये जिल्हा नियोजन समिती, नांदेडला प्राथमिक शाळेच्या विशेष दुरुस्तीकरिता रु.१.०० कोटी तरतुदीची मागणी करण्यात आलेली आहे. तसेच सर्व शिक्षा अभियान अंतर्गत देखभाल दुरुस्तीकरिता वर्षनिहाय खालीलप्रमाणे तरतुद प्राप्त झालेली आहे.

| अ.क्र. (१) | वर्ष (२) | वार्षिक तरतुद (३) | मंजुर तरतुद (४) | झालेला खर्च (५) |
|---|---|---|---|---|
| १ | २०११-१२ | २,१२,७१,०००/- | २,१२,७१,०००/- | १,६६,१०,०००/- |
| २ | २०१२-१३ | २,३५,२८,००/- | २,३५,२८,००/- | २,३५,२८,०००/- |
| ३ | २०१३-१४ | २,१६,८३,०००/- | २,१६,८३,०००/- | २,१६,८३,०००/- |
| ४ | २०१४-१५ | २,२५,००,०००/- | २,२५,००,०००/- | २,२३,८३,०००/- |
| ५ | २०१५-१६ | २,२०,८०,०००/- | २,२०,८०,०००/- | २,२०,८०,०००/- |

सदर तरतुद देखभाल दुरुस्ती करीता प्राप्त होत असून यामध्ये जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमध्ये आवश्यकतेनुसार शाळा व्यवस्थापन समितीचे मान्यतेने दुरुस्ती करण्यात येते.

**यासंदर्भात शालेय शिक्षण विभागाकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद शाळांच्या/वर्गखोल्या दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजन समितीकडून वार्षिक योजनेत तसेच सर्व शिक्षा अभियान अंतर्गत निधी उपलब्ध करण्यात येतो. जिल्हा नियोजन समितीकडून मंजूर वर्षनिहाय निधी तसेच सन २०१६-१७ मध्ये मागणी केलेला निधी याचा तपशील जिल्हा परिषद, नांदेड यांनी दिला आहे. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत केंद्र शासनाकडून वार्षिक कार्य योजनेच्या मर्यादेत निधी मंजूर करण्यात येतो. त्यानुसार नांदेड जिल्हयास सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मंजूर बांधकामे व निधी याचा तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | वर्ष | मंजूर बांधकामे | मंजूर निधी (रु.लाखात) |
|---|---|---|---|
| १ | २०१२-१३ | २९ | २८.६१ |
| २ | २०१३-१४ | - | - |
| ३ | २०१४-१५ | - | - |

नांदेड जिल्ह्यास सन २०१२-१३ मंजूर असलेली २९ प्राथमिक शाळा दुरुस्तीची बांधकामे पूर्ण झाली आहेत.

**यासंदर्भात नियोजन विभागाकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत "प्राथमिक शाळांच्या विशेष दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेला अनुदान" या शालेय शिक्षण विभागाच्या जिल्हास्तरीय योजनेचा समावेश आहे. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) चा आराखडा तयार करताना योजनेच्या संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेने केलेल्या मागणीच्या अनुषंगाने जिल्हा नियोजन समितीने दिलेल्या मान्यतेनुसार योजनांना निधी देण्यात येतो. सन २०१४-१५ मध्ये उपरोक्त योजनेसाठी जिल्हा नियोजन समिती, नांदेडच्या मान्यतेने जिल्हा परिषद, नांदेड यांच्या मागणीप्रमाणे एकूण रु.५०.०० लक्ष निधी वितरित करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे सन २०१४-१५ करीताही रु.५०.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला असून BDS वर सदर निधी १००% खर्च झाल्याचे निदर्शनास येते.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. समितीने साक्षीच्या वेळी अशी विचारणा केली की, सन २०१४-१५ या वर्षात नांदेड जिल्ह्यातील सुमारे २,२७३ शाळांच्या दुरुस्तीकरिता शासनाकडून किती निधी प्राप्त झाला, सदर निधी अपुरा असल्यास त्यात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली, यावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग (शालेय शिक्षण) यांनी समितीस विदित केले की, शासनाच्या धोरणानुसार सर्व शिक्षा अभियान अंतर्गत प्रत्येक शाळेला अनुदान दिले जाते व त्यामधून ते लहानसहान दुरुस्तीची कामे करु शकतात. नांदेड जिल्ह्यात सन २०१२-१३ मध्ये २८.६१ लाख रुपयांची २९ बांधकामे मंजूर करण्यात आली होती व ती पूर्ण झाली आहेत. तसेच, सदरहू दुरुस्तीच्या कामांसाठी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. निधी संदर्भात जिल्हा परिषदेने वेगळे भाष्य केले नाही परंतु शाळांच्या दुरुस्तीच्या कामासाठी निधी अपुरा पडल्याची शक्यता आहे असे मत व्यक्त केले.

## अभिप्राय व शिफारशी

नांदेड जिल्ह्यात सुमारे २२७३ शाळांच्या दुरस्तीकरीता सन २०१४-१५ या वर्षात ५० लाख रुपयांचा अपुरा निधी प्राप्त झाल्याबाबतची तक्रार समितीच्या नांदेड जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांशी झालेल्या अनौपचारीक चर्चेदरम्यान प्राप्त झाली.जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) प्राथमिक शाळांच्या विशेष दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेला अनुदान या शालेय शिक्षण विभागाच्या जिल्हास्तरीय योजनेचा समावेश आहे. सदर योजनेतून शाळाखोल्यांच्या

दुरुस्तीकरीता सरासरी मागील तीन वर्षापासून केवळ ४० ते ५० लक्ष रुपयांचा निधी प्राप्त झाल्याची व त्यातून ४० खोल्यांची दुरुस्ती झाल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. जिल्हा परिषद, नांदेड यांनी जिल्हा नियोजन समितीस शाळांच्या दुरुस्तीकरीता आवश्यक तो वाढीव निधीची मागणी करणे अपेक्षित होते. जिल्हा नियोजन समितीशिवाय सर्व शिक्षा अभियानांतर्गत देखील देखभाल दुरुस्तीकरीता मागील तीन वर्षात सुमारे सव्वादोन कोटी रुपयांचा निधी प्राप्त होऊन त्या त्या आर्थिक वर्षात शाळा दुरुस्तीवर रक्कम खर्च झाल्याची माहिती समितीस प्राप्त झाली.

जिल्हा नियोजन समिती व केंद्र शासनाच्या सर्व शिक्षा अभियानमार्फत सन २०११-१२ पासून वेळोवेळी ११ कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी नांदेड जिल्हा परिषदेला मिळाला आहे. यातून प्रत्येक शाळाखोली दुरुस्ती होणे आवश्यक आहे. तशा प्रकारचे नियोजन देखील जिल्हा परिषदेने केल्याचे त्यांनी दुरुस्त केलेल्या शाळा खोल्यांवरून दिसून येते. अनौपचारिक चर्चेत जिल्हा परिषदेतील शाळा खोल्यांच्या दुरुस्तीसाठी निधीची मागणी जिल्हा परिषदेतील लोकप्रतिनिधींनी केली आहे. यात काही शाळांची दुरुस्ती झाली नसणार ही शक्यता गृहित धरुन डोंगरीभाग, आदिवासी भाग व इतर **ज्या भागात उपरोक्त नमुद केलेल्या निधीमधून शाळा दुरुस्ती केल्या नाहीत अशा शाळांचा जिल्हा परिषद शिक्षण विभागाने सर्वे करुन त्याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल जिल्हा परिषदेला सादर करावा. या अहवालाच्या आधारे जिल्हा परिषदेने जिल्हा नियोजन समितीकडे शाळा दुरुस्तीसाठी मागणी करावी व जिल्हा नियोजन समितीने याबाबत सकारात्मक निर्णय घेऊन ज्या शाळा खोल्यांची अद्यापही दुरुस्ती केली नाही अशा शाळा खोल्यांसाठी विशेष निधी मंजूर करावा अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात पाठवावी.**

प्रकरण चार

## जिल्हा परिषद, नांदेड (प्रशासन)

### नांदेड जिल्हयातील शाळांत मुख्याध्यापक व विषय शिक्षकांच्या रिक्त जागा.

समितीने दिनांक १३ ते १५ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नांदेड जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसोबत केलेल्या अनौपचारीक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की,७० टक्के शाळांना मुख्याध्यापक नाहीत. तसेच विषय शिक्षक सुध्दा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. जिल्हयामध्ये शिक्षणाच्याबाबतीत अनुशेष आहे.

**यासंदर्भात समितीने साक्षीच्या वेळी शालेय शिक्षण विभागाकडून खालील माहिती मागविली.**

नांदेड जिल्ह्यातील बहुतांशी शाळांना मुख्याध्यापक व विषय शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे.

**यासंदर्भात समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद, नांदेड अंतर्गत माध्यमिक शाळेमध्ये खालीलप्रमाणे विषय शिक्षक उपलब्ध आहेत

**मराठी माध्यम**

| विषय | गणित | विज्ञान | इति.भूगोल | मराठी | हिंदी | इंग्रजी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मान्य | ७७ | २८ | ६३ | २२ | १५ | ७८ | २८३ |
| भरलेली | ५८ | ४७ | ६५ | ३७ | २२ | ७८ | ३०७ |
| रिक्त | १९ | ० | ० | ० | ० | ० | १९ |
| अतिरिक्त | ० | १९ | २ | १५ | ७ | ० | ४३ |

**उर्दू माध्यम**

| विषय | गणित | विज्ञान | इति.भूगोल | मराठी | हिंदी | इंग्रजी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मान्य | ८ | ४ | ३ | ३ | ० | ५ | २३ |
| भरलेली | २ | १ | ३ | ४ | ० | ४ | १४ |
| रिक्त | ६ | ३ | ० | ० | ० | १ | १० |
| अतिरिक्त | ० | ० | ० | १ | ० | ० | १ |

गणित विषयाचे रिक्त १९ पदे पदोन्नतीने उपलब्ध होत नाहीत.त्यामुळे ती सरळसेवेने भरण्यासाठी परवानगी मिळणेस्तव मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे कार्यालयात पत्र क्र.४९३०, दि.२३.६.२०१५ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तसेच मा.शिक्षण आयुक्त यांना देखील या कार्यालयाच पत्र क्र.४१०१, दि.१३.०५.२०१५ अन्वये सदर रिक्त पदे सरळसेवेने

भरणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.सध्याच्या परिस्थितीत प्राथमिक शिक्षकातील पदवीधरांकडून जे विषयक शिक्षक उपलब्ध नाहीत त्याचे अध्यापन करुन घेण्यात येते त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे असे म्हणता येणार नाही.

**यासंदर्भात शालेय शिक्षण विभागाकडून उपरोक्त मुद्दयाची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद नांदेड यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष.**

समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की  नांदेड जिल्ह्यातील बहुतांशी शाळांना मुख्याध्यापक व विषय शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, त्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली आहे, यावर प्रधान सचिव शालेय शिक्षण व क्रिडा विभाग (शालेय शिक्षण) यांनी समितीस विदित केले की, सदरहू प्रकरणी जिल्हा परिषद यांनी अंतर्गत माध्यमिक शाळेमधील विषय शिक्षकांची माहिती अनुपालन अहवालातील तक्त्यामध्ये दिली आहे. त्यानुसार मराठी माध्यमामध्ये गणित विषय शिक्षकांची १९ पदे रिक्त आहेत, तसेच, विज्ञान विषय शिक्षकांची १९ पदे, इतिहास व भूगोल विषय शिक्षकांची २ पदे, मराठी विषय शिक्षकांची १५ पदे, हिंदी शिक्षकांची ४३ पदे अशी एकूण ४३ पदे अतिरिक्त ठरलेली आहेत. उर्दू माध्यमातील उर्दू विषय शिक्षकांची १० पदे रिक्त आहेत व १ पद अतिरिक्त आहे यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, अतिरिक्त ठरलेल्या विषय शिक्षकांच्या भरतीस कोण जबाबदार आहे. त्यावर शिक्षण विभागाच्या सचिवांनी विदीत केले की, पदे भरण्यास मान्यता शिक्षण विभागाकडून देण्यात येत असते. हिंदी शिक्षकांची १५ पदे मंजूर असताना २२ पदे भरण्यात आली आहेत. सर्व शिक्षा अभियान येण्यापूर्वी विषय शिक्षकांची पद भरती करण्यात येत नव्हती. सर्व शिक्षा अभियान आल्यानंतर विषयनिहाय शिक्षकांची पद भरण्याचा नियम करण्यात आला. त्यापूर्वी शिक्षक भरती करताना कोणत्या विषयाचा शिक्षक आहे हे पाहण्यात येत नव्हते.

समितीने पुढे विचारणा केली की, माध्यमिक शाळेत भरलेल्या पदांना शिक्षण विभागाने मान्यता दिलेली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सदरहू माध्यमिक शिक्षकांची पदे भरण्यात आली त्यावेळी संबंधित शाळेत आवश्यक विद्यार्थी संख्या होती. काळाच्या ओघात विद्यार्थी संख्या कमी झाल्याने शिक्षक अतिरिक्त ठरलेले आहेत. यावर समितीने पुढे आणखी अशी विचारणा केली की, गणित हा विषय सोडला तर इतर सर्व विषय शिक्षकांची पदे मान्यतेपेक्षा अधिक भरलेले आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस स्पष्ट केले की, यामध्ये सरळ सेवेची ५० टक्के पदे व पदोन्नतीची ५० टक्के पदे असे दोन प्रकार आहेत. त्यावेळी सरळ सेवेने किंवा पदोन्नतीने इतर विषयातील शिक्षक मिळाले असतील पण गणित व इंग्रजी विषयाचे शिक्षक मिळाले नसतील त्यामुळे सदर पदे रिक्त असण्याची शक्यता आहे.

शिक्षकांची रिक्त पदे हा विषय संपूर्ण महाराष्ट्राचा आहे, वास्तविकता अशी आहे की, कनिष्ठ शिक्षकांना पदोन्नती दिलेली नसल्यामुळे त्यांची संख्या कमी दिसत आहेत, काही ठिकाणी एमएस्सी बीएड शिक्षक उपलब्ध आहेत, महाराष्ट्रात वर्षानुवर्षे पदोन्नतीने पदे भरली जात नाहीत. समितीने अशी विचारणा केली की, शिक्षकांची अनेक पदे भरलेली नाहीत, त्याची कारणे काय आहेत. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर पदे भरण्यासाठी समिती नियुक्त करण्यात आलेली आहे. त्यानंतर प्रधान सचिव शालेय शिक्षण व क्रिडा विभाग (शालेय शिक्षण) यांनी समितीस विदित केले की, प्रत्येक शाळेला संच मान्यता घ्यावी लागते, किती विषय आहेत, त्यांची मुले किती आहेत, कोणत्या विषयांची मुले कमी झाली आहेत, त्यानुसार शिक्षकांची भरती केली जाते.

समितीच्या मते शासन पातळीवर निर्णय होत असला तरी विषयानुसार शिक्षकांची नियुक्ती केली जाते. जेवढे विषय असतील तेवढे शिक्षक नियुक्त करणे आवश्यक आहेत. प्रधान सचिव शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांनी समितीस विदित केले की, शाळेमध्ये प्रत्येक विषयांचे दोन दोन शिक्षक असतात, आता ही पदे कमी झाली असून एका विषयाला एक शिक्षक आहेत, एखादा शिक्षक सेवानिवृत्त झाला तर ते पद भरले जात नाही. त्यामुळे इतर विषयांचे शिक्षक अतिरिक्त झाले आहेत, त्या शिक्षकांना इतर ठिकाणी पाठवून ती पदे भरण्याची कार्यवाही करावी लागत आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात आले आहे काय, सर्व अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन जिल्हा परिषदेने करणे आवश्यक आहे. एखादा शिक्षक जास्त झाला तर शिक्षणाधिकारी यांनी इतर शिक्षण संस्थेत त्याची नियुक्ती केली पाहिजे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, जिल्हा परिषदेकडे जे अतिरिक्त शिक्षक होते त्यांचे समायोजन करण्यात येत असून त्यांना इतर ठिकाणी नियुक्ती दिली जात आहे. नांदेड जिल्हा परिषदेमध्ये पदवीधर शिक्षकांची पदे भरपूर आहेत, जी पदे रिक्त आहेत त्या ठिकाणी पदवीधर शिक्षक काही वर्गांना शिकवित आहेत, पाचवी, सहावी अशा वर्गावर हे शिक्षक काम करीत आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या उत्तरावर अधिक स्पष्ट करत प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, गेल्या तीन वर्षापासून शिक्षकांचे समायोजन झाले नाही. सन २०१२ मध्ये अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यावेळी कोर्टातून स्टे ऑर्डर मिळाली होती. आता स्टे उठविण्यात आला आहे. ३० एप्रिल पर्यंत या नियुक्त्या करावयाच्या आहेत, संपूर्ण राज्यात अतिरिक्त शिक्षकांचा प्रश्न निर्माण झाला आहे. २० मे पर्यंत समायोजन करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना जिल्हा परिषदेने दिलेल्या आहेत.

**अभिप्राय व शिफारशी**

समितीने नांदेड जिल्हा परिषदेला भेट देऊन जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसोबत केलेल्या अनौपचारीक चर्चेच्या वेळी नांदेड जिल्हा परिषदेमध्ये मुख्याध्यापकांची तसेच विषय शिक्षकांची पदे रिक्त असून ती भरण्याबाबत समितीला जिल्हा परिषदेच्या लोकप्रतिनिधींनी विनंती केली होती. समितीने शासनाला नांदेड जिल्हा परिषदेतील बहुतांश शाळांमध्ये मुख्याध्यापक व विषय शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे अशी समितीने विचारणा केली असता जिल्हा परिषदेने समितीस सादर केलेल्या लेखी स्वरुपाच्या माहितीमध्ये मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये १९ पदे रिक्त असून ४३ शिक्षक अतिरिक्त असल्याचे नमूद केले आहे. त्याचप्रमाणे उर्दू माध्यमांच्या शाळांमध्ये १० पदे रिक्त असून १ अतिरिक्त शिक्षक असल्याचे नमूद केले आहे. तथापि, नांदेड जिल्हा परिषदेअंतर्गत शाळांमध्ये मुख्याध्यापकांची एकूण किती पदे रिक्त आहेत ही बाब जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीत नमूद केलेली नाही. त्याचप्रमाणे विभागीय सचिवांच्या साक्षीमध्येदेखील याबाबतीत समितीस माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

**जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमांच्या शाळांमधून विषय शिक्षकांची १९ पदे रिक्त आहेत आणि ४३ अतिरिक्त शिक्षक आहेत. साक्षीचे वेळी समितीस सांगितल्याप्रमाणे या ४३ अतिरिक्त शिक्षकांमधून रिक्त असलेली पदे भरण्यात यावीत तसेच उर्दू माध्यमाच्या शाळांच्या बाबतीत देखील याप्रमाणेच कार्यवाही करण्यात यावी. त्याचप्रमाणे नांदेड जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मुख्याध्यापकांची पदे रिक्त असल्यास ती देखील भरण्याची कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद नांदेड (प्रशासन)

## तेलंगणा राज्याच्या धर्तीवर घरकुलासाठी अनुदान देणेबाबत

समितीने दिनांक १३ ते १५ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नांदेड जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसोबत केलेल्या अनौपचारीक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, दुसऱ्या राज्यात केंद्राचा आणि राज्याचा पैसा एकत्र करुन चांगल्या योजना राबविल्या जातात. तेलंगणा राज्यात एका घरकुलासाठी ५ लाख रुपये दिले जातात. तेलंगणामध्ये घरकुलासाठी दारिद्रय रेषेचे कोणतीही अट घातली जात नाही. या ठिकाणी संपूर्ण गावाची घरकुलाची मागणी पूर्ण केली जाते. त्या ठिकाणी डीआरडीएसाठी कोणत्याही प्रकारची अट नाही. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, तामिळनाडू आणि आंध्रप्रदेशामध्ये चांगल्या प्रकारची कामे झालेली आहेत. या दोन राज्यातील कामे पाहून समितीने त्या संदर्भात शिफारस करावी. या राज्यांमध्ये फ्लॅट सिस्टीम सुरु आहे. या सर्व कामांसाठी निधी कसा जमविला जातो याची सुध्दा माहिती घेण्यात यावी.

**यासंदर्भात समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

तेलंगणा या शेजारच्या राज्यात घरकुलासाठी रुपये ५ लक्ष अनुदान दिले जाते व तेथे दारिद्रय रेषेची अट नाही. तेलंगणा राज्याच्या धर्तीवर घरकुलाची योजना राज्यात राबविण्याबाबतची शासनाची काय भूमिका आहे.

**यासंदर्भात समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

तेलंगणा राज्याच्या धर्तीवर घरकुलाची योजना राज्यात राबविण्याबाबतची शासनाची भूमिका राज्य स्तरावरुन मांडणे योग्य.

**यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून उपरोक्त मुद्दयाची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

इंदिरा आवास योजना ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. योजनेची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार करण्यात येते. इंदिरा आवास योजनेच्या निधी वाटपाचे प्रमाण ६०:४० असे आहे. केंद्र शासनाने दि.१/४/२०१३ पासून इंदिरा आवास योजनेच्या प्रति घरकुलाचे अनुदान रु. ७०,०००/- इतके निश्चित केले आहे. राज्य शासनाने योजनेचा अतिरिक्त हिस्सा रु. २५,०००/- निश्चित केला असून राज्यात योजनेच्या प्रति घरकुल अनुदान रु.९५,०००/- इतके आहे.

### अभिप्राय व शिफारशी

समितीने नांदेड जिल्हा परिषदेला भेट देऊन जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांसमेवत केलेल्या अनौपचारिक चर्चेदरम्यान समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, नांदेड जिल्ह्यास लागून असलेल्या तेलंगणा राज्यात एका घरकुलासाठी ५ लक्ष रुपयांपर्यंत अनुदान दिले जाते. तसेच तेथे द्रारिद्रय रेषेची कोणतीही अट घातली जात नाही व गावातील घरकुलांची संपूर्ण मागणी पूर्ण केली जाते. तेलंगणा राज्याच्या धर्तीवर राज्यात घरकुलासाठी अनुदान देण्यात यावे अशी मागणी समितीकडे करण्यात आली. केवळ तेलंगणा राज्यच नव्हे तर देशातील तामिळनाडू व आंध्रप्रदेश या राज्यांनी घरकुलांची योजना चांगल्या प्रकारे राबविली असून त्याअनुषंगाने सदरहू योजना राज्यात राबवितेवेळी काही बदल करता येतील का याबाबत समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली. विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान सचिवांनी राज्यात योजनेचे प्रती घरकुल अनुदान रुपये ९५०००/- इतके आहे याच्या व्यतिरिक्त काहीही माहिती समितीस उपलब्ध करुन दिली नाही. वस्तुत: सदरहू प्रकरणावर समितीसमोर साक्षीकरीता येताना तेलंगणा, तामिळनाडू व आंध्रप्रदेश या राज्यातील घरकुलांच्या योजनेतील फेरफारांविषयी तुलनात्मक अभ्यास करुन समितीस माहिती उपलब्ध करुन देणे विभागीय सचिवांना शक्य होते. परंतू विभागीय सचिवांनी अशा प्रकारची विस्तृत माहिती समितीस उपलब्ध करुन दिली नाही. परिणामी समितीस इंदिरा आवास या अत्यंत महत्वाच्या योजनेवर उहापोह करता आला नाही याबाबत समिती नाराजी व्यक्त करते.

अतएव राज्यातील अनुसूचित जाती/जमातीचे सदस्य, मुक्त वेठबिगार तसेच ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील जाती/जमातीच्या गरीब व्यक्ती यांना सहाय्यक अनुदान देऊन बेघर कुटुंबांना हक्काचे निवास उपलब्ध करुन देणे हे उद्दिष्ट असलेल्या मुळ इंदिरा आवास योजनेचे नाव बदलून "प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण)" असे करण्यात आले आहे. या शासनाच्या महत्वाकांक्षी योजनेची लाभार्थ्यांची कायम प्रतिक्षायादी ही मोठ्या प्रमाणावर आहे. तिच्या अंमलबजावणीमध्ये अनेक समस्या असून देशातील इतर राज्ये जसे तेलंगणा, तामिळनाडू व आंध्रप्रदेश यांनी घरकूलांच्या योजनेत तेथील परिस्थितीनुसार काही फेरफार करुन योजनेची प्रभावी अंमलबजावणी केली आहे.

जिल्हा परिषदेला भेटी देत असताना समितीला असे आढळून आले की, राज्यात अनेक लोक बेघर असून त्यांची घरकुलांची मागणी मोठ्या प्रमाणावर आहे. राज्य शासन व केंद्र शासन घरकुलांकरीता ९५०००/- हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देत असल्याचे दिसून येत आहे. आजच्या बाजार भावाप्रमाणे बांधकाम साहित्याच्या किंमतीत झालेली वाढ लक्षात घेता कुटुंबासाठी ९५०००/- रुपयांमध्ये घरकुल तयार करणे ही बाब अशक्यप्राय वाटते. वर नमूद केल्याप्रमाणे इतर राज्यांत घरकुलांसाठी दिल्या जाणाऱ्या अनुदानात मोठी वाढ केली असल्याचे व त्यांचा दर्जा देखील चांगला असल्याचे काही समिती सदस्यांच्या पाहण्यात आलेले आहे. **प्रत्येक नागरीकांस शासनाने निवारा उपलब्ध करुन देणे हे कल्याणकारी राज्याचे कर्तव्यच आहे. त्यामुळे घरकुलांसाठी निधी देताना दिल्या जाणाऱ्या निधीत लाभार्थ्यांस राहण्याकरीता घर बांधणे शक्य व्हावे अशी तरतूद करणे इष्ट आहे असे समितीस वाटते. सबब, समितीने व्यक्त केलेल्या मतानुसार तेलंगणा राज्याच्या धर्तीवर घरकुलांकरीता निधी देण्याविषयी शासनाची काय भुमिका आहे हे साक्षीदरम्यान स्पष्ट झाले नसल्यामुळे शासनाने यासंदर्भात योग्य ती भूमिका घ्यावी अशी समितीची शिफारस आहे व त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, नांदेड (प्रशासन)

**दलित वस्ती सुधार योजनेच्या निधीतून गावातील रस्ते दलित वस्तींना जोडण्याबाबत :**

समितीने दिनांक १३ ते १५ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नांदेड जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसोबत केलेल्या अनौपचारीक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, जनतेच्या मूलभूत गरजांकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. दलित वस्तीचा पैसा आला की, तो दलित वस्तीमध्ये खर्च करण्यात येतो. परंतु ज्या दलित वस्त्यांमध्ये योजना पोहचल्या नाहीत, अशा ठिकाणी हा निधी खर्च केला जात नाही. म्हणजे मुख्य रस्त्याला दलित वस्त्या जोडल्या गेल्या पाहिजेत. गावात जाणाऱ्या मुख्य रस्त्याला दलित वस्तीमध्ये जाणारे रस्ते जोडले गेले पाहिजेत. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, दलित वस्तीचे रस्ते मुख्य रस्त्याला जोडले गेले तरच या गावांचा विकास होऊ शकेल.

**यासंदर्भात समितीने साक्षीच्या वेळी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून खालील माहिती मागविली.**

दलितवस्तीचा निधी दलितवस्तीतच खर्च करण्यात येतो. परंतु सदर निधीतून गावात जाणाऱ्या मुख्य रस्त्याला दलितवस्तीमध्ये जाणारे रस्ते जोडण्याची कामे घेता येत नाहीत. दलितवस्ती व्यतिरिक्त इतर रस्त्यांच्या कामांना निधी उपलब्ध करुन देऊन गावातील रस्ते दलित वस्तींना जोडण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे.

**यासंदर्भात समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक दवसु-२०१३/प्र.क्र./८५/अजाक-१ दिनांक ०१ ऑगस्ट २०१३ मध्ये कामे मंजूर करताना प्राध्यान्याने पाणी पुरवठा, मलनि:सारण, पोहोच रस्ते, अंतर्गत रस्ते, वीजपुरवठा व समाजमंदिर अशी कामे घेण्यात यावे असे निर्देश आहेत. तथापि दलितवस्ती सोडून इतर वस्तींना निधी देवून गावातील रस्ते दलित वस्तींना जोडण्याबाबत शासन स्तरावरुन निर्णय अपेक्षित आहे. तसे या कार्यालयाचे पत्र क्रमांक ४७७ दिनांक २३ फेब्रुवारी २०१६ च्या पत्रान्वये मा.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महोदय यांना पत्र दिले आहे.

**यासंदर्भात सामाजिक न्याय विभाग विभागाकडून उपरोक्त मुद्दयाची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त**

**झाली.**

सदर बाब धोरणात्मक असल्याने त्यावर शासन स्तरावर विचार करण्यात येईल.

**विभागीय सचिवांची साक्ष**

समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सचिवांनी समितीस माहिती दिली की, दलितवस्ती व्यतिरिक्त इतर रस्त्याच्या कामांना निधी उपलब्ध करुन देऊन गावातील रस्ते दलित वस्तींना जोडण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे, असा मुद्दा काढण्यात आलेला आहे. यामध्ये अनुसूचित जाती उपयोजनेसाठी पैसे असतात, त्याचा वापर केवळ अनुसूचित जातीमधील लोकांसाठीच करता येतो. तसेच दलित वस्तीमध्ये त्याचा वापर करता येतो. परंतु, दलित वस्तीच्या बाहेरील क्षेत्रामध्ये जोड रस्ता असेल तर त्या ठिकाणी खर्च करणे अनुज्ञेय नाही. तरी शासन पातळीवर पुन्हा एकदा त्याची तपासणी करुन घेतली जाणार आहे. ती कामे जनरल बजेटमधून खर्च करणे उचित होईल.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, दलित वस्ती आणि दलित वाढमध्ये थोडाफार फरक असू शकतो. अशा ठिकाणी खर्च करण्यास कोणती अडचण आहे, दलित वस्तीला जोडणारा भाग प्राधान्याने घेतला पाहिजे असे सचिवांचे म्हणणे आहे.

समितीच्या मते ग्रामपंचायत सदस्य निवडून आलेला जो भाग आहे, अशा ठिकाणी का खर्च करुन नये या प्रश्नावर उत्तर देताना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सचिवांनी समितीस माहिती दिली की, निवडणुकीच्या प्रक्रियेबाबत या ठिकाणी भाष्य करुन इच्छित नाही. ज्या ठिकाणी अनुसूचित जातीमधील लोकांचे वास्तव्य आहे, त्याला दलित वस्ती म्हणून संबोधले जाते. त्या ठिकाणी खर्च केला जातो. जनरल प्लॅनमधील निधी लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार अनुसूचित जातीमधील लोकांसाठी ठेवलेला आहे. इतर ठिकाणी एक किंवा दोन दलित कुटुंब असतील तर आणि त्या ठिकाणी ९० टक्के समाज इतर वर्गातील असेल तर अशा ठिकाणी दलित वस्तीचा निधी खर्च करणे कठिण होऊन बसणार आहे.

समितीने पुढे आणखी अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेतील समाजकल्याण समितीच्यामार्फत निधीचे वाटप आणि लाभार्थ्यांची निवड केली जाते. यामध्ये अनेक सदस्यांवर अन्याय होत असतो. निधीचे समन्यायी वाटप व्हावे, अशी समितीची आग्रही भूमिका आहे. यासंदर्भात सचिवांकडून आदेश दिले जातील काय, या प्रश्नावर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सचिवांनी समितीस माहिती दिली की, जिल्हा परिषदेमध्ये समाजकल्याण समितीच्यामार्फत निधी वाटपाच्या संदर्भातील निर्णय घेतला जातो. ज्या भागात समिती काम करते त्याच भागात निधी वर्ग केला जातो, अशी वस्तुस्थिती असते. परिणामी जिल्ह्यातील इतर भाग वंचित राहतो. दलित वस्तीसाठी निधी त्याच ठिकाणी खर्च केला जातो. दलित वस्तीसाठी जो निधी असतो त्याचा योग्य पध्दतीने वापर झाला पाहिजे. जर निधी वाटपाच्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी ॲथोरिटी म्हणून काम करावे अशी सूचना समितीने केली. शासन पातळीवर अधिनियमात सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करावा लागणार आहे. काही गावांमध्ये कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. तसेच काही गावांमध्ये दलित वस्त्या असून सुध्दा ती गावे विविध सुविधा मिळण्यापासून वंचित राहतात. ही असमानता राहू नये याकरिता स्थानिक आमदार तसेच सीईओ यांना समितीमध्ये घेणे अत्यावश्यक आहे. जेणेकरुन मनमानी पध्दतीने होणारे निधीचे वाटप होत आहे, ते होणार नाही. यावर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सचिवांनी समितीस पुढे आणखी माहिती दिली की, अमूक अमूक वर्षी अशी कामे झाली आहेत याबाबतची माहिती मॉर्डन टेक्नालॉजीच्या मदतीने मॅपिंग करुन वेबसाईटवर ठेवल्यास ती कामे मॅपमध्ये दिसू शकतील. अशा प्रकारे लोकांना कामांची माहिती मिळण्यास मदत होईल. यावर समितीने विचारणा केली की, यावर्षी एद्याद्या ठिकाणी काम झाले असले तरी पुढील वर्षी तसेच त्यानंतर सुध्दा तेथेच कामे केली जातात. हा अडचणीचा विषय असतो. यामुळे २ वर्षे किंवा ३ वर्षे असा कालावधी टाकता येईल का तसेच एकाच गावाला एकदा नव्हेतर तीन वेळा रस्ते झाल्याची उदाहरणे समितीच्या निदर्शनास आली आहेत. सचिवांनी समितीला मॅपिंगबाबत माहिती दिली आहे. त्यानुसार कार्यवाही केल्यास ही बाब शक्य होऊ शकते यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला याबाबतची नोंद घेत असल्याचे सांगितले.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने नांदेड जिल्हा परिषदेला भेट देऊन जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांसमवेत केलेल्या अनौपचारिक चर्चेदरम्यान समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, गावात जाणाऱ्या मुख्य रस्त्याला दलीत वस्तीमध्ये जाणारे रस्ते जोडले जाणे आवश्यक आहे. अशा जोड रस्त्यांकरीता दलित वस्ती सुधार योजनेचा निधी खर्च करण्याची परवानगी शासनाने देणे आवश्यक आहे. समितीने सदरहू प्रकरणी विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षीदरम्यान विभागीय सचिवांनी सदरहू बाब धोरणात्मक असल्याने शासन स्तरावर त्यावर विचार करता येईल अशा प्रकारची माहिती समितीला दिली.

अर्वाचिन काळापासून भारतीय समाज व्यवस्थेत अनुसूचित जातीमधील लोकांच्या वस्तीची रचना मुख्य गावठानापासून वेगळी करण्यात येत असे. स्वातंत्र मिळाल्यानंतर सुमारे ७० वर्षांचा प्रदिर्घ कालावधी लोटूनही आजही अनुसूचित जातीच्या दलित वस्त्या ह्या गावाच्या वेशिबाहेर म्हणजेच गावकुसाच्या बाहेर आहेत. ग्रामीण भागातील मुख्य वस्तीतील कारभारी हा प्रस्थापित वर्ग असल्यामुळे गावाबाहेर असलेल्या दलित वस्त्यांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता अनुसूचित जातीच्या वसाहतीत दलित वस्ती सुधारणा योजना ही सन १९७२ पासून राबविण्यात येत आहे. सदर दलित वस्ती सुधारणा योजनेचे नाव तद्नंतर शासनाने "अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे"असे नामकरण केले आहे. सदर योजनेची फलश्रुती चांगली आढळून आल्यामुळे शासनाने सन २००३ मध्ये भटक्या जमातीच्या तांड्यांना प्राथमिक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता स्वतंत्र तांडा/वस्ती सुधार योजना सुरु केलेली आहे. कल्याणकारी राज्य ही संकल्पना शासनाने अंगिकृत केलेली असल्यामुळे शेकडो वर्षे अनुसूचित जाती अशा वस्त्यांमध्ये राहत असल्यातरी अद्यापही या वस्त्यांतील पायाभूत सोयी-सुविधा या मुख्य वस्तीतील सोयी-सुविधांच्या बरोबरीने आलेल्या नाहीत. मागासवर्गीयांना या पायाभूत सुविधा

मिळत असताना मुख्य गावापासून दलित वस्त्यांना जोडणारे रस्ते अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेतून करण्याची परवानगी मिळावी अशा प्रकारची अभिवेदने समितीस प्राप्त झाली आहेत. मागणी करणाऱ्यांची मागणी रास्त असली तरी दलीत वस्तीचा निधी गावातील सवर्ण व्यक्तींना दिल्यास दलित किंवा नवबौध्दांच्या वस्त्या गावातील इतर लोकांची संख्या व त्यांचे आर्थिक व राजकीय स्थिती विचारात घेता विकासापासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही असे समितीचे मत आहे.

"अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे" या योजनेसाठी दरवर्षी राज्यस्तरावर वितरित होणारा निधी आणि संपूर्ण राज्यातील दलित वस्त्यांना पायाभूत सोयी-सुविधा पुरविणे, त्यांचा विकास करणे यासाठी आवश्यक असणारा निधी यातील तफावत लक्षात घेतली असता सदरहू योजनेचा निधी दलित वस्तीच्या बाहेर वापरणे संयुक्तिक ठरणार नाही. **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक दवसु-२०१३/प्र.क्र./८५/अजाक-१, दिनांक ०१ ऑगस्ट, २०१३ अनुसार दलित वस्तीमध्ये कामे मंजूर करताना प्राध्यान्याने पाणीपुरवठा, मलनि:सारण, पोहोच रस्ते, अंतर्गत रस्ते, वीजपुरवठा व समाजमंदिर अशी कामे घेण्यात यावे असे निर्देश आहेत. परंतू दलितवस्ती सोडून इतर वस्तींना निधी देवून गावातील रस्ते दलित वस्तींना जोडण्याबाबत शासन स्तरावरुन निर्णय घेण्याकरीता नांदेड जिल्हा परिषदेने पत्र क्रमांक ४७७, दिनांक २३ फेब्रुवारी २०१६ च्या नुसार प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्याकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. उक्त प्रस्तावावर मागासवर्गीय व इतर वंचित घटकांच्या हक्कावर गदा येणार नाही ही भूमिका विचारात घेऊन शासनाने उक्त प्रस्तावावर विचार करावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण सात

# जिल्हा परिषद, नांदेड (प्रशासन)

## मौ.भोरड व पांढरी (ता.माहूर) व मांडवी, ता.किनवट गावातील गैरव्यवहाराबाबत

समितीने दिनांक १३ ते १५ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नांदेड जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसोबत केलेल्या अनौपचारीक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की,जिल्हा परिषदेमार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची समितीमार्फत तपासणी केली पाहिजे. किनवट व माहुर हे तालुके नांदेड मुख्यालयापासून १५० कि.मी. दूर आहेत. बहुतांश गावांमध्ये अंगणवाडी, शाळा खोल्या, दलित वस्ती, रस्ते यांची कामे अर्धवट स्थितीत आहेत. ग्रामस्थांच्या तक्रारींचे निराकरण होत नाही. ग्रामसेवकाला निलंबित केल्यामुळे कामे अर्धवट राहतात. निधी उपलब्ध होत नाही. उपलब्ध झालेल्या निधीचा अपहार केला जातो. तक्रार करुनही अधिकारी चौकशी करण्यास जात नाहीत. माहुर तालुक्यातील भोरड गावातील भ्रष्टाचाराबद्दल लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार करुनही दखल घेतली जात नाही. त्या गावामध्ये ६०० शौचालयांचे काम झाल्याचे दाखवून ४० लाख रुपयांच्या निधीचा अपहार केला गेला. अंगणवाड्यांचे कामामध्ये भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी असूनही चौकशी झालेली नाही. यात फक्त ग्रामसेवक दोषी नसून मंडळ अधिकारी, अभियंता व मुख्य कार्यकारी अधिकारी सुध्दा दोषी आहेत. तक्रारीचे निराकरण केले पाहिजे. दोषी ग्रामसेवकांना निलंबित केले तरी ३-४ महिन्यात ते पुन्हा कामावर रुजू होतात. त्यांना कायद्याची भीती वाटत नाही. याचा त्रास जनतेला होत आहे.

ग्रामसेवक, मंडळ अधिकारी व गट विकास अधिकारी यांच्या माध्यमातून कामाचा खोळंबा होतो. २५ ते ३० टक्के रक्कम उपलब्ध होते, त्यात सुध्दा अपहार केला जातो आणि कामे अर्धवट राहतात. शासनाच्या योजनांची अंमलबजावणी पूर्णत: होत नाही. जिल्हा परिषद स्तरावर संपूर्ण साखळी दोषी आहे. याची चौकशी झाली पाहिजे. पांढरी गावामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला. मार्च महिन्यामध्ये १७ तारखेला गावामध्ये ग्रामसभा घेण्याबाबत शासनाने आदेश वितरित केले. गावामध्ये दारु दुकान असावे की नसावे याबद्दल निर्णय घ्यायचा होता. पुष्कळ गावामध्ये दारु दुकानदारांनी, दारुची भट्टी लावणाऱ्यांनी ग्रामसेवकांना पैसे दिले, त्यामुळे ग्रामसभा झाली नाही व कागदोपत्री सभा झाल्याचे दाखवून दारु दुकान आहे तेथेच ठेवावे असा निर्णय झाल्याचे सांगितले गेले. किनवट तालुक्यात मांडवी नावाचे गाव आहे. समितीने त्या गावाला भेट दिली तर किमान २५ दारु दुकानदार आपल्याला दिसून येतील. मांडवी गावाच्या ग्रामसेवकांना ग्रामसभा घेण्याबाबत सांगितले होते. त्याची प्रत बीडीओ यांच्याकडे येत नाही. त्यांनी काहीच दखल घेतलेली नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी १७ मार्च रोजी ग्रामसभा घेण्याबाबत नोटीस काढली होती. परंतु त्याची अंमलबजावणी न करणारे दोषी अधिकारी अद्याप कामावर आहेत.

**यासंदर्भात समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

मौजे भोरड व पांढरी (ता.माहूर) व मांडवी (ता.किनवट) या गावांतील गैरव्यवहाराबाबत वारंवार तक्रारी करण्यात येवूनही त्याची दखल न घेण्याची कारणे काय आहेत.

**यासंदर्भात समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मौजे. भोरड, ता.माहूर येथील शौचालय बांधकामात अनियमितता केल्यामुळे व ग्राम पंचायतमधील विविध अहवाल सादर न करणे व विविध आढावा बैठकीस अनुपस्थितीत राहिल्यामुळे संबंधित ग्रामविकास अधिकारी श्री. आर. के. कांबळे यांना सदर प्रकरणी दोषी धरुन दि. ३/९/२०१५ रोजी निलंबनाची कार्यवाही करुन त्याचेवर दोषारोप प्रपत्र १ ते ४ बजावण्यात आलेला आहे. तसेच माहूर तालुक्यात मौजे पांढरी या नावाचे गाव अस्तित्वात नाही.

मौजे मांडवी, ता. किनवट येथील ग्रामसेवक श्री. व्ही. एम. जाधव हे मुख्यालयी राहात नसल्याने, ग्रामपंचायतीचा वार्षिक प्रशासन अहवाल न देणे, पंचायत समितीच्या आढावा बैठकीस माहे जून, २०१५ पासून उपस्थित नसल्याने संबंधितास दि. २-९-२०१५ रोजी निलंबित करुन विभागीय चौकशीची कार्यवाही त्यांचेविरुध्द प्रस्तावित करुन दोषारोप पत्र बजावण्यात आले आहे.

**यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून उपरोक्त मुद्दयाची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषदेतील वर्ग-३ च्या बाबतीत नियुक्ती तथा शिस्तभंग विषयक प्राधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नांदेड यांचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने नांदेड जिल्हा परिषदेला भेट देऊन जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांसमवेत केलेल्या अनौपचारिक चर्चेदरम्यान समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, मौजे भोरड, ता.माहूर व मौजे. मांडवी, ता.किनवट या गावातील गैरव्यवहाराबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे वारंवार तक्रार करुनही ते दखल घेत नाहीत. समितीने सदरहू मुद्यावर विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीदरम्यान मौजे भोरड, ता.माहूर या ग्रामपंचायतीच्या अंतर्गत शौचालयाच्या बांधकामात अनियिमितता केल्याचे तसेच ग्रामपंचायतमधील विविध अहवाल सादर न करणे व आढावा बैठकांस अनुपस्थित राहिल्याप्रकरणी संबंधित ग्रामविकास अधिकाऱ्यावर जिल्हा परिषदेने निलंबनाची कार्यवाही करुन त्यांचेवर दोषारोप बजावून त्याची चौकशी प्रस्तावित केली असल्यामुळे समिती समाधान व्यक्त करते.

मौजे मांडवी, ता.किनवट येथील ग्रामसेवक मुख्यालयी राहत नसणे, ग्रामपंचायतीचा वार्षिक प्रशासन अहवाल सादर न करणे व चार-चार महिने पंचायत समितीच्या आढावा बैठकीस गैरहजर राहणे याबाबत त्यांस निलंबित करुन त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित केल्याचे साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले. संबंधित ग्रामसेवकांवर कारवाई केल्याप्रकरणी समिती समाधान व्यक्त करते. परंतू महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांनी वारंवार लेखी व तोंडी तक्रारी करुनही जिल्हा परिषद प्रशासन त्याची दखल घेत नसेल तर ते योग्य नाही. वस्तुत: समितीसमोर विभागीय सचिवांनी साक्षीकरीता पाचारण होण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीच्या नांदेड जिल्हा परिषदेच्या भेटीच्या वेळेच्या व बैठकांचे कार्यवृत्त पाहून संबंधित लोकप्रतिनिधींची नेमकी तक्रार काय आहे याची शहानिशा करणे आवश्यक होते. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या प्रतिवेदकांकडून गावांची व व्यक्तींची नावे लिहून घेतेवेळी त्यामध्ये पाठभेद उत्पन्न होण्याची शक्यता असते. यास्तव महाराष्ट्र विधानसभा नियम १८ (२) अन्वये सदरहू कार्यवृत्ताची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठवून त्यावरील काही पाठभेदाच्या सुधारणा असतील तर त्या दुरुस्त करुन परत मागविल्या जातात. समितीच्या कार्यवृत्तात मौजे पांढरी या ग्रामपंचायतीमधील गैरव्यवहारासंबंधी चौकशी करुन माहिती सादर करण्याबाबत समितीने निदेशित केलेले असतानाही माहूर तालुक्यात मौजे पांढरी या नावाचे गावच अस्तित्वात नाही अशा प्रकारची माहिती समितीस सादर करण्यात आली. परंतू सदरहू प्रकरणी श्री.प्रदिप नाईक, संबंधित विधानसभा सदस्य यांनी अत्यंत पोटतिडकीने मांडलेल्या समस्यांबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीने दिलेल्या निदेशानुसार संबंधित गावाच्या नावाची साधी खात्री देखील करुन घेतली नसल्याप्रकरणी समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. **संसदीय लोकशाहीत विधानमंडळ सदस्य हे जनतेच्या आशा आकांक्षास जबाबदार असतात मा.लोकप्रतिनिधींनी त्यांच्या मतदार संघातील समस्या तक्रारीद्वारे समितीसमोर मांडल्या. त्यासंदर्भात कारवाई न करणे म्हणजे संसदेच्या परंपरेचा अवमान करणे होय असे समितीस वाटते. अत: प्रस्तुत प्रकरणी श्री.प्रदिप नाईक, वि.स.स. यांनी समितीसमोर मांडलेल्या सर्व तक्रारींबाबत जिल्हा परिषदेच्या ज्या अधिकाऱ्यांच्या स्तरावर ही कार्यवाही करण्यात आली त्यांच्या हेतूवर समिती शंका घेत असून याबाबत त्यांची चौकशी करण्यात यावी व या तक्रारींबाबत पुन्हा सखोल चौकशी करावी व त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, नांदेड (प्रशासन)

### सन २०१२-२०१३ मध्ये अंगणवाडीसाठी प्राप्त झालेला निधी खर्च करण्याची शासनाकडून परवानगी मिळणेबाबत

समितीने दिनांक १३ ते १५ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नांदेड जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसोबत केलेल्या अनौपचारीक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, सन २०१२-१३ मध्ये अंगणवाड्यांसाठी निधी प्राप्त झाला. अंगणवाड्यांचे बांधकाम झाले. जो निधी अखर्चित राहिला तो खर्च करण्यास शासनाने परवानगी दिली पाहिजे. अनेकदा मंत्रालय पातळीवर पाठपुरावा केला आहे. परंतु तो अखर्चित निधी खर्च करण्यास परवानगी मिळत नाही यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, सन २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये अंगणवाड्यांसाठी निधी आला होता. ज्या वर्षात निधी येतो तो पुढील वर्षापर्यंत खर्च करावा लागतो. त्या वर्षात निधी खर्ची पडला नाही, कामे सुरु होण्यास विलंब झाला, त्यामुळे कामे पूर्ण होण्यासही विलंब झाला. अखर्चित निधी वापरण्यास अनुमती देण्याचा प्रस्ताव पाठविला आहे.जिल्हयात निधी उपलब्ध आहे परंतु वापरता येत नाही. त्यावर समितीने विचारणा केली की, ग्रामविकास विभागाकडे प्रस्ताव पाठवला आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की जबाबदारी निश्चित करावी लागेल. बांधकाम केले आहे परंतु वापर करता येत नाही. त्यांनी बांधकाम केले परंतु त्यांना पैसा मिळत नाही. यावर स्थानिक लोकप्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, बांधकाम झालेले आहे. परंतु त्यांना देयक देऊ शकत नाही.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी पुढे म्हणणे मांडले की, या संदर्भातील कार्यपध्दतीमध्ये बदल करणे आवश्यक आहे. निधी उपलब्ध असताना सुध्दा तो वापरता येत नाही म्हणून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना अखर्चित निधी खर्च करण्याचे अधिकार दिले पाहिजेत. नाही तर आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करण्यामध्येच वेळ निघून जाईल व निधी खर्च नाही. किंबहुना ती कामे होणार नाहीत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की वास्तविक पाहता निधी जिल्हा नियोजन समितीमार्फत येतो. हा निधी दोन वर्षात वापरावा असे शासनाचे आदेश आहेत. माननीय पालकमंत्री हे जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष आणि जिल्हाधिकारी हे सदस्य सचिव असतात. विहित मुदतीत निधी खर्च झाला नाही तर तो निधी खर्च करण्याची परवानगी मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करावा लागतो. परंतु या संदर्भात आवश्यक त्या प्रक्रिया पार पाडाव्या लागत असल्यामुळे प्रस्तावाला मान्यता मिळण्यास विलंब लागतो. त्यामुळे यातील निधी व्यपगत होण्यापेक्षा जी प्रकरणे ज्येन्युअन आहेत अशा प्रकरणांच्या बाबतीत, झालेला विलंब क्षमापित करण्याचा अधिकार माननीय पालकमंत्री किंवा जिल्हाधिकाऱ्यांना दिला तर हा प्रश्न सुटू शकेल. यावर समितीने देखील त्या अनुषंगाने व्यपगत होणारा निधी खर्च करण्यास माननीय पालकमंत्र्याच्या अधिकार क्षेत्रात विलंब क्षमापित करण्याचा अधिकार दिला तर हा प्रश्न सुटू शकेल असे मत मांडले.

**यासंदर्भात समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

सन २०१२-१३ मध्ये अंगणवाड्यांसाठी प्राप्त झालेला निधी अखर्चित असून तो खर्च करण्यास नांदेड जिल्हा परिषदेने शासनाकडे प्रस्ताव दिलेला असून त्यावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे.

**यासंदर्भात समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक-संकिर्ण १०.१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ मध्ये सुचविल्यानुसार नांदेड जिल्हयातील ग्रामीण आदिवासी प्रकल्पांतर्गत मंजुर असलेल्या अंगणवाडी केंद्राच्या इमारती बांधकामांच्या सन २००७-०८ ते २०१३-१४ या वर्षापर्यंतचा रुपये १०,७५,०८,०३७/- अखर्चित निधी खर्च करण्यासाठीचा प्रस्ताव विहित नमुन्यात या कार्यालयाचे क्रमांक -६७१ दिनांक १६.९.२०१५ अन्वये सादर करण्यांत आला होता त्यास महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-एबवि-२०१५/प्र.क्र.२९१/का-६ दिनांक २१ नोव्हेंबर, २०१५ अन्वये शासन मान्यता प्राप्त झाली असुन याबाबत जिल्हयातील सर्व गटविकास अधिकारी यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक-९४० दिनांक १४/१२/२०१५ अन्वये कळविण्यात आले असुन सदर बाबतीत पुर्ण झालेल्या १०७० कामांची अदायी करण्यात येत असुन २६६ सुरु नसलेल्या कामांचे रु. ११,१८,७५,०७८/- शासन खाती जमा करण्यात येत आहेत.

**यासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून उपरोक्त मुद्दयाची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद नांदेड यांचे अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात येत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,सन २०१२-२०१३ मध्ये अंगणवाड्यांसाठी प्राप्त झालेला निधी अखर्चित असून तो खर्च करण्यास नांदेड जिल्हा परिषदेने शासनाकडे प्रस्ताव दिलेला असून त्यावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, यावर प्रधान सचिव महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विदित केले की,१०,७५,०८,०३७/- एवढा अखर्चित निधी खर्च करण्यासाठीचा प्रस्ताव विहित नमुन्यात दिनांक १६.०९.२०१५ रोजी शासनाकडे सादर

झाला होता व शासनाने त्याला दिनांक २१ नोव्हेंबर, २०१५ रोजी मान्यता दिलेली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, एवढ्या लवकर मान्यता दिलेली असतानाही खर्च का केला नाही, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांनी समितीस अशी माहिती दिली की, मान्यता दिल्यानंतर ७४५ कामे पूर्ण झाली व त्यावर ३ कोटी ४८ लाख रुपये इतका खर्च झाला. सद्य:स्थितीत मान्यता मिळाल्यानंतर १२६ कामे पूर्ण झाली. त्याकरिता २ कोटी ६५ लाख रूपये इतका खर्च आलेला आहे. जी कामे सुरुआहेत त्यांचे अंतिम देयक येणे बाकी आहे. त्यावर उर्वरित रक्कम खर्च होईल. यानंतर प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस सांगितले की, महोदय, ३२५ अपूर्ण कामांपैकी १२६ कामे पूर्ण झालेली आहेत. यावर समितीने ज्या २६६ कामांचे पैसे शासनाला परत केले आहेत, त्याबाबत माहिती विचारली असता प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीला सांगितले की, ती कामे सुरुच झाली नव्हती. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांनी समितीस आणखी अशी माहिती दिली की,दिनांक २२ एप्रिल, २०१६ रोजी त्या कामांचे पैसे शासनाकडे जमा केलेले आहेत. यावर समितीने पुन्हा विचारले की, ते पैसे शासनाला परत का केले यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांनी समितीस सांगितले की, जी कामे मंजूर झाली होती, त्यांचे काम सुरु न झाल्याने निधी परत केलेला आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, नोव्हेंबरमध्ये मान्यता दिल्यानंतरही मार्चपर्यंत कामे का पूर्ण होत नाहीत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांनी समितीस विदित केले की, २६६ कामे पूर्ण झाली नव्हती. त्याकरिता निधी प्राप्त झाला होता. ती कामे पूर्ण करण्याकरिता शासनाकडे मान्यता मागितलेली होती. परंतु, मान्यता न मिळाल्याने ती कामे सुरु झाली नाहीत, त्यामुळे निधी परत पाठविला या मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या उत्तरावर समितीने आक्षेप घेतला की, एकदा मान्यता दिल्यानंतर पुन्हा मान्यता घेण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. अनेकदा कामे पूर्ण होत नाहीत कारण पैसे मिळत नाहीत असे सांगितले जाते. येथे तर मान्यता व पैसे दोन्हीही मिळालेले असताना कामे झालेली नाहीत आणि कामे झालेली नाहीत म्हणून निधी समर्पित केला असे जिल्हा परिषदेकडून सांगितले जात आहे यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांनी समितीस विदित केले की, समितीचे म्हणणे बरोबर आहे. परंतु, ही सन २००७-२००८ पासूनची अपूर्ण कामे होती. ती सुरुझालेली नसल्याने परवानगी मागितली होती व परवानगी मिळाली नव्हती. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, त्या कामापैकी सर्वच कामे काही सन २००७-२००८ मधील नसतील त्यांना नोव्हेंबर, २०१५ मध्ये मान्यता दिलेली आहे. मग ही कामे सन २००७-२००८ मधील कशी काय असू शकतील, यावर दिनांक ३१ मार्च रोजी अपूर्ण कामांचे पुर्निविलोकन करण्यात आले आणि जी कामे सुरुझालेली नव्हती, त्यांचा निधी दिनांक २२ एप्रिल रोजी परत पाठविला आहे, ही वस्तुस्थिती आहे असे उत्तर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांच्याकडून सांगण्यात आले. यावर समितीने सदरहू कामांची सद्य:स्थिती विचारली असता १२६ कामे पूर्ण झाली आहेत तर उर्वरित कामे सुरुआहेत. त्यांचे केवळ अंतिम बिल येणे बाकी आहे. ते आल्यानंतर बुक ॲडजस्टमेंट करुन देयक अदा केले जाईल. जी २६६ कामे पूर्ण झालेली नाहीत, त्यांचे पैसे परत पाठविलेले आहेत असे उत्तर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नांदेड यांनी दिले व त्यानंतर प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, ही २६६ कामे वेगवेगळ्या कालावधी मधील आहेत. ती तेव्हाच्या नॉर्म्स प्रमाणे मंजूर झाली होती. दिलेल्या कालावधीनंतरही जी कामे सुरूच झाली नाहीत, त्यांच्या बाबतीत

परवानगी घेऊन निधी तेव्हाच परत केला पाहिजे होता. यावर समितीने अशी विचारणा केली की, त्याकरिता २ वर्षांचा कालावधी दिलेला असतो. एवढ्या कालावधीत नियोजन करून ते काम केले पाहिजे होते. २ वर्षांत साध्या अंगणवाड्या बांधता येत नाहीत काय यावर प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी ही कामे सुरुच झाली नव्हती असे समितीस सांगितले. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांनी समितीस असे विदित केले की, सन २०११-२०१२, २०१२-२०१३ मध्ये अंगणवाडीच्या बांधकामाकरिता साडेतीन लाख रुपयांची तरतूद मिळत होती. परंतु, ती अपुरी असल्याने ती वाढविण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा सुरु होता. यावर समितीने पुढे आणखी अशी विचारणा केली की, डीएसआर साधारणपणे दरवर्षी वाढतो क्वचित काही वर्षी तो वाढत नाही. या कामांना त्या वर्षीच्या दरसूचीप्रमाणेच प्रशासकीय मान्यता मिळाली असेल. असे असताना कामाचा खर्च वाढेल म्हणून कामच सुरु करायचे नाही असे करता कामा नये, हे चुकीचे आहे, जी २६६ कामे सुरु झाली नाहीत, त्याकरिता कोण जबाबदार आहे, कामे सुरु झाली नाहीत, याची जबाबदारी निश्चित केली पाहिजे,सदरहू कामे करण्याकरिता कोणती एजन्सी होती, या प्रश्नावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांनी समितीस विदित केले की, नॉर्मली ग्रामपंचायतीनेच ही कामे करावयाची होती. त्यावेळेस असे झाले की, अगोदरच्या वर्षी अंगणवाडीकरिता साडेतीन लाख रूपयांचा निधी मिळत होता. त्याच्या पुढच्या वर्षी तो साडेचार लाख रुपये झाला. त्यामुळे आपल्यालाही हा वाढीव निधी मिळेल, अशा अपेक्षेने लोक वाट पाहू लागले.यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, परंतु, या सर्वांमध्ये जो निधी परत गेलेला आहे, त्याची जबाबदारी कोणावर निश्चित करणार या प्रश्नावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांनी समितीस असे विदित केले की, कामे सुरुच न झाल्याने निधी परत पाठविलेला आहे. लोकांची साडेचार लाख रुपये मिळतील अशी अपेक्षा होती, त्यामुळेच हे प्रकरण राहिलेले आहे. तद्नंतर जेवढी कामे मंजूर झाली, त्यांना शासनाने निधी दिलेला आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, परंतु, त्या २६६ गावांमध्ये अंगणवाड्या नाहीत, हे खरे आहे काय, यावर जिल्हा परिषदेकडून होय असे उत्तर प्राप्त झाले. यावर समितीने असे असेल तर तेथील विद्यार्थी उघड्यावर किंवा शाळेच्या ओट्यावर बसून शिकत असतील असे विचारले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ती ग्रामपंचायतीतील समाज मंदिर किंवा इतर इमारतीत बसतात असे उत्तर दिले. यावर समितीने अशी विचारणा केली की, सन २०१५-२०१६ मध्ये काय झाले, शासनाने परवानगी का दिली नाही, यावर प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, त्यावर्षी १० कोटी रुपयांचे प्रस्ताव पाठविले होते, त्यांना परवानगी दिलेली आहे. अजून प्रस्ताव पाठविले असते, तर त्यांनाही परवानगी दिली असती. जी कामे सुरु झाली नाहीत, त्यामागे डीएसआर मधील वाढीचे कारण आहे की, अजून कोणते कारण आहे हे पाहिले पाहिजे. कारण आता त्या २६६ ठिकाणी नवीन अंगणवाड्यांना मान्यता मागितली तर, मागे मान्यता दिली असताना न केल्याने आता पुन्हा त्यांना इन्क्लुड कसे करावे असा प्रश्न निर्माण होईल व त्यामुळे त्यांचा नंबर शेवटचा राहील. दुसरा मुद्दा म्हणजे अंगणवाडीकरिता कमी पैसे मिळतात याकरिता ते काम ६०:४० मधून किंवा मनरेगा मधून करण्याचे प्रस्तावित आहे. परंतु, स्क्रुटिनी करु?न या प्रत्येक ठिकाणी अंगणवाडी न होण्याचे काय कारण आहे, तेथे जागा उपलब्ध नव्हती का की अजून काही कारण होते याचे विश्लेषण करुन नेमके कारण समोर आले पाहिजे.यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ही कामे करुन घेण्याचे अधिकार गटविकास अधिकाऱ्यांच्या स्तरावर दिले होते का या समितीच्या प्रश्नावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होय असे होकारार्थी उत्तर दिले. यावर समितीने असे मत मांडले की, असे असतानाही त्यांनी हे काम करुन घेतले नाही या करिता त्या त्या तालुक्याच्या गटविकास अधिकारी यांना जबाबदार धरले पाहिजे,असे सर्वच ठिकाणी झालेले नाही. अधिकाऱ्यांच्या म्हणण्याप्रमाणे १२६ कामे पूर्ण झालेली आहेत. कदाचित ती कामे मागच्या वर्षीचीही असतील. यावर प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी होकारार्थी उत्तर दिले यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, यावेळेस ज्या अंगणवाड्यांना मान्यता दिलेली आहे, त्यामध्ये ही २६६ कामे इन्क्लुड आहेत. यावर समितीने याचा अर्थ आता ही कामे होतील असे मत व्यक्त केल्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारार्थी उत्तर दिले. यावर समितीने अशी विचारणा केली की, किंमत वाढवून मिळेल तोपर्यंत काम बंद करुन ठेवायचे असे दिसते या समितीच्या प्रश्नावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, हा गेल्या ४ ते ५ वर्षांचा प्रश्न आहे. जिल्हा परिषदांना निधी दिल्यानंतर त्यांनी त्या वर्षात किंवा फार तर पुढच्या वर्षात काम पूर्ण करणे अपेक्षित आहे. मात्र काही कारणांमुळे ती होत नाहीत. अशा परिस्थितीत यामध्ये शिस्त आणण्यासाठी वित्त विभागाच्या माध्यमातून एक मोहिम सुरु झाली आहे. त्यानुसार ऑगस्ट, सप्टेंबर मध्ये कामांचा आढावा घ्यावा व तोपर्यंत काम सुरु झाले नसल्यास निधी समर्पित करावा. तसेच, काम प्रगतीपथावर असल्यास ३१ मार्चपर्यंत ते पूर्ण करण्यासाठी विशेष परवानगी घ्यायची आहे. याचा चांगला परिणाम झालेला आहे.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, एक ठराविक कालमर्यादा ठरवून देऊन तिच्यामध्ये सर्व काम झाले पाहिजे असे काही तरी केले पाहिजे. समितीला अहवालामध्ये याचा उल्लेख करता येईल, याकरिता गटविकास अधिकारी यांना जबाबदार धरले पाहिजे, असे मत समितीने व्यक्त केले. यावर प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, अहवालामध्ये करण्याकरिता त्यांना एक सूचना करावयाची आहे. आज राज्यात जवळपास ९५ ते ९६ हजार अंगणवाड्या आहेत. त्यापैकी केवळ ५० ते ६० टक्के अंगणवाड्यांचे स्वत:चे बांधकाम आहे. उर्वरित अंगणवाड्यांचे स्वत:चे बांधकाम नाही. त्याकरिता उपलब्ध होणारे पैसे अतिशय कमी आहेत. आता एमआरईजीएस मधून ते काम करण्याबाबत प्रस्तावित केलेले आहे. यासंदर्भात आमचा विभाग व जलसंधारण विभागाने एक संयुक्त परिपत्रक काढलेले आहे. आमची विनंती आहे की, हा उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबविला तर, पुढच्या ५ वर्षांत ज्या अंगणवाड्यांचे स्वत:चे बांधकाम नाही, त्यांचेही बांधकाम पूर्ण करता येईल. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, गटविकास अधिकाऱ्यांवर कारवाई करणार काय, मंत्रालयस्तरावर एखाद्या रस्त्याच्या कामास मान्यता मिळाली तरी, प्रत्यक्षात गटविकास अधिकारी पैसे घेतल्याशिवाय ग्रामपंचायतीला पैसेच देत नाही. दुसरे म्हणजे कामाकरिता २ वर्षांचा कालावधी भरपूर आहे. परंतु, नंतर अधिक पैसे मिळतील म्हणून कामेच करायची नाहीत हे बरोबर नाही. ज्या वर्षीची कामे त्याच वर्षी झाली पाहिजेत या प्रश्नावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, विशिष्ट कालावधीपेक्षा जास्त काळ प्रलंबित राहू नये याकरिता अभ्यास करुन आदेश काढण्यात येईल. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, अकोल्याचे उदाहरण पाहिल्यास जवळपास प्रत्येक शिर्षाखाली प्राप्त झालेला निधी परत गेलेला आहे. कोणाच्या प्राबल्यामुळे असे होते, निधी देऊनही तो कामांवर खर्च का होत नाही, अंगणवाड्या नाहीत वगैरे गोष्टींमुळे समितीला लोकांच्या प्रश्नांना तोंड द्यावे लागते. अमुक दिवसांतच प्रस्ताव सादर केला पाहिजे, डेप्युटी इंजिनिअरनी ७ दिवसांपेक्षा अधिक काळ नस्ती स्वत:कडे ठेवता कामा नये, अशा काही सूचना केल्या पाहिजेत.अमुक इतक्या दिवसांतच प्रक्रिया झाली पाहिजे, याबाबतच्या सूचना असल्या पाहिजेत. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, आम्ही विचारविनिमय करुन याबाबतचे वेळापत्रक कसे असावे, या संदर्भातील आदेश एक-दीड महिन्यात निर्गमित करण्यात येईल.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने नांदेड जिल्हा परिषदेला भेट देऊनजिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांसमेवत केलेल्या अनौपचारिक चर्चेदरम्यान समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, जिल्हा परिषद, नांदेड यांनी राष्ट्रीय ग्रामविकास योजना, ग्रामिण विकास मिशन, जिल्हा वार्षिक योजना, ग्रामिण पायाभूत विकास निधी, जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना, १३ वा वित्त आयोग अंतर्गत रुपये ५७,४१,७६,००० इतका निधी सन २००७-२००८ ते सन २०१३-१४ या वर्षात अंगणवाडी बांधकामासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता. सदरहू निधीपैकी जिल्हा परिषदेकडे २१,९३,८३,११५ रुपयांचा निधी अखर्चित राहिला होता. सदरहू निधी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात खर्च करण्याकरीता जिल्हा परिषदेने शासनाकडे वारंवार विनंती केलेली असून सदर विनंती मान्य होत नसल्याबाबत परवानगी मिळण्याकामी जिल्हापरिषदेला सहकार्य करावे अशी मागणी समितीकडे करण्यात आली होती.

सदरहू विषयावर समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीदरम्यान शासनाने अंगणवाडी बांधकामासाठी जिल्हा परिषद, नांदेड यांना सन २००८-०९ ते २०१३-१४ मध्ये प्राप्त झालेल्या निधीपैकी सुमारे २२ कोटी रुपयांपैकी १० कोटी ७५ लक्ष रुपये सन २०१६-१७ या वर्षात खर्च करण्याची परवानगी दिली असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. अखर्चित निधी खर्च करण्यास परवानगी दिल्याबाबत समिती समाधान व्यक्त करते. परंतू अंगणवाड्यांच्या बांधकामाचे तब्बल २२ कोटी रुपये जिल्हापरिषदा वेळेवर का खर्च करु शकत नाहीत हा प्रश्न अनुत्तरीत राहतो. सन २००७-२००८ सालातील अखर्चित निधी खर्च करण्यासाठी वित्त विभागाच्या दिनांक ६ जून, २००८ रोजी शासन निर्णय अनुसार **(परिशिष्ट १.१)** अखर्चित अनुदान हे लगतच्या एक वर्षापर्यंत खर्च करण्यास शासनाने परवानगी दिलेली असताना सन २००९ ते २०१५ असा सात वर्षे निधी अखर्चित राहिला त्याचा वापर होऊ शकला नाही. शेवटी शासनाने दिनांक २१ नोव्हेंबर, २०१५ रोजी शासन निर्णयान्वये **(परिशिष्ट १.२)** ३१ मार्च, २०१६ अखेर सदर निधी खर्च करण्याची परवानगी दिली. असे असतानाही दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी समितीने विभागीय सचिवांची साक्ष होईपर्यंत परवानगी मिळालेल्या निधीपैकी केवळ ६ कोटी १३ लक्ष रुपये खर्च करण्यात आले असल्याची माहिती समितीसमोर आली. उर्वरित कामाचे अंतिम देयक येणे बाकी असल्याची माहिती समितीस मिळाली याचा अर्थ सात वर्षांनंतर शासनाने अखर्चित निधी खर्च करण्यास विशेष शासन निर्णय निर्गमित करुनही सदर निधी जिल्हा परिषद खर्च करु शकली नाही. एवढेच नव्हेतर २६६ सुरु असलेल्या कामांचे रुपये ११ कोटी १८ लक्ष रुपये जिल्हा परिषदेने शासन खाती परत जमा कले आहेत.

एकिकडे ग्रामीण भागातील बालकांसाठी शासन अंगणवाड्या सुरु करण्याचा निर्णय घेत आहे. अंगणवाड्या बांधकामासाठी निधीची कमतरता असल्यामुळे शासनाने बांधकाम करण्यापूर्वी प्रथम (अ) ज्या अंगणवाड्या झाडाखाली व उघड्यावर बसतात ब) खाजगी इमारतीत (भाड्याच्या इमारतीत) भरणारी अंगणवाडी केंद्रे (क) समाज मंदीरात, शाळांच्या खोल्यात, ग्रामपंचायतीच्या कार्यालयात अशा इमारतीत भरणाज्या अंगणवाड्या या प्राथम्य क्रमानुसारच अंगणवाडी केंद्र इमारत बांधकाम हाती घेण्यात यावे असे शासनाचे आदेश आहेत. पहिल्या प्राथम्य गटातील संपूर्ण अंगणवाडी केंद्राचे बांधकाम संपल्यानंतर तसे प्रमाणपत्र एस.वी.से.यो च्या आयुक्तांनी दिल्यानंतरच पुढील गटातील अंगणवाडी केंद्राचे बांधकाम हाती घेता येते अशा परिस्थितीत अत्यंत तुटपूंज्या अनुदानातून सुरु झालेली योजना त्यातील निधी वेळेवर खर्च होवू शकत नसल्यामुळे तिचा उद्देश सफल होवू शकलेला नाही. वस्तुत: प्रती अंगणवाड्यांना बांधकामासाठी रुपये ३.५० लक्ष रुपये जास्तीत जास्त खर्च करण्याची परवानगी होती. दरम्यानच्या काळात दिनांक १५ जानेवारी, २०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये तो ४.०० लक्ष रुपये करण्यात आले. रुपये ४.०० लक्ष ही मर्यादा दिनांक २० एप्रिल, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये **(परिशिष्ट १.३)** ती ४.५० लक्ष एवढी वाढविण्यात आली. दिनांक २९ जानेवारी, २०१४ च्या शासन निर्णयानुसार **(परिशिष्ट १.४)** सद्यास्थितीत बिगर आदिवासी क्षेत्रात ६ लक्ष व आदिवासी क्षेत्रात ६.५० लक्ष खर्च करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. अंगणवाड्यांच्या बांधकामावरील खर्चाची कमाल मर्यादा दरम्यानच्या काळात वेळोवेळी वाढ होत असताना जुन्या दराने बांधकामाचे कंत्राट घेणाज्या कंत्राटदारास वाढीव दराची अपेक्षा असल्यामुळे काम न करण्याची शक्यता व त्यामुळे निधी अखर्चित राहिला असल्याची शक्यता समिती वर्तवते. केवळ वाढीव दराच्या अपेक्षेने अंगणवाड्यांची कामे रखडलेली असणे हेच एकमेव कारण नसून अंगणवाड्यांच्या बांधकामाकरीता आवश्यक असलेली जागा मोफत मिळणे आवश्यक असते. अशा प्रकारची जागा तीही मोफत प्राप्त करुन घेण्यासाठी वित्त विभागाच्या दिनांक ६ जून, २००८ रोजीच्या शासन निर्णयात घालून दिलेली लगतच्या एका वर्षाची मुदत पुरेशी नसल्याचे समितीचे मत आहे. तसेच मागील चार वर्षे नांदेड या मराठवाड्यातील जिल्ह्यातच नव्हेतर संपूर्ण राज्यातील आवर्षणाची परिस्थिती पहाता नंदूरबार, रायगड, परभणी, पालघर, नागपूर, ठाणे, उस्मानाबाद, लातूर, वाशिम, कोल्हापूर, धुळे, अमरावती, भंडारा, जळगांव, जालना, सातारा, गडचिरोली व नांदेड या जिल्हा परिषदांनी अंगणवाडी बांधकामावरील अखर्चित निधी खर्च करण्यासाठी शासनाने परवानगी दिलेली दिसून येते. उर्वरित जिल्हा परिषदांनी देखील अखर्चित निधी खर्च करण्यास परवानगी शासनाकडे मागितली असल्याची शक्यता समिती नाकारत नाही.

**ग्रामीण भागातील बालके उघड्यावर भरणाऱ्या, झाडाखाली भरणाऱ्या, भाडे तत्वावरील तोकड्या जागेत भरणाऱ्या अंगणवाड्यांमध्ये शिक्षण घेत असताना अखर्चित निधी मुदत संपण्याच्या कारणावर शासनाकडे परत करण्याबाबतच्या नियमां/ शासन निर्णयांमुळे सदरहू योजनांची परिणामकारक अंमलबजावणी होवू शकलेली नाही. याकरीता अंगणवाडी बांधकाम करण्यासंदर्भात शासन स्तरावरुन तसेच जिल्हा परिषद स्तरावरुन वेळोवेळी आढावा घेणे, संबंधितांवर विलंबाबाबतची जबाबदारी निश्चित करणे इत्यादी कार्यवाही होणे आवश्यक होत्या त्या झालेल्या नाहीत. तरी यापुढील काळात निधी अखर्चित राहू नये याकरिता शासनाने एक तंतोतंत वेळापत्रक आखून प्रत्येक टप्प्यावरील अंमलबाजवणी करणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करुन अंगणवाड्यांचे बांधकाम हाती घ्यावे अशी समितीची शिफारस आहे. अंगणवाड्यांचे बांधकामाबाबत वेळापत्रक आखण्याबाबत विभागीय सचिवांनी समितीस आश्वासन दिल्याप्रमाणे तसे आदेश निर्गमित करुन त्याबाबतची माहिती समितीस एक महिन्यात अवगत करावी अशीही समितीची शिफारस आहे.**

प्रकरण नऊ

# जिल्हा परिषद, नांदेड (प्रशासन)

## कृषि विभागाच्या योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्याबाबत

समितीने दिनांक १३ ते १५ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नांदेड जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसोबत केलेल्या अनौपचारीक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की,जिल्हा परिषदेकडील कृषी विभागाच्या सर्व योजना राज्य शासनाकडे जाणार असतील तर जिल्हा परिषद आणि पंचायती राज संस्थांचे महत्व राहणार नाही, समाजकल्याण, शिक्षण विभागाच्या योजना राज्य शासनाकडे चालल्या आहेत. मग जिल्हा परिषदेकडे कोणते काम राहणार आहे.

**यासंदर्भात समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

जिल्हा परिषदेच्या कृषि विभागाच्या बहुतांशी योजना राज्य शासनाकडे गेल्या आहेत. परिणामी पंचायती राज व्यवस्थेचे महत्व कमी होत आहे. सदरहू प्रकरणी शासनाची भूमिका काय आहे ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

कृषी विभाग जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे असलेल्या गळीत धान्य विकास योजना, ऊस विकास योजना, मका विकास योजना, कडधान्य विकास योजना, सधन कापूस विकास योजना, कृषी यांत्रिकीकरण योजना, तुषार सिंचन संच व ठिबक सिंचन संच इ. योजना राज्य शासनाच्या कृषी विभागाकडे हस्तांतरीत झाल्या आहेत. सदर योजना कृषी विभाग जिल्हा परिषदेमार्फत पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यत विहित कालावधीत पूर्ण करण्यात येत होत्या. सन्माननीय पदाधिकारी, जिल्हा परिषद, सदस्य, सभापती पंचायत समिती व पंचायत समिती सदस्य यांच्यामार्फत योजनेचा प्रचार व प्रसार मोठया प्रमाणात होत असे. तसेच या योजनेअंतर्गत योग्य लाभार्थी शेतकऱ्यांची निवड केली जात असे.

सदर योजना राज्य शासनाच्या कृषी विभागाकडे हस्तांतरित झाल्यामुळे शेतकऱ्यांसाठीच्या योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत नसल्यामुळे परिणामी पंचायत राज व्यवस्थेचे महत्त्व कमी होत आहे. त्यामुळे सदर योजना पुन:श्च जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करणे योग्य वाटते.

**समितीस कृषी विभागाकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

भारतीय संविधानाच्या ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार पंचायत राज संरचना सक्षम व लोकाभिमुख करण्याकरिता राज्य शासनाच्या अधिनस्त असलेल्या विविध योजना जिल्हा परिषदांमार्फत राबविण्याचा निर्णय ग्रामविकास विभागाच्या दिनांक २ ऑक्टोबर, २००० च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्यानुषंगाने दिनांक १ फेब्रुवारी, २००१ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या ३७ योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. मात्र अंमलबजावणी संदर्भात प्रशासकीय अडचणी विचारात घेऊन सदर आदेशास दिनांक १ मार्च, २००१ अन्वये पुढील आदेश होईपर्यंत जैसे थे स्थिती ठेवण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. दरम्यान वित्त विभागाचा दिनांक १० सप्टेंबर, २००१ च्या शासन निर्णयान्वये पदांचा आढावा घेण्यात येऊन दिनांक २२ मे, २००९ च्या शासन निर्णयान्वये २७४६१ पदे कृषी विभागाच्या विविध स्तरावरुन मंजूर करण्यात आली. सन २००१ नंतर जिल्हा परिषदेच्या कृषी विभागामार्फत राबविण्यात येणारी कोणतीही योजना शासनाने काढून घेतलेली नाही. ७३ व्या घटनादुरुस्तीच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडे योजना हस्तांतरीत करण्यात याव्यात, यासाठी श्री.बाळासाहेब हराळ यांनी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका क्र.५५३५/२००३ दाखल केली आहे. सद्य:स्थितीत कृषि विभागाच्या विविध विस्तार योजना/कार्यक्रम जिल्हा परिषद व पंचायत समिती मार्फत राबविल्या जातात व त्याकरीता विभागाकडून आवश्यक तो निधी/अनुदान जिल्हा परिषदेकडे उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.दिनांक १/२/२००१ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या ३७ योजनांपैकी काही योजना सद्य:स्थितीमध्ये जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत आहेत. केंद्र शासन पुरस्कृत योजनेसाठी जो निधी उपलब्ध होतो. त्या निधीचा विनियोग,

योजनेची प्रभावी अंमलबजावणी राज्य शासनाकडून केली जाते. त्याचप्रमाणे राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत राज्यभरातील शेतकरी व लाभार्थ्यांना सातत्याने, प्रभावीपणे तसेच समप्रमाणात योजनेचा लाभ राज्य शासनाच्या यंत्रणेकडून उपलब्ध करुन देण्यात येतो. त्यामुळे राज्य शासनाचा कृषि विभाग पुर्णत: जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करणे योग्य होणार नाही, असे विभागाचे मत दिनांक २/५/२०१४ च्या प्रतिज्ञापत्राद्वारे मा.न्यायालयात शासनस्तरावरुन सादर करण्यात आले आहे. **दिनांक १/२/२००१ च्या शासन निर्णयातील काही योजना सध्या जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येतात, काही योजना अंशत: बंद/अन्य योजनांमध्ये समाविष्ट झालेल्या आहेत. या बाबी तसेच कृषि क्षेत्रातील तंत्रज्ञानाचे वाढते महत्व व राज्य शासनाची भूमिका विचारात घेऊन दिनांक १/२/२००१ च्या शासन निर्णयाचे पुनर्विलोकन करुन नव्याने कोणत्या योजना जिल्हा परिषदेकडे वर्ग करावयाच्या याबाबत नव्याने धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनस्तरावर विचाराधिन असून तसे प्रतिज्ञापत्र अपर मुख्य सचिव (कृषि) यांनी दिनांक १०/२/२०१६ अन्वये मा.उच्च न्यायालयात दाखल केले आहे. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.**

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाच्या बहुतांशी योजना राज्य शासनाकडे गेल्या आहेत. परिणामी पंचायती राज व्यवस्थेचे महत्व कमी होत आहे. सदरहू प्रकरणी शासनाची भूमिका काय आहे, यावर अतिरिक्त मुख्य सचिव, कृषि विभाग यांनी समितीस विदित केले की, सन २००१ मध्ये जिल्हा परिषदेकडे एकूण ३७ योजना हस्तांतरित करण्याचा निर्णय झाला होता. त्या अनुषंगाने कर्मचारी वर्ग देखील जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय झाला होता. परंतु, त्यावर्षी काही अडचणी आल्यामुळे या निर्णयाची अंमलबजावणी

झाली नाही. या संदर्भात आढावा घेतलेला आहे. एकूण ३७ योजनांपैकी २-३ योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येतात. राष्ट्रीय पीक विमा योजना आणि फलोत्पादन कार्यक्रम या दोन्ही योजना कृषी विभागामार्फत राबविण्यात येतात. ३२ योजनांपैकी ९ योजना आता बंद आहेत. उर्वरित २३ योजनांचा केंद्र शासनाच्या नवीन योजनांमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. आपल्याला एकंदरीत या सर्व विषयावर पुन्हा विचार करावा लागेल. या संदर्भात हायकोर्टात एक केस सुरु आहे. शासनाने या संदर्भात असा निर्णय घेतलेला आहे की, कृषी आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केलेली आहे. जिल्हा परिषदेकडे कोणत्या योजना वर्ग करण्यात येतील या संदर्भात शासन स्तरावर विचार सुरु आहे. त्यामध्ये अडचण अशी आहे की, आपण सिंगल विंडो कन्सेप्ट आणलेला आहे. गाव पातळीवर कृषी सहायक हा एकमेव अधिकारी आहे. त्या योजना हस्तांतरित केल्या तर कृषी सहायकाचे पद जिल्हा परिषदेकडे वर्ग करावे लागणार आहे. काही विशिष्ट विषय राज्य शासनाकडे ठेवणे आवश्यक असल्याने एकंदरित यादृष्टीने विचार करावा लागणार आहे. उदाहरणार्थ सांगावयाचे झाले तर नवीन प्रकारची बियाणे, ग्रीन हाऊस वगैरे नवीन टेक्नॉलॉजी आलेली आहे. त्यामुळे जिल्हापरिषदेकडे कोणते विषय वर्ग करायचे, त्याकरिता त्यांच्याकडे कोणता कर्मचारीवर्ग वर्ग करणे आवश्यक आहे, यावर विचार सुरु आहे. यावर समितीने विचारणा केली की, हा निर्णय कधी पर्यंत होईल, यावर अतिरिक्त मुख्य सचिव कृषि विभाग यांनी समितीस विदित केले की याबाबतची केस हायकोर्टामध्ये सुरु आहे. या संदर्भात मागच्या ६ महिन्यांपूर्वीच शासनस्तरावर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आलेली आहे. याबाबतचा निर्णय कधी होईल हे सांगणे कठीण आहे,मात्र विभागाचे प्रयत्न सुरु आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने नांदेड जिल्हा परिषदेला भेट देऊनजिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांसमेवत केलेल्या अनौपचारिक चर्चेदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, पुर्वी ज्या योजना जिल्हापरिषदेमार्फत राबविल्या जात होत्या त्या योजना जिल्हा परिषदेकडून काढून त्या कृषी विभागाच्या बहुतांश योजना राज्यशासनाकडून राबविल्या जातात. तसेच समाजकल्याण व शिक्षण विभागाच्या विविध योजना देखील राज्यशासनाकडून राबविल्या जात आहेत. परिणामी, जिल्हा परिषदेच्या कृषी समिती व कृषी विभागाकडे बायोगॅस सारखी एखादी योजना राबविण्यासाठी उपलब्ध आहे. समितीने या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केली. साक्षीच्या वेळी भारतीय संविधानाच्या ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार पंचायत राज संरचना सक्षम व लोकाभिमुख करण्याकरिता राज्य शासनाच्या अधिनस्त असलेल्या विविध योजना जिल्हा परिषदांमार्फत राबविण्याचा निर्णय ग्रामविकास विभागाच्या दिनांक

२ ऑक्टोबर, २०००,दिनांक २८ सप्टेंबर, २००० **(परिशिष्ट २.१)** व कृषी विभागाच्या दिनांक १ फेब्रुवारी, २००१ **(परिशिष्ट २.२)** रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. परंतू सदर शासन निर्णयाच्या अंमलबजावणी संदर्भात प्रशासकीय अडचणी विचारात घेवून शासनाने दिनांक १ मार्च, २००१ रोजीच्या शासन निर्णयान्वये **(परिशिष्ट २.३)** जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करावयाच्या योजना व कर्मचारी/अधिकारी संदर्भातील आदेशास पुढील आदेश होईपर्यंत जैसे थे स्थिती ठेवण्याबाबत आदेशित करण्यात आले असल्याची माहिती समितीस देण्यात आली.

तसेच दिनांक १/२/२००१ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या ३७ योजनांपैकी काही योजना सद्य:स्थितीमध्ये जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत आहेत. काही योजना अंशत: बंद/अन्य योजनांमध्ये समाविष्ट झालेल्या आहेत. या बाबी तसेच कृषि क्षेत्रातील तंत्रज्ञानाचे वाढते महत्व व राज्य शासनाची भूमिका विचारात घेऊन दिनांक १/२/२००१ च्या शासन निर्णयाचे पुनर्विलोकन करुन नव्याने कोणत्या योजना जिल्हा परिषदेकडे वर्ग करावयाच्या याबाबत नव्याने धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनस्तरावर विचाराधिन असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली आहे. **अत: दिनांक १ फेब्रुवारी, २००१ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी विभागीय सचिवांनी साक्षीदरम्यान समितीस विदीत केल्याप्रमाणे जिल्हा परिषदेकडे कृषी विभागाच्या कोणकोणत्या योजना वर्ग करण्यात येतील यासंदर्भात आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीकडून तिचा अहवाल शासनाने विहीत मुदतीत प्राप्त करुन घ्यावा. तसेच समितीच्या अहवालानुसार कृषी विभागाच्या नेमक्या किती व कोणकोणत्या योजनांच्या अंमलबजावणीचे काम जिल्हा परिषदांकडे सोपविण्यात येणार आहेत. याबाबत नव्याने पुर्नविलोकन करुन त्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याबाबतचा निर्णय घेण्यासंदर्भात विभागाने पाठपुरावा करावा. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्यात पाठवावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण दहा

## जिल्हा परिषद, नांदेड (प्रशासन)

### सन २०१२-१३ या अहवाल वर्षात पंचायत समिती भोकर अंतर्गत दहन/दफन भूमीच्या कामांबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १३ ते १५ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नांदेड जिल्हा परिषदेस भेट दिली. समितीने सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावर गट विकास अधिकारी यांची साक्ष घेतली. पंचायत समितीच्या अंतर्गत सुरु करण्यात आलेल्या कामांची सद्य:स्थिती संदर्भात समितीने विचारणा केली की, दहन/दफन भुमीची ७ कामे का रद्द केली, यावर गट विकास अधिकारी यांनी उत्तर दिले की, ही कामे २०१२-१३ व पुढील एक वर्ष २०१३-१४ पर्यंत पूर्ण करावयाची होती. परंतु खर्च करण्यास परवानगी नाही म्हणून काम सुरु झालेले नाही. या कामासाठी ४४ लाख रुपये प्राप्त झाले होते. २० लाख रुपये खर्च झाले व २४ लाख रुपये शासन खाती जमा केले आहेत. अशी माहिती समितीला दिली. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या हलगर्जीपणामुळे ७ कामे रद्द झाली आहेत. या सातही ठिकाणची कामे सुरु न होण्याची कारणे काय आहेत, दोषी कोण आहे याची चौकशी करून समितीला अहवाल द्यावा असे निदेश समितीने दिले.

**समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

सन २०१२-१३ या अहवाल वर्षात पंचायत समिती भोकर अंतर्गत दहन/दफन भूमीची ७ कामे रद्द करण्यात आली असून ती का रद्द करण्यात आली, याबाबत चौकशी करुन समितीला अहवाल सादर करण्याचे निदेश समितीने दिलेले आहेत. त्यानुसार सदर प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

सन २०१२-२०१३ मध्ये दहन/दफन भूमी अंतर्गत भोकर तालुक्यात ११ कामे हाती घेण्यात आली होती. त्यापैकी ४ कामे झाली असून ७ कामे रद्द करण्यात आली आहेत. या ७ पैकी चार कामे स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे कामे रद्द करण्यात आली. उर्वरित ३ कामे संबंधित ग्रामसेवकांनी केली नसल्यामुळे संबंधित तीनही ग्रामसेवकांची एक वार्षिक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात एक वर्षासाठी दिनांक ३०/१२/२०१५ च्या आदेशान्वये बंद करण्यात आली आहे.

**समितीस ग्रामविकास विभागाकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नांदेड यांचे स्तरावर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सन २०१२-१३ या अहवाल वर्षात पंचायत समिती भोकर अंतर्गत दहन/दफन भूमीची ७ कामे रद्द करण्यात आली असून ती का रद्द करण्यात आली, याबाबत चौकशी करुन समितीला अहवाल सादर करण्याचे निदेश समितीने दिलेले आहेत. त्यानुसार सदर प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली आहे. यावर विभागीय सचिवांनी समितीस विदीत केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नांदेड यांचे स्तरावर कार्यवाही करण्यात आली आहे, यावर समितीने समाधान व्यक्त केले.

### अभिप्राय व शिफारशी

भोकर पंचायत समिती अंतर्गत सन २०१२-१३ या अहवाल वर्षात दहन/दफन भुमीची ११ कामे हाती घेण्यात आली होती. या कामांकरीता शासनाकडून एकूण ४४ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता. या अकरा कामांपैकी ७ कामे रद्द करण्यात आली तर केवळ चार कामे पूर्ण होवू शकली. सदर चार कामांवर २० लक्ष रुपये निधी खर्च करण्यात आला व उर्वरित २४ लक्ष रुपयांचा निधी शासनाकडे परत गेला आहे. वस्तुत: अहवाल वर्ष २०१२-१३ मध्ये प्राप्त झालेला निधी पंचायत समितीला खर्च करण्याकरीता वाढीव एक वर्ष २०१३-१४ करीता उपलब्ध होता. परंतू संबंधित विभागाचे अधिकारी सदर निधी दोन वर्षाच्या काळात खर्च करु शकलेले नाही याबाबत समिती असमाधान व्यक्त करते.

ग्रामीण भागात हिंदू, मुस्लीम, बौध्द ई. धर्मीय नागरीकांच्या सोयीकरीता दहन/दफन भुमीची कामे हाती घेतली जातात. जेणेकरुन मयत व्यक्तींच्या अंत्यविधीकरीता जमणाऱ्या नागरीकांना किमान सुविधा उपलब्ध होतात. परंतू प्रस्तुत प्रकरणात रद्द केलेल्या ७ कामांकरीता ४ कामांना जागा उपलब्ध होवू शकली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. मुळात जागा उपलब्ध का झाल्या नाहीत किंवा जागा उपलब्ध झाल्याशिवाय सदर कामे मंजूर कशी करण्यात आली हे प्रश्न अनुत्तरीतच राहतात. उर्वरित ३ कामांच्या संबंधित ग्रामसेवकांनी कामे केली नसल्यामुळे संबंधित तीनही ग्रामसेवकांची एक वार्षिक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात एक वर्षासाठी बंद करण्यात आली आहे. ग्रामसेवक दर्जाच्या कर्मचाऱ्यांची वेतनवाढ बंद करण्याची कारवाई केली असली तरी ज्या कारणांसाठी ही कामे घेण्यात आली नाही ती उद्दीष्टपुर्ती झाली नाही असे समितीस वाटते. **त्याअनुषंगाने महाराष्ट्र विकास सेवांतर्गत गटविकास अधिकारी आणि संबंधित विस्तार अधिकारी यांची पर्यवेक्षकीय जबाबदारी प्रस्तुत प्रकरणात निश्चित करणे आवश्यक होते. परंतू अशी कोणतीही कारवाई न करुन त्यांस पाठीशी घालण्याचा प्रकार जिल्हा परिषद प्रशासन करीत आहे. त्यामुळे रद्द झालेल्या सातही दहन/दफन भुमींची कामे रद्द होण्यामागे पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांची जबाबदारी काय होती व ती त्यांनी नियमाप्रमाणे पार पाडली आहे किंवा नाही याची चौकशी करुन त्यात दोषींवर कारवाई करण्यात यावी व सदर रद्द केलेली कामे नव्याने मंजूर करुन घेऊन ती लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावीत व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस पाठवावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण अकरा

## जिल्हा परिषद, नांदेड (प्रशासन)

### सन २०१२-१३ या अहवाल वर्षात इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुलांच्या कामांबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १३ ते १५ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नांदेड जिल्हा परिषदेस भेट दिली. सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने गटविकास अधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सन २०१२-१३ या वर्षात इंदिरा आवास घरकुल योजनेंतर्गत एकूण किती घरकुले बांधण्यात आली, या योजनेंतर्गत किती घरकुलांचा ताबा लाभार्थ्यांना देण्यात आला, उर्वरित लाभार्थ्यांना ताबा न देण्याची कारणे काय आहेत, तसेच उप अभियंता यांनी प्रमाणित न केल्यामुळे किती लाभार्थ्यांना घरकुलाचा ताबा मिळाला नाही, यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, अहवाल वर्षात इंदिरा आवास योजनेतून ७५४ घरकुले मंजूर केली होती, त्यापैकी ७२३ घरकुलांचे काम सुरु करण्यात आले होते. ६४७ घरकुले पूर्ण झाली असून ७६ प्रगतीपथावर होती. ३१ घरकुले रद्द केली होती. यावर पुढे समितीने अशी विचारणा केली की, ३१ घरकुले रद्द का केली, यावर गटविकास अधिकारी यांनी सांगितले की, बऱ्याच कालावधीनंतर सुध्दा काम केले नाही म्हणून रद्द केली आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, जागेअभावी रद्द केलेली नाहीत हे खरे आहे काय, यावर गटविकास अधिका-यांनी समितीस सांगितले की, होय. घरकुलाची तरतूद ६८५०० रुपये होती, १५०० रुपये लाभार्थ्यांचा हिस्सा होता. या रक्कमेत घरकूल होत नाही. यावर समितीने असे निदेश दिले की, ३१ घरकुलांसाठी हे कारण संयुक्तिक वाटत नाही. पूर्वी यापेक्षा कमी किंमतीत घरकूल बांधले जात होते. शासनाची योजना नको असे कोणी म्हणणार नाही. पंचायत समिती प्रशासनाने पुन्हा तपासणी करावी. स्वत:ची जागा नसेल तर ग्रामीण भागात जागा खरेदी करण्यासाठी पंडीत दिनदयाळ योजनेअंतर्गत शासनामार्फत ५० हजार रुपये लाभार्थ्यांना जागा विकत घेण्यासाठी दिले जातात. त्यामधून २५० चौ.फूट जागा विकत घेता येऊ शकते. यावर गटविकास अधिकारी यांनी समितीला माहिती दिली की याबाबत खात्री करुन अहवाल समितीला सादर करण्यात येईल.

यावर समितीने पुन्हा विचारणा केली की, ३१ घरकुले रद्द केली, ही संख्या मोठी आहे. शासनाने पंडित दिनदयाळ यांच्या नावाने नवीन योजना आणली आहे. ग्रामीण भागात जागा उपलब्ध नसेल तर या योजनेअंतर्गत ५० हजार रुपये जागा खरेदी करण्यासाठी लाभार्थ्यांना घरकुलाच्या मंजूर रकमेच्या व्यतिरिक्त दिले जातात. पक्की घरे किती लोकांची होती व गाव नमुना ८(अ) नावावर नाही, जागेची निश्चिती नाही असे किती लोक होते याचा अहवाल एका महिन्याच्या आत समितीला सादर करावा. घरकूल कोणी नाकारणार नाही. ग्रामसभेने यादी पाठविली तर डीआरडीए मार्फत घरकुले मंजूर केली जातात. त्यांचे पंचायत समितीमार्फत समुपदेशन करावे. ग्रामीण भागात ७० ते ८० हजार रुपयात जागा मिळू शकते, शासन त्यांना ६० हजार रु?पये देणार आहे हे त्यांना पटवून द्यावे असे निदेश समितीने दिले.

**समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

सन २०१२-१३ या अहवाल वर्षात इंदिरा आवास घरकुल योजनेंतर्गत एकूण किती घरकुले बांधण्यात आली, या योजनेंतर्गत किती घरकुलांचा ताबा लाभार्थ्यांना देण्यात आला, उर्वरित लाभार्थ्यांना ताबा न देण्याची कारणे काय आहेत, तसेच उप अभियंता यांनी प्रमाणित न केल्यामुळे किती लाभार्थ्यांना घरकुलाचा ताबा मिळाला नाही, घरकुले रद्द का करण्यात आली, तसेच दुबार लाभ देण्यात आला आहे काय याची चौकशी करण्यात यावी असे निदेश समितीने दिलेले आहेत त्यानुसार सदर प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

**अ) पंचायत समिती हिमायतनगर :-**

सन २०१२-१३ या अहवाल वर्षात इंदिरा आवास योजनेअंतर्गत एकूण ७५४ घरकुल बांधकामास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली. त्यापैकी ६४७ घरकुलांची कामे पूर्ण झाली. पूर्ण झालेल्या ६४७ घरकुलाचा ताबा लाभार्थीनी बांधकाम केल्यामुळे लाभार्थीकडेच आहे. उर्वरित १०७ लाभार्थ्यापैकी ७६ घरकुलांची कामे प्रगतीत असून ३१ घरकुलांची कामे रद्द करण्यात आली

आहेत. उपअभियंता यांचेस्तरावर एकही घरकूल ताबा देण्यासाठी प्रलंबित नाही. किंबहूना बांधकाम स्वत: लाभार्थी करीत असल्याने ताबा देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. ३१ घरकुलांची कामे रद्द करण्यात आली असून त्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.---

| | | |
|---|---|---|
| १) | लाभार्थी यादीत दुबार नाव | ०१ |
| २) | लाभार्थी गावात राहत नाहीत | १९ |
| ३) | लाभार्थी मयत वारस नाही | ०७ |
| ४) | लाभार्थीस घरकुल बांधण्यास जागा नाही. | ०२ |
| ५) | लाभार्थीस यापूर्वी लाभ दिल्यामुळे रद्द | ०२ |
| | **एकूण** | **३१** |

**ब) पंचायत समिती किनवट :-**

सन २०१२-१३ या अहवाल वर्षात इंदिरा आवास योजनेअंतर्गत १९५२ घरकुलांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. त्यापैकी १२८७ घरकुले बांधण्यात आली. उपरोक्त प्रमाणे १९५२ पैकी १२८७ घरकुलांचा ताबा लाभार्थींनी बांधकाम केल्यामुळे लाभार्थींकडेच आहे. उर्वरित ६६५ घरकुलांपैकी ५१५ घरकुले प्रगतीपथावर आहेत व १५० घरकुले रद्द करण्यात आली आहेत. उपअभियंता यांचेस्तरावर एकही घरकुल ताबा देण्यासाठी प्रलंबित नाही. किंबहूना बांधकाम स्वत: लाभार्थी करीत असल्याने ताबा देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. किनवट तालुक्यात १९५२ पैकी १५० घरकुले रद्‌द करण्यात आली. त्याची कारणे खालीलप्रमाणे आहे.---

| | | |
|---|---|---|
| १) | घरकुल बांधकामासाठी जागा नाही असे लाभार्थी | २१ |
| २) | पूर्वी घरकुल योजनेचा लाभ घेतलेले लाभार्थी | ३३ |
| ३) | लाभार्थी गावात राहत नाहीत | ५६ |
| ४) | पक्क घर असलेले लाथार्थी | ०९ |
| ५) | लाभार्थी मयत वारस नाही | १७ |
| ६) | इतर कारणासाठी रद्द केलेले | १४ |
| | **एकूण** | **१५०** |

उपरोक्त मंजूर घरकुल १९५२ पैकी एकाही लाभार्थीस दुबार लाभ देण्यात आलेला नाही. सदर प्रकरणी चौकशी करुन पंचनामा केला असता ३३ लाभार्थ्यांना पूर्वी लाभ घेतलेले असल्यामुळे प्रस्तावच रद्द केलेले आहेत इंदिरा आवास योजनेअंतर्गत पात्र लाभार्थींनाच लाभ देण्यात आलेला आहे. सोबत १५० घरकुलांचा स्थळ पाहणी अहवाल सुलभ संदर्भासाठी जोडलेला आहे.

**क) पंचायत समिती माहूर :-**

सन २०१३-१३ या अहवाल वर्षात इंदिरा गांधी आवास योजनेअंतर्गत ५८९ घरकुलांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. त्यापैकी ४७२ घरकुले बांधण्यात आली. उपरोक्तप्रमाणे ५८९ पैकी ४७२ घरकुलांचा ताबा लाभार्थींनी बांधकाम केल्यामुळे

लाभार्थीकडेच आहे. उर्वरित ११७ घरकुलापैकी ९१ घरकुले अपूर्ण आहेत. उप अभियंता यांचे स्तरावर एकही घरकुल ताबा देण्यासाठी प्रलंबित नाही. किंबहूना बांधकाम स्वत: लाभार्थी करीत असल्याने ताबा देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. माहूर तालुक्यात ५८९ पैकी २६ घरकुले रद्द करण्यात आलेली आहेत. त्याची कारणे खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | घरकुल बांधकामासाठी जागा नाही असे लाभार्थी | ०५ |
| २) | पूर्वी घरकुल योजनेचा लाभ घेतलेले लाभार्थी | १० |
| ३) | लाभार्थी गावात राहत नाहीत | ०७ |
| ४) | पक्क घर असलेले लाथार्थी | ०० |
| ५) | लाभार्थी मयत वारस नाही | ०४ |
| ६) | इतर कारणासाठी रद्द केलेले | ०० |
| ७) | **एकूण** | **२६** |

उपरोक्त मंजूर घरकुल ५६३ पैकी एकाही लाभार्थीस दुबार लाभ देण्यात आलेला नाही. इंदिरा आवास योजने अंतर्गत पात्र लाभार्थांनाच लाभ देण्यात आलेला आहे.

**समितीस ग्रामविकास विभागाकडून उपरोक्त मुद्यांची माहिती खालीलप्रमाणे प्राप्त झाली.**

सदर प्रश्नाधीन बाब सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाशी संबंधित नाही.

जिल्हा परिषद नांदेड यांनी दिलेल्या अभिप्रायाशी सहमत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की सन २०१२-२०१३ या अहवाल वर्षात इंदिरा आवास योजनेंतर्गत किती घरकुले बांधण्यात आली, या योजनेंतर्गत किती घरकुलांचा ताबा लाभार्थ्यांना देण्यात आला, उर्वरित लाभार्थ्यांना ताबा न देण्याची कारणे काय आहेत, तसेच उप अभियंता यांनी प्रमाणित न केल्यामुळे किती लाभार्थ्यांना घरकुलाचा ताबा मिळाला नाही, घरकुले रद्द का करण्यात आली, तसेच दुबार लाभ देण्यात आला आहे काय, याची चौकशी करण्यात यावी, असे निर्देश समितीने दिलेले आहेत, त्यानुसार सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, पंचायत समितीनिहाय माहिती घेतलेली आहे. सन २०१२-२०१३ या अहवाल वर्षात इंदिरा आवास योजनेंतर्गत एकूण ७५४ घरकुल बांधकामास प्रशासकीय मान्य प्राप्त झाली. त्यापैकी ६४७ घरकुलांची कामे पूर्ण झाली. पूर्ण झालेल्या ६४७ घरकुलांचा ताबा संबंधित लाभार्थ्यांना देण्यात आलेला आहे. उर्वरित १०७ लाभार्थ्यांपैकी ७६ घरकुलाची कामे प्रगतीत असून ३१ घरकुलांची कामे रद्द करण्यात आली आहे. त्यावेळी जागेची उपलब्ध नसल्यामुळे घरकुलांची कामे रद्द करण्यात आली होती. उप अभियंता यांच्या स्तरावर एकही घरकूल ताबा देण्यासाठी प्रकरण प्रलंबित नव्हते, ही वस्तुस्थिती आहे. लाभार्थी यादीत एकजण दुबार होता. १९ लाभार्थी गावात राहत नव्हते आणि ७ लाभार्थ्यांना मयत वारस नव्हता. २ लाभार्थ्यांस घरकुल बांधण्यास जागा नव्हती. अशा प्रकारे ३१ लाभार्थ्यांची घरकुले रद्द करण्यात आली होती. किनवट तालुक्यात १९५२ घरकुलांपैकी १५० घरकुले रद्द करण्यात आली आहेत. तसेच माहुर तालुक्यात ५८९ घरकुलांपैकी २६ घरकुले रद्द करण्यात आली आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावर नांदेड जिल्हा परिषदेतील सर्व पंचायत समित्यांना भेटी देवून गटविकास अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. समितीने सन २०१२-२०१३ या वर्षात इंदिरा आवास घरकुल योजनेअंतर्गत माहितीवरुन असे दिसून येते की, नांदेड जिल्ह्यातील हिमायतनगर, किनवट व माहूर या पंचायत समित्यांमधील मंजूर घरकुलांपैकी मोठ्या प्रमाणावर घरकुले अपूर्ण होती व रद्द करण्यात आलेली होती. नांदेड जिल्हा परिषदेअंतर्गत हिमायतनगर पंचायत समितीमध्ये अहवाल वर्षात ७५४ घरकुलांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली, ६४७ घरकुलांचे काम पूर्ण झाले आहे. परंतू ७६ घरकुले अपूर्ण राहीली व ३१ घरकुले रद्द झाली. किनवट पंचायत समिती अंतर्गत अहवाल वर्षात १९५२ घरकुलांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली तर त्यापैकी १२८७ घरकुले बांधून तयार झाली. परंतू ५१५ अपूर्ण आहेत तर १५० घरकुले रद्द झाली. माहूर पंचायत समिती अंतर्गत ५८९ घरकुलांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यापैकी ४७२ घरकुले बांधण्यात आली, ९१ घरकुले अपूर्ण तर २६ घरकुले रद्द झाली आहेत. नांदेड जिल्ह्यातील १३ तालुके असून त्यापैकी केवळ तीन तालुक्यांत बांधण्यात आलेल्या घरकुलांचीही संख्या मोठी आहे याबाबत समिती समाधान व्यक्त करते. परंतू अपूर्ण घरकुलांची ६८२ ही संख्या व रद्द केलेल्या घरकुलांची २०७ ही संख्या देखील समितीला चिंता करायला लावणारी आहे. अशा परिस्थितीत एकीकडे घरकुलासाठी लाभार्थ्यांची प्रतिक्षा यादी वाढत असताना अपूर्ण घरकुलांची कामे मोठ्या प्रमाणावर आहेत. सदरची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांनी प्रकरणनिहाय लक्ष घालून येत्या सहा महिन्यात पूर्ण करावी व त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

उक्त तीन तालुक्यातून रद्द झालेल्या घरकुलांची २०७ ही संख्या निश्चितच गंभीर आहे. राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील अनुसूचित जाती/जमाती, मुक्त वेठबिगार तसेच मागासेत्तर यांना मोफत घरे उपलब्ध करुन देण्याकरीता इंदिरा आवास योजना सन १९८५-८६ पासून राबविण्यात येत आहे. लाभार्थ्यांकडे घरकुल बांधण्याकरीता जागेचा अभाव असल्यास पंडीत दिनदयाळ उपाध्याय योजनेअंतर्गत शासनामार्फत लाभार्थ्यांस घरकुलाच्या मंजूर रकमे व्यतिरिक्त लाभार्थ्यांस स्वत:ची जागा उपलब्ध नसल्यास ती खरेदी करण्यास व त्यावर घरकुल बांधण्यासाठी जागा खरेदी करण्याचा पर्याय उपलब्ध आहे. परंतू समितीच्या भेटी दरम्यान समितीला आढळून आले की, शासन राबवित असलेल्या पंडीत दिनदयाळ उपाध्याय योजनेचा व्हावा तसा प्रसार व प्रचार ग्रामीण भागात झालेला नाही. त्यामुळे अनेक बेघर घरकुलांच्या लाभार्थ्यांना जागे अभावी घरकुलांपासून वंचित रहावे लागत आहे. या वंचित घटकाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व त्यांना निवारा मिळण्यासाठी घरकुल देण्यासंदर्भात शासनाने नव्याने सुरु केलेली पंडीत दिनदयाळ उपाध्याय जागा खरेदी योजना यशस्वी करण्यासाठी तथा फलद्रुप होण्यासाठी तिचा प्रसार व प्रचार होणे अगत्याचे आहे. राज्यात जागे अभावी इंदिरा आवास योजनेचा लाभ मिळण्यापासून वंचित असलेल्या लाभार्थ्यांची संख्या लाखांच्या घरात असल्याची शक्यता आहे. त्यामुळे केंद्र पुरस्कृत इंदिरा आवास योजनेच्या निधीचा राज्य शासनास पूर्ण क्षमतेने उपयोग करुन घेता येत नव्हता. त्याचप्रमाणे सामाजिक न्याय विभागाची रमाई आवास योजना, आदिवासी विकास विभागाची शबरी आवास योजना ह्या राज्य पुरस्कृत योजनेमध्ये देखील मोठ्या प्रमाणात पात्र लाभार्थी केवळ जागा अभावी घरकुल योजनेचा लाभ देता येणे शक्य होत नव्हते. ग्रामीण भागात घरकुल योजनेतील लाभार्थ्यांकडे घरकुल बांधकामासाठी स्वत:ची जागा नसलेल्या दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांना जागा खरेदीसाठी अतिरिक्त अर्थसहाय्य उपलब्ध व्हावे यासाठी घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना दिनांक ३० डिसेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये **(परिशिष्ट ३.१**) शासनाने सुरु केली. **केंद्र पुरस्कृत इंदिरा आवास योजनेतील दारिद्र्य रेषेखालील भूमिहीन कुटूंबांना जागा खरेदी करण्यासाठी केंद्र शासनामार्फत रु. १०,०००/- व या योजनेअंतर्गत रु. ४०,०००/- असे एकूण रु. ५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच रमाई आवास योजना व शबरी आवास योजना या राज्य पुरस्कृत घरकुल योजनेतील दारिद्र्य रेषेखालील घरकुल पात्र भूमिहिन कुटूंबांना जागा खरेदी करण्यासाठी या योजनेअंतर्गत रु. ५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे. जागेअभावी रद्द होणाऱ्या घरकुलांच्या लाभार्थ्यांपर्यंत सदर योजना पोचविण्याकरीता अंमलबजावणी यंत्रणेने पुढाकार घ्यावा व योजनेचा प्रसार व प्रचार करुन योजना अधिकाअधिक लाभार्थ्यांपर्यंत पोचवून यशस्वी करण्याकरीता सदरचा निर्णय प्रत्येक ग्रामपंचायतींपर्यंत कसा पोहोचेल याची उपाययोजना करण्यासंदर्भात विभागाने कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण बारा

## जिल्हा परिषद, नांदेड (प्रशासन)

### पंचायत समिती नायगांव अंतर्गत मौजे कृष्णुर येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील समस्यांबाबत

समितीने दिनांक १३ ते १५ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नांदेड जिल्हा परिषदेस भेट दिली. दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ रोजी समितीने कृष्णूर ता.नायगांव (खै.) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भेट देवून शाळेतील इयत्ता पाचव्या वर्गास समितीने भेटी देऊन शैक्षणिक कामकाजाची पाहणी व प्रगतीबाबत विचारणा केली. समितीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कृष्णूर ता.नायगाव जि.नांदेड येथील सदरील वर्गातील शैक्षणिक कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले व त्यानंतर समितीने कृष्णूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शौचालयांची उपलब्धता आहे की नाही याची पाहणी केली. मुले व मुली यांच्यासाठी वेगवेगळे शौचालय उपलब्ध आहे. परंतु मुलांकरिता असलेल्या शौचालयाची पाहणी केली असता ते ब-याच कालावधीत वापरात नसावे असे दिसून आले. कारण त्याला लावलेले कुलूप गंजलेले असून शौचालयाच्या बाहेरील भागास कोळयांची जाळी झालेली होती. शौचालय उघडून दाखवा असे संबंधित मुख्याध्यापक यांना सांगितले. त्यानंतर मुख्याध्यापकांनी समितीस शौचालयाची चावी सरपंचाकडे असल्याचे सांगितले. यावर समितीने दगडाच्या सहाय्याने कुलूप तोडण्यास सांगण्यात आले. पण कुलूप काही तुटले नाही व त्यामुळे समितीला शौचालयाची अंतर्गत पाहणी करता आली नाही. सदरील मुलांच्या शौचालयाकडे जाणाऱ्या मार्गात मोठमोठे दगड पडलेले असून तिथून शौचालयाकडे जाण्यास लहान मुलांनाच काय पण मोठया माणसांना चालत जाणे कठीण आहे. मुले पडून जखमी होऊ शकतात. समितीने पुढे अशी विचारणा केली की, कृष्णूर येथील प्राथमिक शाळेस शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी तसेच विस्तार अधिकारी (शिक्षण) हे भेट देतात का, यावर मुख्याध्यापकांनी समितीस अशी माहिती दिली की, या शाळेला भेट देण्यासाठी शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी तसेच विस्तार अधिकारी (शिक्षण) अधिकाऱ्यांनी मुक्काम केल्याचे सांगितले.

समितीने तद्नंतर मुलींसाठी बांधलेल्या शौचालयाची/प्रसाधनगृहाची पाहणी केली असता शौचालयास पाणी पुरवठा नसल्याचे व ते दुरावस्थेत असल्याचे दिसून आले. तसेच लघुशंकेच्या जागी विभाजक केलेले नाहीत त्यामुळे मुलींना तेथे संकोचावस्थेत वावरावे लागते, ही अतिशय गंभीर व लज्जास्पद बाब असल्याचे नमूद करुन समितीने शाळेतील विद्यार्थ्यांना शौचालय चालू स्थितीत पाणी पुरवठयासह उपलब्ध न करुन दिल्याबाबत मुख्याध्यापकाविरुध्द तसेच शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी यांच्यावर योग्य ती दंडात्मक कार्यवाही करावी असे निदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना दिले.

यानंतर समितीने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आहार तयार करण्याच्या खोलीची पाहणी केली. तेथे स्वयंपाकीणबाई व आहार पुरवठा करणारे व्यक्ती उपस्थित होते. खिचडी करण्याकरिता एका पातेल्यात सुमारे २५ किलो तांदूळ होता तसेच बाजूला भाजीपाला ठेवलेला होता. यावर समितीने ठेवलेल्या भाजीपाल्याची पाहणी केली असता ती कोथिंबीर असून ती सडलेली असल्याचे दिसून आले. तसेच अन्य पालेभाज्या सुध्दा चांगली खाण्यायोग्य नसल्याचे दिसून आले. शाळेतील विद्यार्थ्यांना आवश्यक तेव्हा मिळेल अशा प्रकारे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली नसल्याचे दिसून आले. आहार पुरवठा करणा-या व्यक्तीस याबाबत विचारले असता आम्ही मुलांना जागेवर नेऊन पिण्याचे पाणी देतो असे सांगितले. यावर समितीने शाळेच्या परिसरातील पिण्याच्या पाण्याच्या नळाची पाहणी केली. नळाच्या आजूबाजूस दगड असून पाण्यामुळे चिखल आढळून आला. त्यामुळे मुले पडून जखमी होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे तसेच मुख्याध्यापकांनी सुरक्षितपणे मुलांना पिण्याचे पाणी मिळेल याची काळजी घेतल्याचे दिसले नाही. याबाबत मुख्याध्यापक नरवाडे यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करण्यात यावी असे निदेश समितीने दिले.

कृष्णूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शौचालय उघडून पहावे म्हटल तर चावी नाही. त्या कुलूपची चावी सरपंचाकडे असल्याचे तेथील मुख्याध्यापकाने समितीस सांगितले. मुलांसाठी व मुलींसाठी सुलभ शौचालय असावयास हवे पण या बाबीकडे अत्यंत दुर्लक्ष करण्यात आलेले आहे. शौचालयासाठी ९०,०००/- रुपये खर्च करण्यात आलेले आहेत पण ते वापरात नाही व दुरावस्थेत आहे. याकरीता विभागप्रमुख शिक्षणाधिकारी, गट विकास अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक असल्याचे निदेश देवून समितीने विचारणा केली की, जिल्हयात एक लाख शौचालये बांधली आहेत असे समितीस सांगण्यात येत आहे. परंतु अनेक शाळेत शौचालये नसल्याचे का दिसून येत आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांनी समितीस विदित केले की, जिल्हा परिषदेने जिल्हयांत शाळांचे केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी, गट

शिक्षणाधिकारी यांना दर महिन्यात जिल्हा परिषद शाळांच्या ठिकाणी मुक्काम करण्याबाबत आयोजित केले असून तेथे त्यांनी शौचालयाचा वापर करावा असेही आदेशित केले आहे. असे केल्यामुळे शाळांमधील शौचालये वापरात येतील. जिल्हयातील प्रत्येक केंद्र प्रमुखाकडे १० ते १५ शाळा आहेत. त्यांना शौचालयांच्या वापराबाबत अहवाल देण्याबाबत सूचित केलेले आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, शौचालयाची कामे कोण करते, ग्राम शिक्षण समितीने त्याकडे लक्ष दिले पाहिजे. एका शौचालयास ९० हजार रुपये खर्च करुनही त्याचा वापर होत नसेल तर त्याचा उपयोग काय, कृष्णूरच्या शाळेच्या शौचालयावर १,८०,०००/- रुपये (दोन युनिट असल्याने) खर्च झाला असावा. पण त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शौचालयाचा वापर नाही. याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही प्रस्तावित करावी आणि अहवाल समितीकडे सादर करावा. शाळांमध्ये योग्य प्रकारची शौचालयांची सुविधा उपलब्ध न करुन दिल्याबाबत संबंधित अधिका-यांना निलबित का करण्यात येऊ नये, याबाबत त्यांना नोटीसा द्यावी व अहवाल सादर करण्याचे निदेश समितीने दिले.

**समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

पंचायती राज समितीने पंचायत समिती नायगाव अंतर्गत मौजे कृष्णूर येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस भेट दिली असता समितीने शाळेतील विद्यार्थ्यांना शौचालय चालू स्थितीत पाणीपुरवठयासह उपलब्ध न करुन दिल्याबाबत मुख्याध्यापकांविरुध्द तसेच शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांच्यावर योग्य ती दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी, तसेच शाळेच्या परिसरातील पिण्याच्या पाण्याची नळाची पाहणी करण्यात आली असता नळाच्या आजूबाजूस दगड असून पाण्यामुळे चिखल आहे. त्यामुळे मुले पडून जखमी होत असून मुलांच्या पिण्याच्या पाण्याची काळजी घेतल्याचे दिसून येत नाही, मुलांच्या शालेय पोषण आहाराची योग्य ती काळजी घेतली नसल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेऊन पुरेसा पोषण आहार शिजविण्याबाबत मुख्याध्यापकांनी स्वत: लक्ष घालावे असे समितीने निदेश दिले त्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

सदरील प्रकरणात चौकशी अती शाळेचे मुख्याध्यापक श्री. ए. ई. नरवाडे व केंद्र प्रमुख श्री. एम. व्ही. शेख यांच्यावर जबाबदारी निश्चित केली असून त्यांना आदेश क्र. ३२७, दिनांक ८ ऑक्टोबर, २०१५ अन्वये निलंबित केले आहे व सर्व संबंधितांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. श्री.लखमावाड, प्रभारी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती नायगाव यांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात या कार्यालयाचे आदेश क्र. १२२०५ दिनांक २१ डिसेंबर, २०१५ अन्वये रोखण्यात आलेली आहे.

**समितीस शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून उपरोक्त मुद्यांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद नांदेड यांच्या अभिप्रायाशी सहमत.

## चौकशी अहवाल

पंचायती राज समितीने क्षेत्रीय भेटी दरम्यान जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा कृष्णूर ता.नायगाव जि.नांदेङ येथे दिलेल्या निर्देशाचे अनुषंगाने चौकशी अहवाल सादर करणेबाबत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कृष्णुर ता.नायगाव येथे इ.१ली ते ७ वी पर्यंतचे वर्ग आहेत. शाळेला दर्शनी भागात संरक्षण भिंत आहे. वर्ग खोल्या सुव्यवस्थित असल्याचे निर्देशास आले. नांदेड जिल्हयात पंचायत राज समितीचा दि. १३.०९.२०१५ ते १५.०९.२०१५ या दरम्यान दौरा होता. यामध्ये क्षेत्रीय भेटीच्या अचानक दौरात नायगांव तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्रथमिक शाळा कृष्णर ता.नायगांव या शाळेस पंचायती राज समितीने दि.१४.०९.२०१५ रोजी भेट दिली.

भेटी दरम्यान खालील बाबी पंचायती राज समितीच्या निर्देशनास आल्या.

१) शालेतील शौचालय बंद आढळून आले.

२) मुख्याध्यापकास शौचालय उघडण्यासाठी सूचना दिली असता मुख्याध्यापकाने शौचालय उघडून दाखविले नाही.

३) शौचालयाकडे जाण्याचा रस्ता बरोबर नव्हता.

४) शौचालय वापण्याजोगे नसल्याचे समितीचे मत झाले कारण शौचालय उघडून दाखविण्यात आलेले नव्हते.

५) विध्यार्थ्यांना पिण्याची व्यवस्था करण्यात आलेली नव्हती.

६) पिण्याच्या पाण्याचे सिलबंद कॅन कुलूपबंद रूम मध्ये ठेवण्यात आले होते.

७) मुख्याध्यापकास अभ्यासक्रमाचे संदर्भाने काही बाबी विचारणा केली असता उत्तरे बरोबर दिली नाहीत.

यावरून विर्ध्याथ्याना शौचालय चालू स्थितीत पाणीपुरवठयासह उपलब्ध करून देण्यात येत नव्हते. ही बाब स्पष्ट होती त्यामुळे संबधीत मुख्याध्यापकाची शौचालय वापराजोगे ठेवणे ही जबाबदारी असतांना त्यानी त्यांच्या कर्तव्यात कसूर केल्याचे सिध्द होत आहे. तसेच मुख्यध्यापकानी सुरक्षितपणे मुलांना पिण्याचे पाणी मिळेल याची काळजी घेतली नाही. सदरील सुविधा उपलब्ध न करून दिल्या नाहीत. या बाबतीत श्री.ए.ई.नरवाडे, मुख्याध्यापक जबाबदार आहेत. मुख्याध्यापक आपल्या कर्तव्यात कसून केल्याचे दिसून आले. परंतू शाळेस क्रेंद्र प्रमुख यांनी भेटी देवून गुणवत्ता व भौतिक सुविधा पुरेसा उपलब्ध आहेत किंवा नाही याबाबत वरिष्ठास कळविणे गरजेचे होते. केंद्रप्रमुख श्री.एम.बी.शेख यांनी शाळेस भेटी दिल्यानंतर शाळेची भौतिक व शैक्षणिक तपासणी करणे आवश्यक असतांना त्यानी ती केली नसल्याचे वरील बाबी वरून सिध्द होते. त्यानी याबाबतीत शाळेच्या असुविधेबाबत मुख्याध्यापकांना शौचालय वापरात ठेवणे अत्यंत आवश्यक आसतांना अशा प्रकारचे कोणतेही निर्देश दिलेले नाहीत. तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नियमित करणेबाबत सुध्दा नियमित करणेबाबत सुध्दा निर्देश दिल्याचे दिसून येत नाही. तसेच श्री.पी.टी.लखमावड, गट शिक्षणअधिकारी, पंचायत समिती, नायगांव यांनी शाळेस भेट दिल्यानंतर सदर शाळेची प्रशासकीय दृष्टया पाहणी करून केंद्र प्रमुख व मुख्याध्यापक यांना शौचालय व पिण्याचे पाणी उपलब्ध करणे याबाबत निर्देश देणे आवश्यक असतांना तशा प्रकारचे निर्देश दिलेले नसल्याचे दिसून येते. त्यामुळे संबधित शाळेचे मुख्याध्यापक श्री.ए.ई.नरवडे यांना जबाबदार धरून त्यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ कलम ३ भाग-२ नुसार कारवाईस पात्र ठरतात. गट शिक्षणाधिकारी यांना नियंत्रण न केल्याबद्दल ताकीद देण्यात यावी. वरील प्रमाणे अधिकारी व कर्मचारी यांचे असमन्वयामुळे शाळेतील स्वच्छतागृह व मुलांना पिण्याचे पाण्याची व्यवस्था बरोबर नसल्यामुळे पंचायत राज समितीने दौज्या दरम्यान असमाधान व्यक्त केले म्हणून संबधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर उल्लेखीत केल्याप्रमाणे निश्चितच जबाबदार धरून त्यांचेवर कारवाई प्रस्तावित करावी अशी शिफारस करण्यात येत आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायत समिती नायगांव अंतर्गत मौजे कृष्णूर ता.नायगांव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भेट दिली होती. उक्त भेटीच्या वेळी शिक्षणाच्या कामकाजाबाबत समितीने शाळेच्या वर्गात जाऊन कामकाजाची पाहणी केली. त्याबाबत समितीने समाधान व्यक्त केले. उक्त जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या शौचालयाची पाहणी केली असता मुले व मुली यांच्यासाठी वेगवेगळी शौचालये असल्याचे निदर्शनास आले. परंतु मुलांकरिता असलेल्या शौचालयाची पाहणी केली असताना ते बऱ्याच कालावधीत वापरात नसावे असे दिसून आले. त्याला लावलेले कुलूप गंजलेले असून शौचालयाच्या बाहेरील भागास कोळयांची जाळी झालेली होती. शौचालयाची चावी उपलब्ध नसल्याने समितीने दगडाच्या सहाय्याने कुलूप तोडण्याचा प्रयत्न केला. परंतु कुलूप तुटले नसल्यामुळे शौचालयाची अंतर्गत पाहणी करता आली नाही. या शौचालयाच्या आजूबाजुला मोठ मोठे दगड पडलेले असून तेथून शौचालयाकडे जाणे लहान मुलांना अशक्य असून मोठया माणसांना चालणे कठीण आहे. शौचालयात जाताना मुले पडून जखमी होऊ शकतात. म्हणून या प्राथमिक शाळेस शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी तसेच विस्तार अधिकारी (शिक्षण) हे भेट देतात का, याबाबत मुख्याध्यापकांनी समितीस "होय" अशी माहिती दिली. तथापि, या दुरावस्थेबाबत संबंधितांकडून काहीही कारवाई केली नसल्याचे समितीला दिसून येते.

समितीने त्यानंतर मुलींसाठी असलेल्या शौचालयाची पाहणी केली असता शौचालयास पाणीपुरवठा नसल्याचे व ते दुरावस्थेत असल्याचे दिसून आले. तसेच लघुशंकेच्या जागी विभाजक केलेले नाहीत. त्यामुळे मुलींना तेथे संकोचावस्थेत वावरावे लागते. ही अतिशय गंभीर व लज्जास्पद बाब असून समितीने शालेय विद्यार्थ्यांना शौचालय चालू स्थितीत पाणीपुरवठयासह उपलब्ध न करुन दिल्याबद्दल मुख्याध्यापकाविरुध्द तसेच शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी यांच्यावर योग्य ती दंडात्मक कार्यवाही करावी असे निदेश दिले होते. त्याचप्रमाणे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन चौकशी अहवाल पाठविण्याबाबत निदेश दिले होते. उक्त निदेशानुसार जिल्हापरिषदेने संबंधितांची चौकशी सुरु केली. त्यामध्ये श्री.लखमावाड, प्रभारी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती नायगाव यांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात रोखण्यात आली. त्याचप्रमाणे शाळेचे

मुख्याध्यापक श्री.ए.ई.नरवाडे व केंद्र प्रमुख श्री.एम.व्ही.शेख यांच्यावर जबाबदारी निश्चित केली असून त्यांना दिनांक ८ ऑक्टोबर, २०१५ अन्वये निलंबित केले आहे. समिती या कार्यवाहीबाबत समाधान व्यक्त करत असून संबंधितांची विभागीय चौकशी वेळेत पूर्ण करुन त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्या दृष्टीने कठोर कार्यवाही करण्यात यावी. त्याचप्रमाणे प्रथम शाळेच्या आवारात मुला-मुलींना वेगवेगळे शौचालय वापरता यावे असे शासनाचे धोरण आहे. या धोरणानुसार या जिल्हापरिषदेचे सर्व संबंधित अधिकारी, शिक्षणाधिकारी, प्रभारी गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी (शिक्षण) त्याच बरोबर पाणीपुरवठा अधिकारी तेवढेच जबाबदार आहेत. या दृष्टीने जिल्हापरिषदेने सर्व संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करणे आवश्यक होते. तथापि, केवळ मुख्याध्यापक, प्रभारी गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी यांची चौकशी केली असून इतरांना मोकळे सोडले असल्याने समिती खेद व्यक्त करीत आहे.

**सदरहू शाळेला भेट देऊन शौचालयांची पाहणी करताना शौचालय व पाणीपुरवठयाच्या दुरावस्थेबाबत का कळविण्यात आले नाही. तसेच या संपूर्ण कामाला किती निधी मंजूर करण्यात आला, त्यापैकी किती वापरला गेला, नियमावलीप्रमाणे वापरला गेला का, याची संपूर्ण चौकशी करुन अहवाल समितीला पाठविण्याची गरज होती. परंतू असा संपूर्ण अहवाल समितीला पाठविला नसल्यामुळे समितीला निश्चित निष्कर्षापर्यंत जाता आले नाही. यास्तव चौकशी करणाऱ्या जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्याने या प्रकरणी डोळेझाक केली. म्हणून उक्त प्रकरणी जिल्हापरिषदेने पुनश्च सर्व आक्षेपीत बाबींची चौकशी करुन संबंधितांविरुध्द कठोर स्वरुपाची कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण तेरा

# जिल्हा परिषद, नांदेड (प्रशासन)

## पंचायत समिती नायगाव अंतर्गत मौजे कृष्णूर येथील अंतर्गत रस्त्याच्या कामातील गैरव्यवहार

समितीने दिनांक १३ ते १५ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नांदेड जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी पंचायत समिती नायगाव अंतर्गत समितीने मौजे कृष्णूर येथील अंतर्गत रस्त्याची पहाणी केली. त्याबाबत समितीला अशी माहिती प्राप्त झाली की, सदरील रस्त्याचे काम ४ ते ५ महिन्यापूर्वी झालेले असून काम चांगल्या दर्जाचे झाले नाही. यावर समितीने रस्त्याचे काम रस्ता आवश्यक तेवढा खोदून तपासण्यासाठी ग्रामस्थांकडून कुदळ, टिकास मागवली व तपासणीसाठी छोटा खड्डा करुन पाहणी करण्यात आली. रस्त्याच्या डांबरीकरणासाठी आवश्यक तेवढे डांबर वापरण्यात आल्याचे दिसून आले नाही. हे काम करणारी एजन्सी कोणती आहे त्याची माहिती देण्याबाबत कार्यकारी अभियंता यांना सांगण्यात आले. योग्य प्रमाणात डांबर वापरले असते तर खडीला डांबर चिकटल्याचे दिसले असते, पण तसे दिसत नाही. गावक-यांनीही या कामात डांबर अत्यंत कमी प्रमाणात वापरल्याचे सांगितले. कार्पेटला डांबर फार कमी वापरल्याचे दिसून येते. यावर पुढे समितीने रस्त्याच्या कामासाठी डांबर निकृष्ट दर्जाचे आहे असे वाटत असल्यामुळे त्याचा नमुना प्रयोगशाळेत पाठवून तपासणी करुन घ्यावी असे निदेश दिले. रस्त्यावर खडी टाकून डांबरीची फवारणी (स्प्रे) करण्यात आली नसल्याचेही ग्रामस्थांनी सागितले. बीबीएम व डब्ल्यूएम चा योग्य थर दिला नसल्याचे दिसून आले. याबाबत मोजमापपट्टीने उंची/खोली मोजून पाहणी करण्यात आली. तसेच रस्त्याची योग्यप्रकारे दबाई केलेली दिसून येत नाही. डांबर खरेदी करताना जो गेट पास मिळतो तोही समितीला दाखविण्याचे तसेच सदरहू रस्त्याचे झालेले सर्व काम नामंजूर(रिजेक्ट) करण्याच्या स्थितीतील आहे. हे काम रिजेक्ट करण्यात यावे. ज्यांनी या कामाचे बिल रेकॉर्ड केले आहे. त्यांनी (उप अभियंता, कार्यकारी अभियंता यांनी) या कामाचे सुपर व्हिजन बरोबर केलेले नाही. या कामाचे अंदाजपत्रक व ते काम कोणत्या निधीतून करण्यात आले आणि रस्त्याच्या बाजूला सांडपाणी वाहून जाण्यासाठी नाल्या केलेल्या नाहीत यासंदर्भात सविस्तर माहिती सादर करण्याचे समितीने निदेश दिले.

कृष्णूर गावातील दलीत वस्तीतील पाणी पुरवठ्या संदर्भात समितीला तक्रार प्राप्त झाली की, दलित वस्तीसाठी बोअर अधिग्रहण करण्यात आला आहे. परंतु पाणी एक दिवस आड याप्रमाणे सोडण्यात येत असून पाणी पुरेसे मिळत नसल्याचे व नळ योजनेच्या विहिरीला पाणी भरपूर आहे. पाईपलाईन झालेली आहे. पण दलित वस्तीपर्यंत नळ योजनेचे पाणी दिले जात नाही. या नळ योजनेसाठी २५ लाख रुपये खर्च झालेला आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विनंती अर्ज सादर केला आहे. परंतू सरपंच ग्रामस्थांचे म्हणणे ऐकत नाही/ मान्य करीत नाहीत. ग्रामसेवकासही पाणीपुरवठा करण्याबाबत सांगितले आहे.

यावर कोणतीही नळ योजना पूर्ण केल्यानंतर व तिच्याव्दारे पाणीपुरवठा सुरळीत होत असल्याबाबत सबंधित अधिका-यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अहवाल दिला पाहिजे. पाणी पुरवठा सुरळीत न करण्यासाठी जे अधिकारी असतील त्यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यासाठी प्रस्तावित करावे असे निदेश समितीने दिले.

**समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

(१) पंचायत समिती नायगाव अंतर्गत समितीने मौजे कृष्णूर येथील अंतर्गत रस्त्यांची पाहणी केली असता सदरहू काम निकृष्ठ दर्जाचे झाले असल्याचे समितीस आढळून आले असता समितीने सदरहू कामाची चौकशी करण्याचे निदेश दिलेले आहेत. त्यानुसार सदरहू प्रकरणी चौकशी केली असून संबंधित दोषींवर कोणत्या स्वरुपाची कारवाई केली, केलेल्या कार्यवाहीबाबत शासनाचे काय मत आहे ?

(२) दलित वस्तीसाठी बोअर अधिग्रहण करण्यात आली असून पाणी एक दिवस आड सोडण्यात आल्यामुळे पुरेसे पाणी मिळत नसल्याने ग्रामस्थांचे पिण्याच्या पाण्याचे हाल होत असल्याबाबत चौकशी करण्यात यावी, असे समितीने निदेश दिलेले असून त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आलेली आहे ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

१) मा.अध्यक्ष, पंचायत समिती यांनी दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ रोजी रस्त्याचे कामास दिलेल्या भेटी दरम्यान प्राप्त निर्देशाचे अनुषंगाने जिल्हा परिषद, नांदेड दक्षिण विभाग अंतर्गत रस्ते व पूल दुरुस्ती परीक्षण अंतर्गत कामाची गुणवत्ता तपासणी करण्याबाबत श्री.पी.आर. किर्ती, राज्य गुणवत्ता निरीक्षक, पुणे यांना कार्यालयाचे पत्र क्र. जीपन/बाविद/पी.बी.१/२०३० दिनांक ५ नोव्हेंबर, २०१५ अन्वये आदेश देण्यात आले होते.

मा. अध्यक्ष, पंचायत राज समिती यांनी प्रत्यक्ष भेट दिलेले काम कृष्णूर हिप्परगा किमी ०/०० ते १/०० रस्त्याची विशेष दुरुस्ती करणे प्रशासकीय मान्यता दिनांक ४ मार्च, २०१४ (सन २०१३-१४) मध्ये मंजूर मागील सहा महिन्यात केलेल्या इतर ०५ कामांचे गुणवत्ता तपासणी अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. राज्य गुणवत्ता निरीक्षक, पुणे यांचा अहवाल दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी प्राप्त झालेले असून यासोबत सादर करण्यात येत आहेत.

१) कृष्णुर हिप्परगा ता. नायगाव किमी ०/०० ते १/०० रस्त्याची विशेष दुरुस्ती करणे. -असमाधानकारक (सिलकोटचे काम)

२) बेळकोणी कोल्हे बोरगाव ता. बिलोली किमी ०/०० ते १/०० रस्त्याची विशेष दुरुस्ती करणे. समाधानकारक.

३) जोडरस्ता खेमा तांडा ता.कंधार किमी ०/५०० ते २/०० किमी ०/०० ते १/०० रस्त्याची विशेष दुरुस्ती करणे-समाधानकारक.

४) प्रजीमा ८३ ते मंगणाळी ता धर्माबाद किमी ०/०० ते १/०० किमी ०/०० ते १/०० रस्त्याची विशेष दुरुस्ती करणे-समाधानकारक.

५) प्रजीमा ८३ ते पिंपळगाव (ध) सालेगाव ता.बिलोली किमी ०/५०० ते १/५०० किमी ०/०० ते १/०० रस्त्यांची विशेष दुरुस्ती करणे. समाधानकारक.

६) गंगनबीड महादेव मंदिर ताकबीड ता.नायगाव किमी २/०० ते ४/०० किमी ०/०० ते १/०० रस्त्याची विशेष दुरुस्ती करणे. असमाधानकारक (सिलकोटचे काम)

वरील ६ पैकी ४ कामे समाधानकारक असल्याबाबत राज्य गुणवत्ता निरीक्षक यांचा अहवाल प्राप्त असून २ कामे सिलकोटची कामे न झाल्यामुळे असमाधानकारक असा अहवाल प्राप्त झाला आहे. सिलकोटची कामे करण्याबाबत संबंधित ठेकेदारांना नोटीस देण्यात आल्या होत्या. संबंधित ठेकेदारांकडून काम पुन:श्च करुन घेण्यात आले असून सध्या काम समाधानकारक असल्याबाबत राज्य गुणवत्ता नियंत्रक यांनी त्यांच्याकडे दिनांक १८ फेब्रुवारी, २०१६ चे अहवालानुसार कळविले आहे. कामामध्ये दुर्लक्ष गेल्यामुळे संबंधित शाखा अभियंता यांची एक वार्षिक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात आदेश क्र. ०६ दिनांक २ जानेवारी, २०१६ अन्वये बंद करण्यात आली आहे व संबंधित उप अभियंता यांना या कार्यालयाचे पत्र क्र. ०४ व ०५ दिनांक २ जानेवारी, २०१६ अन्वये ताकीद देण्यात आली आहे.

२) सदर प्रकरणी उप विभागीय अभियंता यांनी चौकशी केली असून उदभवास अपूरे पाणी असल्यामुळे सदर वस्तीमध्ये पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला होता. सद्यस्थितीत गावातील विहिर/बोअर अधिग्रहण करुन त्याद्वारे पिण्याचा पाणी पुरवठा करण्यात येवून प्रश्न सोडविण्यात आला आहे.

**समितीस ग्रामविकास व पाणीपुरवठा विभागाकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे अभिप्राय :-**

जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत.

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-**

सदर प्रकरणी उप विभागीय अभियंता यांनी चौकशी केली असून उदभवास अपूरे पाणी असल्यामुळे सदर वस्तीमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली होती. सद्यस्थितीत गावातील विहिर/बोअर अधिग्रहण करुन त्याद्वारे पिण्याचा पाणी पुरवठा करण्यात येवून प्रश्न सोडविण्यात आला आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली पंचायत समिती नायगाव अंतर्गत समितीने अंतर्गत रस्त्याची पाहणी केली असता रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याचे आढळून आले आहे. त्याबाबत समितीने दिलेल्या निर्देशानुसार चौकशी करुन दोषींवर कोणती

कारवाई करण्यात आली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, समितीने सदरहू ठिकाणी भेट दिली असता रस्त्याची पाहणी केली होती. तसेच, त्यावेळी समितीस काही लोकांनी दलीत वस्तीला पाण्याची सुविधा नसल्याबाबतची तक्रार केली होती त्यासंदर्भात बोअर अधिग्रहण करुन एक दिवसा आड पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सदरहू प्रकरणीची संबंधितांची अडचण तात्काळ सोडविण्यात आली आहे. तसेच कृष्णूर हिप्परगा रस्त्याच्या निकृष्ट कामासंदर्भात कोणती कारवाई करण्यात आलेली आहे व त्याबाबत शासनाचे मत काय आहे. विभागीय सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, सदरहू रस्त्याची तपासणी राज्य गुणवत्ता निरीक्षक यांचे मार्फत करण्यात आली असून त्यांनी सदरहू रस्त्याच्या सिलिकोटचे काम असमाधान कारक आहे असा अहवाल सादर करण्यात आला आहे. त्यानंतर सदरहू काम संबंधित कंत्राटदाराकडून पूर्ण करुन घेण्यात आले आहे. सदर प्रकरणी संबंधित ठेकेदार यांना नोटीस देण्यात आली असून संबंधित शाखा अभियंता यांची एक वार्षिक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात बंद करुन त्यांना ताकीद दिली आहे. तसेच, संबंधित कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांना जिल्हा परिषद स्तरावरुन ताकीद देण्यात आली आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदरहू दौज्यामध्ये समितीने त्या कामाला भेट दिली. ही बाब एक उदाहरण म्हणून घेता येईल. पाण्याचा प्रश्न निर्माण झाला तसेच समितीने ते काम पहाण्यासाठी त्या रस्त्यावरुन प्रवास केला. सदरहू रस्ता आता तयार केला की, पूर्वी तयार केला याबाबत चौकशी केल्यावर यातील सर्व विषय समोर आले. हा विषय एकाच रस्त्याबाबत आहे. परंतु या काळात अशा प्रकारचे किती रस्ते तयार करण्यात आले होते. तसेच भविष्यात असे होता कामा नये असे निदेश दिले. त्यावर विभागीय सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, अहवालानुसार करावयाचे काम त्यांनी पूर्ण केले आहे. विभागाने ते काम तपासण्यासाठी पुन्हा राज्य गुणवत्ता निरीक्षक, पुणे यांच्याकडे परत पाठविले होते. त्याचवेळी सदरहू एका कामाबरोबर सहा कामांची तपासणी केली होती. त्यातील दोन कामांच्या बाबतीत असमाधानकारक व चार कामांच्या बाबतीत समाधानकारक रिपोर्ट आलेला आहे. ती दोन्ही कामे पुन्हा करुन घेतलेली आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सोसायटी एकच होती की, वेगवेगळी होती. यावर विभागीय सचिवांनी समितीस माहिती दिली की, सोसायटीज् वेगवेगळ्या होत्या. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, अधिकारी एकच होते की, वेगवेगळे होते, या प्रश्नावर विभागीय सचिवांनी विदीत केले की, उप अभियंता व कनिष्ठ अभियंता वेगवेगळे होते. त्यावर समितीने निदेश दिले की, भविष्यात निकृष्ठ दर्जाची किंवा अशा प्रकारची कामे होणार नाही, याकरिता त्यांना ताकीद दिली. परंतु यापेक्षा अधिक काय कार्यवाही प्रस्तावित करता येईल, याबाबत विचार करण्याची आवश्यकता आहे. विभागाने संबंधित अधिकाऱ्याला अतिशय सौम्य शिक्षा दिलेली आहे. सदरहू अधिकाऱ्याला केवळ ताकीद देऊन त्यांची एक वार्षिक वेतनवाढ रोखलेली आहे अशा अधिकाऱ्यावर सक्त कारवाई होणे आवश्यक आहे.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने भेटीच्या वेळी कृष्णूर हिप्परगा या ०/० ते १/१०० किमी या रस्त्यास भेट देवून सदरहू रस्त्याचे काम प्रत्यक्ष खोदकाम करुन पाहिले असता निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे समितीला दिसून आले. रस्त्याच्या डांबरीकरणासाठी आवश्यक तेवढे डांबर वापरले नसून त्याचा दर्जा सुध्दा चांगला नव्हता. त्यामुळे डांबराची तपासणी प्रयोगशाळेतून करण्याचे निदेश समितीने दिले होते. बी.बी.एम. व डब्ल्यू.एम चा योग्य थर दिला नसून त्यावर डांबराची फवारणी केली नाही. रस्त्याची दबाई योग्य प्रकारे केली नाही. तसेच डांबराची खरेदी करताना जो गेट पास नंबर दिला जातो त्याची माहिती समितीस देण्यात आली नाही. एकंदरच या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून संबंधित शाखा अभियंता/उप अभियंता यांचेवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेविरुध्द कारवाई करण्याबाबत समितीने निदेश दिले असता जिल्हा परिषदेने संबंधित काम असमाधानकारक झाले असल्याचे मान्य केले असून संबंधित शाखा अभियंत्याची एक तात्पुरत्या स्वरुपात वेतनवाढ रोखण्यात आली असून उप अभियंत्यास ताकीद देण्यात आली आहे. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. समितीने प्रत्यक्ष रस्त्याची पाहणी केली, रस्त्यावरील डांबर निकृष्ट दर्जाचे होते, बी.बी.एम. व डब्ल्यू.एम योग्य प्रकारच्या खोलीत टाकले नव्हते. एकंदरीत या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून निधीच्या गैरव्यवहाराची समितीला शंका वाटत असल्याने संबंधित अभियंत्यावर केलेली कारवाई जुजबी स्वरुपाची आहे. या रस्त्यावर जेवढा खर्च मंजूर करण्यात आला तेवढा त्यावर खर्च करण्यात आला नाही. या रस्त्याच्या कामात संबंधितांनी गैरव्यवहार केला असा समितीचा स्पष्ट आक्षेप आहे. असे असूनही केवळ वेतनवाढ रोखणे व ताकीद देणे या शिक्षा पुरेशा आहेत ही बाब समितीला आश्चर्यचकीत करणारी आहे. हा सारासर संबंधित अभियंत्यांना पाठीशी घालण्याचा प्रकार आहे. **अशाप्रकारे पाठीशी घालण्याचे प्रकार प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत गंभीर असून गंभीर चुका करणाऱ्या अधिकाऱ्यास सोडल्यास भविष्यात तो यापेक्षाही मोठ्या चुका करण्याची शक्यता नाकारता येणार नाही. शिक्षा करताना चुकीचे स्वरुप पाहून जिल्हा परिषदेने शिक्षा करणे समितीला अपेक्षित होते. याप्रकरणी समिती अत्यंत गंभीर असून संबंधितांना ज्या प्रकारे शिक्षा देण्यात आली ती अत्यंत अपूरी असून चौकशी अधिकाऱ्यांच्या निर्णय क्षमतेवर शंका घेते. अत: विभागाने या प्रकरणी अत्यंत गांभीर्याने लक्ष घालून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने निर्णय घ्यावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण चौदा

## जिल्हा परिषद, नांदेड (प्रशासन)

### मौजे बेटमोगरा (ता.मुखेड, जि. नांदेड)ग्रामपंचायती मधील गैरव्यवहार

समितीने दिनांक १३ ते १५ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नांदेड जिल्हा परिषदेस भेट दिली. दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ रोजी समितीने मौजे बेटमोगरा, ग्रामपंचायत ता.मुखेड, जि.नांदेड येथे भेट दिली. भेटीच्या वेळी समितीला अशी माहिती देण्यात आली की, बेटमोगरा ग्रामपंचायत येथे आधी जो ग्रामसेवक होता त्याची बदली झाली परंतु नवीन ग्रामसेवक रुजु झाल्यानंतर त्याने अद्यापपावेतो नवीन ग्रामसेवकाला ग्राम पंचायतीचा कार्यभार व अभिलेखे दिलेने नाहीत. त्यामुळे ग्राम पंचायतीचे कामकाज करता येत नाही. नवीन ग्रामसेवकाने गट विकास अधिकारी यांना याबाबत दिनांक २१.०६.२०१५ रोजी लेखी कळविलेले आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, ग्रामसेवकाने लेखी पत्र देऊनही गट विकास अधिकारी यांनी बेटमोगरा ग्राम पंचायतीच्या कार्यभाराची व्यवस्था केली नाही ही गंभीर बाब आहे. ही जबाबदारी गट विकास अधिकारी यांची आहे. गट विकास अधिकारी यांनी एवढी गंभीर बाब कळत नाही काय, चार्ज दिला नसताना ग्राम पंचायतीचे काम कसे होईल, आधीच्या ग्रामसेवकाने नवीन ग्रामसेवकास चार्ज न दिल्याबाबत त्याला त्वरित कारणे दाखवा नोटीस द्यावी व त्यांच्याकडून ताबडतोब ग्राम पंचायतीचे सर्व रेकॉर्ड घ्यावे. रेकॉर्ड देत नसल्यास त्याच्याविरुध्द केस दाखल करावी. आधीच्या ग्रामसेवकास निलंबित करण्याचा प्रस्ताव सादर करावा असे निदेश समितीने दिले.

बेटमोगरा गावातील पाणी पुरवठा योजना चालू आहे तथापि पाणी पुरावठा योजनेचे काम बोगस करण्यात आले असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. थातूरमातूर काम करुन जुन्या पाईपलाईनलाच नवीन केल्याचे दाखविण्यात आले आहे. या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यांकडे तसेच गट विकास अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दिल्या आहेत. पाणी पुरवठा योजनेचे काम बेटमोगरा येथील ग्राम पाणीपुरावठा व स्वच्छता समितीने केलेले आहे. बेटमोगरा येथील नळ योजनेच्या कामाचे अभिलेख नांदेड येथे होणाऱ्या बैठेकीच्या वेळी समितीला दाखविण्यात यावे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी समिती नेमुन पाणी पुरवठा योजनेच्या कामाची चौकशी करुन अहवाल सादर करावा, काम बोगस केल्याचे निदर्शनास येत असल्याचे संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदवावा असे निदेश समितीने दिले.

बेटमोगरा गावातील पाणीपुरवठा योजनेच्या निकृष्ट दर्जाबाबत कार्यकारी अभियंता (पापु) यांचे म्हणणे समितीने जानून घेतले असता कार्यकारी अभियंता (पापु) यांनी समितीस विदित केले की, बेटमोगरा येथील नळ योजनेव्दारे पाणी पुरवठा चालू आहे. या योजनेस २००८ या वर्षामध्ये मंजूरी मिळाली होती. योजनेचे बहुतेक काम पूर्ण झालेले आहे व वितरण व्यवस्थेचे काम बाकी आहे. योजना पूर्णपणे पूर्ण झालेली नाही.

मौजे बेटमोगरा गावास समितीने भेट दिली असता समितीकडे अशीही तक्रार प्राप्त झाली की, बेटमोगरा येथील शौचालयांची कामेही पूर्ण करण्यात आलेली नाहीत. शौचालयाचे एकच काम अनेकवेळा दाखविण्यात येऊन पैसे उचलण्यात आलेले आहेत. समितीने याबाबत पाहणी करुन खात्री करावी यावर समितीने असे निदेश दिले की, याबाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तत्कालीन गट विकास अधिकारी याची चौकशी करावी व त्याचा अहवाल सादर करावा. शौचालयाची कामे बोगस आढळल्यास तत्कालीन गट विकास अधिकारी यांना निलंबित करण्याचा प्रस्ताव समितीकडे सादर करावा. शौचालयांच्या कामांचे सर्व रेकॉर्ड ताब्यात घ्यावे. सुवर्ण महोत्सवी घरकूल योजनेअंतर्गत झालेली कामे पण पाहून त्याबाबत अहवाल सादर करावा असे निदेश दिले. समितीस अशीही माहिती प्राप्त झाली की, येथे फक्त काही श्रीमंत माणसांच्या घरीच शौचालये आहेत. गरीबांच्या घरी शौचालयाचे काम पूर्ण करण्यात आले नाही. दलित वस्तीमध्ये शौचालये नाहीत. शौचालयांसाठी देण्यात येत असलेले पैसे लाभार्थ्यांमार्फत पोहचत नाहीत. ज्या लाभार्थ्यांची नावे यादीत आहेत,त्यांच्या शौचालयांचे फोटोसुध्दा काढून नेले, पण त्यांना पैसे देण्यात आले नाहीत. उदाहरण म्हणून श्रीमती ललिताबाई मालोजी सोनकांबळे या लाभार्थ्याची नावं सांगीतली असता श्री.दिलीप भद्रे स्वत: लाभार्थी आहे, पण त्यांनासुध्दा शौचालयाचे पैसे देण्यात आले नाहीत. त्यांचे पैसे परस्पर उचलून घेण्यात आले आहेत. तसेच एका ग्रामस्थाची आई ग्राम पंचायत सदस्या आहे. त्याच्या वडीलांच्या नावावर पण शौचालयाचे पैसे आले होते, ते त्यांना न देता परस्पर उचलण्यात आले आहेत. बऱ्याच ठिकाणी असे झालेले आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, लाभार्थ्यांचे शौचालयाचे पैसे इतर कोणी उचलून घेतले असतील तर त्यांच्यावर कार्यवाही करायला पाहिजे. याबाबत चौकशी केली आहे काय, यावर समितीला अशी माहिती प्राप्त झाली की, शौचालयांच्या बाबतीत काही मुख्य कार्यकारी अधिकारी व गट विकास अधिकारी यांच्याकडे लेखी अर्ज सादर केलेला आहे. यावर समितीने असे निदेश दिले की, चौकशी

केल्यानंतर ज्यांनी लाभार्थ्यांच्या शौचालयाचे पैसे उचलले आहेत त्यांच्याकडून वसूली करण्यात यावी व त्यांच्याविरुध्द निलंबनाच्या कार्यवाहीचा प्रस्ताव सादर करावा नंतर चौकशी सुरु करावी. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांना निलंबित करुन अहवाल सादर करावा. तत्कालीन ग्रामसेवक नवीन ग्रामसेवकास चार्ज/रेकॉर्ड देत नसल्यास त्यास अटक करवून रेकॉर्ड हस्तगत करावे व त्याच्यावर नियमानुसार कार्यवाही करावी. शौचालयांच्या कामांची चौकशी करण्यासाठी समिती गठीत करावी असे निदेश समितीने दिले.

बेटमोगरा गावास दिलेल्या भेटीत समितीस रोजगार हमी योजनेबाबत देखील तक्रारी प्राप्त झाल्या. त्यात प्रामुख्याने मयत झालेल्या व्यक्तींना मजूर म्हणून दाखविण्यात येऊन त्यांच्या मजुरीचे पैसे उचलण्यात आलेले आहेत. उदाहरणार्थ, सन २०१२ मध्ये लिंगू पोशट्टी सुनेवाड या मयत व्यक्तीचे नाव मजूर म्हणून रोहयोच्या कामाच्या यादीत दाखविलेले आहेत. तक्रारदाराने सदरील व्यक्तीचे मृत्यूप्रमाणपत्र सादर केलेले आहे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुखेड तालुक्यातील सन २०१२ मधील रोहयोअंतर्गत मुखेड तालुक्यात करण्यात आलेल्या सर्व कामांची चौकशी एक महिन्याच्या आत करावी. रोहयोच्या कामांबाबत चौकशी करताना उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांचे सहकार्य घेण्यात यावे. रोहयोच्या कामांच्या बाबतीत तक्रारदाराने असे म्हटले आहे की, जे लोक सरकारी नोकरीत आहेत त्यांची नावे सुध्दा मजुरांच्या यादीत टाकली आहेत. तसेच इंटरनेटवरुन मतदारांच्या यादी काढून घेऊन त्यातील व्यक्तींची नावे मजूर म्हणून दाखविलेली आहेत.मंडलापूर, ता.मुखेड येथील रोहयोअंतर्गत करण्यात आलेल्या सी.सी.टी.एल.बी.एस. च्या कामाबाबतही तक्रार करण्यात आली आहे. या कामाचे रेकॉर्ड मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावे असे निदेश समितीने दिले.

समितीने गावातील दलित वस्तीमधील शौचालयांच्या कामांची पाहणी केली. समितीला अशी माहिती प्राप्त झाली की, सदरील शौचालये कंत्राटदारामार्फत बांधलेली आहेत. कंत्राटदारास पैसे न दिल्यामुळे त्याने काम अर्धवट करुन सोडून दिले आहे. विस्तार अधिकारी व्ही.पी.कांबळे, गट विकास अधिकारी यांनी शौचालयाची सर्व बोगस बिले काढलेली आहेत. पाहणी करताना एक ज्येष्ठ महिलेने समितीसमोर कैफियत मांडली की, मांगवाड्यामध्ये शौचालये केलेली नाहीत. आमच्यापर्यंत कोणत्याही योजना येऊ देत नाहीत. बालाजी तुकाराम गायकवाड याने शौचालयाचे काम केले आहे पण त्याला पैसे दिले नाहीत. दुसऱ्यांनीच पैसे उचलून घेतले. बौध्दवाड्यामध्ये देखील अशीच परिस्थिती आहे. श्रीमंत लोकांच्या घरी चांगली शौचालये आहेत आम्हा गरीबांना अशी निकृष्ट शौचालये बांधून दिली आहेत. जी कधीच वापरता येत नाहीत.

यासंदर्भात चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश समितीने दिले. डॉ.प्रविणकुमार रामराव गव्हाणे (माक्रणी येथील रहिवाशी) यांनी माकणी येथील रोहयोअंतर्गत कामासंबंधात न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे. रोहयोअंतर्गत ३५ कामे केल्याचे केवळ कागदोपत्री दाखवलेले आहे. जवळपास साडेचार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे तक्रार करुन तीन वर्ष झाली आहेत. पण कोणत्याही प्रकारची या बाबतीत कार्यवाही करण्यात आली नाही. रोहयोअंतर्गत सीसीटी वगैरे काम केल्याचे सांगतात पण ती कामे अस्तित्वातच नाही. यावर समितीने असे निदेश दिले की, तक्रारदार यांनी लेखी दिलेल्या अर्जाची प्रत पंचायत राज समितीकडे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे द्यावी. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीत नमूद केलेल्या कामांबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सखोल चौकशी करावी आणि चौकशी अहवाल पंचायती राज समितीकडे एक महिन्याच्या आत सादर करावा. वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्यात यावा. जवळपास साडेचार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. रोहयोसंबंधात बेटमोगरा, मंडलापूर व माकणी या तीन गावांची चौकशी करण्यात यावी. मुखेड पंचायत समितीचे तत्कालीन गट विकास अधिकारी नवले, रामोड यांची चौकशी करावी. त्यांना निलंबित करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करावा असेही निदेश समितीने दिले.

**समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

समितीने मौजे बेटमोगरा, ग्रामपंचायत ता.मुखेड, जि.नांदेड येथे भेट देवून--

(१) बेटमोगरा गावातील पाणी पुरवठा योजनेचे काम निकृष्ठ दर्जाचे झाले असल्याचे निदर्शनास आले असता संपूर्ण मुखेड तालुक्यातील नळपाणी योजनांच्या कामाची चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे समितीने निदेश दिलेले आहेत.

(२) मौजे बेटमोगरा गावातील शौचालयाची दलित वस्तीतील कामे निकृष्ठ झाल्याचे तसेच एकही शौचालय वापरात नाही तसेच शौचालय अनुदान परस्पर दुसऱ्या व्यक्तीस दिल्याचे निदर्शनास आल्यावरुन समितीने या प्रकरणी चौकशी करण्याचे निदेश

दिले आहेत तसेच या गावात दलितवस्ती व सवर्ण वस्ती यांच्या शौचालय बांधकामात भिन्नता असल्याचे कारण काय ? याप्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली. दलित वस्तीतील शौचालयांचे पुन्हा बांधकाम करुन त्यांना ते उपलब्ध करुन देण्याबाबतची शासनाची भुमिका काय आहे ?

(३) रोजगार हमी योजनेअंतर्गत मयतव्यक्ती, शासकीय कर्मचाऱ्यांची नावे मजूरांच्या यादीत समाविष्ट असल्याचे आढळून आल्यावरुन समितीने मुखेड व कंधार तालुक्यातील सन २०१२ मधील सर्व कामांची चौकशी करण्याचे निदेश दिलेले आहेत त्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आहे ? उक्त चौकशीत दोषी आढळून आलेल्यांवर कोणती कारवाई केली, नसल्यास त्याची कारणे काय ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

१) मौ.बेटमोगरा, ता.मुखेड येथील पाणी पुरवठा योजनेची चौकशी उप विभागीय अभियंता नायगाव यांनी केली असून समितीस दिलेल्या अनुदानाच्या अनुषंगाने समितीने काम केले आहे. योजनेचे काम मानकाप्रमाणे उत्कृष्ट दर्जाचे झाले आहे. सदरील योजना सन २०१२ पासून आजतागायत कार्यान्वित असून पाणी पुरवठा चालू आहे.

मुखेड तालुक्यात भारत निर्माण कार्यक्रम अंतर्गत (४८) व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत (२६) अशा एकूण (७४) योजना मंजूर असून त्यांची चौकशी ४ उप विभागीय अभियंता यांचे मार्फत करण्यात आली आहे. मौ.बेटमोगरा व व मौ.बेळी बु.वगळता एकाही योजनेवर अनियमितता झालेली नाही.

२) मौ.बेटमोगरा येथील ग्रामसेवकाने रु.२.८२ लक्ष रक्कम समितीच्या खाते वर्ग न करता परस्पर उचलून घेतली आहे. त्यांचेकडून सदर रक्कम वसूल करण्याबाबत त्यांचेवर दोषारोप ठेवून कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच सदर कर्मचारी हे अन्य प्रकरणात दोषी आढळल्याने त्यांना निलंबित करण्यात आले आहे.

**३) तालुका मुखेड :-** पंचायत राज समितीच्या निर्देशानुसार मुखेड तालुक्यातील १२८ पैकी १०३ ग्रामपंचायत मार्फत सन २०१२-१३ मध्ये कामे हाती घेण्यात आली होती. त्यापैकी १०३ ग्रामपंचायतीमधून स्वतंत्र पथक नेमून चावडी वाचन हाती घेण्यात आले. त्या चावडी वाचनाच्या अहवालानुसार आता पावेतो ९० ग्रामपंचायतचे अहवाल प्राप्त असून उर्वरित अहवाल सादर होणे बाकी आहेत. ग्रामपंचायतीमध्ये चावडी वाचनात तक्रार नसल्याचे निष्पन्न झाले आहे. तर काही ठिकाणी पाणंद रस्त्यांची देयके देणे प्रलंबित आहेत. ग्रामपंचायत सुगाव बु., कुंद्राळ ग्रामपंचायतीमध्ये तक्रारी आढळून आल्याने पथक नेमून चौकशी करण्यात येत आहे. तसेच ज्या ग्रामपंचायतीने चौकशी पथकास अभिलेखे उपलब्ध करुन दिले नाहीत अशा संबंधित ग्रामसेवकाविरुध्द, प्रशासकीय कार्यवाही करण्यासाठी उपमुख्य कार्यकारी, अधिकारी (पं) यांना कळविण्यात आले आहे.

मौजे बेटमोगरा, मंडलापुर व माकणी या ग्रामपंचायतीमध्ये करण्यात आलेल्या कामांच्या संबंधाने प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असून चौकशीने पुढील बाबी निष्पन्न झाल्या आहेत.

१. ग्रामपंचायत बेटमोगरा :- ग्रामपंचायत बेटमोगरा अंतर्गत दिनांक २५ मार्च, २०१२ ते ३१ मार्च, २०१२ या कालावधीत झालेल्या पाणंद रस्त्याच्या कामावर हजेरीपत्रक क्र. ०८२६२६, २७, २८ मध्ये मयत व शासकीय कर्मचारी असल्याने आढळून आले आहे. तसेच याच कालावधीत याच कामावर हजेरीपत्रक क्र. ०८२६११, १२, १३ हे सुध्दा वापरण्यात आले आहे. ही दोन्ही हजरीपत्रके दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजी एकच व्हाउचर क्र.५०३ ने पारित झालेली आहेत. यावरुन ग्रामपंचायतीने एकाच कालावधीत एकाच कामावर दोन वेगवेगळे तेवढ्याच रक्कमेचे बोगस हजेरीपट तयार करुन पंचायत समितीकडे सादर केले. ते हजेरीपट कुठलीही शहानिशा, तपासणी, छाननी न करता तत्कालीन सहा. लेखाधिकारी व गटविकास अधिकारी यांनी पारित केले आहेत.

यावरुन ग्रामपंचायत बेटमोगरा येथील तक्रारीच्या अनुषंगाने तपासणीत तत्कालीन अधिकारी व कर्मचारी यांचेकडून अनियमितता व अंमलबजावणी प्रक्रियेत दुर्लक्ष झाल्यास निष्पन्न झाले आहे. सदर अनियमिततेस ग्रामपंचायत स्तरावर ग्रामरोजगार सेवक, ग्रामसेवक, व पंचायत समिती स्तरावर तांत्रिक अधिकारी (नरेगा), पंचायत समिती, नरेगा शाखेचे प्रमुख, सहाय्यक लेखाधिकारी व गट विकास अधिकारी हे जबाबदार आहेत. अनियमितता झालेल्या मजुरी वाटपास पोस्ट कार्यालय तत्कालीन ग्रामसेवक यांना निलंबित करण्यात आले आहे. २) ग्राम रोजगारसेवक यांच्या सेवा खंडीत करण्याचे आदेश गट विकास अधिकारी पं. स. मुखेड यांना देण्यात आले आहेत. ३) संबंधित कंत्राटी तांत्रिक अधिकारी (नरेगा) यांच्या सेवा खंडीत करण्यात येत आहेत. ४) लेखाविषयकबाबतीत अनियमिततेस तत्कालीन संबंधित सहा. लेखाधिकारी व्ही. बी. कांबळे यांचेविरुध्द शास्तीची कार्यवाही करणेबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना कळविण्यात आले आहे. ५) तत्का. गट विकास अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला आहे, अद्याप खुलासा अप्राप्त आहे.

**२. ग्राम पंचायत मंडलापूर :-** मौजे मंडलापूर, ता.मुखेड येथील चावडी वाचनासाठी पो.स्टे.कडून उपलब्ध करुन घेण्यात आलेल्या ९ हजेरीपटाचे पोलीस बंदोबस्तात चावडी वाचन घेतले. ज्यात एकूण ११२ मजूर/ग्रामस्थ हजर होते. त्यापैकी १२ मजूरांनी चावडी वाचनातील हजेरी पटावर त्यांनी काम न करता त्यांची बोगस नावे टाकल्या बाबत लेखी जबाब दिला आहे. चावडी वाचनावेळी तक्रार केलेल्या १२ मजुरांचे काम न करता हजेरीपटात नावे आल्या बाबतची यादी अधिक्षक मुख्य डाकघर नांदेड यांना दिनांक २२.१२.२०१५ रोजीच्या पत्राद्वारे देऊन सदर मजुरांना पोष्टातून झालेल्या मजुरीच्या अदायगी बाबत अहवाल मागविण्यात आला होता. संबंधिताचा अहवाल प्राप्त झाला असून SB-(withdraw Slip) उपलब्ध नसल्याचे अधिक्षक, डाकघर नांदेड यांनी कळविले आहे. त्याबाबत संबंधीत तत्कालीन सरपंच/ग्राम सेवक व ग्रामरोजगार सेवक व पोष्ट खाते यंत्रणा जबाबदार आहेत. सदर ग्राम पंचायती अंतर्गत झालेल्या सर्व कामांची तांत्रिक तपासणी करण्यासाठी त्रयस्त अधिकारी यांचे पथक नेमण्यात आले असून त्यांच्या अहवालावरुन पुढील कार्यवाही हाती घेण्यात येईल. तक्रार कर्त्यांने केलेल्या तक्रारी ह्या online Data वरुन केल्याचे दिसून आले. चावडी वाचनावेळी हजेरीपटावरील मजुरांची नावे व मनरेगा संकेतस्थळ Online Muster मधील नावे यात मोठ्या प्रमाणात तफावत आढळून येतात. Online Data व प्रत्यक्ष हजेरीपट यातील नावाच्या तफावतीस तात्कालीन APO व Data Entry करणारी यंत्रणा जबाबदार आहे.

**३. ग्राम पंचायत माकणी :-** ग्राम पंचायत माकणी, ता.खेड येथे मग्रारोहयोच्या कामाबाबत यापूर्वीच मा.मुखेड न्यायालयाच्या आदेशाने पो.स्टे.मुक्रामाबाद येथे १५६ (३) अंतर्गत गुन्हे दाखल असून सर्व संबंधित अभिलेखे पो.स्टे.मुक्रामाबाद येथे पुढील चौकशी करीता जमा आहेत. सदर अभिलेखाच्या छायांकित प्रती प्राप्त करुन घेण्यात आल्या व ग्राम पंचायत माकणी येथे दिनांक ०८.१२.२०१५ रोजी प्राथमिक चौकशी करण्यात आली व दिनांक १८.१२.२०१५ रोजी माकणी येथे हजेरीपत्रकाचे चावडी वाचन करण्यात आले. चावडी वाचनावेळी तक्रार केलेल्या २२ मजूरांचे काम न करता हजेरीपटात नावे आल्या बाबतची यादी अधिक्षक मुख्य डाकघर नांदेड यांना पत्राद्वारे देऊन सदर मजुरांना पोष्टातून झालेल्या मजूरीच्या अदायगी बाबत अहवाल मागविण्यात आला होता. संबंधिताचा अहवाल प्राप्त झाला असून SB-(withdraw Slip) उपलब्ध नसल्याचे अधिक्षक, डाकघर नांदेड यांनी कळविले आहे. त्याआर्थी रक्कमा कोणी उचल केल्या आहेत याबाबत खात्री पटत नाही. त्याबाबत संबंधित तत्कालीन सरपंच, ग्रामसेवक व ग्रामरोजगार सेवक व पोस्ट खाते यंत्रणा जबाबदार आहे. ग्रामपंचायत मार्फत झालेल्या कामाची जायमोक्यावर पाहणी करुन तांत्रिक अहवाल देण्याबाबत पथकास आदेशीत करण्यात आले आहे. तक्रार कर्त्याने केलेल्या तक्रारी ह्या Online Data वरुन केल्याचे दिसून आले.

Online Data व प्रत्यक्ष हजेरीपट यातील नावाच्या तफावतीस तत्कालीन APO व Data Entry करणारी यंत्रणा जबाबदार आहे. सदर ग्रामपंचायती अंतर्गत झालेल्या सर्व कामाची तांत्रिक तपासणी करण्यासाठी त्रयस्त अधिकारी यांचे पथक नेमण्यात आले असून त्यांच्या अहवालावरुन पुढील कार्यवाही हाती घेण्यात येईल.

- **तालुका कंधार :-** पंचायत राज समितीच्या निदेशानुसार कंधार तालुक्यातील ११६ पैकी १०७ ग्रामपंचायती मार्फत सन २०१२-१३ मध्ये मनरेगाअंतर्गत कामे घेण्यात आली होती. त्यापैकी १०७ ग्रामपंचायती मधून स्वतंत्र पथक नेमून चावडी वाचन घेण्यात आले. त्या चावडी वाचन अहवालानुसार आतापर्यंत ८९ ग्रामपंचायतीचे अहवाल प्राप्त झाले असून उर्वरित १८ ग्रामपंचायतीचा अहवाल सादर होणे बाकी आहेत. चावडी वाचनामध्ये एकही गंभीर स्वरुपाची बहुतांश ठिकाणी कुशल देयकाची रक्कम मिळणे प्रलंबित असणेबाबत दिसून आले. विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांनी प्रलंबित कुशल देयके प्रदान करण्यास परवानगी दिली आहे. परंतु ग्रामपंचायत स्तरावरील ६०.४० गुणोत्तर न राखल्या गेल्यामुळे अद्याप देयके प्रलंबित आहे. तर ग्रामपंचायत गुट्टेवाडी, पानभोसी व शिरसी खु. या तीन ग्राम पंचायतमध्ये चावडी वाचनाच्या वेळी तक्रारी प्राप्त झाल्या असल्याने स्वतंत्र पथक नेमुन चौकशी करण्यात येत आहे. ज्या ग्रामपंचायतीने चौकशी पथकास अभिलेखे उपलब्ध करुन दिले नाही अशा संबंधित ग्रामसेवकाविरुद्ध प्रशासकीय कार्यवाही करण्यासाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत यांना कळविण्यात आले आहे.

**समितीस मंत्रालयीन विभागाकडून उपरोक्त मुद्यांसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

**१) पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-**

मौ.बेटमोगरा, ता.मुखेड येथील पाणी पुरवठा योजनेची चौकशी उप विभागीय अभियंता नायगाव यांनी केली असून समितीस दिलेल्या अनुदानाच्या अनुषंगाने समितीने काम केले आहे. योजनेचे काम मानकाप्रमाणे उत्कृष्ट दर्जाचे झाले आहे.

सदरील योजना सन २०१२ पासून आजतागायत कार्यान्वित असून पाणी पुरवठा चालू आहे. मुखेड तालुक्यात भारत निर्माण कार्यक्रम अंतर्गत (४८) व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत (२६) अशा एकूण (७४) योजना मंजूर असून त्यांची चौकशी ४ उप विभागीय अभियंता यांचे मार्फत करण्यात आली आहे. मौ.बेटमोगरा व व मौ.बेळी बु.वगळता एकाही योजनेवर अनियमितता झालेली नाही.

मौ.बेटमोगरा येथील ग्रामसेवकाने रु.२.८२ लक्ष रक्कम समितीच्या खाते वर्ग न करता परस्पर उचलून घेतले आहे. त्यांचेकडून सदर रक्कम वसूल करण्याबाबत त्यांचेवर दोषारोप ठेवून कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच सदर कर्मचारी हे अन्य प्रकरणात दोषी आढळल्याने त्यांना निलंबित करण्यात आले आहे. मौ. बेळी बु. येथील समितीने रु. १.७२ लक्ष निधी उचल करुन योजनेचे काम न केल्यामुळे त्यांचेविरुध्द पत्र क्र.२३ दिनांक १८ फेब्रुवारी, २०१६ अन्वये आर. आर.सी.ची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

**२) ग्रामविकास जलसंधारण (ग्रामविकास) विभागाचे अभिप्राय :-**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचे स्तरावर कार्यवाही करण्यात आलेली आहे. जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत

**३) नियोजन (रोहयो) विभागाचे अभिप्राय-** सहमत आहे.

## चौकशी अहवाल

**क्षेत्रसुधार पथदर्शी प्रकल्प (S.R.P) अंतर्गत मौ.मंडलापूर, ता.मुखेड येथील पाणी पुरवठा योजना :-**

पंचायत राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेस दिनांक १३.०९.२०१५ ते १५.०९.२०१५ या कालावधीत भेट दिली होती. सदरील तालुका भेटीत दिनांक १४.०९.२०१५ रोजी समितीचे अध्यक्ष व सन्माननिय सदस्य यांनी मौ.बेटमोगरा, ता.मुखेड येथील ग्रामपंचायतीस भेट दिली असता पाणी पुरवठा योजनेची पाहणी करून योजनेचा सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

त्यानुषंगाने समिती व मा.कार्यकारी अभियंता यांनी दिलेल्या निर्देशानुसार चौकशी अहवाल खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १) योजनेचे नाव | पाणी पुरवठा योजना मंडलापूर, ता.मुखेड |
| २) योजनेची किमंत | रू.२०,८६,०८०/- |
| ३) योजनेची प्रशासकीय मान्यता | क्र. ३३७ दिनांक ०३.०६.२००२ |
| ४) योजनेची तांत्रिक मान्यता | क्र.१५ दिनांक ३०.०५.२००२ |
| ५) निविदेचे वर्ष | २००२-२००३ |
| ६) निविदेची किंमत | १८,७९,७२९/- |
| ७) कंत्राटदाराचे नाव | अध्यक्ष/सचिव ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मंडलापूर, ता.मुखेड |
| ८) काम सुरू केल्याचा दिनांक | जुलै, २००२ |

समितीस आतापर्यंत दिलेला शासन निधी व प्राप्त लोकवर्गणी बाबत तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | निधीचा हप्ता | दिनांक | दिलेली निधी | लोकसहभाग | समितीला दिलेली एकूण निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | लोकवर्गणी प्रत्यक्ष प्राप्त | | | १२७५००/-रोख ३५५७७/-श्रमदान | १६३०७७/- |
| २ | पहिला हप्ता | ०५.०६.२००२ | ४१७०००/- | | ४१७०००/- |
| ३ | दुसरा हप्ता | २३.१०.२००२ | ४१७०००/- | | ४१७०००/- |
| ४ | तिसरा हप्ता | २५.११.२००३ | २९३७००/- | | २९३७००/- |
| ५ | चौथा हप्ता | १४.०२.२००५ | ६०७०००/- | | ६०७०००/- |
| | एकूण | | | | १८९७७७७/- |

## मुखेड तालुक्यातील नळ योजना बाबतचा चौकशी अहवाल

राज्य शासनाने लोकसहभागावर आधारीत भारत निर्माण कार्यक्रम सन २००६ पासून सुरू केलेला आहे.त्यामध्ये लोकांचा सहभाग अपेक्षित आहे. लोकांना योजने बाबत जाणीव निर्माण व्हावी या हेतुने ही योजना राबविण्यात येत आहे.सदरील कामाचे अंदाजपत्रक तयार करून त्यास ग्रामसभेची मान्यता घेण्यात आलेली आहे. तसेच ग्रामसभेने निवडलेल्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती सदरील कामे करीत आहेत.मुखेड तालुक्यातील भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत मंजूर योजनेबाबत तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र | योजना मंजूरी वर्ष | मंजूर योजना | कार्यान्वीत योजना | प्रगती पथावरील | अपुर्ण योजना | कारणे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००६-२००७ | ०५ | ०५ | ० | ० | एकूण (४८) योजनांपैकी (४६) योजना कार्यान्वीत करण्यात आल्या आहेत. उर्वरीत दोन योजना पैकी बेरळी (बु) येथील कामाबाबत पाणी पुरवठा समिती व ग्राम पंचायत मध्ये वाद असल्यामुळे योजना अर्धवट आहे आणि तांदळी व तांदळी तांडा या गावाच्या समितीचे काम संथगतीने चालू असल्याने योजना अपूर्ण आहे. |
| २ | २००७-२००८ | २६ | २५ | ० | ०१ | |
| ३ | २००८-२००९ | १७ | १६ | ०१ | ० | |
| | एकूण | ४८ | ४६ | ०१ | ०१ | |

सन २०१० पासून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमास सुरूवात झाली असून या योजने अंतर्गत पाणी पुरवठा योजनांना प्रत्यक्षात मंजूरी २०११-१२ पासून सुरू झालेली आहे.सदरील कामे सुध्दा ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत करण्यात येत आहे.योजनांचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | योजना मंजूर वर्ष | मंजूर योजना | कार्यान्वीत योजना | प्रगती पथावरील योजना | अपुर्ण योजना | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०११-२०१२ | ०३ | ०१ | ०२ | ० | प्रगती पथावरील (२१) योजनां पैकी (१३) योजनांचा पाणी पुरवठा सुरू झालेला आहे.म्हणजेच एकूण (२६) योजना पैकी (१८) योजनांचा पाणी पुरवठा सुरू झालेला आहे.उर्वरित कामे निधी उपलब्धतेनुसार पुर्ण करूनघेण्यात येतील. |
| २ | २०१२-२०१३ | ०३ | ० | ०३ | ० | |
| ३ | २०१३-२०१४ | ०७ | ०४ | ०३ | ० | |
| ४ | २०१४-२०१५ | १३ | ० | १३ | ० | |
| एकूण | | २६ | ०५ | २१ | ० | |

राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम अंतर्गत मंजूर योजनांपैकी मौ.सांगवी (बनेक) ता.मुखेड येथील पाणी पुरवठा योजनेच्या कामासाठी शासन निधीचा पहिला हप्ता रूपये ४१.९१ लक्ष इतका निधी ग्रामपंचायतीच्या खाते वर्ग करण्यात आला होता.त्यापैकी मा.सांगवी (बनेक), ता.मुखेड येथील सरपंच यांनी रू.१४.०० लक्ष निधी समितीच्या खात्यात वर्ग न करता ग्रामपंचायतीच्या खात्यातून परस्पर उचलून घेतले आहे.याबाबत संबंधित ग्रामसेवकाने सरपंचाविरूध्द पोलिस स्टेशन मुखेड येथे गुन्हा नोंदविला आहे. सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. भारत निर्माण कार्यक्रम अंतर्गत मुखेड तालुक्यातील दोन योजना समिती कडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे अपुर्ण आहेत.समितीकडे काम पुर्ण करून घेण्यासाठी पाठपुरावा चालू आहे.

**चौकशी अहवाल**

**महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलीत वस्ती पाणीपुरवठा व स्वच्छता योजने अंतर्गत**

**मौजे बेटमोगरा, ता.मुखेड**

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेस दिनांक १३/९/२०१५ ते १५/०९/२०१५ या कालावधीत भेट दिली होती. सदरील तालुका भेटीत दिनांक १४/०९/२०१५ रोजी समितीचे अध्यक्ष व सन्माननीय सदस्य यांनी मो.बेटमोगरा, ता.मुखेड येथील ग्रामपंचायतीस भेट दिली असता महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती मध्ये शौचालयाची पाहणी करुन शौचालयाचे एकच काम अनेक वेळा दाखवून पैसे उचलण्याबाबत समितीसमोर ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी पाहणी करुन सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

त्यानुषंगाने समिती व मा. कार्यकारी अभियंता यांनी दिलेल्या निदेशानुसार दिनांक ०८/१०/२०१५ रोजी मो.बेटमोगरा ता.मुखेड येथील उपरोक्त योजनेअंतर्गत तक्रारीच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी, पंचायत समिती मुखेड यांचे पत्र क्र. २४९८ दिनांक ०६.१०.२०१५ च्या अनुषंगाने शाखा अभियंता यांनी दिनांक ०८/१०/२०१५ रोजी मो.बेटमोगरा येथे क्षेत्रीय दौरा करुन जायमोक्यावर जावून मंजूर यादीच्या अनुषंगाने प्रत्यक्ष शौचालयाच्या कामाची पाहणी केली आहे.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. ग्रापाधो-१११११/प्र.क्र. १५६/पापु-०७ दिनांक १८ नोव्हेंबर, २०११ अन्वये ग्रामीण भागातील अनुसुचित जाती व नवबौध्द घटकामधील कुटुंबांना खाजगी नळ जोडणी व वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना राबविण्याची सुरुवात केली.

या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांना प्रति कुटुंब खाजगी नळ जोडणीसाठी रु. ४०००/- आणि वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी प्रति कुटुंब रु. ११,०००/- अनुदान अनुज्ञेय राहील असे निदेशित केले तसेच त्यामध्ये ९५ टक्के शासकीय अनुदान व ५ टक्के लोकसहभाग अनुज्ञेय राहील. या योजनेअंतर्गत प्रकल्प प्रस्ताव तयार करतांना गावातील अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांमधील कुटुंबाचे सर्वेक्षण करावे असे नमुद आहे. ग्रामपंचायत प्रकल्प प्रस्ताव तयार करुन जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडे सादर करतात आणि त्याची तपासणी करुन ग्रामपंचायतीस निधी पंचायत समिती मार्फत वितरित करण्यात येतो.

मो.बेटमोगरा, ता.मुखेड येथील (१८५) लाभार्थ्यांना शौचालयाची मंजूरी देण्यात आलेली आहे. बाबनिहाय तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | बाबनिहाय वर्णन | संख्या | अंदाजित रक्कम लाखात |
|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायतने मंजुरीसाठी सादर केलेल्या प्रस्तावानुसार एकूण लाभार्थी संख्या | १८५ | २०.३५ |
| २ | जिल्हा स्तरावरुन प्रत्यक्षात मिळालेली मंजुरीनुसार लाभार्थी संख्या व निधीची रक्कम | ८८ | ९.६६ |
| ३ | ग्रामपंचायतीने प्राधान्याने निवड केलेली लाभार्थी | ८८ | ९.६६ |
| ४ | प्रत्यक्षात ग्रा.प.नी शौचालय बांधकाम सुरु केलेली लाभार्थी संख्या | ४८ | -- |
| ५ | ग्रामपंचायतीस वितरित केलेली निधी | -- | ९.६६ |
| ६ | या एकूण ४८ लाभार्थी साठी बांधकाम | -- | ३.७४ |
| ७ | ग्रामपंचायतीकडून वसूलपात्र रक्कम | -- | ५.९२ |

वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असून (८८) शौचालयाच्या कामासाठी लागणारा निधी रु. ९.६६ लक्ष ग्रामपंचायतीस पंचायत समिती मार्फत वितरीत करण्यात आलेला आहे. प्रत्यक्षात (४८) शौचालयाचे काम हाती घेण्यात आले असून त्याचे रु. ३.८४ लक्षचे मूल्यांकन होत आहे.

ग्रामपंचायतीच्या बँक खात्याची पाहणी केली असता उर्वरित रुपये ५.९२ लक्ष निधी ग्रामपंचायतीच्या खात्यात जमा नसल्याचे आढळून आले. याबाबीस श्री.येंडे तत्कालीन ग्रामसेवक हे जबाबदार आहेत. सदर चौकशीत शौचालयाचे एकच काम अनेक वेळा दाखवून पैसे उचलल्याचे दिसून आले नाही.

पंचायत समिती अंतर्गत मंजूर झालेल्या योजना विहित कालावधीत कार्यान्वित करुन योजनेचे उद्दिष्ट साध्य करण्याची जबाबदारी तत्कालीन विस्तार अधिकारी (पंचायत) व श्री. व्हि.बी. कांबळे तत्कालीन गट विकास अधिकारी यांची असून याप्रकरणी ते दोषी दिसून येतात.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, समितीने मौजे बेटमोगरा ग्रामपंचायत, ता.मुखेड, जि.नांदेड येथे भेट देऊन पाणी पुरवठा बेटमोगरा गावातील पाणी पुरवठा योजनेचे काम निकृष्ठ दर्जाचे झाले असल्याचे निदर्शनास आले असता संपूर्ण मुखेड तालुक्यातील नळपाणी योजनांच्या कामाची चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे समितीने निदेश दिलेले आहेत त्यानुसार कोणती कार्यवाही केली आहे यावर प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, जिल्हा परिषद, नांदेड यांचे असे उत्तर आलेले आहे की, या योजनेचे काम मानकाप्रमाणे उत्कृष्ट झालेले आहे. तसेच सदरील योजना सन २०१२ पासून आजतागायत कार्यान्वित असून पाणी पुरवठा सुरळीत चालू आहे. त्यानंतर यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, त्यासंदर्भात समितीकडे अशी तक्रार आली होती की, डिस्ट्रीब्युशन लाईन बसविण्यात आली नाही. परंतु त्याचवेळी उप अभियंता यांना पाठविण्यात आले होते. त्यानंतर तिसऱ्या दिवशी साक्षीच्यावेळी त्यांच्याकडून तो रिपोर्ट घेतला होता. त्यांनी जे काम केले, ते जुन्याच डिस्ट्रीब्युशनला कनेक्ट झालेले आहे आणि ती स्कीम त्याच पद्धतीने आजही चालू आहे. आजही जुन्याच डिस्ट्रीब्युशनमधून पाणी पुरविले जात आहे. तसेच तेथेच म्हणजे बेटमोगरा येथे इतर दोन विषय होते. त्यावेळी समितीने अर्धवट राहिलेल्या शौचालयांची पहाणी केली होती. तसेच दुसरा विषय रोजगार हमी योजनेच्या कामांचा होता.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, त्या योजनेची समितीने स्वत: तपासणी केलेली आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग जिल्हा परिषद नांदेडने जुन्याच योजनेला नवीन योजनेमध्ये दाखविलेले आहे. त्यासंदर्भात देयक अदा देखील करण्यात आले आहे. त्यांनी गावात गेल्यावर समितीला नवीन पाईप लाईन दाखविली. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने नवीन पाईप घेण्याचे ठरविले होते. त्या गावामध्ये इंजिनिअर जाऊन आले होते. ती जुनी योजना आहे, परंतु जून महिन्यानंतर नवीन डिस्ट्रीब्युशन लाईन केली जाणार आहे. आज रोजी जुन्याच डिस्ट्रीब्युशन लाईनमधून पाणी चालू आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, त्यासंदर्भातील पेमेंट करण्यात आले आहे काय यावर नव्या वितरिकेचे देयक अदा केलेले नाही. परंतु घेण्यात आलेल्या पाईपचे पेमेंट केलेले आहे असे उत्तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला दिले. समितीने पुढे अशी विचारणा केली की, या प्रकरणासंदर्भात जिल्हा परिषद समाधानी आहे काय, जिल्हा परिषद समाधानकारक असेल तर जिल्हा परिषदेने अभिप्राय द्यावा, सदरहू ठिकाणी जिल्हा परिषदेने सर्वांनी एकत्रितच भेट दिली होती. तेव्हा सत्य परिस्थितीची जाणीव झाली. तसेच त्यासंदर्भात गावकऱ्यांनी देखील माहिती दिली होती. यासंदर्भात समिती म्हणून समितीचा अभिप्राय नोंदविणार आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, या योजनेच्या पाईप खरेदीसाठी ॲडव्हान्स दिलेला होता. परंतु फायनल बील दिलेले नाही. त्यामध्ये ॲक्च्युअल जे खर्ची पडलेले आहे, त्यामध्ये डिस्ट्रीब्युशन खर्ची पडलेले नाही.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, बेटमोगरा येथील ग्रामसेवकाने २.८२ लक्ष रुपये पाणीपुरवठा समितीच्या खाते वर्ग न करण्याबाबत संबंधित ग्रामसेवकावर दोषारोप ठेवले आहेत. परंतु त्यांच्यावर पर्टीक्युलर काही ॲक्शन घेण्यात आली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, सदरहू ग्रामसेवकाला निलंबित करण्यात आलेले आहे. त्याची विभागीय चौकशी चालू केलेली आहे व त्यामध्ये स्पेसिफिकली असा उल्लेख केलेला आहे की, बेटमोगरा गावातील २ लाख ८२ हजार रुपये उचलण्यात आलेले आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्हा परिषदेला अधिकार असताना देखील खुलासा मागितल्यानंतर त्याच्याकडून खुलासा दिला जात नाही. ते आपल्यासोबत संवाद साधत नाहीत. त्यांच्याकडून त्या ग्रामपंचायती संदर्भातील कागदपत्रे दिली जात नाहीत व कोणताच खुलासा केला जात नाही. तरी देखील चौकशी सुरु असल्याचे जिल्हा परिषदेकडून समितीस सांगीतले जात आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, समितीने सदरहू ठिकाणी भेट दिली होती. त्याच्याकडून कागदपत्रे दिली जात नव्हती. त्यानंतर त्याला निलंबित करण्यात आलेले आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ग्रामपंचायत बेटमोगरा येथील तक्रारीच्या अनुषंगाने तपासणीत तत्कालीन अधिकारी व कर्मचारी यांचेकडून अनियमितता व अंमलबजावणी प्रक्रियेत दुर्लक्ष झाल्यास निष्पन्न झाले आहे. सदर अनियमिततेस ग्रामपंचायत स्तरावर ग्रामरोजगार सेवक, ग्रामसेवक, व पंचायत समिती स्तरावर तांत्रिक अधिकारी (नरेगा), पंचायत समिती,

नरेगा शाखेचे प्रमुख, सहाय्यक लेखाधिकारी व गट विकास अधिकारी हे जबाबदार आहेत. अनियमितता झालेल्या मजुरी वाटपास पोस्ट कार्यालय तत्कालीन ग्रामसेवक यांना निलंबित करण्यात आले आहे. २) ग्राम रोजगारसेवक यांच्या सेवा खंडीत करण्याचे आदेश गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड यांना देण्यात आले आहेत. ३) संबंधित कंत्राटी तांत्रिक अधिकारी (नरेगा) यांच्या सेवा खंडीत करण्यात येत आहेत. ४) लेखाविषयकबाबतीत अनियमिततेस तत्का. संबंधित सहा लेखाधिकारी व्ही. बी. कांबळे यांचेविरुध्द शास्तीची कार्यवाही करणेबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना कळविण्यात आले आहे. ५) तत्का. गट विकास अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला आहे. अद्याप खुलासा अप्राप्त आहे, याबाबत विभागाने कोणती कार्यवाही केलेली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले की, बेटमोगरा येथे तीन मुद्दे समोर आले होते. त्यातील पहिला मुद्दा पाणी पुरवठा या संदर्भातील होता. दुसरा मुद्दा शौचालयासंदर्भातील होता आणि तिसरा मुद्दा खुलासा मागविण्यात आलेल्या बेटमोगरा येथील एमआरइजीएसच्या कामासंदर्भातील होता. सदरहू खुलासा आलेला नाही. यावर समितीने विचारणा केली की, त्याबाबत एकतर्फी कारवाई सुरु केलेली आहे काय, या प्रश्नावर उत्तर देताना खुलासा आला नसल्यामुळे पुढील कारवाई करण्यासंबंधी प्रक्रिया सुरु आहे अशी माहिती समितीला देण्यात आली.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने मौजे बेटमोगरा ग्रामपंचायत, तालुका मुखेड येथे भेट दिली असता ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीमधील ग्रामसेवकाची बदली झाल्यानंतर त्याने नवीन रुजू झालेल्या ग्राम सेवकास अभिलेख दिलेला नसल्यामुळे ग्रामपंचायतीचे कामकाज करता येत नाही अशी तक्रार केली होती. उक्त तक्रारीवरुन काय कारवाई केली अशी समितीने विचारणा केली असता संबंधित ग्रामसेवकास निलंबित केले असल्याचे समितीस सांगण्यात आले. अद्यापी, ग्रामपंचायतीचा रेकॉर्ड नवीन ग्रामसेवकास दिला किंवा कसे याचा काही उल्लेख किंवा माहिती समितीस प्राप्त झालेल्या कागदपत्रावरून दिसून येत नाही. तसेच समितीला बेटमोगरा ग्रामपचांयतीचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे दिसून आले. नळपाणी योजनेच्या कामांची चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचे निदेश दिले असता मुखेड तालुक्यात भारत निर्माण कार्यक्रम अंतर्गत (४८) व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत (२६) अशा एकूण (७४) योजना मंजूर असून त्यांची चौकशी ४ उप विभागीय अभियंता यांचेमार्फत करण्यात आली आहे. मौजे बेटमोगरा व मौजे बेळी बु. वगळता एकाही योजनेवर अनियमितता झालेली नाही. मौजे बेटमोगरा येथील ग्रामसेवकाने रु.२.८२ लक्ष रक्कम समितीच्या खाते वर्ग न करता परस्पर उचलून घेतले आहे. संबंधित ग्रामसेवकावर दोषारोपपत्र ठेऊन त्यास निलंबित करण्यात आले असल्याचे समितीला सांगण्यात आले. याबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे. **त्याचप्रमाणे मौजे बेळी बु. या गावासंदर्भात नेमकी कोणती अनियमितता झाली ही बाब समितीस अवगत करण्यात आलेली नाही. मौजे बेळी बु. येथील रु.१.७२ लक्ष निधी उचल करुन योजनेचे काम न केल्यामुळे त्यांचेविरुध्द आर.आर.सी.ची कार्यवाही प्रस्तावित करण्यात केल्याचे समितीस सांगण्यात आले. या दोन्ही प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याचे काम सुरु असल्याने समिती समाधान व्यक्त करीत आहे.त्याच बरोबर सदरची रक्कम वसूल करण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.**

मौजे बेटमोगरा या गावात दलित वस्तीमधील शौचालयांच्या कामांची पाहणी केली. सवर्णांच्या वस्तीत देखील पाहणी करण्यात आली. तेथे फक्त काही श्रीमंत माणसांच्या घरी सुस्थितीत शौचालय असल्याचे आढळले. गरीबांच्या घरच्या शौचालयांची कामे अपूर्ण ठेवण्यात आलेली आहेत. दलित वस्त्यांमध्ये शौचालये नाहीत. शौचालये देण्यात आलेल्या लाभार्थ्यांपर्यंत पैसे पोहचत नाहीत. जी शौचालये आहेत ती मोडकळीस, अर्धवट बांधलेल्या अवस्थेत, काही शौचालयांना दारे नाहीत, शौचालयासाठी देण्यात येत असलेली रक्कम लाभार्थ्यांपर्यंत पोहचत नाही. काही शौचालयांसाठी परस्पर पैसे उचलून घेण्यात आल्याचे एका ग्रामपंचायत सदस्याने सांगितले. काही व्यक्तींच्या नावे शौचालयाचे पैसे येऊन सुध्दा शौचालयाचे बांधकाम तेथे न होता अनुदानाचे पैसे थेट परस्पर उचलण्यात आलेले आहे. संबंधित दोषी अधिकारी/ कर्मचारी यांची चौकशी करुन त्याबाबतचा संपूर्ण अहवाल समितीस सादर करण्याबाबत समितीने निदेश दिले होते. तथापि, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या गंभीर प्रकरणाची चौकशी केली असल्याचे दिसून येत नाही. कारण या प्रकरणाचा चौकशी अहवाल अद्यापही समितीला सादर केलेला नाही. सचिवांच्या साक्षीच्यावेळी देखील या बाबतची माहिती समितीला मिळू शकली नाही. म्हणून यासंदर्भात बेटमोगरा गावातील सर्व शौचालयांची पूर्ण पाहणी करुन प्रत्येक घराला जे शौचालय दिलेले आहे, **त्या शौचालयांचे निकृष्ट बांधकाम करणाऱ्या एजन्सीला काळ्या यादीत टाकून प्रसंगी संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा. त्याचप्रमाणे**

**लाभार्थ्यास शौचालय उपलब्ध नसल्यामुळे सर्व लाभार्थ्यांना नवीन शौचालये देण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात यावी. यासंदर्भात चौकशी अहवाल समितीला सादर केला असून त्यात समितीने प्रत्यक्ष पाहणी करुन शौचालयांची स्थिती नमूद केलेली असताना सुध्दा त्याप्रमाणे सर्वंकष चौकशी अहवाल सादर केलेला नाही याबाबत समिती नापसंती व्यक्त करते. तथापि, (८८) शौचालयाच्या कामासाठी लागणारा निधी रु. ९.६६ लक्ष ग्रामपंचायतीस पंचायत समिती मार्फत वितरीत करण्यात आलेला आहे. प्रत्यक्षात (४८) शौचालयाचे काम हाती घेण्यात आले असून त्याचे रु. ३.८४ लक्षचे मूल्यांकन होत आहे. ग्रामपंचायतीच्या बँक खात्याची पाहणी केली असता उर्वरित रुपये ५.९२ लक्ष निधी ग्रामपंचायतीच्या खात्यात जमा नसल्याचे आढळून आले. याबाबीस श्री.येंडे तत्कालीन ग्रामसेवक हे जबाबदार आहेत. सदर चौकशीत शौचालयाचे एकच काम अनेक वेळा दाखवून पैसे उचलल्याचे दिसून आले नाही.पंचायत समिती अंतर्गत मंजूर झालेल्या योजना विहित कालावधीत कार्यान्वित करुन योजनेचे उद्दिष्ट साध्य करण्याची जबाबदारी तत्कालीन विस्तार अधिकारी (पंचायत) व श्री. व्हि.बी. कांबळे तत्कालीन गट विकास अधिकारी यांची असून याप्रकरणी ते दोषी दिसून येतात असा जिल्हा परिषदेने केलेल्या चौकशीचा निष्कर्ष आहे. त्यानुसार दोषी कर्मचारी/ अधिकाऱ्यांवर चौकशी अहवाला आधारे कठोर कारवाई करण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

रोजगार हमी योजनेअंतर्गत मयतव्यक्ती, शासकीय कर्मचाऱ्यांची नावे मजूरांच्या यादीत समाविष्ट असल्याचे आढळून आल्यावरुन समितीने मुखेड व कंधार तालुक्यातील सन २०१२ मधील सर्व कामांची चौकशी करण्याचे निदेश दिलेले आहेत. त्यानुसार चौकशी करण्यात आली असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या लेखी खुलाश्यात नमूद केले आहे. कंधार तालुक्यातील ११६ पैकी १०७ ग्रामपंचायती मार्फत सन २०१२-१३ मध्ये मनरेगाअंतर्गत कामे घेण्यात आली होती. त्यापैकी १०७ ग्रामपंचायती मधून स्वतंत्र पथक नेमून चावडी वाचन घेण्यात आले. त्या चावडी वाचन अहवालानुसार आतापर्यंत ८९ ग्रामपंचायतीचे अहवाल प्राप्त झाले असून उर्वरित १८ ग्रामपंचायतीचा अहवाल सादर होणे बाकी आहे. बेटमोगरा ग्रामपंचायतीने एकाच कालावधीत एकाच कामावर दोन वेगवेगळे तेवढयाच रक्कमेचे बोगस हजेरीपट तयार करुन पंचायत समितीकडे सादर केले. ते हजेरीपट कुठलीही शहानिशा, तपासणी, छाननी न करता तत्कालीन सहलेखाधिकारी व गटविकास अधिकारी यांनी पारित केले आहेत. या प्रकरणी अनियमितता झाल्याचे दिसून आले. तत्कालीन ग्रामसेवक यांना निलंबित करण्यात असून ग्राम रोजगार सेवक यांच्या सेवा खंडीत करण्यात आल्या. मौजे मंडलापूर, ता.मुखेड यांनी देखील चावडी वाचन केले. त्यावेळी हजेरीपटावरील मजुरांची नावे व मनरेगा संकेतस्थळ Online Muster मधील नावे यात मोठया प्रमाणात तफावत आढळून येते. तक्रार कर्त्याने केलेल्या तक्रारी ह्या Online Data व प्रत्यक्ष हजेरीपट यातील नावाच्या तफावतीस तात्कालीन APO व Data Entry करणारी यंत्रणा जबाबदार असल्याचे नमूद केले आहे.

**मनरेगाअंतर्गत ग्रामपंचायत गुट्टेवाडी, पानभोसी व शिरसी खु. या तीन ग्राम पंचायतीमध्ये चावडी वाचनाच्या वेळी तक्रारी प्राप्त झाल्यामुळे स्वतंत्र पथक नेमून चौकशी करण्यात येत आहे. ज्या ग्रामपंचायतींने चौकशी पथकास अभिलेखे उपलब्ध करुन दिले नाहीत. अशा संबंधित ग्रामसेवकांविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यासाठी उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत यांना कळविण्यात आले. याबाबत समिती समाधान व्यक्त करीत असून रोजगार हमी योजनेच्या संदर्भात समितीला प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सर्व संबंधित प्रकरणांची चौकशी करण्यात यावी व त्या चौकशीत जे कोणी दोषी असतील त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करुन त्यांच्याविरुध्द करावयाच्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा अशीही समितीची शिफारस आहे.**

प्रकरण पंधरा

## जिल्हा परिषद, नांदेड (प्रशासन)

### मौजे. मंडलापूर (ता.मुखेड, जि.नांदेड) अंतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या कामातील गैरव्यवहार

समितीने दिनांक १३ ते १५ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नांदेड जिल्हा परिषदेस भेट दिली. दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ रोजी समितीने मंडलापूर ग्राम पंचायत कार्यालयास भेट दिली असता समितीस अशी तक्रार प्राप्त झाली की, मंडलापूर येथे दीड कोटी रुपयाचे सी.सी.टी चे काम झाल्याचे दाखविण्यात येत आहे. परंतु कामच झालेले नाही. तसेच एकाच हेक्टरमध्ये एलबीसी, टीसलएम इ. कामे केल्याचे दाखविलेले आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. गावात पाणी टंचाई आहे. नळ योजनेचे काम अपूर्ण आहे. या कामात दोषी आढळून आल्यामुळे एका कर्मचा-यास (ग्रामसेवक बेंडके यास) तुरुंगात टाकण्यात आले होते व तो दोन महिने जेलमध्ये होता तरीही त्यास निलंबित केले नाही. नियमाप्रमाणे त्यास नोकरीतून काढून टाकावयास पाहिजे होते. उलट जेलमधील कालावधीची त्याची अर्जित रजा मंजूर करण्यात येत आहे असे समजले आहे. यावर समितीस सरपंचांनी असे विदित केले की, टाकीचे काम पूर्ण करुन दिले आहे. नळ योजनेची पाईपलाईन झालेली आहे. लोकसहभागातून पाणी पुरवठा योजना मंजूर झाली होती. समितीला या कामासाठी १४ लाख रुपये देण्यात आले होते. समितीने १२ लाखांचे काम केलेले आहे. समितीच्या खात्यावर पावणे दोन लाख रुपये शिल्लक असताना काम बंद पाडले. प्रकरण न्यायालयात गेले असून त्यामुळे काम प्रलंबित राहिलेले आहे. समितीने बाकीचे काम पूर्ण केलेले आहे. यावर समितीने असे निदेश दिले की, मंडलापूर येथील नळ योजनेबाबतची संपूर्ण माहिती लेखी स्वरुपात पंचायत राज समितीसमोर ठेवण्यात यावी. नळ योजनेच्या कामात काही गैरव्यवहार झाला असल्यास संबंधितांविरुध्द गुन्हे नोंदवावेत, तसेच संबंधित कर्मचा-यांस निलंबित करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करावा.

**समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

समितीने ग्रामपंचायत मंडलापूर ता.मुखेड, येथे भेट दिली. मंडलापूर नळ योजनेचे काम अपूर्ण असल्याचे समितीस निदर्शनास आले असता सदरहू कामाची चौकशी करण्याचे निदेश समितीने दिलेले आहेत, त्यानुसार चौकशी करुन दोषींवर गुन्हे दाखल केले आहेत, तथापि वसुलीबाबत काहीही नमुद नाही, सदरच्या वसुलीबाबत शासनाची काय भुमिका आहे ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्यांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

मौ.मंडलापूर, ता.मुखेड येथे रु.२०,८६,०८०/- ची पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे. योजनेच्या कामासाठी समितीस रु.१८,९७,७७७/- एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यापैकी समितीने रु.१४.८९ लक्षचे काम करुन नियमबाह्य रु.४.५८ लक्ष उचल केल्यामुळे समितीविरुद्ध पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे आणि प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे. तद्नंतर समितीने योजनेचे पुढील काम केले असून त्याचे मुल्यांकन रु.१७.३८ लक्ष होत असून समितीच्या खात्यावर रु.१.५९ लक्ष शिल्लक असणे अपेक्षित असतांना केवळ रु.३३८/- शिल्लक आहे. त्यामुळे समितीकडून उर्वरित रक्कम वसुल करण्याबाबत आर.आर.सी.ची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.

**समितीस मंत्रालयीन विभागाकडून उपरोक्त मुद्यांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

**ग्राम विकास जलसंधारण विभागाचे अभिप्राय-**

प्रकरण न्यायप्रविष्ट असून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड यांचे स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-**

मौ.मंडलापूर, ता.मुखेड येथे रु. २०,८६,०८०/- ची पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे. योजनेच्या कामासाठी समितीस रु.१८,९७,७७७/- एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यापैकी समितीने रु.१४.८९ लक्षचे काम करुन नियमबाह्य रु.४.५८ लक्ष उचल केल्यामुळे समितीविरुद्ध पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे आणि प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे. तद्नंतर समितीने योजनेचे पुढील काम केले असून त्याचे मुल्यांकन रु.१७.३८ लक्ष होत असून समितीच्या खात्यावर रु.१.५९ लक्ष शिल्लक असल्याचा चौकशी अहवाल सादर करण्यात आला आहे. तथापि समितीने सध्या योजनेचे उर्वरित कामे केली आहेत, त्यामुळे समितीकडे शासनाची वसुलीपात्र रक्कम निघत नाही.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की समितीने ग्रामपंचायत मंडलापूर, ता. मुखेड येथे भेट दिली. मंडलापूर नळ योजनेचे काम अपूर्ण असल्याचे समितीस निदर्शनास आले असता सदरहू कामाची चौकशी करण्याचे निदेश समितीने दिलेले आहेत. त्यानुसार चौकशी करुन दोषींवर गुन्हे दाखल केले आहेत. तथापि वसुलीबाबत काहीही नमूद नाही, सदरच्या वसुलीबाबत शासनाची काय भूमिका आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, मंडलापूर येथे २० लाख ८६ हजार रुपयांची कामे मंजूर करण्यात आली होती. प्रत्यक्षात १८ लाख ९७ हजार रुपये इतका निधी उपलब्ध करुन दिला होता. त्यापैकी १४ लाख ८९ हजार रुपयांचे काम करुन नियमबाह्य रु.४.५८ लाख उचल केल्यामुळे समितीविरुद्ध पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविलेला आहे. ही वस्तुस्थिती आहे. गुन्हा नोंदविल्यानंतर त्यांनी थोडे काम केलेले आहे. त्याची किंमत १७ लाख ३८ हजार रुपये होत आहे. समितीच्या खात्यावर १.५९ लाख रुपये शिल्लक असणे अपेक्षित असतांना ३३८ रुपये शिल्लक असल्यामुळे समितीकडून उर्वरित रक्कम वसूल करण्याबाबत आरआरसीची कारवाई सुरु केलेली आहे.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने ग्रामपंचायत मंडलापूर, तालुका मुखेड येथील नळ योजनेच्या अपूर्ण कामांबाबत ग्रामस्थांच्या तक्रारीवरुन पाहणी केली असता सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे, गावात पाणी टंचाई आहे, नळ योजनेचे काम अपूर्ण आहे. या कामात दोष आढळून आल्यामुळे एका कर्मचाऱ्यास तुरुंगात टाकण्यात आले होते तो कर्मचारी दोन महिने जेलमध्ये होता. तरीही त्यास निलंबित केले नाही. उलट जेलमधील कालावधीची त्याची अर्जित रजा मंजूर करण्यात आली इत्यादी माहिती तक्रारकर्त्या गावकऱ्यांद्वारे समितीला देण्यात आलेली होती. यासंदर्भात मंडलापूर नळ योजनेची कामे अपूर्ण असल्यामुळे सदरच्या कामांची चौकशी करण्याचे समितीने दिलेल्या निदेशानुसार चौकशी करुन दोषींवर गुन्हे दाखल केले असून अपहारीत रक्कम वसुलीबाबत चौकशी अहवालात काहीही नमुद केलेले नाही. सदरच्या वसुलीबाबत शासनाची काय भूमिका आहे अशी विचारणा केली असता, उक्त नळ योजनेसाठी शासनाने रु.२०,८६,०८०/- ची पाणी पुरवठा योजना मंजूर केली असून योजनेच्या कामासाठी ग्राम समितीस रु.१८,९७,७७७/- एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला. त्यापैकी ग्राम समितीने रु.१४.८९ लक्षचे काम करुन नियमबाह्य रु.४.५८ लक्ष उचल केल्यामुळे ग्राम समितीविरुध्द पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदरहू प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ असल्याचे समितीला विदित केले. या अभिप्रायावर ग्राम विकास व जलसंधारण विभागाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावरुन कार्यवाही सुरु असल्याचे नमूद करुन पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने सदरचे प्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविला असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. त्यानंतर ग्राम समितीने योजनेची पुढील कामे केली असून त्याचे मुल्यांकन रु. १७.३८ लक्ष होत असून समितीच्या खात्यावर रु.१.५९ लक्ष शिल्लक असल्याबाबत चौकशी अहवाल सादर करण्यात आला आहे. तथापि, ग्राम समितीने सध्या योजनेची उर्वरित कामे केली आहेत. त्यामुळे ग्राम समितीकडे शासनाची वसुलीपात्र रक्कम निघत नाही.

उपरोक्त माहितीवरुन समितीला असे दिसून येते की, याबाबतचे फौजदारी प्रकरण न्यायालयात न्यायप्रविष्ठ असून न्यायालयात या प्रकरणी निर्णय होईल. तथापि, त्या ग्रामसेवकाचा तुरुंगातील कालावधी "अर्जित रजा" म्हणून मंजूर करण्याबाबत चौकशी अहवालात काहीही नमूद केलेले नाही. **विभागीय साक्षीच्या वेळी देखील ग्राम समितीविरुध्द गुन्हा नोंदविल्यानंतर त्यांनी थोडे काम केलेले आहे. त्याची किंमत रु.१७ लाख ३८ हजार रुपये होत आहेत. ग्राम समितीचे खात्यावर रु.१.५९ लाख रुपये शिल्लक असणे अपेक्षित असताना रु.३३८/- शिल्लक आहेत. ग्राम समितीकडून उर्वरित रक्कम वसुल करण्याबाबत आरआरसीची कारवाई सुरु केलेली आहे असे समितीला आश्वासित केले त्यानुसार या वसुलीबाबत तातडीने कारवाई करण्यात यावी. त्याचप्रमाणे फौजदारी गुन्हा जास्त कालावधीकरिता प्रलंबित न राहता तो तातडीने कसा निकाली निघेल याकडे जिल्हापरिषदेने लक्ष घालून त्या संदर्भात जिल्हा परिषदेच्या अभियोक्त्याकडे पाठपुरावा करुन कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण सोळा

# जिल्हा परिषद, नांदेड (प्रशासन)

## जिल्हा परिषदेच्या रकमा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत न ठेवता राष्ट्रीयकृत बँकेत ठेवण्याचा निर्णय घेण्याबाबत

समितीने दिनांक १३ ते १५ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नांदेड जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँक अवसायानात गेल्यामुळे पंचायत समित्यांच्या रक्कमा या बँकेत अडकून पडल्यामुळे विकास कामे थांबली असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. अनेक जिल्हा परिषदेमध्ये अशी परिस्थिती आहे. महाराष्ट्रातील जवळपास १६ को-ऑपरेटीव्ह बँका अवसायानात गेल्या असून जिल्हा परिषदेचा मोठा निधी या को-ऑपरेटीव्ह बँकेत आहे. त्यामुळे हा निधी राष्ट्रीयकृत बँकेत ठेवण्याच्या संदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात जिल्हा परिषदेने एक नोट तयार करुन आम्ही इतकी इतकी रक्कम को-ऑपरेटीव्ह बँकेत ठेवली होती परंतु ती रक्कम न मिळाल्यामुळे जिल्हा परिषदेचे झालेल्या नुकसानीच्या संदर्भातील अहवाल पाठविण्यात यावा असे निर्देश समितीने दिले. जेणेकरून जिल्हा परिषदेच्या रक्कमा कोणत्याही को-ऑपरेटीव्ह बँकेत न ठेवता त्या रक्कमा फक्त राष्ट्रीयकृत बँकेतच ठेवल्या जाण्याच्या संदर्भात विभागीय सचिवांच्या साक्षीचे वेळी विचार करता येईल.जिल्हा परिषदेचा पैसा अवसायनात गेलेल्या को-ऑपरेटीव्ह बँकेत असून हा पैसा मिळण्याच्या संदर्भात कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. ज्या को-ऑपरेटीव्ह बँकेत जिल्हा परिषदेच्या रक्कम अडकलेल्या आहेत त्या वसूल करुन देण्याच्या संदर्भात शासनाने भूमिका घेण्याची आवश्यकता आहे. बँकाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी शासनाने बँकांना काही पैसे दिलेले आहेत. अनेक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका जिल्हा परिषदेच्या ठेवीवर सुरु आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेचा पैसा परत मिळण्याच्या संदर्भात, शासनाने हा पैसा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे या दोन्ही विषयाच्या संदर्भात सचिवांच्या साक्षीच्या वेळी सहकार विभागाच्या सचिवांना पाचारण करण्याचा निर्णय समितीने घेतला.मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेला व्यवहार करण्यास बंदी असल्यामुळे आपली रक्कम त्यांच्याकडे अडकून पडली आहे, परंतु या बँकेकडे आता पैसे आहेत. परंतु आता या बँकेला व्यवहार करण्याची परवानगी मिळाली असल्यामुळे जिल्हा परिषदेचे पैसे आता बँकेतून ताबडतोब मिळू शकतात.

**यासंदर्भात समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

महाराष्ट्रातील जवळपास १६ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका अवसायानात गेल्या असून जिल्हा परिषदेचा मोठा निधी या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत आहे. त्यामुळे हा निधी राष्ट्रीयकृत बँकेत ठेवण्याच्या संदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात जिल्हा परिषदेने ठराविक रक्कम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ठेवली होती परंतु ती रक्कम न मिळाल्यामुळे जिल्हा परिषदेचे झालेल्या नुकसानीच्या संदर्भातील अहवाल समितीला पाठविण्याचे निदेशित केलेले आहे. जिल्हा परिषदांच्या सहकारी बँकांत अडकलेल्या ठेवी परत देण्यासंदर्भात शासनाची भुमिका काय आहे ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्यांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ४९ नुसार जिल्हानिधीचा व्यवहार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत होतो. माहे फेब्रुवारी २००५ पासुन सदर बँकेमार्फत धनादेशाची अदाई होण्यास अडचणी येत होत्या. तसेच याबाबी कर्मचारी आणि शिक्षक संघटनाच्या निवेदनातुन निदर्शनास आल्या.त्या अनुषंगाने बँकेशी संपर्क करुन व्यवहार सुरळीत करण्याबाबत प्रयत्न केले. परंतु बँकेमार्फत याबाबत कोणताही प्रतिसाद मिळत नव्हता. सदर बाबीवर जिल्हा परिषद अध्यक्ष तसेच जिल्हा परिषद सभेत चर्चा झाली. सदर बँके मार्फत प्रतिसाद न मिळाल्यामुळे बँक डबाघाईला आल्याचे निदर्शनास आल्यामुळे ही बाब शासनाच्या तसेच रिझर्व बँक ऑफ इंडिया यांना कळवून जिल्हा परिषदेला जिल्हा निधीचे खाते स्टेट बँक ऑफ हैद्राबाद किंवा इतर राष्ट्रीयकृत बँकेत जिल्हा निधीचे खाते उघडण्याची परवानगी मागीतली. त्या अनुषंगाने ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक परास-२००४/९१३ प्र.क्र.४६३०/वित्त-३ दिनांक १७.०३.२००५ अन्वये नांदेड जिल्हा परिषदेचे खाते स्टेट बँक ऑफ हैद्राबाद शाखेत उघडून व्यवहार चालू आहेत.

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत जिल्हा परिषद नांदेडचा रुपये ६९.०० कोटी निधी अडकलेला आहे. अडकलेल्या निधीमध्ये वेतन, निवृत्तीवेतन, कंत्राटदाराच्या रक्कमा, विविध योजनेतील लाभार्थ्यांच्या रक्कमा, विकास कामाचा निधी ईत्यादीचा समावेश असुन रक्कमा अदाईसाठी बँकेकडून अडचणी निर्माण झाल्यामुळे असंतोषाचे वातावरण निर्माण झाले. याचा परिणाम कर्मचारी, कंत्राटदार, लाभार्थी, विकास योजना यांच्यावर झाला आहे. सदर बाब मा. शासन, मा. मुख्यमंत्री, मा, ग्रामविकास मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या निदर्शनास आणून दिली व त्यांच्यामार्फत शासनस्तरावर पाठपुरावा करुन अडकलेली रक्कम जिल्हा परिषदेला उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली. मा. उप सचिव, महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांनी यासंदर्भात प्रशासक, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांना पत्र देऊन जिल्हा परिषदेचा अडकलेला निधी तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले आहे. तथापि, बँकेकडून प्रतिसाद मिळाला नाही.

याबाबतीत जिल्हा परिषद नांदेड विधीज्ञामार्फत बँकेला कायदेशीर नोटीस दिनांक ३१ ऑगस्ट, २००५ अन्वये बजावण्यात आली असून त्या संदर्भात देखील बँकेने प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर बँकेस तसेच शासनास याबाबत पाठपुरावा केला. मा. उप सचिव, महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांनी या अनुषंगाने दिनांक २३ नोव्हेंबर, २००५ रोजी बँकेच्या सर्व संबंधित यंत्रणेची बैठक बोलावून जिल्हा परिषदेचा अडकलेला निधी जिल्हा परिषदेस तात्काळ प्राप्त व्हावा यासाठी पाठपुरावा केला.

याबाबत सहकार व वस्त्रोद्योग मंत्रालय, मुंबई यांच्याकडेही पाठपुरावा केला असून मा.संतोष पाटील, विशेष कार्य अधिकारी, सहकार व वस्त्रोद्योग मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक ३०.१०.२०१३ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्स आयोजित करुन जिल्हा परिषदेचा अडकलेला निधी परत करणेबाबत बँकेस कृती कार्यक्रम दिला असून बँकेच्या वसुलीद्वारे उपलब्ध होणाज्या निधीतून टप्प्याने जिल्हा परिषदेची रक्कम परत करण्यात येईल असे बँकेने त्यांचे बँकेचे पत्र क्रमांक हिशोब/संकलन/५०३२/१३-१४ दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३ अन्वये कळविले आहे. तथापि, निधी परत मिळालेला नाही.

या बाबतीत वेळोवेळी जिल्हा परिषदेमार्फत व शासनामार्फत पाठपुरावा चालू आहे. मा.उप सचिव, महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र जिपका/२०१४/प्र.क्र.८६/वित्त-३ दिनांक १९ जानेवारी, २०१५ अन्वये मा. सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अडकून पडलेला निधी जिल्हा परिषदेच्या सध्याच्या खात्यामध्ये वर्ग करण्याबाबत संबंधित जिल्हा मध्यवर्ती बँकांना सुचना देण्यात याव्यात अशी विनंती केली.

नांदेड जिल्हा परिषद (मुख्यालय व पंचायत समिती) अंतर्गत मार्च २००५ पर्यंतचा रु. ६९ कोटी निधी नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक डबघाईला आल्यामुळे अडकून पडला आहे. याबाबत वेळोवेळी बँकेशी तसेच शासन स्तरावर पाठपुरावा केलेला आहे. अडकून असलेल्या निधीची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडण्यापूर्वी जिल्हा बँकेत अडकलेला सुरुवातीचा निधी | आतापर्यंत वळती झालेला निधी | सद्य:स्थितीत बँकेकडे अडकलेला निधी |
|---|---|---|
| ६९,००,००,०००/- | ८,५२,२८,५११/- | ६०,४७,७१,४८९/- |

सदर निधी वेतन/वेतनेत्तर/विकास कामाची असून निधी बँकेच्या (Current Account) चालू खात्यामध्ये असल्यामुळे त्यावर व्याज देय नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँक म.जि.नांदेड यांचे पत्र क्र.हिशेब/संकलन/५६८५ दिनांक २५ जानेवारी, २०१६ अन्वये मालमत्ता विक्री अंती वसुलीतून निधी प्राप्त झाल्यास प्राप्त निधीतून रु.२१.०० कोटी प्रमाणे सन २०१५-१६ ते २०१७-१८ या तीन वर्षात निधी परत करण्याचे नियोजन कळविले आहे. परंतु त्यानुसार सन २०१५-१६ मध्ये अद्याप पावेतो कोणतीही रक्कम परत केलेली नाही. सबब, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अडकलेला निधी जिल्हा परिषदेस उपलब्ध करुन देण्याबाबत मा.समितीमार्फत शासनस्तरावरुन कार्यवाही व्हावी, अशी नम्र विनंती करण्यात येत आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

सहकार विभागाच्या पत्र क्र.बैठक १०१३/प्र.क्र.४५२/२-स दि २५.२.२०१६ अन्वये प्राप्त झालेले अभिप्राय परिशिष्ट "अ" अन्वये सोबत जोडले आहेत. तसेच या विभागाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता, १९६८ च्या नियम ४९ मध्ये दि.३/२/१९९७ रोजी केलेल्या सुधारणे नुसार "एखादया जिल्हा निधीच्या संबंधातील पैसा आणि त्यामध्ये जमा झालेल्या सर्व रक्कमा शासकीय कोषगारात किंवा महाराष्ट्र जिल्हा परिषदां व पंचायत समित्या अधिनियम १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम ५) याच्या कलम १३० पोट कलम (३) च्या खंड (अ) अन्वये शासकीय कोषागाराचा व्यवहार ज्या बँकेमार्फत चालतो त्या बँकेमध्ये उक्त किंवा अधिनियमाच्या पोटकलम (३) च्या खंड (ब) अन्वये राज्य शासनाने मान्यता दिलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये ठेवण्यात येईल." असे नमूद केले आहे.

राज्यातील बीड, उस्मानाबाद, वर्धा, नांदूरबार, धुळे,नागपूर, वर्धा,बुलढाणा व नांदेड येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाची आर्थिकस्थिती डबघाईला आल्याने तसेच, रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाने त्यांच्या परवान्याचे नूतनकरण केले नसल्याने, या बँकेतील जिल्हा परिषदांची खाती बंद करून, राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडण्यास परवानगी देण्यात आली.

राज्यातील जिल्हा परिषदांचे आर्थिक व्यवहार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून चालतात. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे कोणतेही धनादेश वटले जात नसल्याने जिल्हा परिषदांचे संपूर्ण आर्थिक व्यवहार ठप्प झाले होते. याकरिता मध्यवर्ती जिल्हा सहकारी बँकेत अडकलेला निधी राष्ट्रीयकृत बँकेत वर्ग करण्याबाबत या विभागाच्या दि.६/५/२०१३ च्या पत्रान्वये प्रधान सचिव सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांना त्याच्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करणेबाबत कळविण्यांत आले आहे. तसेच दि५/८/२०१४ च्या पत्रान्वये दि. ६/५/२०१३ च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत पुन्हा सहकार विभागास कळविले आहे.

जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हानिधीची रक्कम सुरक्षित रहाण्याच्या दृष्टीने संबधीत जिल्हयाच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक स्थितीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा व त्यांना योग्य वाटल्यास जिल्हा निधीचे खाते, शासनाच्या कोषागाराचे व्यवहार ज्या राष्ट्रीयकृत बँकेत चालतात त्या बँकेत सुरू करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर निर्णय घेणेबाबत दि.११/८/२०१४ च्या शासन पत्रान्वये सर्व जिल्हा परिषदांना सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच जिल्हा परिषदांचा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अडकलेला निधी परत मिळण्याबाबत सचिव (सहकार) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांना बँकेत अडकलेला निधी जिल्हा परिषदांच्या राष्ट्रीयकृत बँकेत वर्ग करण्याबाबत संबंधित जिल्हा मध्यवर्ती बँकाना त्यांच्या स्तरावर सूचना देण्याबाबत दि.१९/१/२०१५ व दि. २७/१/२०१५ च्या पत्रान्वये प्रधान सचिव (ग्रामविकास) यांच्या स्तरावर कळविण्यांत आले आहे.

## चौकशी अहवाल

**नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत जिल्हा परिषद नांदेडच्या अडकलेल्या निधीबाबत टिप्पणी :-**

महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ४९ नुसार जिल्हानिधीचा व्यवहार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेतून होतो. त्यानुसार नांदेड जिल्हा परिषदेतील जिल्हा निधीचे सर्व खाते नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेत होते.माहे फेब्रुवारी २००५ पासुन सदर बॅकेमार्फत धनादेशाची अदाई होण्यास अडचणी येत होत्या. तसेच याबाबी कर्मचारी आणि शिक्षक संघटनाच्या निवेदनातून निदर्शनास आल्या.त्याअनुषंगाने बॅकेशी संपर्क करून व्यवहार सुरळीत करण्याबाबत प्रयत्न केले.परंतू बॅकेमार्फत या बाबत कोणताही प्रतिसाद मिळत नव्हता.सदर बाबीवर जिल्हा परिषद अध्यक्ष तसेच जिल्हा परिषद सभेत चर्चा झाली.सदर बॅक मार्फत प्रतिसाद न मिळाल्यामुळे बॅक डबघाईला आल्याचे निदर्शनास आल्यामुळे ही बाब शासनाच्या तसेच रिझर्व बॅक ऑफ इंडिया यांना कळवून जिल्हा परिषदेला जिल्हा निधीचे खाते स्टेट बॅक ऑफ हैद्राबाद किंवा इतर राष्ट्रीयकृत बॅकेत जिल्हा परिषदेची खाते उघडण्याची परवानगी मागीतली.त्या अनुषंगाने ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई याचे पत्र क्रमांक परास-२००४/९१३ प्र.क्र.४६३०/वित्त-३ दिनांक १७.०३.२००५ अन्वये नांदेड जिल्हा परिषदेला खाते स्टेट बॅक ऑफ हैद्राबाद या बॅकेत जिल्हा निधीचे खाते उघडण्याची परवानगी देण्यात आली.त्याप्रमाणे मार्च २००५ पासुन जिल्हा परिषद नांदेडचे जिल्हा निधीचे खाते स्टेट बॅक ऑफ हैद्राबादच्या शाखेत उघडून व्यवहार चालू आहेत.

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत जिल्हा परिषद नांदेडचा रूपये ६९.०० कोटी निधी अडकलेला आहे.अडकलेल्या निधी मध्ये वेतन, निवृत्तीवेतन, कंत्राटदाराच्या रक्कमा, विविध योजनेतील लाभार्थ्याच्या रक्कमा,विकास कामाचा निधी इत्यादीचा समावेश असून रक्कमा,अदाईसाठी बँकेकडून अडचणी निर्माण झाल्यामुळे असंतोषाचे वातावरण निर्माण झाले. याचा परिणाम कर्मचारी, कंत्राटदार, लाभार्थी, विकास योजना यांच्यावर झाला आहे. सदर बाब मा.शासन, मा.मुख्यमंत्री, मा.ग्रामविकास मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशनास आणून दिली व त्यांच्या मार्फत शासन स्तरावर पाठपुरावा करून अडकलेली रक्कम जिल्हा परिषदेला उपल्बध करून देणे बाबत विनंती केली. मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांनी या संदर्भात प्रशासक नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांना पत्र देवून जिल्हा परिषदेचा अडकलेला निधी तात्काळ उपल्बध करून देणे बाबत कळविले आहे. तथापि बँकेकडून प्रतिसाद मिळाला नाही.

या बाबतीत जिल्हा परिषद नांदेड विधीज्ञामार्फत बँकेला कायदेशीर नोटीस दिनांक ३१.०८.२००५ अन्वये बजावण्यात आली असून त्या संदर्भात देखील बँकेने प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर बँकेस तसेच शासनास या बाबत पाठनुरावा केला.उप सचिव महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांनी या अनुषंगाने दिनांक २३-११-२००५ रोजी बँकेच्या सर्व संबंधित यंत्रणेची बैठक बोलावून जिल्हा परिषदेचा अडकलेला निधी जिल्हा परिषदेस तात्काळ प्राप्त व्हावा या साठी पाठपुरावा केला.

याबाबत सहकार व वस्त्रोद्योग मंत्रालय, मुंबई यांच्याकडेही पाठपुरावा केला असून संतोष पाटील, विशेष कार्यकारी अधिकारी, सहकार व वस्त्रोद्योग मंत्रालय, मंबई यानी दिनांक ३०.१०.२०१३ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्स आयोजित करून जिल्हा परिषदेचा अडकलेला निधी परत करणेबाबत बँकेस कृती कार्यक्रम दिला असून बँकेच्या वसूली व्दारे उपलब्ध होण्याज्या निधीतुन टप्याने जिल्हा परिषदेची रक्कम परत करण्यात येईल असे बँकेने त्यांचे बँकेचे पत्र क्रमांक हिशोब/संकलन/५०३२/ १३-१४ दिनांक ३१-१०-२०१३ अन्वये कळविले आहे. तथापि, निधी परत मिळालेला नाही.

या बाबतीत वेळोवेळी जिल्हा परिषदेमार्फत व शासन मार्फत पाठपुरावा चालू आहे.मा.उप सचिव,महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र जिपका/२०१४/प्र.क्र.८६/वित्त-३, दिनांक १९-०१-२०१५ अन्वये मा.सचिव (सहकार) सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय मंबई यांना नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेत अडकून पडलेला निधी जिल्हा परिषदच्या सद्याच्या खात्यामध्ये वर्ग करण्याबाबत संबंधित जिल्हा मध्यवर्ती बॅकांना सुचना देण्यात याव्यात अशी विनंती केली.

नांदेड जिल्हा परिषद (मुख्यालय व पंचायत समिती)अंतर्गत मार्च, २००५ पर्यंतचा रू ६९ कोटी निधी नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक डबघाईला आल्यामुळे अडकून पडला आहे.याबाबत वेळोवेळी बॅकेशी तसेच शासन स्तरावर पाठपुरावा केलेला आहे.अडकून असलेल्या निधीची सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

| राष्ट्रीयकृत बॅकेत खाते उघडण्यापुर्वी जिल्हा बॅकेत अडकलेला सुरवातीचा निधी | आता पर्यंत वळती झालेला निधी | सद्य:स्थितीत बॅकेकडे अडकलेला निधी |
|---|---|---|
| ६९,००,००,०००/- | ८,५२,२८,५११/- | ६०,४७,७१,४८९/- |

सदर निधी वेतन/वेतनेतर/विकास कामाचा असून निधी बँकेच्या चालू खात्यामध्ये असल्यामुळे त्यावर व्याज देय नाही. सबब, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अडकलेला निधी जिल्हा परिषदेस उपलब्ध करून देणेबाबत मा.समिती मार्फत शासन स्तरावरून कार्यवाही व्हावी, अशी नम्र विनंती करण्यात येत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, महाराष्ट्रातील जवळपास १६ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका अवसायानात गेल्या असून जिल्हा परिषदेचा मोठा निधी या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत आहे. त्यामुळे हा निधी राष्ट्रीयकृत बँकेत ठेवण्याच्या संदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात जिल्हा परिषदेने एक टिप्पणी तयार करून ठराविक रक्कम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ठेवली होती. परंतु, ती रक्कम न मिळाल्यामुळे जिल्हा परिषदेच्या झालेल्या नुकसानाच्या संदर्भातील

अहवाल समितीला पाठविण्याचे निदेशित केलेले आहे. जिल्हा परिषदांच्या सहकारी बँकात अडकलेल्या ठेवी परत देण्यासंदर्भात शासनाची भूमिका काय आहे, यावर प्रधान सचिव, सहकार विभाग यांनी समितीस विदित केले की, हा विषय शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय जिव्हाळ्याचा असा आहे. खरे तर लाखो शेतकऱ्यांची गरज या बँका भागवित आल्या आहेत. यातील सर्वच बँका काही अवसायानात, लिक्विडेशनमध्ये निघालेल्या नाहीत, तर त्या डबघाईला आलेल्या आहेत. मागच्या कालखंडात अनेक प्रॉब्लेम निर्माण झाले आणि आजची परिस्थिती पाहिली तर, मागच्या ३-४ वर्षापासून या कर्जाची वसुलीच होऊ शकलेली नाही. त्यामुळे दिनांक २९ जुलै, २०१५ आणि दिनांक २०-१०-२०१५ रोजीच्या निर्णयाद्वारे कर्जाला स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला. आता अशी वेळ आलेली आहे की, कर्जाच्या पुनर्गठनाबाबत बोलले जात आहे. प्रधान सचिव, सहकार विभाग, हे दिनांक २१ मे, २०१२ रोजी ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिव पदावर रुजू झाले त्यानंतरच्या काळात जुलै महिन्यामध्ये प्रधान सचिव,सहकार विभाग यांनी हा निधी राष्ट्रीयकृत बँकेत ठेवण्याच्या संदर्भातील निर्णय घेतला होता. प्रधान सचिव, सहकार विभाग यांनी तत्कालीन सचिव श्री. देवरा यांच्यासमवेत प्रधान सचिव, सहकार विभागाच्या कार्यालयात चर्चाही केली होती आणि आज या विषयावरील चर्चा होत असताना त्यांच्याकडे सहकार विभागाची जबाबदारी आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, त्यामुळेच प्रधान सचिव, सहकार विभाग यांनी याबाबत जास्त सांगण्याची आवश्यकता नाही. प्रधान सचिव, सहकार विभाग यांची परिस्थिती त्यांना माहिती आहे. आपल्या विचारांनीच त्यांनी हा निर्णय घेतला होता यावर प्रधान सचिव, सहकार विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, शासनाने दुष्काळाच्या पार्श्वभूमिवर काही गोष्टी केल्या होत्या. आपल्याकडे ८-९ बँका आहेत. मागील काळात बँकाना कर्ज देता यावे म्हणून शासनाने ४६७ कोटी रुपयांची हमी घेतली होती. नागपूर, बुलडाणा आणि वर्धा बँकेला लायसन्स देता यावे म्हणून ५२४ कोटी रुपयांचे देय अनुदान उपलब्ध करून दिले होते. परिणामी नागपूर बँकेला १४ मार्च, २०१६ रोजी लायसन्स मिळाले होते. तसेच बुलडाणा आणि वर्धा या बँका देखील त्याच मार्गावर आहेत. त्या बँकेला कोणत्याही क्षणी लायसन्स मिळण्यास मदत होणार आहे. मराठवाड्यातील जालना, उस्मानाबाद, बीड आणि नांदेड अशा ४ बँका आहेत. नांदेड बँकेने नियोजन केलेले आहे आणि ते वसुलीवर अवलंबून आहे. नांदेडची ७० ते ८० कोटी रु?पयांची वसुली ही काही कारखान्यांकडून करणे अपेक्षित आहे. जालना बँकेकडे १७२२ कोटी रु?पयांची एनपीए आहे. बीड बँकेत १७५ कोटी रु?पये अडकून पडले आहेत. दिनांक ११-०८-२०१४ रोजीचे एक परिपत्रक निर्गमित केलेले असून मुख्य कार्यकारी अधिकारी दुसऱ्या ठिकाणी निधी ठेवण्याची परवानगी मिळावी म्हणून अहवालाच्या माध्यमातून मागणी करीत असतात. विभागाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावरून स्थानिक बँकेची परिस्थिती काय आहे ते पाहून निर्णय घ्यावा, असे सांगितले होते.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ज्या बँकेची आर्थिक परिस्थिती चांगली आहे, अशा बँकेत पैसे ठेवण्याची गरज आहे. यावर प्रधान सचिव, सहकार विभाग यांनी समितीस सांगितले की, समितीचे म्हणणे बरोबर आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा बँकेत पैसे ठेवले पाहिजे, अशी समितीची आग्रही विनंती आहे. धुळे आणि नंदूरबार बँकेची परिस्थिती चांगली आहे. शासनाने जिल्हा बँकेवर काही निर्बंध लावले आहेत, त्यानुसार शेतकऱ्यांना कर्ज देणे, वसुली थांबविणे वगैरे माहिती सचिवांनी दिलेली असून, त्या परिणामाला समितीला सामोर जावे लागत आहे. व्याज अल्पदरात दिले जाते. नॅशनलाईज बँक कर्ज देत नाही. ज्यावेळी बँका अडचणीत आल्या, त्यावेळी असंख्य कारणे होती. सद्य:स्थितीत काही बँका चांगल्या प्रकारे सुरु झालेल्या आहेत. यावर प्रधान सचिव, सहकार विभाग यांनी समितीस माहिती दिली की, या सर्व बँकाना भविष्यात स्थैर्य लाभणार आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, नांदेड जिल्हा बँकेची किती रक्कम अडकलेली आहे, प्रधान सचिव, सहकार विभाग यांनी उत्तरादाखल समितीस सांगितले की, नांदेड जिल्हा बँकेची ६० कोटी रुपयांची रक्कम अडकलेली आहे. तर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी अर्धाकखुलासा केला की, ९ जिल्ह्यांमध्ये ७६३ कोटी रुपये अडकले आहेत.यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, डिस्ट्रीक्ट बँकांचा आर्थिक व्यवहार चांगला असेल तर त्यांना ५० टक्के परवानगी देण्याची आवश्यकता आहे, अशी माझी विनंती आहे. त्यामुळे त्या बँका सुरु राहण्यास मदत होणार आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेतील अकाऊंट बंद केल्यामुळे नॅशनलाईज बँकेत गेलेलो आहेत. धुळे आणि नंदूरबारमधील बँकेने पैसे परत केले आहेत. त्यामुळे शासनाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्या बँकांमध्ये ५० टक्के रक्कमा ठेवण्याबाबत सूचना देण्याची गरज आहे, राज्यातील बीड, उस्मानाबाद, नंदूरबार, धुळे, नागपूर, वर्धा आणि नांदेड येथील जिल्हा मध्यवर्ती बँकांची आर्थिक परिस्थिती डबघाईला आल्यामुळे, तसेच रिझर्व्ह बँकेने त्यांच्या परवान्यांचे नूतनीकरण केले नसल्यामुळे, त्या बँकातील जिल्हा परिषदांमधील खाती बंद करून राष्ट्रीयकृत बँकेत खाती उघडण्यास परवानगी देण्यात आली आहे. धुळे आणि नंदूरबार बँकेचे एकूण १३३ कोटी रुपये अडकले आहेत. त्यांनी टप्प्याटप्प्यानुसार पैसे दिले आहेत. यानंतर विभागीय सचिवांनी समितीस

माहिती दिली की, मागील वर्षी १५ कोटी रुपयांचे रि-पमेंट केलेले आहे. त्यामुळे बँकेची उलाढाल सुरु झालेली आहे. फक्त वसूली झाली पाहिजे. पुढील वर्षी आणखी पैसे वसूल होऊ शकणार आहेत. जिल्हा मध्यवर्ती बँकांमध्ये २०० ते २५० कोटी रुपयांचा व्यवहार होत असतो. ज्यावेळी जिल्हा परिषदेचे अकाऊंट व्यवस्थितपणे चालते त्यावेळी जिल्हा मध्यवर्ती बँका देखील व्यवस्थित चालतात अशा प्रकारचे चित्र आहे. आता सचिवांनी दिलेल्या माहितीनुसार धुळे आणि नंदूरबार बँकेतून पेमेंट होऊ शकते. शासनाने नागपूर, वर्धा आणि धुळे बँकेसाठी ५२४ कोटी रुपये दिल्यामुळे लायसन्स मिळाले आहेत. सद्य:स्थितीत रिस्ट्रिक्शन असल्यामुळे पेमेंट करता आले नाही. यावर प्रधान सचिव, सहकार विभाग यांनी सांगितले की, मागील महिन्यात नागपूरमध्ये एक बैठक आयोजित केली होती. त्या ठिकाणी ६० कोटी रु?पयांचा ओव्हरड्राफ्ट दिलेला आहे. जिल्हापरिषदा आणि तेथील बँका या एकमेकांवर अवलंबून असतात. स्थानिक पातळीवर बारकाईने अभ्यास करून वसुली करण्याची कार्यवाही केली तर प्रलंबित रक्कमा मिळण्यास कोणतीही अडचण येणार नाही.

समितीने आणखी अशी विचारणा केली की, नांदेड बँकेसाठी कोणती प्रोव्हिजन केली जाणार असा प्रश्न आहे. यावर प्रधान सचिव, सहकार विभाग यांनी असे सांगितले की, नांदेड बँकेने दोन ते तीन कारखान्यांकडून वसुली करण्याची आवश्यकता आहे. दोन साखर कारखान्यांचा तीन वेळा लिलाव काढण्यात आला होता. दोन कारखान्यांची विक्री झाल्यानंतर ७० कोटी रुपये वसूल करण्यास मदत होणार आहे. यावर पुन्हा समितीने अशी विचारणा केली की, रक्कमा वसूल झाल्यानंतर अनेक रक्कमा जिल्हा परिषदांना द्याव्या लागणार आहेत. यावर समितीस माहिती मिळाली की, जिल्हा परिषदेला पार्टली पेमेंट केले तर त्यांचा बिझनेस सुरु होण्यास मदत होणार आहे. जिल्हा परिषदेला सर्व पैसे एकदम देणे शक्य होणार नाही. २५ कोटी रुपये दिले तर बँकेतील व्यवहार सुरु होण्यास मदत होणार आहे आणि जिल्हा परिषदेला कोणतीही अडचण येणार नाही. यावर समितीने असे मत मांडले की, जिल्हा परिषदेला प्रायोरिटीवर घ्यावे, यावर विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, रिपेमेंट करीत असताना जिल्हा परिषदेला प्राधान्याने पेमेंट करावे, अशा पध्दतीच्या सूचना दिल्या जातील. समितीने प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांचे मत विचारले असता त्यांनी सांगितले की, सिच्युएशन पाहून निर्णय घेण्याबाबत सांगितले आहे. तसेच विभागाने लेखी स्वरु?पात काही आदेश दिले आहेत. सन २०१४ मध्ये सचिवांनी अभ्यास करून राष्ट्रीयकृत बँका आणि या बँकांच्या संदर्भातील निर्णय घेण्याबाबत सांगितले आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, ज्या बँकांची आर्थिक परिस्थिती सुधारलेली असेल अशा बँकांमध्ये ५० टक्के पेमेंट ठेवले पाहिजे, अशा प्रकारचे पत्रक काढण्याची गरज आहे. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस माहिती दिली की, शासन पातळीवर अशा प्रकारचा निर्णय घेण्याची गरज आहे.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने नांदेड जिल्हा परिषदेस भेट दिली असता भेटीच्या वेळी समितीच्या निदर्शनास आले की, नांदेड जिल्हापरिषदेचा सुमारे ६०,४७,७१,४८९/- रुपयांचा निधी नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेत अडकून पडलेला आहे. सन २००५ मध्ये नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक डबघाईला येवून ती अवसायानात गेली तेव्हापासून सदरचा निधी अडकून पडलेला असून मागील ११ वर्षांपासून शासनाकडे व बँकेकडे पाठपुरावा करण्यात येवूनही सदरचा निधी अद्याप जिल्हा परिषदेला परत करण्यास अपयश आलेले आहे. समितीने या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीदरम्यान नांदेड जिल्हा परिषदेस बँकेने तिच्याकडील थकीत तीन कारखान्यांची वसुली प्राधान्याने केल्यावर त्यातून मिळालेल्या रकमेतून जिल्हा परिषदेला काही रक्कम अदा करता येईल अशी माहिती दिली. समितीच्या मते बँकेने दोन कारखान्यांचा आतापर्यंत लिलाव करण्याचे तीन प्रयत्न केले आहेत. परंतू अद्याप या कारखान्यांचा लिलाव होवू शकलेला नाही. ग्रामीण भागाच्या विकासासाठी जिल्हापरिषदा व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या दोन्ही संस्था आवश्यक आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या एकमेकांस पूरक देखील आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहितेच्या नियम ४९ मध्ये जिल्हा परिषदांनी त्यांचा निधी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये ठेवणे बंधनकारक आहे. जिल्हा परिषदा व्यवस्थित चालत असताना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी देखील सचोटी व व्यावसायिक दृष्टीकोनातून व्यवसाय करणे आवश्यक आहे अन्यथा नांदेड जिल्हा परिषदेप्रमाणे मोठ्या प्रमाणावर निधी अडकून पडतो. परिणामी जिल्ह्यातील विविध विकास योजना, वेतन व भत्ते, वैयक्तिक लाभार्थ्यांस लाभ देण्याज्या योजना प्रभावित होतात. त्याचबरोबर असा निधी बचत खात्याऐवजी चालू खात्यात ठेवल्यामुळे त्यावर जिल्हा परिषदांना व्याज देखील मिळणे दूरापास्त होते.

राज्यातील अनेक मध्यवर्ती सहकारी बँकांची आर्थिक स्थिती डबघाईला आल्यामुळे रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाने त्यांच्या परवान्यांचे नुतनीकरण केलेले नव्हते. अशा परिस्थितीत शासनाने या बँकातील जिल्हा परिषदांची खाती बंद करुन राष्ट्रीयकृत बँकेने खाते उघडण्यास परवानगी दिली आहे. परंतू अशा बँकांमध्ये अडकून पडलेला जिल्हा परिषदेचा निधी तातडीने परत मिळविणे आवश्यक आहे. **जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हानिधीची रक्कम सुरक्षित रहाण्याच्या दृष्टीने संबधीत जिल्हयाच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक स्थितीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा अशी समितीची शिफारस आहे. जिल्हा निधीचे खाते, शासनाच्या कोषागाराचे व्यवहार ज्या राष्ट्रीयकृत बँकेत चालतात त्या बँकेत सुरू करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर निर्णय घेणेबाबत दि.११-८-२०१४ च्या शासन पत्रान्वये सर्व जिल्हा परिषदांना सूचना देण्यात आल्या आहेत.सुचनानुसारकार्यवाही सुरु असल्यामुळे याबाबत समिती समाधान व्यक्त करते.**

प्रकरण सतरा

## जिल्हा परिषद, नांदेड (प्रशासन)

### नांदेड जिल्ह्यातील सन २००५ ते २०१५ या कालावधीतील पाणीपुरवठा योजनांच्या कामांबाबत

समितीने दिनांक १३ ते १५ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नांदेड जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीने नांदेड जिल्हा परिषदेने सन २००५ ते २०१५ या कालावधीत घेतलेल्या पाणी पुरवठा योजनांच्या कामांबाबत आढावा घेण्याचे निदेश दिले. समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिले की, समितीने दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ रोजी काही कामांची अचानक तपासणी केली त्यात काही अनियमितता व गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, अशीच कामे इतरही ठिकाणी झाल्याची शंका आहे. त्यामुळे गेल्या सहा वर्षात जी कामे झाली व ज्या कामांचे देयक अदा केले त्या कामांची गुणनियंत्रण मंडळाकडून तपासणी करुन त्या बाबतचा अहवाल समितीला सादर करावा असे निदेश समितीने दिले.

ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांवर ५० लाख ते १ कोटी रुपयांपर्यंत खर्च करण्यात आलेला आहे. परंतु यातील अनेक योजना सुरु नाहीत. समितीने बेटमोगरा गावाला भेट दिली. त्या ठिकाणी पाईपच्या बाबतीत समितीला काय आढळून आले त्या बाबी निदर्शनास आणून दिल्या आहेत. त्या योजनेवर लाखो रुपये खर्च करुन सुध्दा योजनेचा वापर होत नाही. जुन्या पाईपचा वापर केलेला असताना नवीन पाईप टाकल्याचे दाखविण्यात आले. त्यामुळे जिल्हा परिषदेने सन २००५ ते २०१५ या कालावधीत ज्या पाणीपुरवठा योजनांची कामे हाती घेतली होती त्यातील किती योजना पूर्ण झाल्या, त्यावर किती खर्च करण्यात आला, अपूर्ण योजना किती आहेत, त्या योजना अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत, तसेच योजना सुरु झाल्यानंतर त्या योजनेतून किती दिवस पाणीपुरवठा करण्यात आला या सर्व बाबींचा अहवाल समितीला सादर करावा. योजना सुरु केल्यानंतर त्यातून किमान १ लाख लीटर पाणीपुरवठा झाला काय, या संदर्भातील योजनानिहाय अहवाल समितीला सादर करावा. या संदर्भातील चौकशी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी १ महिन्यात करुन समितीला चौकशी अहवाल सादर करावा. भविष्यात अशा प्रकारच्या योजना करीत असताना निरनिराळ्या अडचणी येऊ शकतात, पाणी व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून अडचणी येऊ शकतात. त्यामुळे या सर्व बाबींची चौकशी केल्यानंतर ज्यांनी जाणीवपूर्वक योजना सुरु केल्या नाहीत त्यांच्यावर दंडात्मक कारवाई किंवा जी काही कारवाई करणे शक्य आहे ती करता येईल. या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून अनुपालन अहवाल देखील सादर करण्याचे निदेश समितीने दिले.

त्याचबरोबर समितीने दिनांक १३ ते १५ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नांदेड जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसोबत केलेल्या अनौपचारीक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, नांदेड जिल्ह्यामध्ये पाणी पुरवठ्याच्या योजना ५० टक्के अपूर्ण आहेत. एमजेपीने १५ वर्षांपूर्वी पाणी पुरवठ्याच्या योजनांना सुरवात केलेली असतांना सुध्दा या योजना ५० टक्के अपूर्ण आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत जनतेला पाणी मिळाले नाही. पाणीपुरवठ्याच्या योजना पूर्ण करुन जिल्हा परिषदेच्या ताब्यात दिल्या जात नाहीत, जिल्हा परिषद या योजना हस्तांतरीत करुन घेत नाही असे असताना या योजना ग्रामपंचायतीने सुरु कराव्यात यासाठी त्यांच्यावर प्रेशर टाकले जाते. खरे म्हणजे योजनांची कामे पूर्ण केल्यानंतरच या योजना ग्रामीपंचायतीच्या ताब्यात दिल्या पाहिजेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठ्याच्या योजनांची कामे अतिशय निकृष्ट पध्दतीची आहेत. यावर समितीने असे निदेश दिले की, पाणी पुरवठ्याच्या योजनांना शासन आता मान्यता देत नाही. त्यामुळे काही पाणी पुरवठ्याच्या योजना मंजूर झाल्या, त्यांच्या कामाला सुरुवात झाली असतानाही या कामांना स्थगिती देण्यात आलेली आहे. सन २००५ ते २०१५ या काळात पाणी पुरवठ्याच्या योजना हाती घेण्यात आल्या होत्या. त्यामुळे या काळातील पाणी पुरवठ्याच्या योजनांची माहिती समितीला उपलब्ध करुन देण्यात यावी. पैसा खर्च होऊन सुध्दा पाणी पुरवठ्याच्या योजना पूर्ण होत नसेल तर त्यासंदर्भातील कारणे समिती समोर आली पाहिजेत असे निदेश समितीने दिले.

**समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

(१) नांदेड जिल्हा परिषदेने सन २००८ ते २०१५ या कालावधीत ज्या पाणीपुरवठा योजनांची कामे हाती घेतली होती त्यातील किती योजना पुर्ण झाल्या, त्यावर किती खर्च करण्यात आला, अपूर्ण योजना किती आहेत, त्या अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत, तसेच योजना सुरु झाल्यानंतर त्या योजनेतून किती दिवस पाणीपुरवठा करण्यात आला, याबाबीचा

अहवाल समितीला सादर करण्याचे निदेश समितीने दिले असून त्यासंदर्भात भविष्यात अशा योजना यशस्वीपणे कार्यान्वित राहण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना हाती घेतली आहे ?

(२) सन २००५ ते सन २०१५ या कालावधीतील पाणी पुरवठ्याच्या योजनांवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च होवूनही योजना पूर्ण होत नसतील तर त्याची कारणे काय आहेत ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली--**

(१) भारत निर्माण कार्यक्रम अंतर्गत व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत योजनांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | योजनेचे नाव | मंजूर योजना | कार्यान्वित योजना | अकार्यान्वित योजना | पूर्ण झालेल्या योजना |
|---|---|---|---|---|---|
| १ | भारत निर्माण कार्यक्रम | ४८३ | ४६६ | १७ | ११६ |
| २ | राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम | २७३ | १७९ | ९४ | ०७ |

उक्त सर्व योजनांवर रु. १८८.१९ कोटी रुपये खर्च झाला आहे.

तसेच भारत निर्माण कार्यक्रम अंतर्गत (४८३) मंजूर पाणीपुरवठा योजनापैकी (४६६) योजना कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत. नांदेड जिल्ह्यातील मागील ३ वर्षांपासून पर्जन्यमान कमी झाल्यामूळे उदभव कोरडे पडले आहे. त्यामुळे ९४ योजना सद्यस्थितीत बंद आहेत. तसेच देखभाल दुरुस्ती अभावी २३ असे एकूण ११७ योजना बंद आहेत. सदर गावात उपलब्ध असलेले हातपंप/विद्युतपंप अथवा टँकरद्वारे पाणीपुरवठा करुन सदर गावाची पाणी विषयक समस्या सोडविण्यात येत आहे. दुरुस्ती अभावी बंद पडलेल्या २३ योजना टंचाई अंतर्गत नळ योजना विशेष दुरुस्ती काम घेवून त्याद्वारे पाण्याचा प्रश्न सोडविण्यात येत आहे. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत २७३ पाणी पुरवठा योजना मंजूर असून १७९ योजनांचा पाणीपुरवठा सुरु करण्यात आलेले आहे आणि ९४ योजनांचे काम प्रगतीपथावर आहे. पाणी पुरवठा सुरु असलेल्या १७९ योजनांचेपैकी १२ योजनांचे उदभव कोरडे पडल्याने सध्या पाणीपुरवठा बंद आहे. सदर गावात उपलब्ध असलेले हातपंप/विद्युतपंप अथवा टँकरद्वारे पाणीपुरवठा योजना कार्यान्वित झाल्यापासून चालू आहे. याबाबत स्वतंत्र अहवाल समितीसमोर सादर करण्यात येत आहे.

(२) योजना अपूर्ण राहण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

(१) समितीमधील अंतर्गत वाद

(२) ग्रामपंचायतीच्या निवडणुकीनंतर नविन समिती गठीत झाल्यानंतर नवीन समितीस हिशोब देण्यास होणारा विलंब

(३) समितीस बँकेतून रक्कम काढण्यासाठी ग्रामपंचायतीचा ठराव शासन निर्णय दिनांक ०२ डिसेंबर, २०११ अन्वये बंधनकारक केले होते. त्यामुळे शासन अनुदान ग्रामपंचायतीमार्फत समितीच्या खात्यामध्ये जमा करण्यास होणारा विलंब.

(४) शासन निर्णय दि.१२-०८-२००९ अन्वये समितीचे पदसिध्द अध्यक्षपदी सरपंच व पदसिध्द सचिव पदी ग्रामसेवक राहतील असा निर्णय दिला आहे. त्याविरोधत समितीने न्यायालयात धाव घेतल्याने शासन निर्णय दि.१५.१०.२०१० अन्वये वरील शासन निर्णयापूर्वी अस्तित्वात असलेली ग्राम आरोग्य, पोषण, पर्यावरण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीची रचना कायम केली आहे.

५) समितीकडील तांत्रिक ज्ञानाचा अभाव

**समितीस पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.--**

भारत निर्माण कार्यक्रम अंतर्गत व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत योजनांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | मंजूर योजना | कार्यान्वित योजना | अकार्यान्वित योजना | पूर्ण झालेल्या योजना |
|---|---|---|---|---|---|
| १ | भारत निर्माण कार्यक्रम | ४८३ | ४६६ | १७ | ११६ |
| २ | राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम | २७३ | १७९ | ९४ | ०७ |

उक्त सर्व योजनांवर रु. १८८.१९ कोटी रुपये खर्च झाला आहे. तसेच भारत निर्माण कार्यक्रम अंतर्गत (४८३) मंजूर पाणी पुरवठा योजनापैकी (४६६) योजना कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत.

नांदेड जिल्ह्यातील मागील ३ वर्षांपासून पर्जन्यमान कमी झाल्यामूळे उदभव कोरडे पडले आहे. त्यामुळे ९४ योजना सद्यस्थितीत बंद आहेत. तसेच देखभाल दुरुस्ती अभावी २३ असे एकूण ११७ योजना बंद आहेत. सदर गावात उपलब्ध असलेले हातपंप/विद्युतपंप अथवा टॅंकरद्वारे पाणीपुरवठा करुन सदर गावाची पाणी विषयक समस्या सोडविण्यात येत आहे. दुरुस्ती अभावी बंद पडलेल्या २३ योजना टंचाई अंतर्गत नळ योजना विशेष दुरुस्ती काम घेवून त्याद्वारे पाण्याचा प्रश्न सोडविण्यात येत आहे. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत २७३ पाणीपुरवठा योजना मंजूर असून १७९ योजनांचा पाणीपुरवठा सुरु करण्यात आलेले आहे. आणि ९४ योजनांचे काम प्रगतीपथावर आहे. पाणी पुरवठा सुरु असलेल्या १७९ योजनांचेपैकी १२ योजनांचे उदभव कोरडे पडल्याने सध्या पाणी पुरवठा बंद आहे. सदर गावात उपलब्ध असलेले हातपंप/विद्युतपंप अथवा टॅंकरद्वारे पाणी पुरवठा योजना कार्यान्वित झाल्यापासून चालू आहे. याबाबत स्वतंत्र अहवाल समितीसमोर सादर करण्यात येत आहे.

(१) भारत निर्माण कार्यक्रम सन २००५ ते २००९ या कालावधीकरीता आणि राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम २०१० पासून झालेला आहे. सदरील कामे ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती मार्फत करण्यात येतात. योजना अपुर्ण राहण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.--

(१) समितीमधील अंतर्गत वाद

(२) ग्रामपंचातीच्या निवडणुकीनंतर नवीन समिती गठीत झाल्यानंतर नवीन समितीस हिशोब देण्यास होणारा विलंब.

(३) समितीस बॅंकेतून रक्कम काढण्यासाठी ठराव शासन निर्णय दिनांक २ डिसेंबर, २०११ अन्वये बंधनकारक केले होते. त्यामुळे शासन अनुदान ग्रामपंचायतीमार्फत समितीच्या खात्यामध्ये जमा करण्यास होणारा विलंब.

(४) शासन निर्णय दिनांक १२ ऑगस्ट, २००९ अन्वये समितीचे पदसिध्द अध्यक्षपदी सरपंच व पदसिध्द पदी ग्रामसेवक राहतील असा निर्णय दिला आहे. त्याविरोधात समितीने न्यायालयात धाव घेतल्याने शासन निर्णय दिनांक १५ ऑक्टोबर, २०१० अन्वये वरील शासन निर्णयापूर्वी अस्तित्त्वात असलेली ग्राम आरोग्य-पोषण, पर्यावरण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीची रचना कायम केली आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की नांदेड जिल्हा परिषदेने सन २००५ ते २०१५ या कालावधीत ज्या पाणीपुरवठा योजनेंची कामे हाती घेतली होती, त्यातील किती योजना पूर्ण झाल्या. त्यावर किती निधी खर्च करण्यात आला. अूपर्ण योजना किती आहेत, त्या अपूर्ण रहाण्याची कारणे काय आहेत, तसेच योजना सुरु झाल्यानंतर त्या योजनेतून किती दिवस पाणी पुरवठा करण्यात आला, या बाबीचा अहवाल समितीला सादर करण्याचे निदेश समितीने दिले असून त्यासंदर्भात भविष्यात अशा योजना यशस्वीपणे कार्यान्वित रहाण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना हाती घेतली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, भारतनिर्माण कार्यक्रमांतर्गत मंजूर

झालेल्या ४८३ योजनांपैकी ४६६ योजना कार्यान्वीत झालेल्या आहेत. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत २७३ मंजूर योजनांपैकी १७९ योजना पूर्ण झालेल्या आहेत आणि इतर योजना प्रगती पथावर आहेत. सद्याच्या परिस्थितीमध्ये अपूर्ण रहाण्याचे कारण म्हणजे नांदेड जिल्ह्यात मागील तीन वर्षांपासून पर्जन्यमान कमी झाल्यामुळे विशेषत: उद्‌भवांना पाणी कमी आहे. नव्याने स्कीम घ्यावे लागत आहे, ही वस्तुस्थिती आहे. ७३ योजना अपूर्ण आहेत. काही प्रगती पथावर आहेत.

समितीने आणखी विचारणा केली की, सन २००५ ते २०१५ या कालावधीमध्ये पाणी पुरवठा योजनांवर मोठ्या प्रमाणात खर्च होऊनही योजना पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत. यावर प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, समितीने नांदेड जिल्ह्याचा दौरा केला होता त्यावेळी मंजूर असलेल्या ७५६ पैकी ६४५ योजना पूर्ण केल्या असून ११८ योजना मोठ्या प्रमाणामध्ये खर्च होऊनही अपूर्ण होत्या. जिल्ह्यामध्ये ८३९ पाणी पुरवठ्याच्या योजना सन २००५ ते २०१५ या कालावधीमध्ये मंजूर करण्यात आल्या होत्या त्यापैकी ६६६ योजना जिल्हा परिषद, नांदेड यांनी पूर्ण केल्या आहेत. उर्वरित योजना आजच्या स्थितीत प्रगती पथावर असून त्या सन २०१६-१७ मध्ये पूर्ण करण्यात येईल. नांदेड जिल्हा परिषदेच्या आर्थिक परिस्थितीमुळे पाणीपुरवठा योजनेची काही कामे अपूर्ण आहेत. समितीने पुढे विचारणा केली की, समितीने पाणी पुरवठा योजनांच्या कामांना भेटी दिल्या होत्या त्यावेळी मोठ्या प्रमाणात निधी खर्च होऊनही काही गावामध्ये योजना राबविल्याचे आढळून आले नाही. यावर प्रधान सचिवांनी समितीस माहिती दिली की, पाणी पुरवठ्याच्या ८०० योजनांपैकी ६६६ पेक्षा अधिक योजना पूर्ण होऊन त्या वापरात आहेत व काही योजना प्रगती पथावर आहेत. बेटमोगरा येथील तक्रारी संदर्भात चौकशी करण्यात आली असून त्याबाबतचा अहवाल प्राप्त झाला आहे. पाणी पुरवठ्याच्या प्रलंबित प्रस्तावाबाबत जिल्हा परिषद अध्यक्ष यांचे समवेत व पॉलिटीकल बॉडीबरोबर बैठका घेऊन आम्ही मार्ग काढण्याचा प्रयत्न केला आहे. अपूर्ण योजनांचे प्रमाण फार कमी आहे. नवीन वर्षात मोठ्या प्रमाणात योजना हाती घेण्यात येत आहेत. यावर समितीने पुढे आणखी विचारणा केली की, सदरील योजनांची आकडेवारी समितीला सांगण्यात यावी. यावर सचिव, एमएमजीएसवाय यांनी समितीस माहिती दिली की, ८३९ योजनांची कामे जिल्हा परिषदेने मागील १० वर्षांत हाती घेतली होती व त्यापैकी ७६६ योजना कार्यान्वीत झालेल्या आहेत. काही योजना प्रगती पथावर आहेत. यावर समितीने विचारणा केली की, पाणी पुरवठ्याची योजना एकाच गावात दोन पेक्षा अधिक वेळा घेण्यात आल्या आहेत काय, असतील तर ती गावे कोणती आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, यासंदर्भातील माहिती तपासून समितीस सादर करण्यात येईल. काही गावामध्ये जुन्या स्कीमचे मधून पाणी पुरवठा बंद झाल्यामुळे नवीन योजना घेण्यात आली असेल त्याबाबतची माहिती सादर करण्यात येईल. यानंतर सचिव पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, नांदेड जिल्ह्यामध्ये एकूण १६ तालुके, १३१३ ग्रामपंचयती, १५४४ गावे व २१२० वाडी-वस्त्या आहेत. जिल्ह्यात आजपर्यंत १६४७ स्वतंत्र योजना व १६ प्रादेशिक अशा प्रकारे १६६३ पाणी पुरवठा योजना या भारत निर्माण, ग्रामीण पेयजल, राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम अशा वेगवेगळ्या योजनेतून राबविण्यात आल्या आहेत. सदरहू १६६३ योजनेपैकी स्वतंत्र योजनेतील १८ योजना बंद आहेत व प्रादेशिक मधील ६ योजना बंद आहेत. कायम स्वरुपी बंद असलेल्या ११८ योजना आहेत. सदरहू योजनांची लाईफ संपलेली आहे. सदर ठिकाणी नवीन योजना देण्याची जिल्हा परिषदेला मुभा आहे. सदरहू योजना पुनर्जिवीत होऊ शकतात. ६ प्रादेशिक योजना पुनर्जिवीत करण्याकरिता यावर्षीच्या प्रोग्राममध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने नांदेड जिल्हा परिषदेला भेट दिली असता पाणीपुरवठा योजनांबाबत समितीने माहिती घेतली. समितीने काही गावांना प्रत्यक्ष भेटी दिल्या त्यापैकी बेटमोगरा या गावास भेट दिली असता तेथील पाणीपुरवठा योजनेमध्ये अनियमितता व गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी समितीस प्राप्त झाल्या. बेटमोगरा पाणीपुरवठा योजनेत जुन्या वितरीकेसच जोडणी देवून नवीन पाईप लाईन टाकल्याचे दाखविण्यात आले आहे अशा स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यावरुन समितीने २००५ ते २०१५ या कालावधीत जिल्ह्यामध्ये ज्या पाणीपुरवठा योजनांची कामे हाती घेतली होती त्यातील किती योजना पूर्ण झाल्या, त्यावर किती खर्च झाला, अपूर्ण योजना किती आहेत व त्या अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत यासंदर्भातील माहिती विभागाकडून घेतली. त्यानुसार नांदेड जिल्ह्यात एकूण १३१३ ग्रामपंचायती असून १५४४ गावे व २१२० वाडी वस्त्या आहेत. जिल्ह्यात आजपर्यंत १६४७ स्वतंत्र योजना व १६ प्रादेशिक अशा १६६३ पाणीपुरवठा योजना या भारत निर्माण, ग्रामीण पेयजल, राष्ट्रीय पेयजल अशा वेगवेगळ्या योजनेतून राबविण्यात आल्या आहेत. स्वतंत्र योजनांपैकी १८ योजना तर प्रादेशिक ६ योजना बंद असल्याचे आणि ११८ योजना कायमच्या बंद अवस्थेत असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. सन २००५ ते २०१५ या कालावधीत पाणीपुरवठा योजनांवर ११८.१९ कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. **समितीने भेट देण्यापूर्वीची तीन वर्षे जिल्ह्यात पर्जन्यमान कमी झाल्यामुळे पाणीपुरवठा योजनांचे उद्‌भव कोरडे पडल्यामुळे तब्बल ९४ योजना बंद पडल्या असल्याबाबत समितीला चिंता वाटते. तद्वतच प्रशासनाने या ९४ योजनांवरील गावे व वाड्या वस्त्यांना हातपंप/विद्युतपंप व टँकरद्वारे पाणीपुरवठा करुन या गावांच्या पाण्याची समस्या प्रशासनाने अंशत: सोडविल्याबाबत समिती समाधान व्यक्त करते.परंतू अकार्यान्वयीत ९४ योजनांच्या बाबतीत ज्यांची कामे प्रगती पथावर आहेत त्या सर्व योजना कालबध्द कार्यक्रम हाती घेवून पुढील सहा महिन्यांच्या काळात पूर्णत्वास नेणे आवश्यक आहे. तसेच ११८ कायम बंद असलेल्या योजनांवरील गावांना पर्यायी स्त्रोत शोधून त्या गावांच्या पाणी पुरवठ्याच्या योजना तातडीने हाती घेण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे.**

# जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रकरण अठरा

# जिल्हा परिषद, औरंगाबाद (प्रशासन)

## ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद अंतर्गत कविटखेडा पाणीपुरवठा योजनाबाबत

समितीने दिनांक १५ ते १७ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत औरंगाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली. दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ रोजी समितीने फुलंब्री पंचायत समितीला भेट देवून सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालावर गटविकास अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीदरम्यान समितीने विचारणा केली की, या भागातील पाणीपुरवठा योजनेवर खर्च झालेला आहे. परंतु, कविटखेडा पाणीपुरवठा योजना अद्याप का सुरु झालेली नाही, यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, सन २००६-२००७ ते सन २०१४-२०१५ पर्यंत २९ योजनांची कामे हाती घेण्यात आली होती. त्यामधील कवीटखेड पाणीपुरवठा योजना सुरु झाली नाही. यानंतर समितीस योजना अद्याप का सुरु झाली नाही याबाबत समाधानकारक उत्तर प्राप्त झाले नाही. तद्नंतर समितीने योजनेबाबतचा संपूर्ण अहवाल समितीला सादर करावा. तसेच जिल्ह्यातील सर्व पाणीपुरवठा योजनांची माहिती देखील समितीला सादर करावी. मराठवाडा दुष्काळाला सामोरा जात आहे. कोट्यावधी रुपये या योजनांवर खर्च होतात. परंतु, पाणी पुरवठा होत नाही. ज्या योजना बंद पडल्या असतील, भ्रष्टाचार झाला असेल तर त्याबाबतची माहिती देखील समितीला सादर करावी असे निदेश दिले.

**समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद अंतर्गत कविटखेडा पाणपुरवठा योजनांसह सन २००६ ते २०१५ या कालावधीतील जिल्ह्यातील बंद पडलेल्या, सुरु झालेली कामे, खर्च झालेला निधी व आक्षेपात निधी या सर्व बाबींचा समावेश करुन पाणीपुरवठा योजनांचा संपुर्ण अहवाल समितीस सादर करण्याचे निदेश दिले आहेत. त्यानुसार जिल्ह्यात बंद पडलेल्या योजना पुन्हा सुरु करण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

ता. फुलंब्री, जि.औरंगाबाद अंतर्गत कविटखेडा पाणीपुरवठा योजनांसह सन २००६ ते २०१५ या कालावधीतील ग्रामिण पेयजल कार्यक्रम अंतर्गत योजनांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.--

| अ.क्र. | एकूण मंजुर योजना | कार्यान्वित योजना | प्रगतीतील योजना |
|---|---|---|---|
| १ | ८६३ | ७७० | ९३ |

उक्त सर्व योजनांवर रु.२७०.२९ कोटी रुपये खर्च झाला आहे. प्रगतीतील योजना व कार्यान्वित झालेल्या योजना अंतिम करण्यासाठी रु. ५७.०० कोटी इतका निधी प्राप्त होणे आक्षेपात आहे.

औरंगाबाद जिल्ह्यात १३० योजना सद्यस्थितीत बंद आहेत. सदर गावात उपलब्ध असलेले हातपंप/विद्युत पंप अथवा टँकरव्दारे पाणीपुरवठा करुन सदर गावाची पाणी विषयक समस्या सोडविण्यात येत आहे. बंद पडलेल्या योजना पुन्हा सुरु करण्यासंदर्भात सन २०१६-१७ चे कृती आराखड्यात प्रपत्र-ई, देखभाल दुरुस्ती मध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

**समितीस पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

सन २००६ ते २०१५ या कालावधीत औरंगाबाद जिल्ह्यातील योजनांचा संपूर्ण अहवाल सादर केला आहे. या कालावधीत कोणतीही योजना बंद पडलेली नाही. तथापि सन २००६ पूर्वीच्या १० योजना सद्यस्थितीत बंद आहेत. सदर गावात उपलब्ध असलेले हातपंप/विद्युतपंप अथवा टँकरव्दारे पाणीपुरवठा करुन सदर गावाची पाणी विषयक समस्या सोडविण्यात येत आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २४ मे, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद अंतर्गत कविटखेडा पाणी पुरवठा योजनांसह सन २००६ ते २०१५ या कालावधीतील जिल्ह्यातील बंद पडलेल्या सुरु झालेली कामे, खर्च झालेला निधी व आक्षेपात निधी या सर्व बाबींचा समावेश

करुन पाणी पुरवठा योजनांचा संपूर्ण अहवाल समितीस सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार जिल्ह्यात बंद पडलेल्या योजना पुन्हा सुरु करण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली आहे. यावर विभागीय सचिवांनी समितीस विदीत केले की, औरंगाबाद जिल्ह्यात २००६ ते २०१५ या कालावधीत ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत एकूण ८६३ योजना हाती घेण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी ७७० योजना कार्यान्वित होऊन ९३ योजना प्रगतीपथावर होत्या, आता त्या सर्व योजना पूर्ण झालेल्या आहेत. एकूण पूर्ण जिल्ह्याची ग्रामीण पाणी पुरवठ्याची परिस्थिती पाहिली तर जिल्ह्यात १३० योजना वेगवेगळ्या कारणांमुळे बंद आहेत. १३० पैकी १० योजना पुनर्जीवित होऊ शकतात. त्या त्यांनी या वर्षीच्या कार्यक्रमामध्ये घेतल्या आहेत. या वर्षी त्या १० योजना पुनर्जीवित होऊ शकतील.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने फुलंब्री पंचायत समितीला भेट देवून गट विकास अधिकारी यांची साक्ष घेतली असता समितीला औरंगाबाद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाअंतर्गत मौजे कविटखेडा, ता. फुलंब्री योजनेस दिनांक १८ एप्रिल, २००७ रोजी मान्यता मिळालेली असुन अद्याप ती कार्यान्वीत झाली नसल्याचे आढळून आले. यासंदर्भात समितीने दिलेल्या निदेशानुसार सन २००६ ते २०१५ या कालावधीतील ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत बंद पडलेल्या, सुरु असलेल्या, पूर्ण झालेल्या, योजना व त्यावरील खर्च झालेला निधी व अपेक्षित निधी यांसंदर्भात संपूर्ण अहवाल जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी सादर करणे अपेक्षीत होते. परंतू साक्षीच्या बैठकीपर्यंत संपूर्ण अहवाल समितीस प्राप्त झाले नाहीत याबाबत समिती सखेद आश्चर्य व्यक्त करते.

समितीस प्राप्त झालेल्या अत्यंत त्रोटक लेखी माहितीवरुन लक्षात येते की, सन २००६ ते २०१५ या कालावधीत एकूण ८६३ मंजूर योजनांपैकी ७७० योजना कार्यान्वीत असून ९३ योजना प्रगतीपथावर असून कविटखेडा पाणी पुरवठा योजना ही त्यापैकी एक आहे. आतापर्यंत योजनांवर २७०.२९ कोटी रुपये खर्च झालेले असून उर्वरित ९३ योजना कार्यान्वित करण्यासाठी ५७ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असून योजनेचे स्वरुप पाहून तसे पुनर्विलोकन करुन या योजनांना आवश्यक असल्यास निधी तातडीने शासनाने उपलब्ध करुन दिल्यास या योजना लवकरात लवकर पूर्ण होतील. **याकरिता शासनाने निधी तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा अशी समितीची शिफारस आहे.** लेखी माहितीत १० योजना बंद असल्याची तर सचिवांनी १३० योजना बंद अवस्थेत असुन त्यातील १० योजना पुनर्जिवित होवू शकतील अशी परस्परविरोधी माहिती दिल्यामुळे बंद योजनांच्या संख्येबाबत समिती साशंक असून जिल्ह्यातील बंद पडलेल्या योजनांची योजनानिहाय माहिती त्या बंद पडण्याच्या कारणासह तसेच त्या पुनर्जिवित होवू शकतात किंवा कसे व त्या पुनर्जिवीत होवू शकत असल्यास त्याकरिता अपेक्षीत निधी याबाबतचे विवरण शासनास पाठविण्यात यावे. जेणेकरुन सन २०१६-१७ च्या कृती आराखड्यात त्यांचा समावेश झाला नसल्यास तो करता येईल असे समितीचे मत आहे.**सबब, अपूर्ण असलेल्या पाणी पुरवठ्याच्या योजना पुर्ण करण्यासंदर्भात अथवा अशा योजना पुर्ण करणे शक्य नसल्यास त्याऐवजी दुसज्या नवीन योजना घेऊन त्यासंदर्भात निधी उपलब्ध करुन देण्याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा तसेच याप्रकरणी समितीस विदित केल्याप्रकरणी सन २०१६-१७ च्या कृती आराखड्याची अंमलबजावणी करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस पाठविण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

प्रकरण एकोणीस

## जिल्हा परिषद, औरंगाबाद (प्रशासन)

### मौजे. फरशी किणवली, ता.फुलंब्री येथील कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधण्यास झालेल्या विलंबाबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १५ ते १७ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत औरंगाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली. दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ रोजी समितीने फरशी किणवली येथील कोल्हापूर बंधाऱ्याला भेट दिली व बंधाऱ्याची पाहणी केली. यावेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबी व समितीने व्यक्त केलेले अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत :-

- सदर बंधाऱ्याचे काम ८ वर्षापूर्वी सुरु करण्यात आल्याची माहिती उप अभियंता यांनी समितीला दिली.
- काम पूर्ण होण्याचा कालावधी ९ महिने होता.
- बंधाऱ्याचे काम अपूर्णावस्थेत आहे.
- तेथे उपस्थित असलेल्या गावकऱ्यांनी समितीला अशी माहिती दिली की, सदर काम पूर्ण करावे, अशा प्रकारची विनंती गावकऱ्यांनी वारंवार केली असून जिल्हा परिषदेकडे सातत्याने पाठपुरावाही केलेला आहे.
- बंधाऱ्याच्या बाजूला असलेल्या नदीमध्ये पूर्ण क्षमतेने पाणी आहे. तथापि, बंधाज्याचे बांधकाम

झाले नसल्यामुळे बंधाऱ्याव्दारे पाणीसाठा झालेला नाही.

- बंधाऱ्याचे काम अपूर्णावस्थेत असल्यामुळे आजुबाजूची शेतजमीन खचली असून मोठ्या प्रमाणावर शेतजमिनीची धूप होत आहे.
- बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे आहे, काम अपूर्णावस्थेत आहे, त्यामुळे शासनाने या कामावर केलेला खर्च वाया गेला आहे.
- याच भागातील अन्य ४ बंधाऱ्यांचीही स्थिती अशीच असल्याची माहिती गावकऱ्यांनी समितीला दिली.

भेटीअंती समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे या कामासंदर्भात तीव्र नापसंती व्यक्त केली व या कामाबाबतची सर्व कागदपत्रे आणि वस्तुनिष्ठ माहिती आढावा बैठकीत सादर करण्याचे निदेश त्यांना दिले. त्याचप्रमाणे समितीने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना अशाही सूचना दिल्या की, या संपूर्ण कामाबाबत मूळ अंदाजपत्रक, आतापर्यंत झालेला खर्च, काम किती पूर्ण झाले, याबाबतची टक्केवारी, अपूर्ण काम, त्यासाठी लागणारा निधी, निधीची उपलब्धता याबाबतची सखोल चौकशी करावी, अनियमितता आढळून आल्यास संबंधितांना निलंबित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सादर करावा असे समितीने निदेश दिले.

**यासंदर्भात समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

(१) समितीने कोल्हापुर पध्दतीचा बंधारा, मौजे फरशी-किणवली ता फुलंब्री, जि.औरंगाबाद या कामास भेट दिली असता ९ महिने कालावधीत पूर्ण करावयाचे काम मागील ८ वर्षांपासून सुरु असणे इत्यादी गंभीर बाबी समितीच्या निदर्शनास आल्या असता प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश समितीने दिले आहेत. त्यानुसार चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले.

(२) जलसंधारण विभागामार्फत राज्यात अशा प्रकारे अपूर्ण अवस्थेत, अर्धवट काम सोडण्यात आलेले दिर्घकाळापासून प्रलंबित असणाऱ्या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांच्या कामांचा आढावा शासनाने घेतला आहे काय, अशा योजना विशेष मोहिम राबवून त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाची भुमिका काय आहे.

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

सदर कामाची चौकशी करण्यासाठी एक उप अभियंता व तीन शाखा अभियंता यांची नेमणूक करण्यात येवुन त्यांनी चौकशी अहवाल पुढीलप्रमाणे सादर केला आहे.

(१) समितीने कोल्हापूर पध्दतीचा बंधारा, मौजे फरशी-किणवली, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद या कामास भेट दिली त्याबाबत सविस्तर चौकशी अहवाल खालीलप्रमाणे सादर. मौजे फरशी- किणवलीचे महसुली नाव महालकिन्होळा असल्यामुळे गावातील सर्व शासकीय कामांना महालकिन्होळा या नावाने मंजुरी देण्यात येते. मौजे महालकिन्होळा येथे एकूण चार कोल्हापूर पध्दतीचे बंधारे मंजूर आहे. त्यापैकी दोन कोल्हापूर पध्दतीचे बंधारे कोपब राज्यक्षेत्र या लेखार्शिषात व दोन कोपब राष्ट्रीय कृषी विकास योजने अतंर्गत मंजूर आहे.

**(अ) कोपब महालकिन्होळा क्र.१ (कोप राज्यक्षेत्र)** :- सदर कोपबला मुळ प्रशासकीय मान्यता जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती दिनांक १६-४-२००८ रोजी ठराव क्र. ५० नुसार रु.२४.९९ लक्षला दिलेला आहे. अति मुख्य अधिकारी जिल्हा परिषद यांनी प्रशासकीय मान्यता आदेश दि.१०-११-२०११ ला निर्गमित केलेले आहे. सदर कामास मुळ तांत्रिक मान्यता रु. २२७१०००/- ला क्र.०५, दि. १२-१०-२००७ ला कार्यकारी अभियंता सिंचन जिल्हा परिषद यांनी दिलेली आहे. काम पुर्ण करण्याचा कालावधी १२ महिने होता प्रत्यक्ष काम प्रगतीत असतांना मा. कार्यकारी अभियंता सिंचन जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी दि. ८-१२-२०१२ ला साईट पाहणी करुन निरिक्षण टिप्पणीत कोपब महालकिल्होळा क्र.०१ मंजूर अंदाजपत्रकापेक्षा जास्त खोल खोदकाम केल्यावरही पक्का खडक न लागल्यामुळे पक्का खडकात०.६० मी. खोलपर्यंत खोदकाम करण्याचे नमुद केले त्यामुळे कामाच्या परिमाणात वाढ झाल्यामुळे सुधारित अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती यांनी दि. १३-०७-२०१२ ला ठराव नुसार रुपये ४९.५० लक्ष यास देण्यात आलेली असुन तांत्रिक मान्यता सहाय्यक अधीक्षक अभियंता लघु पाटबांधारे (स्थानिकस्तर) मंडळ यांनी दि.१०-८-२०१२ ला क्र.५७२ नुसार ४८,५२,५००/- ला दिलेली आहे.

सदर कामाचे दोन धावते देयक देण्यात आलेले आहे.सदर काम २६-०५-२०१२ ला भौतिकदृष्ट्या पुर्ण झालेली कामे व मोजमाप पुस्तीकेत नोंदविलेली मोजमापे सुसंगत आहेत. प्रत्यक्ष चौकशीच्या वेळी सदर स्थापत्य काम भौतिकदृष्ट्या पुर्ण होते. दि. १७ व १८ सप्टेंबर २०१५ ला अतिवृष्टीमुळे (१०५ मी.मी.) कोपबंचे दोन्ही तिराचे बाजू भराव वाहून गेले होते ते लोकसमुहवर्गातून पुर्ण करुन घेण्यात आले आहे. सदर कामास तांत्रिक मान्यता एकच असुन कामाचे दोन भाग करुन निविदा करण्यात आलेली आहे. कामाचे भाग पाडण्यासाठी मा. अधीक्षक अभियंता लघु पाटबंधारे स्थानिकस्तर मंडळ, औरंगाबाद यांनी दिनांक ०५ नोव्हेबर २००७ ला परवानगी दिलेली आहे. या कामापोटी रुपये ४८.३१ लक्ष खर्च झालेला आहे. कामाच्या भेटीच्या वेळी लोखंडी दरवाजे नव्हते. तथापि दरवाजेचे रक्कमेचे देयक अदा करण्यात आलेले आहे. या कामा संबंधित प्रभारी उप अभियंता निलंबीत असून त्याची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

**(ब) कोपब महालकिन्होळा क्र-२ (कोपब राजक्षेत्र)** :- सादर कोपबला मुळ प्रशासकिय मान्यता जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती औरंगाबाद यानी दि.१६-०४-२००८ रोजी ठराव क्र.५० नुसार रू.२४.९७ लाख ला देण्यात आली आहे. मुळ तांत्रिक मान्यता कार्यकारी अभियंता, सिंचन, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी क्र.०५ दि.१२-१०-२००७ अन्वये रू.२२७१००/-ला दिलेली आहे.कामाचे आदेश कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद यांनी यमुनाबाई म.स.सं.ला क्र.१०८, दि.१२-०३-२०१२ अन्वये रू.१०,३१,८११/- देण्यात आले आहे.काम पुर्ण करण्याचा कालावधी १२ महिने होता.कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद सिंचन यांनी दि.०८-१२-२०१२ ला दौ-यात सदर कमाची पाहणी करून मंजूर अंदाजपत्रकापेक्षा जास्त खोल खोदकाम केल्यावरही पक्का खडक न लागल्यामुळे पक्का खडकात ०.६० मि. खोली पर्यंत खोदकाम करण्याचे निरिक्षण टिप्पणीत नमुद केले त्यामुळे वाढलेल्या परिमाणा मुळे मंजूर कामाच्या किंमतीत वाढ झाली व त्यानुसार सुधारीत अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता जलव्यवस्थापन पाणीपुरवठा व स्वच्छता समिती यांनी दि.१३-०७-२०१२ ला ठराव १२ नुसार रू.४९.५० लक्ष ला मान्यता दिली आहे. तांत्रिक मान्यता सहाय्यक अधीक्षक अभियंता लघु पाटबंधारे (स्थानिकस्तर) मंडळ औरंगाबाद यांनी दि.१०-०८-२०१२ ला क्र.५७२ नुसार रू. ४८,५२,५००/-ला दिलेला आहे.

भौतिकदृष्ट्या बंधा-याचे काम पुर्ण झालेले असून प्रत्यक्ष कांमाची मोजमापे पुस्तिकेत नोंदविलेल्या मोजमापाशी सुसंगत आहे. सदर कामास आदेश दि.१२-०३-२०१२ ला दिले आहे व काम भौतिकदृष्ट्या मे २०१२ ला पुर्ण झालेले आहे. भौतिकदृष्ट्या स्लॅब सोडून पुर्ण झालेले आहे.दि.१७ व १८ सप्टेंबर, २०१५ ला अतिवृष्टीमुळे (१०५ मी.मी.) कोपबंचे दोन्ही तिराचे बाजूभराव वाहून गेले होते ते लोकसहभागातून पुर्ण करून घेण्यात आले आहे. सदर कामास तांत्रिक मान्यता एकच असून कामांचे दोन भाग करून निविदाकरण्यात आलेली आहे.कामाचे भाग पाडण्यासाठी मा. अधीक्षक अभियंता लघु पाटबंधारे स्थानिकस्तर मंडळ,औरंगाबाद यांनी दिनांक ०५ नोव्हेंबर, २००७ ला परवानगी दिलेली आहे. या कामा पोटी रूपये ४७.८९ लाख खर्च झालेला आहे. कामाच्या भेटीच्या वेळी लोखंडी दरवाजे नव्हते. तथापि दरवाजेचे रक्कमेचे देयक अदा करण्यात आलेले आहे.या कामा संबधीत प्रभारी उप अभियंता निलंबीत असून त्यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

**(क) कोपबं महालकिन्होळा क्र.१ (राष्ट्रीय कृषी विकास योजना):-** सदर कोपबंला प्रशासकिय मान्यता जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती दि.०५-०७-२०१२ रोजी ठराव क्र. ६ (ब) नुसार रू.२४.९९ लक्ष ला दिलेली आहे. तांत्रिक मान्यता कार्यकारी अभियंता सिंचन जिल्हा परिषद यांनी क्र.११६ दि.२५-०७-२०११ रोजी रू.२२६९८००/-ला दिलेली आहे.सदर कामास कामाचे आदेश कार्यकारी अभियंता सिंचन यांनी क्र. १४०, दि.१४-०३-२०१२ अन्वये व १३९८७५७/-ला दिलेला आहे.काम पुर्ण करण्याचा कालावधी १२ महिने होता. सदर काम कामाचे एक धावते देयके देण्यात आलेले असून सदर को.प.बंधा-याचे स्थापत्य काम पुर्ण असून लोखंडी दरवाजे बसविणे बाकी आहे. या कामाची मा.आयुक्त विभागीय कार्यालय औरंगाबाद यांच्या मार्फत चौकशी सुरू आहे.सदर कामांवर रूपये १९.८२ लक्ष खर्च झालेला आहे. या कामा संबधीत प्रभारी उप अभियंता निलंबीत असून त्यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

**(ड) कोपबं महालकिन्होळा क्र.१ (राष्ट्रीय कृषी विकास योजना)** :- सदर कोपबला प्रशासकीय मान्यता जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीने दि.०५-०७-२०१२ रोजी ठराव क्र.६ (ब) नुसार रू.२४.९७ लक्ष ला दिलेली आहे.तांत्रिक मान्यता कार्यकारी अभियंता सिंचन जिल्हा परिषद यांनी दि.२५-०७-२०११ रोजी रू.२४७४६००/-ला दिलेली आहे.सदर कामास कामाचे आदेश कार्यकारी अभियंता सिंचन यांनी क्र.१४१ दि.१४-०३-२०१२ अन्वये रू.१४५८४२५/- ला दिलेले आहे.काम पुर्ण करण्याचा कालावधी १२ महिने होता. सदर काम कामाचे एक धावते देयक देण्यात आलेले असून सदर को.प.बंधा-याचे स्थापत्य काम पुर्ण असून लोखंडी दरवाजे बसविणे बाकी आहे.या कामाची मा.आयुक्त विभागीय कार्यालय औरंगाबाद यांच्या मार्फत चौकशी सुरू आहे.सदर कामावर रूपये २०.२६लक्ष खर्च झाला आहे.या कामा संबधीत प्रभारी उप अभियंता निलंबीत असून त्यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

**गोषवारा**

| अ.क्र | कामाचे नांव | लेखाशिर्ष | प्रशासकीय मायता रक्कम लक्षात | झालेला खर्च | कामाची सद्यास्थिती |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | महाकिन्होळा क्र.-१ | कोपब राजक्षेत्र | ४९.५० | ४८.३१ | भौतिकदृष्ट्या काम पुर्ण दरवाजे उपलब्ध नाही. |
| २ | महाकिन्होळा क्र.- २ | कोपब राजक्षेत्र | ४९.५० | ४७.८९ | भौतिकदृष्ट्या काम पुर्ण दरवाजे उपलब्ध नाही. |
| ३ | महाकिन्होळा क्र.- २ | रा.कृ.वि. यो | २४.९९ | १९.८२ | भौतिकदृष्ट्या काम पुर्ण दरवाजेउपलब्ध नाही. |
| ४ | महाकिन्होळा क्र.- २ | रा.कृ.वि. यो | २४.९७ | २०.२६ | भौतिकदृष्ट्या काम पुर्ण दरवाजेउपलब्ध नाही. |

**समितीस ग्रामविकास विभागाकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

(१) किणवली (महालकिन्होळ) येथील चार को.प.बंधा-या पैकी राज्य क्षेत्रातील दोन बंधारे भौतिकदृष्टया लोखंडी दरवाज्याचे काम वगळता पुर्ण करण्यात आले आहेत.तसेच सदर कामास जबाबदार असणा-या संबधीतांवर कारवाईच्या प्रस्तावाबाबत मुख्यकार्यकारी अधिकारी,जि.प. औरंगाबाद यांना दिनांक १६-०५-२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच रा.कृ.वि.यो. अंतर्गत बांधलेल्या दोन को.प.बंधा-या बाबत विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद कडून चौकशी सुरू आहे.

(२) या मुद्याच्या अनुषंगाने मुख्यअभियंता, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम, नागपूर यांना अपुर्ण अवस्थेतील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-याची कामे तसेच इतर ही जलसंधारणांच्या कामांचा आढावा घेवून सदर अपुर्ण बांधकामे प्राधान्याने पुर्ण करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याच प्रमाणे राज्यात राबविण्यात येत असलेल्या जलयुक्त शिवार अभियांनातर्गत देखील अपुर्ण कामे पुर्ण करणे/कामांची दुरूस्ती करणे या कामांना प्राधान्य देण्यात येत असून कमी खर्चामध्ये जास्त सिंचनाच्या सुविधा उपलब्ध होत असलेल्या कामांना प्राधान्य देण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,समितीने कोल्हापुर पध्दतीचा बंधारा, मौजे फरशी-किणवली, ता फुलंब्री, जि.औरंगाबाद या कामास भेट दिली असता ९ महिने कालावधीत पूर्ण करावयाचे काम मागील ८ वर्षांपासून सुरु असणे इत्यादी गंभीर बाबी समितीच्या निदर्शनास आल्या असता प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश समितीने दिले आहेत. त्यानुसार चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले, जलसंधारण विभागामार्फत राज्यात अशा प्रकारे अपूर्ण अवस्थेत, अर्धवट काम सोडण्यात आलेले दिर्घकाळापासून प्रलंबित असणाज्या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांच्या कामांचा आढावा शासनाने घेतला आहे काय, अशा योजना विशेष मोहिम राबवून त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाची भुमिका काय आहे. त्यावर विभागीय सचिवांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नांदेड यांचे स्तरावर कार्यवाही करण्यात आली असल्याचे समितीस नमुद केले,याबाबत समितीने समाधान व्यक्त केले.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक १५ ते १७ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत औरंगाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीलामौजे. फरशी-किणवली, ता.फुलंब्री येथील कोल्हापूर पध्दतीचा बंधाज्याच्या कामास तब्बल आठ वर्षांचा कालावधी उलटूनही अद्याप सदरहू काम पूर्ण झाले नसल्याबाबत समितीने यासंदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीदरम्यान मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन संबंधित प्रभारी उप अभियंता निलंबीत असून त्यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली असल्याप्रकरणी समिती समाधान व्यक्त करते.

शासनाने मुख्यअभियंता, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम, नागपूर यांना अपुर्ण अवस्थेतील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-याची कामे तसेच इतर ही जलसंधारणांच्या कामांचा आढावा घेवून सदर अपुर्ण बांधकामे प्राध्यान्याने पुर्ण करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याच प्रमाणे राज्यात राबविण्यात येत असलेल्या जलयुक्त शिवार अभियांनातर्गत देखील अपुर्ण कामे पुर्ण करणे/कामांची दुरूस्ती करणे या कामांना प्राधान्य देण्यात येत असून कमी खर्चामध्ये जास्त सिंचनाच्या सुविधा उपलब्ध होत असलेल्या कामांना प्राधान्य देण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहेत्याबाबत समिती समाधान व्यक्त करते. **कृषी क्षेत्रात लघुसिंचन प्रकल्पांचे महत्व लक्षात घेता अशा प्रकारे कोल्हापूर पध्दतीचे बंधारे अनेक वर्ष अपूर्ण अवस्थेत असणे, बंधाऱ्याच्या दोन्ही तीरांवरील भराव वाहून जाणे, बंधाऱ्याचे लोखंडी दरवाजे चोरीस जाणे, बंधाज्यात मोठ्या प्रमाणात गाळ साचून त्याची सिंचन क्षमता कमी होणे इत्यादी प्रकार रोखण्याकरीता शासनाने कालबध्द कार्यक्रम हाती घेऊन असे प्रकल्प पूर्ण करणे, त्यांची दुरुस्ती करणे, लोखंडी दरवाज्यांच्या चोरीला आळा घालणे, बंधाऱ्यातील गाळ काढणे इत्यादी संदर्भात विभागाने ठोस उपाययोजना कराव्यात. त्याचप्रमाणे समितीला पाठविलेल्या माहितीत ज्या प्रकरणात चौकशी सुरु आहे त्या सर्व प्रकरणाची चौकशी कालबध्दरित्या पूर्ण करुन दोषींवर नियमानुसार कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण वीस

## जिल्हा परिषद, औरंगाबाद (प्रशासन)

### ग्रामसेवक आदी कर्मचाऱ्यांची बायोमेट्रीक यंत्राद्वारे उपस्थिती नोंदविण्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १५ ते १७ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत औरंगाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की,वैयक्तिक लाभाच्या योजनांबाबतची माहिती आपण लोकांपर्यंत कशी पोहोचविता या प्रश्नावर अधिक्षक, शालेय पोषण आहार यांनी समितीस असे विदित केले की, ग्रामसेवकांच्या बैठकीत जिल्हा परिषद या बाबतची माहिती सर्व ग्रामसेवकांना देते. इतर अधिकारीही त्या बैठकीत असतात. त्यांनी गावापर्यंत व लोकांपर्यंत माहिती पोहोचवावी, असे अपेक्षित आहे. समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, ग्रामसभेला आता फार महत्व आहे. ग्रामसभेमध्ये सर्व योजनांची माहिती दिली गेली पाहिजे. परंतु, असा अनुभव आहे की, ग्राम सभेमध्ये कोणतीही माहिती दिली जात नाही. योजनांची माहिती ग्रामसभेत देणे बंधनकारक केले पाहिजे. ग्रामसेवक ग्रामपंचायतीमध्ये उपस्थित रहात नाहीत किंवा त्यांच्याकडे दोन ग्रामपंचायतींचा कार्यभार असतो. त्यामुळे त्यांच्यासाठी बायोमेट्रिक पध्दत सुरु केली पाहिजे यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी समितीस अशी माहिती दिली की, काही ग्रामपंचायतीमध्ये बायोमेट्रिक मशिन्स बसविण्यात आली आहेत. यावर समितीने समाधान व्यक्त करुन औरंगाबाद जिल्हा परिषदेने काही ग्रामपंचायतीमध्ये बायोमेट्रिक पध्दत सुरु केली असून अशा प्रकारे संपूर्ण राज्यात बायोमेट्रीक मशिनवर कर्मचाऱ्यांची उपस्थिती नोंदविण्याबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचा निर्णय घेतला.

**यासंदर्भात समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

समितीने जिल्ह्यातील काही ग्रामपंचायतींना भेट दिली असता, ग्रामसेवक ग्रामपंचायतीमध्ये उपस्थित राहत नसल्याच्या तक्रारी समितीला प्राप्त झाल्या, ग्रामसेवकांना उपस्थिती बंधनकारक करण्याकरिता काही ग्रामपंचायतींमध्ये बायोमेट्रीक मशीन बसविण्यात आल्याची माहिती समितीस देण्यात आली. या बायोमेट्रिक मशीन लावण्याच्या योजनेचे फलीत लक्षात घेऊन संपूर्ण राज्यात सदरहू योजना राबविण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

औरंगाबाद जिल्ह्यातील मौजे हतनुर ता.कन्नड व पांगरा ता.पैठण येथे बायोमेट्रिक मशीन बसविण्यात आलेले असून सदरील मशीनचा उपयोग उपस्थिती नोंदविण्यासाठी सुयोग्य प्रकारे होत आहे. सदरहू ग्रामपंचायतीचे सरपंच यांचे अहवालावरुन असे दिसून आले आहे की, बायोमेट्रिक मशीन बसविण्यात आलेल्या ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत ग्रामस्तरावरील कर्मचारी वेळेवर उपस्थित होत असून कार्यालयीन वेळेत कार्यालयांमध्ये उपस्थित वाढ झालेली आहे. त्यामुळे नागरीकांची कामे वेळेवर होण्यास मदत होत आहे.

आर्थिकदृष्ट्या सक्षम बायोमेट्रिक मशीन बसविल्यास ग्रामपंचायत अंतर्गत शासकीय कर्मचा-यांनी बायोमेट्रिक पध्दतीने हजेरी नोंदविणे बंधनकारक करण्याकरिता जिल्हा परिषद पातळीवरुन परिपत्रक दि.२३ सप्टेंबर, २०१५ निर्गमीत करण्यात आले आहे.

**समितीस ग्रामविकास विभागाकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

मौजे हतनूर ता.कन्नड व मौजे पांगरा ता.पैठण जि. औरंगाबाद येथील ग्रामपंचायती मध्ये ग्रामपंचायतीच्या स्वखर्चाने बायोमेट्रिक मशीन बसविण्यात आलेल्या आहेत. तसेच दि. २३.९.२०१५ च्या पत्रान्वये कर्मचा-यांनी बायोमॅट्रिक मशीनवर उपस्थिती नोंदविण्याबाबत जिल्हा प्रशासनामार्फत कळविण्यात आले आहे.

ग्रामसेवकांचा कामाचे स्वरुप लक्षात घेता औरंगाबाद जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना बसविण्यात बायोमॅट्रिक मशीनच्या वापराची परिणामकारकता अथवा उपयुक्तता तसेच बायोमॅट्रिक मशीन खरेदीसाठी व विनियोगासाठी लागणारा आवर्ती व अनावर्ती निधी व त्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध असणारे आर्थिक स्त्रोत या बाबींचा सर्वकष अहवाल विभागीय आयुक्त यांच्याकडून मागविण्यात येईल. त्यानंतर सर्व ग्रामपंचायती मध्ये बायोमॅट्रिक मशीन बसविण्याबाबत शासन स्तरावरुन निर्णय घेण्यात येईल.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १४ मे, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की समितीने जिल्ह्यातील काही ग्रामपंचायतींना भेट दिली असता, ग्रामसेवक ग्रामपंचायतींमध्ये उपस्थित राहत नसल्याच्या तक्रारी समितीला प्राप्त झाल्या. ग्रामसेवकांना उपस्थिती बंधनकारक करण्याकरिता काही ग्रामपंचायतींमध्ये बायोमॅट्रिक मशीन बसविण्यात आल्याची माहिती समितीस देण्यात आली. या बायोमेट्रिक मशीन लावण्याच्या योजनेचे फलीत लक्षात घेऊन संपूर्ण राज्यात सदरहू योजना राबविण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे, यावर प्रधान सचिव, ग्रामविकास यांनी समितीस विदित केले की, सर्वसाधारणपणे अनेक वेळा एका ग्रामसेवकाकडे दोन ते तीन गावांचा अतिरिक्त कारभार दिलेला असतो. त्यामुळे ग्रामसेवकांना सकाळी दहा ते पाच या वेळेमध्ये कार्यालयात उपस्थित राहणे शक्य होत नाही. याकरिता आयुक्त यांच्याकडून अभिप्राय मागविलेले आहेत. अभिप्राय आल्यानंतर याचे कॉस्टिंग केले जाईल. प्रत्येक गावामध्ये बायोमॅट्रिक केल्यास त्याचा खर्च प्रचंड होणार आहे. राईट टू सर्व्हिसअंतर्गत तेरा प्रकारच्या सेवा एकाच ठिकाणी देण्याची हमी शासनाने कायद्यांतर्गत दिलेली आहे. ग्रामसेवकांवर बायोमॅट्रिकच्या माध्यमातून आऊटपूट बेस्ड नियंत्रण ठेवणे व्यवहार्य नाही. यावर समितीने आणखी अशी विचारणा केली की, सामाजिक जीवनामध्ये काम करीत असताना ब-याच वेळा असे आढळून येते की, शासकीय यंत्रणेमध्ये केवळ न्यायाधीश सोडले तर इतर लोक जागेवर थांबून काम करीत नाहीत. ग्रामसेवक जागेवर नसल्याच्या तक्रारींकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्यासंबंधी योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे. २० सेवा देण्याचे उत्तरदायित्व सक्तीचे करण्यात आले तर कर्मचाऱ्यांचे व इतर कार्यकारिणीचे जागेवर बसणे आवश्यक होईल. अनेक ठिकाणी अनेक महत्त्वाच्या बाबींचे रेकॉर्डस उपलब्ध नाही. प्रत्येक यंत्रणेतील घटकांवर कामांची जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर उत्तरदायित्व सक्तीचे करणे आवश्यक आहे. त्याशिवाय गांभीर्याने काम करण्याची वृत्ती वाढणार नाही.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेस भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. समितीने जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायती व पंचायत समितींना दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने व प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने समितीने ग्रामसेवक, शिक्षक, तलाठी, कृषी सहाय्यक इत्यादी वर्ग-३ चे कर्मचारी त्यांना नेमून दिलेल्या मुख्यालयी राहत नसल्याचे तसेच कार्यालयीन वेळेत आपापल्या कार्यालयात कामाच्या ठिकाणी उपस्थित राहत नसल्याचे निदर्शनास आले.

औरंगाबाद जिल्हा परिषदेने ग्रामसेवक इत्यादींच्या उपस्थितीची नोंद बायोमेट्रीक यंत्रावर करण्याचा उपक्रम सधन ग्रामपंचायतींद्वारे राबविला आहे. राज्यातील सर्वच ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या सक्षम असतील असे नाही. बायोमेट्रीक उपस्थिती यंत्रणांचा खर्च एकदाच करावयाचा आहे. विद्यमान शासनाने राज्यातील सर्वच ग्रामपंचायतीचे संगणकीकरण करण्याचे काम हाती घेतले आहे. त्यामुळे उपलब्ध असलेल्या संगणकास केवळ उपस्थिती दर्शक यंत्र जोडावयाचे व त्यावर गावातील कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीची नोंद ठेवावयाची आहे. उपस्थिती दर्शक यंत्रावर कार्यालयात उपस्थित होताना व कार्यालय सोडताना अधिकारी व कर्मचाऱ्यांना बंधनकारक केल्याने ग्रामीण भागातील नागरीकांना त्यांच्या नियमित सेवांचा लाभ होऊ शकतो. **यासंदर्भात ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी यथास्थिती तलाठी, कृषी सहाय्यक, विस्तार अधिकारी इत्यादी संबंधित वेगवेगळ्या विभागांचे असले तरी त्यांची उपस्थिती एकाच ठिकाणी बायोमेट्रीक यंत्रावर नोंदविण्यासंदर्भातील त्या त्या गावांतील ग्राम पंचायतीने त्यांच्या आर्थिक क्षमतेच्या व साधन सामुग्रीचा विचार करुन बायोमॅट्रीक संदर्भात निर्णय घ्यावा. ग्रामसेवकांवर एकापेक्षा अनेक गावाच्या ग्रामपंचायतींचा कार्यभार तसेच तो जागेवर बसून काम करीत नसल्याने त्यास बायोमॅट्रीक उपस्थिती अनिवार्य करणे आर्थिकदृष्ट्या तेवढे व्यवहार्य होणार नाही. अलिकडे ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असल्यामुळे सदर निर्णय संबंधित ग्रामपंचायतींवर सोपविण्यात यावा व त्याची सक्ती करण्यात येऊ नये अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण ऐकवीस

# जिल्हा परिषद, औरंगाबाद (प्रशासन)

## ग्रामपंचायत पाटोदा (गंगापूर नेहरी) ता.औरंगाबाद गावाच्या शेजारी असलेल्या खामनदीतील प्रदुषणाबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १५ ते १७ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत औरंगाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली. दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ रोजी समितीने औरंगाबाद तालुक्यातील मौजे.पाटोदा या ग्रामपंचायतीला भेट दिली. भेटीच्या वेळी समितीला या गावाच्या शेजारी असलेल्या खामनदीत औरंगाबाद शहर व परिसरातील औद्योगिक वसाहतीतून मलजल व सांडपाणी कोणत्याही प्रक्रियेविना सोडण्यात आल्यामुळे दुषित झाल्याचे निदर्शनास आले. यासंदर्भात पाणी पुरवठा, उद्योग विभाग तसेच नगर विकास विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्याचा निर्णय समितीने घेतला.

**समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

समितीने ग्रामपंचायत पाटोदा (गंगापूर नेहरी) ता. औरंगाबाद येथे भेट दिली असता गावच्या शेजारी असलेल्या खामनदीत औरंगाबाद महानगरपालिकेकडून मलजल व सांडपाणी कोणत्याही प्रक्रियेविना सोडल्यामुळे तसेच औरंगाबाद परिसरातील (एम.आय.डी.सी.) औद्योगिक वसाहतीमधून मोठ्या प्रमाणावर रसायनयुक्त पाणी कोणत्याही प्रक्रियेविना खामनदीत सोडल्यामुळे खामनदीचे पाणी प्रदुषित होऊन तिच्या पाणलोट क्षेत्रातील सार्वजनिक पाणी पुरवठ्याचे उद्‌भव प्रदुषित झाल्याचे समितीस सांगण्यात आले आहे. प्रस्तुत प्रकरणी खाम नदी प्रदुषणमुक्त करण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना अंमलात आणली आहे?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद औरंगाबाद यांची कार्यवाही :- मा.पंचायत राज समितीने ग्रामपंचायत पाटोदा (गंगापूर नेहरी) ता.औरंगाबाद येथे भेट दिली असता त्यावेळी गावाच्या शेजारी असलेल्या खामनदीत औरंगाबाद महानगरपालिकेकडून मलजल व सांडपाणी कोणत्याही प्रक्रियेविना सोडणे, तसेच औरंगाबाद परिसरातील (एम.आय.डी.सी) औद्योगिक वसाहतीमधून मोठ्या प्रमाणावर रसायनयुक्त पाणी कोणत्याही प्रक्रियेविना खामनदीत सोडण्यात येते. परिणामी खामनदीचे पाणी प्रदुषित होऊन तिच्या पाणलोट क्षेत्रातील सार्वजनिक पाणी पुरवठ्याचे उद्रव प्रदुषित झाल्याचे समितीस सांगण्यात आलेली वस्तुस्थिती सत्य आहे. सदरील वस्तुस्थितीच्या अनुषंगाने ग्रामपंचायत पाटोदा (गंगापूर नेहरी), औरंगाबाद यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेण्यात आली. त्यांचे पत्र दि. ०५/०५/२०१६ अन्वये कळविले आहे की, खामनदीचे पाणी प्रदुषित होऊन पाणलोट क्षेत्रातील सार्वजनिक पाणी पुरवठ्याचे उद्‌भव प्रदुषित झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे ग्रामपंचायत पाटोदा (गंगापूर नेहरी), ता.औरंगाबाद यांचेकडून महानगरपालिका, औरंगाबाद यांना मलजल व सांडपाणी प्रक्रिया करुन सोडणेबाबत तसेच एम.आय.डी.सी. वाळूज यांना रसायनयुक्त पाण्यावर प्रकिया करुन तद्‌नंतरच खाम नदीमध्ये सोडण्यात यावे या आशयाचे पत्र देण्यात आलेले आहे. तसेच सदरील ग्रामपंचायतच्या पत्राच्या अनुषंगाने जिल्हा परिषद औरंगाबाद यांचे स्तरावरुन देखील महानगरपालिका, औरंगाबाद तसेच एम.आय.डी.सी. वाळूज यांना मलजल व सांडपाणी तसेच रसायनयुक्त पाण्यावर प्रक्रिया करुन तद्‌नंतरच खाम नदीमध्ये सोडण्यात यावे याबाबत कार्यालयीन पत्राव्दारे कळविण्यात आलेले आहे.

**समितीस महानगरपालिका, औरंगाबाद यांच्याकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

(१) औरंगाबाद महानगरपालिकेने सन १९८२ अंतर्गत २.०० लक्ष लोकसंख्या विचारात घेऊन मुख्य मलनि:सारण वाहिन्या टाकण्यात आलेल्या होत्या. जनगणना २०११ नुसार शहराची लोकसंख्या ११.६७ लक्ष इतकी असल्याने जुन्या सर्व ठिकाणच्या मलनि:सारण वाहिन्या निकामी (Non functional) झालेल्या आहेत. यामुळे प्रक्रियारहित मलजल हे नदीच्या पात्रातून उघड्याने वाहत आहे.

(२) तसेच शहरामध्ये फक्त ११.५० दशलक्ष लिटर क्षमतेचे दोन मलजल प्रक्रिया केंद्र कार्यान्वित आहे.

(३) उक्त सर्व बाबींचा विचार करुन औरंगाबाद महानगरपालिकेने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे सादर केला होता.

(४) केंद्र शासनाचे शहरी विकास मंत्रालयाचे पत्र क्र/के/१४०११/१५/२०१३-यु-डी-१, दिनांक २४ डिसेंबर, २०१६ च्या ऑफिस मेमोरॅन्डम नुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेच्या रक्कम रुपये ३६५.६९ कोटीच्या प्रकल्प प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे.

(५) प्रकल्प अंतर्गत शहरातील एकूण ६०.०० कि.मी. लांबीपर्यंतच्या मुख्य मलनि:सारण वाहिन्या टाकण्याचे प्रस्तावित आहे. तसेच शहरातील विविध ४ भागात (सुधारित) एकूण २१६.०० द.ल.लि. क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र उभारण्याचे प्रस्तावित आहे.

(६) शहरातील खाम नदीवर एकूण १३.०० कि.मी. लांबीच्या मुख्य मलनि:सारण वाहिन्या टाकण्याचे प्रस्तावित आहे. सदरील प्रकल्पा अंतर्गत खाम नदीवर ४००.०० मी.मी. ते १८००.०० मी.मी. पर्यंतच्या मलनि:सारण वाहिन्या टाकण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्यापैकी सद्यस्थितीत एकूण ८३० कि.मी. लांबीपर्यंतच्या मलनि:सारण वाहिन्याटाकण्याचे पूर्ण झालेले आहे. उर्वरित काम डिसेंबर, २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(७) तसेच खाम नदीवर महानगरपालिकेमार्फत बनेवाडी येथे १६१.०० द.ल.ली.क्षमतेचे (सुधारित) असे एकूण १७१.०० द.ल.ली.क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र बांधण्याचे प्रस्तावित आहे.

(८) सद्यस्थितीत कांचनवाडी मलजल प्रक्रिया केंद्राचे काम ६० टक्के पूर्ण करण्यात आलेले आहे. तसेच बनेवाडी मलजल प्रक्रिया केंद्राच्या संकल्पनेचे काम पूर्ण झालेले आहे.

(९) शहरातील मलनि:सारण प्रकल्प व मलजल प्रक्रिया केंद्र बांधण्याचे काम जुलै, २०१७ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे.

**समितीस मंत्रालयीन विभागाकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

**नगर विकास विभागाचे अभिप्राय :-**

आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी नमूद केलेल्या सदर खुलाशाशी नगर विकास विभाग सहमत आहे.

**उद्योग विभागाचे अभिप्राय :-**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने औरंगाबाद - पुणे महामार्गावर औरंगाबाद पासून सुमारे १० कि.मी. अंतरावर १५१३ हे आर इतक्या क्षेत्रात वाळुंज औद्योगिक क्षेत्र सन १९८२ पासून विकसित केले आहे. सदर औद्योगिक क्षेत्रात खालीलप्रमाणे भूखंड पाडण्यात आले असून त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| औद्योगिक | निवासी | व्यापारी सुविधा व छोटे PAP | एकूण | वाटप केलेले | उत्पादनात असलेले भूखंड | बांधकाम असलेले भूखंड | बंद असलेले | वाटपास उपलब्ध असलेले भुखंड |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १७५९ | ७९५ | ७०९ | ३२६३ | ३२१९ | ३०३२ | ९८ | १२१ | ५३ |

**(१) सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र :**

- सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र (CETP) :- वाळुंज औद्योगिक क्षेत्रामध्ये सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र (CETP) सर्व औद्योगिक संघटनांनी मिळून मे.एसएमएस CETP यांच्यामार्फत बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्वावर बांधले आहे.

- यासाठी मऔविमने सदर सीईटीपीसाठी भूंखड क्र. क्यु-१ आणि क्यु-२ हा १,३३,६५० चौ.मी. नाममात्र दराने (रु.१/ प्रति चौ.मी.) उपलब्ध करुन दिला आहे.

- सीईटीपी उभारण्यासाठी म.औ.वि. महामंडळाच्या धोरणाप्रमाणे २०% रु.३४०.०० लक्ष इतका निधी महामंडळाने उपलब्ध करुन दिला आहे. सध्या सुमारे ३.०० MLD एवढ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येते व नजीकच्या काळामध्ये सदर प्रकल्पाचा वापर १०.०० MLD एवढा होणे अपेक्षीत आहे.

• सदर सांडपाणी प्रक्रिया केंद्राची क्षमता १० MLD असून सदर सांडपाणी प्रक्रिया केंद्र नोव्हेंबर -२००१ पासून कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

• यासाठी मऔविमने प्रथम टप्प्यामध्ये ३१.६० कि.मी. लांबीच्या सांडपाणी वाहिन्या टाकण्यात आल्या असून, आतापर्यंत मोठे व मध्यम कारखाने ज्याचे सांडपाणी मोठ्या प्रमाणात आहे. अशा एकूण ६७ कारखान्यांनी सांडपाणी वाहिनीस जोडणी केली आहे. तसेच दुसऱ्या टप्प्यामधील सांडपाणी व्यवस्थेची सुमारे २२.०० कि.मी. लांबीच्या सांडपाणी वाहिन्या टाकण्यात आल्या आहेत व सांडपाणी जोडणी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या सल्ल्याने सुरु करण्यात आलेली आहे.

• सदर सांडपाणीवर सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये प्रक्रिया करण्यात येते व तेथील प्रक्रियेवर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नियंत्रण आहे.

• रहिवाशी विभागामध्ये घरगुती सांडपाणी वहनासाठी सुमारे २३.०० कि.मी. च्या सांडपाणी वाहिन्या आणि ५.०० MLD चा Sewage Treatment plant बांधण्याचे काम देण्यात आले होते त्यापैकी सांडपाणी वाहिन्याचे सुमारे ७० टक्के काम पूर्ण झाले असून Sewage Treatment plant चे ४० टक्के काम पूर्ण झाले आहे. सदर कंत्राटदाराने काम पूर्ण न केल्यामुळे त्यांच्याकडून काम काढून घेण्यात आले असून, नव्याने निविदा मागविण्यासंबंधीची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

**(२) मऔविमच्या मोकळ्या जागेवर Rain Water Harvesting प्रकल्प राबविण्याबाबत**

वाळुज औद्योगिक क्षेत्रामधील उद्योजकांनी स्वयंस्फुर्तीने वाळुज औद्योगिक क्षेत्राच्या परिसरामधील प्रदुषणाची तीव्रता कमी करण्याचा उद्देशाने औद्योगिक क्षेत्रामधील (Open Spaces) मोकळ्या जागांमध्ये ४० ठिकाणी Rain Water Harvesting Pit तयार करण्यात आले असून, त्यामधून पावसाचे पाणी जमिनीमध्ये झिरपण्याची शक्यता आहे.

**(३) रस्त्याचे कडेने झाडे लावणे :**

वाळुज औद्योगिक क्षेत्रामधील उद्योजकांनी औद्योगिक क्षेत्र Clean आणि Green राहण्यासाठी MECC नावाची ना नफा ना तोटा या तत्वावर एक कंपनी स्थापन केली आहे. सदर कंपनीद्वारे औद्योगिक क्षेत्रातील कचरा/घाण उचलण्याचे काम सुरु आहे.

तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजुने सुशोभिकरण करुन तार कुंपणासह सुमारे १,५०,००० एवढी झाडे लावणे प्रस्तावित असून त्यापैकी आतापर्यंत १०,००० एवढी झाडे लावण्यात आली आहे.

**पर्यावरण विभागाचे अभिप्राय :-**

## खामनदी प्रदुषणाबाबत सविस्तर माहिती

## खामनदीत औरंगाबाद महानगरपालिकेकडून मलजल व सांडपाणी कोणत्याही प्रक्रियाविना सोडण्यात येणेबाबत (दिनांक १६/१०/२०१५ पृष्ठ क्र.सी-२०)

खामनदीचा उगम औरंगाबाद शहरालगत असलेल्या हर्सुल परिसरातून होतो. सदर नदी शहराच्या पश्चिम-दक्षिण भागामधून वाहते. या नदीची एकूण लांबी (उगमापासून ते धरणापर्यंत) अंदाजे ५० कि.मी. आहे. खाम नदीत फक्त पावसाळ्यात पाणी वाहते व त्यानंतर खाम नदीत घरगुती सांडपाणी विसर्जीत होत असते.

औरंगाबाद शहरातून एकंदरीत १०३ दशलक्ष लिटर प्रतिदिन घरगुती सांडपाणी निर्माण होते. औरंगाबाद महानगरपालिकेने ५ व ६.५ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचे घरगुती सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा सलीमअली सरोवर येथे व विमानतळाजवळ बसविलेली आहे. प्रक्रिया केलेले ११.०५ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या सांडपाण्यापैकी प्रक्रियाकृत ०५ दशलक्ष लिटर प्रतिदिन व प्रक्रियाविना ८० दशलक्ष लिटर प्रतिदिन इतके घरगुती सांडपाणी (एकूण ८८ दशलक्ष लिटर प्रतिदिन) खामनदीच्या लाभ क्षेत्रात सोडण्यात येते.

मंडळातर्फे खामनदीवर दोन ठिकाणी होलीक्रॉस शाळा व पातोडा गावा जवळ खाम नदीच्या पाण्याची गुणवत्ता दरमाह तपासली जाते. पृथ:करण अहवालानुसार खाम नदीच्या पाण्याची गुणवत्ता शहरामधून सोडण्यात येत असलेल्या विनाप्रक्रिया घरगुती सांडपाण्यामुळे प्रभावीत (दुषित असल्याचे) झाल्याचे दिसून येते.

सुखना नदीच्या लाभ क्षेत्रात एकूण १५ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतके घरगुती सांडपाणी सोडण्यात येते. (प्रक्रिया केलेले ६.५ दशलक्ष लिटर प्रतिदिन व प्रक्रियाविना ८.५ दशलक्ष लिटर प्रतिदिन) खामनदी शहराची हद्द ओलांडून पूर्व ते दक्षिण दिशेला नगर रोडकडे वाळूज औद्योगिक परिसरातून वाहत ग्रामपंचायत पातोडा या मार्गे वाहत जाते. खाम नदीत सोडण्यात येत असलेल्या घरगुती सांडपाण्याची माहिती खालीलप्रमाणे नमूद आहे :---

| नदीचे नाव | एकूण घरगुती सांडपाणी | उपलब्ध सांडपाणी प्रक्रिया सयंत्र क्षमता | घरगुती सांडपाणी विना प्रक्रिया खाम नदीत सोडण्यात येत असलेली क्षमता | प्रस्तावीत प्रक्रिया सयंत्रणा | घरगुती सांडपाणी प्रक्रिया संयत्राणा पूर्ण होण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| (१) (२) | (३) | (४) | (५) | (६) | |
| खामनदी | ८८ दशलक्ष लिटर प्रति दिवस | ५ दशलक्ष लिटर प्रति दिवस | ८० दशलक्ष प्रति दिवस प्रति दिवस | २१६ दशलक्ष प्रति दिवस | जून-२०१७ |

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या कार्यवाहीबाबत :**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना शहरामधून निघणारे घरगुती सांडपाणी विनाप्रक्रिया नदीत सोडले जात असल्याने व अपुरे प्रक्रिया सयंत्रणा असल्याने जल कायदा, १९७४ अन्वये दि. ०५/०४/२०१३, २६/१२/२०१४, २०/०१/२०१५, ०३/०६/२०१५, ०४/०८/२०१५ व दि.१८/०६/२०१५ रोजी नोटीस बजाविलेली आहे. तसेच मंडळाने आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांना दि. १५/०३/२०१६ अंतर्गत खटला दाखल करण्यासंबंधी नोटीस बजावलेली आहे.

याअनुषंगाने आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी महानगरपालिका क्षेत्रात एकूण ४ ठिकाणी (एकूण क्षमता २१६ दशलक्ष/दिन) घरगुती सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा उभारणीचे काम प्रगतीपथावर चालू असल्याचे कळविले आहे. त्यांची सांडपाणी प्रक्रिया क्षमता अनुक्रमे कांचनवाडी-१६१ एमएलडी, पडेगांव-१० एमएलडी व बनेवाडी-१० एमएलडी इतकी असून प्रक्रिया केलेले सांडपाणी खाम नदीच्या लाभ क्षेत्रात सोडण्याचे प्रस्तावित आहे. तसेच या प्रकल्पांचे काम बनेवाडी व्यतिरिक्त प्रकल्प जून-२०१७ पर्यंत पूर्ण होणार असल्याचे दि.०४/०२/२०१६ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे.

तसेच झाल्टा-येथील घरगुती सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणेची क्षमता ३५ एमएलडी इतकी असून प्रक्रिया केलेले सांडपाणी सुखना नदीच्या लाभ क्षेत्रात सोडण्याचे प्रस्तावित आहे. एकूण प्रकल्पाचे पाईप लाईन टाकण्याचे व सयंत्रणा उभारण्याचे काम ८५ टक्के पूर्ण झाले असून ते माहे डिसेंबर, २०१६ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असल्याचे पत्राद्वारे कळविले आहे.

**औरंगाबाद परिसरातील (एमआयडीसी) औद्योगिक वसाहतीमधून मोठ्या प्रमाणावर रसायनयुक्त पाणी कोणत्याही प्रक्रियाविना खामनदीत सोडण्यात येणेबाबत.**

**(दिनांक १६/१०/२०१५ पृष्ठ क्र.सी-२०)**

खाम नदी शहराचा परिसर ओलांडून पश्चिम ते दक्षिण दिशेला वाळूज औद्योगिक परिसराजवळून खाम नदी वाहते. वाळूज औद्योगिक परिसरात एकूण १२० उद्योग जल प्रदूषण निर्माण करण्याऱ्या श्रेणीत मोडतात. या १२० उद्योगामधून अंदाजे ४.० ते ४.५० दशलक्ष लिटर औद्योगिक सांडपाणी निर्माण होते. वाळूज परिसरातील उद्योगामधून निर्माण होणारे औद्योगिक सांडपाणी भूमिगत पाईपलाईन व काही ठिकाणी टँकरद्वारे सामूहीक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेत पुढील प्रक्रिया करण्यासाठी पाठविण्यात येते.

वाळूज सामुहीक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा माहे, जुलै-२०११ पासून कार्यान्वीत आहे. या सयंत्रणाकडे ५ दशलक्ष घनलिटर प्रतिदिवस क्षमतेचे दोन संच आहेत. एकूण प्रक्रिया क्षमता १० दशलक्ष घनलिटर प्रतिदिवस आहे. सद्य:स्थितीत वाळूज औद्योगिक सांडपाणी सयंत्रणेमध्ये ३.५० ते ४.० दशलक्ष लिटर प्रतिदिवस सांडपाण्याची प्रक्रिया करण्यात येते व प्रक्रियाकृत सांडपाणी ४.० कि.मी. लांब आरसीसी पाईपद्वारे खाम नदीत सोडण्यात येते. मंडळातर्फे सामुहीक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेच्या गुणवत्तेची तपासणी आठवड्यातून एकदा करण्यात येते व सामुहीक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणाचे पृथ:करण अहवाल मंडळाच्या संकेत स्थळावर जनतेच्या माहितीकरीता प्रदर्शित करण्यात येते. सामुहीक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणाचा पृथ:करण अहवालानुसार प्रक्रियाकृत सांडपाण्याची गुणवत्ता मंडळाच्या विहीत मर्यादेत म्हणजे BOD चे प्रमाण ३० मिलीग्रॅम प्रतिलिटर, COD चे प्रमाण २५० मिलीग्रॅम प्रतिलीटर व Ph चे प्रमाण ५.५ ते ९.० च्या अधीन आढळून येते. मंडळामार्फत माहे एप्रिल-२०१५ ते ३१ मार्च २०१६ या एका वर्षाच्या कालावधीत तपासलेल्या प्रक्रियाकृत सांडपाण्याची गुणवत्तेची आकडेवारी Ph-७.९३, BOD-२७.७३ मिलीग्रॅम प्रतिलीटर व COD-१६८.६५ मिलीग्रॅम प्रतिलीटर आढळले आहे.

वाळूज औद्योगिक परिसरातील भुर्गभागातील पाण्याची गुणवत्ता (दूषित) प्रभावीत झाल्याने मा.राष्ट्रीय हरित लवाद, पुणे येथे श्री. रघुनाथ लोहकरे विरुध्द महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे प्रकरण न्यायप्रविष्ट असून या अनुषंगाने मा.राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांच्या निर्देशानुसार वाळूज परिसरातील भुर्गभागातील पाण्याची गुणवत्ता पुर्ववत करण्याकरीता महाराजा सयाजीराव गायकवाड बडोदा युनिर्व्हेसिटी, गुजरात यांच्या मार्फत कृती आराखडा राबविण्यात येत आहे. वाळूज औद्योगिक परिसरातील भुगर्भातील पाण्याची गुणवत्ता पुर्ववत करण्याकरीता रु.१९.१५ कोटी खर्च दर्शविलेला आहे. सदर खर्च जल प्रदूषणकारी उद्योगाकडून वर्गणीद्वारे वसुल करण्याचे निर्देश मा.राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिलेले आहे व मंडळामार्फत सदर खर्च वसुली बाबत दि.०२/०५/२०१६ रोजी मा.राष्ट्रीय हरित लवाद, पुणे येथे शपथपत्र सादर करण्यात आलेले आहे.

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या कार्यवाहीबाबत :-**

मंडळाने वाळूज औद्योगिक वसाहतीत अस्तित्वात असलेल्या जल प्रदूषण उद्योगावर मागील दोन वर्षापासून म्हणजेच सन २०१४ पासून एकूण १३ उद्योगावर कडक कारवाई करत जल प्रदूषणकारी उद्योग बंद करण्याचे निर्देश दिलेले आहेत. मंडळाने केलेल्या कारवाईचा तक्ता खालीलप्रमाणे आहे :----

**मंडळाने वाळूज येथील जल प्रदूषणकारी उद्योगाविरुध्द केलेल्या कार्यवाहीचा तक्ता.----**

| अ.क्र. | उद्योगाचे नाव व पत्ता | उद्योग बंद करण्याची तारीख | सद्य:स्थिती |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (१) | मे.आकार टूल्स लि., प्लॉट नं. ई-५, एम.आय.डी.सी. वाळूज, औरंगाबाद | १३/०५/२०१४ | कारखान्याने सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा अद्यावत केलेली असून सामूहिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणामध्ये पुढील प्रक्रियाकरीता सांडपाणी पाठविण्यात येत आहे. |
| (२) | मे.क्वॉलिटी वायर प्रॉडक्टस, गट नं. ३४/३६, वाळूज परिसर, औरंगाबाद | २२/०५/२०१४ | कारखान्याने सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा अद्यावत केलेली असून सामूहिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणामध्ये पुढील प्रक्रियाकरीता सांडपाणी पाठविण्यात येत आहे |
| (३) | मे.इंडूरन्स टेक्नालॉजीस प्रा.लि., प्लॉट नं. के-१२०, एम. आय. डी.सी. वाळूज, औरंगाबाद | २८/०७/२०१४ | कारखान्याने सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा अद्यावत केलेली असून सामूहिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणामध्ये पुढील प्रक्रियाकरीता सांडपाणी पाठविण्यात येत आहे |

**कार्यवाहीचा तक्ता.----**चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| (४) | मे.मिडास केअर फार्मासिटूकल्स प्रा. लि., प्लॉट नं. बी-१६, एम. आय. डी.सी. वाळूज, औरंगाबाद | २८/०७/२०१४ | कारखान्याने सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा अद्यावत केलेली असून सामूहिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणामध्ये पुढील प्रक्रियाकरीता सांडपाणी पाठविण्यात येत आहे |
| (५) | मे.हॉस्पीरा हेल्थकेअर प्रा.लि., गट नं. ३६, प्लॉट नं.९, एम.आय.डी.सी., वाळूज, औरंगाबाद | २२/०७/२०१५ | कारखान्याने सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा अद्यावत केलेली असून सामूहिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणामध्ये पुढील प्रक्रियाकरीता सांडपाणी पाठविण्यात येत आहे |
| (६) | मे.इंडूरन्स टेक्नालॉजीस प्रा.लि., प्लॉट नं. के-२२८/२२९, एम. आय. डी.सी. वाळूज, औरंगाबाद | २२/०७/२०१५ | कारखान्याने सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा अद्यावत केलेली असून सामूहिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणामध्ये पुढील प्रक्रियाकरीता सांडपाणी पाठविण्यात येत आहे |
| (७) | मे. अत्रा फार्मासिटूकल्स प्रा. लि., प्लॉट नं. एच-९, एम. आय. डी.सी. वाळूज, औरंगाबाद | २२/०७/२०१५ | कारखान्याने सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा अद्यावत केलेली असून सामूहिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणामध्ये पुढील प्रक्रियाकरीता सांडपाणी पाठविण्यात येत आहे |
| (८) | मे.व्हेराक इंजिनिअरिंग प्रा.लि., प्लॉट नं. एल-४, एम. आय. डी.सी. वाळूज, औरंगाबाद | २२/०७/२०१५ | कारखान्याने सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा अद्यावत केलेली असून सामूहिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणामध्ये पुढील प्रक्रियाकरीता सांडपाणी पाठविण्यात येत आहे |
| (९) | मे.इप्का लॅबोरेटीज.लि., प्लॉट नं. एच-४, एम. आय. डी.सी. वाळूज, औरंगाबाद | २२/०७/२०१५ | कारखान्याने सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा अद्यावत केलेली असून सामूहिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणामध्ये पुढील प्रक्रियाकरीता सांडपाणी पाठविण्यात येत आहे |
| (१०) | मे.श्रेया लाईफ सायन्स प्रा.लि. प्लॉट नं. बी-९/२, एम.आय.डी.सी., वाळूज, औरंगाबाद | २२/०७/२०१५ | कारखान्याने सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा अद्यावत केलेली असून सामूहिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणामध्ये पुढील प्रक्रियाकरीता सांडपाणी पाठविण्यात येत आहे |
| (११) | मे.गुरुदत्त इंटरप्राईजेस, गट नं. ४८, प्लॉट नं. ५, एम.आय.डी.सी., वाळूज, औरंगाबाद | १५/०२/२०१६ | कारखाना बंद आहे. |
| (१२) | मे.औरंगाबाद ॲटो ॲनसिलरी प्रा.लि. प्लॉट नं. एच-२७, एम.आय.डी.सी., वाळूज, औरंगाबाद | ०४/०४/२०१६ | कारखान्याने सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा अद्यावत केलेली असून सामूहिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणामध्ये पुढील प्रक्रियाकरीता सांडपाणी पाठविण्यात येत आहे. |
| (१३) | मे.एसएआर इंडस्ट्रीज, प्लॉट नं. एम-१९, एम.आय.डी.सी., वाळूज, औरंगाबाद | ०२/०५/२०१६ | कारखाना बंद आहे. |

मा.राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांच्या आदेश दि.१५-०७-२०१५ मे.हॉस्पीरा हेल्थ केअर लि. यांनी रु.५ कोटी व मे.इंडूरन्स टेक्नालॉजी लि. यांनी रु.१० कोटी मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद येथे निधी जमा केलेला आहे. तसेच मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या संयुक्त बैठक दि.०९-०९-२०१५ च्या अनुषंगाने जल प्रदूषणकारी उद्योगाकडून रु.२.३५ कोटी निधी जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद येथे जमा केलेला आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २४ मे, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, महापालिकेकडून मलजल व सांडपाणी कोणत्याही प्रक्रियेविना सोडण्यात येते. तसेच औरंगाबाद परिसरातील (एमआयडीसी) औद्योगिक वसाहतीमधून मोठ्या प्रमाणावर रसायनयुक्त पाणी कोणत्याही प्रक्रियेविना खाम नदीत सोडण्यात येते. परिणामी खामनदीचे पाणी प्रदुषित होऊन तिच्या पाणलोट क्षेत्रातील सार्वजनिक पाणी पुरवठ्याचे उद्भव प्रदुषित झाल्याचे समितीस सांगण्यात आले आहे. प्रस्तुत प्रकरणी खाम नदी प्रदुषणमुक्त करण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना अंमलात आणली आहे, यावर प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी समितीस विदित केले की, यामध्ये वेळोवेळी एमपीसीबी मार्फत महानगरपालिकेला नोटीसा काढलेल्या आहेत. एकूण ८८ दलघमी पाणी खाम नदीमध्ये प्रक्रिया न करता सोडले जात होते. त्यांनी पाणी ट्रीटमेंट करुन नदीमध्ये सोडणे आवश्यक होते. परंतु या पाण्यापैकी केवळ ५ दलघमी पाण्यावर प्रक्रिया केली जाते. जवळपास ८३ दलघमी पाणी प्रक्रिया न करता सोडले जाते. आयुक्तांना संबंधितांवर खटला भरण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यावर त्यांनी प्रक्रिया सुरु केलेली आहे. त्यांनी सादर केलेल्या माहितीनुसार माहे जून, २०१७ पर्यंत २१६ द.ल.लि. क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र उभारण्याचे प्रस्तावित आहे. शहरातील मलनि:सारण प्रकल्प व मलजल प्रक्रिया केंद्र बांधण्याचे काम जून २०१७ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचा महानगरपलिकेचा मानस आहे. जून २०१७ पर्यंत ही सर्व प्रक्रिया पूर्ण होईल. यानंतर आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी समितीस अशी माहिती दिली की, आमचे एकूण जनरेशन १०३ एमएलडीआहे. त्यापैकी शहरामध्ये केवळ ११.५० दशलक्ष लिटर क्षमतेचे दोन मलजल प्रक्रिया केंद्र कार्यान्वित आहेत. म्हणजेच यावरच ट्रीटमेंट होते. आमच्या पूर्ण योजना दिनांक ३० जून २०१७ पर्यंत पूर्ण करणार आहोत. त्याद्वारे एकूण सीव्हेज सीस्टीम पूर्ण होणार आहे. खाम नदीमध्ये सद्या मल:निस्सारण जाते. खाम नदीवर महानगरपालिकेमार्फत बनेवाडी येथे १०.०० द.ल.लि. क्षमतेचे व कांचनवाडी येथे १६१ एमएलडी क्षमतेचे असे एकूण १७१ एमएलडी क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र बांधण्याचे प्रस्तावित आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, आतापर्यंत आपण ८८ दलघमी सांडपाणी प्रक्रिया न करता नदीमध्ये सोडत आहात. त्यापैकी केवळ ०.५ दलघमी सांडपाण्यावर प्रक्रिया होते. हे पाणी खालच्या सर्व गावांना मिळते. तुम्ही स्वच्छ पाणी घ्यायचे आणि दुसऱ्यांना प्रदूषित पाणी द्यायचे, हे बरोबर नाही. यावर आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांनी समितीस माहिती दिली की, याकरिताची योजना ३६५ कोटी रुपयांची आहे. सदरहू योजना ३६ महिन्यामध्ये पूर्ण करावयाची असून ती जून २०१७ मध्ये पूर्ण होणार आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, योजना पूर्ण होईपर्यंत काय करायचे, सीव्हेज ट्रीटमेंटचे प्लँटचे काम आणि ड्रेनेज सीस्टीम हा प्रत्येक गावासाठी वादग्रस्त विषय आहे.

ही बाब २०१७ पर्यंत पूर्ण झाली तरी फार चांगली आहे. परंतु त्यापेक्षा जास्त वेळ लागायला नको, या प्रश्नावर आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी समितीस विदित केले की, सद्या ५ टक्के काम पूर्ण झालेले आहे. हे सर्व काम एप्रिल २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे. यावर प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी समितीस माहिती दिली की, ३५ द.ल.लि. सांडपाणी नदीमध्ये जात होते. त्याकरिताचा प्लँट डिसेंबर पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. औरंगाबाद येथील वाळूज एमआयडीसी मध्ये मोठ्या प्रमाणावर प्रदुषण होते. आतापर्यंत त्याची दखल घेतली नव्हती. गेल्या तीन, चार वर्षामध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया न करता, तेथील कारखान्यांद्वारे सीईटीपीमध्ये न करता बोअरवेल्स पाडून केमिकल जमिनीमध्ये सोडले जात होते. त्यामुळे वाळूज परिसरातील भूजल दूषित झाले होते. त्या सर्व कारखान्यांना नोटीसा देण्यात आलेल्या आहे. जमिनीतील पाणी दूषित करणाऱ्या उद्योगांना नोटिसा दिल्या असून त्यांच्या विरुध्द खटले भरण्यात आले आहेत. उद्योगांना दूषित पाणी बोअरवेलच्या माध्यमातून भूगर्भामध्ये सोडण्याकरिता बंदी घालण्यात आली आहे. उद्योगांनी जमिनीमध्ये दूषित पाणी सोडलेले असल्याने सदरहू भागामध्ये बोअर घेण्यासाठी बंदी घालण्याच्या पर्याय तपासून पाहण्यात येणार आहे तसेच ऑनलाईन वॉटर मॉनिटरींग करण्याचाही प्रयत्न करण्यात येणार आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, उद्योगांनी दुषित पाणी बोअरवेलच्या माध्यमातून जमिनीत सोडल्यामुळे सामान्य नागरिकांचे पिण्याचे पाणी दूषित झालेले आहे. यावर प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी असे मत व्यक्त केले की, समितीचे म्हणणे अगदी बरोबर आहे. उद्योगांनी दूषित पाणी

जमिनीमध्ये सोडून अतिशय बेजबाबदारपणे वर्तन केले आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, उद्योगांनी जमिनीमध्ये दूषित पाणी सोडल्यामुळे बोअर व विहिरींचे पाणी दूषित झालेले असून ते शुध्द करण्याकरिता कोणते प्रयत्न करण्यात येणार आहेत, यावर प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी समितीस विदित केले की, याकरिता एमपीसीबीने एक प्रकल्प हाती घेतला असून त्याकरिता १९.१५ कोटी रुपयांचे नियोजन केले आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून दूषित पाण्याचा उपसा करुन पाण्याची गुणवत्ता पूर्ववत करण्यात येणार आहे. यावर समितीने पुढे आणखी अशी विचारणा केली की, उद्योगाच्या माध्यमातून प्रदूषित पाणी व गाळ जमिनीमध्ये सोडल्याने ते झिरपून त्या परिसरातील बोअर आणि विहिरीतून बाहेर आल्याचे दिसून आले आहे. अशा प्रकारे उद्योगांनी किती वर्षे प्रदूषित पाणी जमिनीमध्ये जिरवले आहे, यावर प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी समितीस विदित केले की, वाळूज येथील एमआयडीसी सुरु झाल्यापासून अशा प्रकारे दूषित पाणी भूगर्भामध्ये सोडण्यात येत आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, वाळूज एमआयडीसी सुरु होऊन किती वर्ष झाले, यावर प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, वाळूज एमआयडीसी सन १९८३ मध्ये सुरु करण्यात आली आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, याचा अर्थ वाळूज एमआयडीसीतील उद्योग मागील २० ते २५ वर्षापासून दूषित पाणी भूगर्भामध्ये सोडत आहेत. यावर प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी समितीस विदित केले की, याकरिता पाणी रिजनरेशनची प्रक्रिया करण्यात येणार आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, उद्योगांनी भूगर्भात सोडलेल्या दूषित पाण्यामुळे किती किलो मीटरचा परिसर प्रभावित झाला आहे, यावर प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी समितीला माहिती दिली की, जवळपास ६ किलो मीटर क्षेत्र दूषित पाण्यामुळे प्रभावित झाल्याचे सांगण्यात येत आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, सदरहू भागात समुद्र नसून तेथे गोड्या पाण्याचे स्त्रोत आहेत त्यामुळे दूषित पाणी गोड्या पाण्याच्या स्त्रोतामध्ये गेले असण्याची दाट शक्यता असून आपण केवळ ६ किलो मीटरचा परिसर दूषित पाण्याने प्रभावित झाल्याचे सांगत आहात. जेवढे पाणी जमिनीमध्ये जाईल तेवढे ते झिरपून भूगर्भात पसरत असते व बाहेर पडण्यासाठी ते मार्ग शोधत असते. समितीच्या मते सदरचे दूषित पाणी १० ते १२ किलो मीटरच्या परिसरामध्ये पसरले असण्याची शक्यता आहे. यावर प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी समितीस विदित केले की, दूषित पाण्याचे क्षेत्र हे घेण्यात आलेल्या चाचणीनुसार ६ किलो मीटरच्या परिसरामध्ये आढळून आले आहे. सदरहू दूषित पाणी रिजनरेट करण्यासाठी जवळपास १९.५ कोटी रुपयांचा प्रकल्प उभारण्यात येत आहे. सदरहू प्रकल्प यावर्षी सुरु करण्याचा प्रयत्न सुरु असून तो सुरु झाल्यानंतर आपल्याला त्याचे रिझल्ट मिळतील त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल. यावर समितीने आणखी अशी विचारणा केली की, पूर्वी कोणत्याही ठिकाणी वाळूचा उपसा करुन ओढ्याचे पाणी पीत असत. आता कोणत्याही ठिकाणच्या नदीचे पाणी पिऊ शकत नाही आणि हातामध्ये घेऊ शकत नाही. पवित्र नद्यांच्या ठिकाणी लोक स्नान करु शकत नाही किंवा तेथील पाणी हातामध्ये घेऊ शकत नाही. सदर दूषित पाण्यामुळे लोकांना चर्मरोग होण्याचा धोका अधिक असतो. राज्यातील सर्वच नद्यांचे पाणी दूषित झालेले आहे. महानगरपलिकेमार्फत प्रत्येक घरास पाणी पुरवठा करण्यात येतो परंतु दूषित पाण्याचे प्रमाण अधिक असल्याने लोकांना आता आपल्या घरामध्ये आर.ओ.फिल्टर बसवावे लागत आहेत. एक आर.ओ.फिल्टरची किंमत १० ते २५ हजार रुपये आहे, दर २-३ महिन्याला त्याचे मेंटनन्स करावे लागते, या यंत्राकरिता वीजेचा वापर करावा लागतो. हा सर्व खर्च जलसाठे दूषित केल्यामुळे सामान्य माणसाला सोसावा लागत आहे. त्यामुळे याप्रकरणी ठोस उपाय योजना करण्याकरिता विभागाच्या सचिवांनी गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. राज्यातील सर्व महानगरपालिकांनी सांडपाणी नद्यांमध्ये सोडलेले आहे त्यामुळे जलपर्णी सारख्या वनस्पतींची वाढ होत असून नांदेड येथे त्या काढण्याकरिता मोठ्या प्रमाणात मोहिम हाती घ्यावी लागली आहे. याप्रकरणी कठोर कायदा करुन महानगरपालिकांना सांडपाणी नदीमध्ये सोडू नये याकरिता सक्त सूचना देण्यात याव्यात व कडक कारवाई करणे आवश्यक आहे. उद्योगांनी भूगर्भात सोडलेले दूषित पाणी रिजनरेट करण्याकरिता प्रकल्प उभारण्यात येत आहे, ही अभिनंदनीय बाब आहे. सांडपाण्याच्या संदर्भात संबंधित यंत्रणा योग्य प्रकारे काम करते किंवा नाही, याकडे विभागाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. औरंगाबाद येथील खाम नदी किंवा राज्यातील महानगरपालिका क्षेत्रातील नद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात सांडपाणी सोडण्यात येते. पुणे शहरामध्ये देखील अशाच प्रकारची अवस्था आहे. विभागाच्या सचिवांनी सांगितले की, उद्योगांनी भूगर्भात सोडलेले दूषित पाणी रिजनरेट करण्याकरिता प्रकल्प उभारण्यात येत असून तो ३० जून पर्यंत सुरु करण्यात येणार आहे. समितीचे समाधान होण्याकरिता अशी माहिती सचिव देत असतील परंतु प्रत्यक्षात याबाबी कृतीमध्ये आणण्यात येत नाहीत. महानगरपालिकेकडून सांडपाण्याच्या संदर्भात कार्यवाही सुरु असल्याचे सांगण्यात येते. परंतु त्या ठिकाणी भेट दिली तर कोणत्याही प्रकारचे काम सुरु असल्याचे दिसून येत नाही. हे उदाहरण पुणे शहराला लागू आहे त्यामुळे समितीने बाब निदर्शनास आणून दिली. उद्योग हे बोअरच्या माध्यमातून भूगर्भामध्ये रासायनिक पाणी सोडतात. अशा प्रकारच्या बोअर बंद करण्याची आवश्यकता आहे. यावर प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, सदरहू बोअर बंद

करण्यात आल्या आहेत. यावर समितीने अशी माहिती विचारली की, सदरहू बोअर बंद केल्याबद्दल समितीने समाधान व्यक्त केले. परंतु अशा बोअर बंद केल्यानंतर संबंधित उद्योग रासायनिक पाणी कोठे सोडतात याची माहिती घेणे आवश्यक आहे. यावर प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी समितीला अशी माहिती दिली की, याप्रकरणी एमआयडीसीने त्यांची सामुहिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा अपग्रेड करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून मागिल आर्थिक वर्षाच्या कालावधीमध्ये सदरहू ठिकाणच्या प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची गुणवत्ता विहीत मर्यादेत असल्याचे अहवालानुसार आढळून आले आहे. सदर भागातील भूजलगर्भात असलेले दूषित पाणी शुध्द करण्यासाठीची प्रक्रिया करावी लागणार आहे. राज्यातील प्रत्येक नगरपालिकेकडून नदीमध्ये सांडपाणी सोडण्यात येते, ही बाब खरी आहे. सदरहू प्रकरणी प्रत्येक महानगरपालिकेला नोटिसा देण्यात आलेल्या आहेत. तसेच, प्रत्येक नगरपालिकेला आवाहन करण्यात आले आहे की, सिव्हरेज ट्रिटमेंट प्लँट व सॉलिड वेस्ट प्लँटसाठी त्यांच्या बजेटच्या २५ टक्के निधी आरक्षित ठेवण्यात यावा. सदरहू निधी त्यावरच खर्च करण्यात यावा, असेही बंधन घालण्यात आले आहे. राज्यातील दोन नगरपालिका वगळल्या तर इतर सर्व नगरपालिका व महानगरपालिकांनी त्यांच्या बजेटच्या २५ टक्के निधी सदरहू प्रकरणी आरक्षित केला आहे. यावर समितीने पुढे अशी पृच्छा केली की, सदरहू प्रकरणी औरंगाबाद महानगरपालिकेवर कोणती कारवाई करण्यात आली आहे, या प्रश्नावर प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी समितीस विदित केले की, औरंगाबाद महानगरपालिकेस सदरहू प्रकरणी नोटिसा देण्यात असून महानगरपालिका आयुक्तांना प्रॉसिक्यूशन नोटीस देण्यात आली असून त्यांनी एचटीपी ट्रिटमेंट प्लँट सुरु करण्यात येणार असल्याचे कळविले आहे. यावर समितीने पुढे आणखी अशी विचारणा केली की, प्रदूषण नियंत्रण मंडळाने नोटिसा काढल्या हे ठीक आहे. पंरतु नोटिसा काढूनही महानगरपालिकांवर काही परिणाम होत असल्याचे बऱ्याच वेळा दिसून येत नाही. नोटिसा काढल्यानंतर त्यास महानगरपालिका उत्तर देतात परंतु प्रत्यक्षात संबंधित ठिकाणी भेट देऊन पाहणी केली तरच सद्य:स्थिती समजू शकेल. यावर प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी समितीस सांगितले की, विभागाचे अधिकारी सदरहू ठिकाणी भेट देत असतात.यावर समितीने अशी विचारणा केली की, सदरहू नदीमध्ये सांडपाणी आताही सोडण्यात येत आहे काय, यावर प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी समितीस विदित केले की, जोपर्यंत महानगरपालिकेचा एचटीपी प्लँट सुरु होत नाही तोपर्यंत त्यास पर्याय नाही.

**अभिप्राय व शिफारशी**

समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेअंतर्गत पंचायत समिती औरंगाबादला भेट देऊन मौजे पाटोदा (गंगापूर नेहरी) या ग्रामपंचायतीस भेट दिली. उक्त भेटीच्या वेळी समितीला या गावाच्या शेजारी असलेल्या खामनदीत औरंगाबाद शहर व परिसरातील औद्योगिक वसाहतीतून मलजल व सांडपाणी कोणत्याही प्रक्रियेविना सोडण्यात आल्यामुळे पाणी दुषित झाल्याचे निदर्शनास आले. याबाबत समितीने ग्रामविकास विभागास विचारणा केली असता विभागाने औरंगाबाद महानगरपालिकेकडून मलजल व सांडपाणी कोणत्याही प्रकारच्या प्रक्रियेविना खामनदीत सोडणे, तसेच औद्योगिक वसाहतीमधून मोठया प्रमाणावर रसायनयुक्त पाणी कोणत्याही प्रक्रियेविना या नदीत सोडण्यात येते. परिणामी खामनदीचे पाणी प्रदुषित होऊन तिच्या पाणलोट क्षेत्रातील सार्वजनिक पाणी पुरवठयाचे उद्‌भव प्रदुषित झाल्याची वस्तुस्थिती मान्य केली आहे. खामनदीचे पाणी प्रदुषित होऊन पाणलोट क्षेत्रातील सार्वजनिक पाणी पुरवठयाचे उद्‌भव प्रदुषित झाल्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेने देखील याबाबत समितीस माहिती पाठवून अवगत केले.

उक्त माहितीवरुन असे दिसून येते की, जुन्या ठिकाणच्या मलनि:सारण वाहिन्या निकामी झाल्या असल्यामुळे प्रक्रियेतील मलजल पाणी हे नदीच्या पात्रातून उघडयाने वाहत आहे. याबाबत केंद्र शासनाकडे सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आला. या भुयारी गटार योजनेच्या रक्कम रुपये ३६५.६९ कोटीच्या प्रकल्प प्रस्तावास मंजूरी दिलेली आहे. शहरातील एकूण ६०.०० कि.मी. लांबीपर्यंतच्या मुख्य मलनि:सारण वाहिन्या टाकण्याचे काम प्रस्तावित आहे. तसेच शहरातील विविध ४ भागात एकूण २१६.०० द.ल.लि. क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र उभारण्याचे प्रस्तावित आहे.

त्याचप्रमाणे बनेवाडी येथे १७१.०० द.ल.ली. क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र उभारण्याचे प्रस्तावित असून कांचनवाडी मलजल प्रक्रिया केंद्राचे काम ६० टक्के पूर्ण झालेले आहे. **शहरातील मलनि:सारण प्रकल्प व मलजल प्रक्रिया प्रकल्प केंद्र बांधण्याचे काम जुलै, २०१७ अखेरपर्यंत पुर्ण करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे. त्यास नगर विकास विभागाने सहमती दर्शविली आहे. उपरोक्त माहिती विचारात घेता औरंगाबाद महानगरपालिकेकडून मलनि:सारण वाहिन्यांची कामे, मलजल प्रक्रियेची कामे, इत्यादि कामांस मंजूरी दिली असून ती कामे सुरु असल्याचे व जुलै, २०१७ अखेरपूर्ण होणार असल्यामुळे समिती समाधान व्यक्त करीत आहे. तसेच विभागाने सदरची कामे कोणत्याही परिस्थितीत जुलै, २०१७ पर्यंत पुर्ण करावीत व तशी कामे पूर्ण झाल्याबाबतचा अहवाल समितीस अवगत करावा अशी समितीची शिफारस आहे.**

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी शहरातून निघणारे सांडपाणी बिगर प्रक्रियेविना सोडले जात असल्याने व अपुरी प्रक्रिया सयंत्रणा असल्याने जल कायदा, १९७४ अन्वये सुमारे ६ नोटीसा बजावलेल्या आहेत. तसेच दिनांक १५.३.२०१६ अंतर्गत खटला दाखल करण्यासंबंधी नोटीस बजावलेली आहे. तसेच प्रदुषण नियंत्रण मंडळ सामुहीक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेच्या गुणवत्तेची तपासणी आठवडयातून एकदा करीत असून सामुहीक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेचे पृथ:करण अहवाल मंडळाच्या संकेत स्थळावर जनतेच्या माहितीकरिता प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

वाळूज औद्योगिक परिसरातील भुर्गभागातील पाण्याची गुणवत्ता (दूषित) प्रभावीत झाल्याने याबाबतचा मा.राष्ट्रीय हरित लवाद, पुणे येथे प्रकरण न्याय प्रविष्ठ असून वाळूज परिसरातील भुगर्भातील पाण्याची गुणवत्ता पुर्ववत करण्याकरिता महाराजा सयाजीराव गायकवाड बडोदा युनिर्व्हेसिटी, गुजरात यांच्या मार्फत कृती आराखडा राबविण्यात येत आहे. वाळूज औद्योगिक परिसरातील भुगर्भातील पाण्याची गुणवत्ता पुर्वरत करण्याकरिता रु.१९.१५ कोटी खर्च दर्शविण्यात आला आहे. सदर खर्च जल प्रदूषणकारी उद्योगाकडून वर्गणीद्वारे वसुल करण्याचे निर्देश मा.राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिलेले आहेत. याबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे. **वाळूज औद्योगिक परिसरातील ज्या कारखान्यांच्या दुषित पाण्यामुळे भूजल प्रदुषण होत आहे. त्या कारखान्यांना नोटीस देण्यात आलेली असून त्यांच्यावर खटले दाखल केले आहेत. उद्योगांना दूषित पाणी बोअरवेलच्या माध्यमातून भूर्गामध्ये सोडण्याकरिता बंदी घालण्यात आली आहे. उद्योगांनी जमिनीत दुषित पाणी सोडलेले असल्याने सदरहू भागामध्ये बोअर घेण्यासाठी बंदी घालण्याचा पर्याय तपासून पाहण्यात येईल. तसेच ऑनलाईन वॅाटर मॅानिटरींग करण्याचाही प्रयत्न करण्यात येणार आहे इ. बाबत समितीस आश्वासित केले आहे. याबाबत समिती अत्यंत गंभीर आहे. उद्योगांनी दूषित पाणी जमिनीमध्ये सोडल्यामुळे सामान्य नागरीकांचे पिण्याचे पाणी दूषित झालेले आहे. त्यामुळे अशा सर्व उद्योजकांवर नियमानुसार कठोर कारवाई करुन त्यांच्याकडून दंडात्मक रक्कम वसुल करण्याबरोबरच प्रदुषण कायद्याअंतर्गत देखील खटला दाखल करावा अशी समितीची शिफारस आहे.**

या परिसरामध्ये गोड पाण्याचे स्त्रोत असून दूषित पाणी गोडया पाण्याच्या स्त्रोतामध्ये गेले असण्याची दाट शक्यता असून केवळ ६ किलो मीटरचा परिसर दूषित पाण्याने प्रभावित झाल्याचे सांगण्यात आले. जेवढे पाणी जमिनीमध्ये जाईल तेवढे ते झिरपून भूगर्भात पसरत असते व बाहेर पडण्यासाठी ते मार्ग शोधत असते. **समितीच्या मते सदरचे दूषित पाणी १० ते १२ किलो मीटरच्या परिघात पसरलेले असण्याची शक्यता आहे. सदरहू दूषित पाणी रिजनरेट करण्यासाठी जवळपास १९.५ कोटी रुपयांचा प्रकल्प उभारण्यात येत असल्याबाबत प्रधान सचिवांनी सांगितले. सदरचा प्रकल्प सुरु झाल्यानंतर आपल्याला त्याचे रिझल्ट मिळतील. त्याअनुषंगाने पुढील कारवाई करण्यात येईल. याबाबत समिती समाधान व्यक्त करीत असून दूषित पाणी रिजनरेट करण्याचा प्रकल्प तातडीने पूर्ण करण्यात यावा व त्याबाबतची कार्यवाही तातडीने करुन तो पूर्ण करण्याबाबत योग्य ती कार्यवाही विभागाने करावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण बावीस

## जिल्हा परिषद, औरंगाबाद (प्रशासन)

### पैठण पंचायत समितीमध्ये पिंक (गुलाबी)पैठण ही नाविण्यपुर्ण योजना राबविण्यात येत असल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १५ ते १७ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत औरंगाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीने पैठण पंचायत समितीमध्ये नाविन्यपूर्ण योजना अथवा उपक्रम हाती घेतला आहे काय, याबाबत विचारणा केली असता सहाय्यक गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण, श्रीमती. उषा मोरे यांनी पिंक पैठण या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल समितीस अवगत केले.

सात वाहनाची राजधानी असलेले प्रतिष्ठान तथा पैठण हि संताची भूमी असून येथे काम करत असतांना काहीतरी नाविन्य पूर्ण करण्याच्या उद्देशाने तालुक्यातील ग्रामपंचायत आय.एस.ओ. करण्याचा निर्णय पंचायत समिती, पैठण यांनी केला. त्यामध्ये ग्रामपंचायतींच्या इमारतींना गुलाबी छटा देवून राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी व पैठण तालुक्याला एक नविन ओळख देण्यासाठी गुलाबी पैठण ही संकल्पना राबविण्यात आली. यामध्ये तालुक्यातील १०७ ग्रामपंचायत यांना गुलाबी रंग देण्यासाठी लोक सहभागातून कामे केली. सरपंच, सदस्य लोकांनी अतिशय सकारात्मक दृष्टीकोन ठेवून प्रत्येक ग्रामपंचायत गुलाबी रंगाने रंगविली आहे. यामध्ये ३३ ग्रामपंचायत आय.एस.ओ. साठी प्रस्तावित केल्या आहेत. आय.एस.ओ. ग्रामपंचायतमध्ये अंगणवाडी, शाळा, सर्व शासकीय इमारतींना गुलाबी रंग देण्यात आला. १६ ग्रामपंचायतचे ऑडीट झालेले आहे. उर्वरित ग्रामपंचायतीची कामे सुरु आहेत.

**पिंक पैठण या उपक्रमात खालील कामे अंतर्भूत केली असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली.**

१. ग्रामपंचायत रंगरंगोटी, फर्निचर, कारपेंटर, पडदे, आसन व्यवस्था, पाणी व्यवस्था, डस्टबिन, वेलकम मॅट, चहाचे कप, पेन स्टॅन्ड, पृथ्वीचा गोल, घड्याळ, कॅलेंडर, कार्यकारणी मंडळ व अधिकाऱ्यांचे नावाचे बोर्ड, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना युनिफॉम,

२. वृक्षारोपन, घरावर पती पत्नीचे नाव टाकणे, सौर दिवे लावणे, कचराकुंडी वाटप, प्रत्येक घरासमोर कचराकुंडी वाटप

३. १०० टक्के कर भरणाऱ्या कुटुंबास मोफत पिठाची गिरणी, अपघाती विमा,

४. गरोदर महिलांसाठी मदर केअर सेंटर, यामध्ये गरोदर मातेला दररोज दुपारी २ तास विश्रांतीसाठी बोलविण्यात येते. आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात येते.

५. व्यायाम शाळा, वाचनालय, क्रिडांगण इत्यादी गोष्टी करण्यात आल्या.

६. गावासाठी वॉटर प्युरिफिकेशन प्लांट ५ ग्रामपंचायतीमध्ये बसविण्यात आले.

७. अंगणवाडी रंगरंगोटी, फर्निचर करण्यात आले.

८. सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्यात आले.

९. स्वागत कमान, वाढदिवसांचे शुभेच्छा फलक.

१०. स्मशान भुमी शुशोभिकरण, रस्ते, ड्रेनेज लोईन, प्लेवर ब्लॉक,

११. ग्रामपंचायत मध्ये कर्मचाऱ्यांची हजेरी घेण्यासाठी बायोमॅट्रीक.

१२. घन कचरा व्यवस्थापन, १०० टक्के शौचालय,

१३. संग्रामच्या व प्रिया सॉफ्टच्या अद्यावत नोंदी,

१४. रस्ता दिशा दर्शक फलक

१५. सार्वजनिक कचरा कुंडी (जपानी)

१६. अभिलेखे अद्यावत करणे.

समितीने पुढे आणखी विचारणा केली की, या सर्व १६ कलमी उपक्रमांना ग्रामीण भागातील लोकांचा प्रतिसाद कसा मिळाला आहे व सदरहू योजनेने काय साध्य केले आहे. यावर समितीस विदीत करण्यात आले की, वरिल सर्व कामे करण्यात आली असून गांवामध्ये वॉटर प्युरीफिकेशन प्लांट बसविल्यामुळेदुषीत पाण्यामुळे होणाज्या आजाराचे प्रमाणे कमी होऊन आरोग्य सुधारले व आर्थिक बचत झाली. ग्रामपंचायत सुस्वच्छ झाल्यामुळे ग्रामसेवकाच्या कामामध्ये कार्यक्षमते वाढ झाल्याचे दिसून आले.मदर केअर सेंटर मुळे गरोदर स्तनदा माता एकत्र येऊन त्यांना आरोग्य व अहाराविषयी माहिती मिळाल्यामुळे त्यांच्या आरोग्यात सुधारणा झाली व त्यांच्या विचारांची देवाणघेवाण होऊन एकोपा वाढला.क्रिडांगण केल्यामुळे तरुण मुलांमध्ये खेळण्याचे प्रमाण वाढले. दुसज्या गावातील लोकांचा ग्रामपंचायतीकडे पहाण्याचा दृष्टीकोन बदलला. गावामधील सलोख्याचे वातावरण निर्माण झाले.

सदरहू योजनेत प्राधान्याने करावयाची कामे पुढीलप्रमाणे आहेत. १)ग्रामपंचायतला स्वत:ची इमारत असणे आवश्यक आहे. २) गावात व्यायाम शाळा, वाचनालय, क्रिडांगण, ३) मदर केअर सेंटर (गरोदर व स्तनदा मातांसाठी) ४) मोफत पिठाची गिरणी, ५) जलशुध्दी प्रकल्प, ६) वॉटर हार्व्हेसिंग प्रकल्प ७) गावात १०० टक्के सौर दिवे, ८) एका ग्रामसेवकाकडे एकच ग्रामपंचायत सजा ठेवणे, ९) मोठ्या ग्रामपंचायतसाठी सहाय्यक ग्रामसेवक ठेवणे. या सर्व प्राधान्याने करावयाच्या कामासाठी शासन स्तरावरुन जर मार्गदर्शक सुचना आल्या तर वरील सर्व नाविन्यपूर्ण काम एका वर्षात पुर्ण होऊ शकतात. ग्रामस्तरावर नाविण्यपूर्ण कामे करतांना प्रत्येक वेळी गावकरी व सदस्य शासनाच्या काही सुचना आहेत का अशी विचारणा करतात त्यामुळे कामे करतांना अडचणी निर्माण होतात. शासन स्तरावरुन सुचना आल्यानंतर कामे करणे सुरळीत होईल. समितीला ही संकल्पना आवडली असून याची अंमलबजावणी संपूर्ण राज्यात करण्यासाठी हा मुद्दा विभागीय सचिवांच्या साक्षीकरिता घेण्याचा निर्णय समितीने घेतला.

**समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून उपरोक्त विषयासंदर्भात खालील माहिती मागविली.**

पंचायत राज समितीने पंचायत समिती पैठण येथे भेट दिली असता पैठण पंचायत समितीमध्ये पिंक (गुलाबी पैठण) ही नाविन्यपुर्ण योजना हाती घेतल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सदरहू योजना स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामिण भागातील नागरीक या दोहोंसाठी अधिक उपयुक्त असल्याने ती संपूर्ण राज्यात लागू करण्या संदर्भात शासनाची भूमिका काय आहे?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

औरंगाबाद जिल्हयातील एकूण ८६१ ग्रामपंचायतीपैकी ११६ ग्रामपंचायती सन २०१५-१६ मध्ये आय.एस.ओ.प्रमाणित झालेल्या आहेत. त्यापैकी पैठण तालुक्यात १८ ग्रामपंचायती आय.एस.ओ. प्रमाणित आहेत. जिल्हयात ग्रामपंचायतींचे आय.एस.ओ. प्रमाणिकरण करीत असतांना सहभागी सर्व ग्राम पंचायत इमारतींची रंगसंगती एकसारखी असावी या संकल्पनेतून ग्रामपंचायतींना गुलाबी (पिंक) रंगाची रंगसंगती निश्चित करुन ती उपयोगात आणली गेली. सदरील रगसंगतीमुळे औरंगाबाद जिल्हयातील ११६ ग्रामपंचायती आकर्षक, एकसारखी दिसून येतात यामुळे लोकसहभागाची भावना वृध्दिंगत झाली आहे. त्यामुळे सदरहू योजना स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामीण भागातील नागरीक या दोहोंसाठी अधिक सुसंगत तसेच उपयुक्त असल्याचे मत आहे.

**समितीस ग्रामविकास विभागाकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

सदर योजनेची संकल्पना, त्याच्या अंमलबजावणीसाठीची यंत्रणा, आर्थिक तरतूद, योजनेची उपयुक्तता व परिणामकारकता या विषयाबाबत माहिती घेण्यासाठी विभागीय आयुक्त पातळीवर एका अभ्यासगटाची स्थापना करण्यात येईल, या अभ्यासगटाच्या अहवालानुसार ती योजना संपूर्ण राज्यात लागू करण्याबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २४ मे, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,पंचायत राज समितीने पंचायत समिती पैठण येथे भेट दिली असता पैठण पंचायत समितीमध्ये पिंक ही नाविन्यपूर्ण योजना हाती घेतल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सदरहू योजना स्थानिक स्वराज्य संस्था

आणि ग्रामीण भागातील नागरिक या दोहोंसाठी अधिक उपयुक्त असल्याने ती संपूर्ण राज्यात लागू करण्यासंदर्भात शासनाची भूमिका काय आहे यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, औरंगाबाद यांनी समितीस विदित केले की, सदरहू उपक्रम हा सहाय्यक गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण यांच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. विशिष्ट रंगसंगतीमध्ये प्रशासकीय इमारती कल्पक पध्दतीने पेंट केलेल्या आहेत.अनेक ठिकाणी या भागामध्ये चांगले काम केलेले आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, यामध्ये असे दिलेले आहे की, सदर योजनेची संकल्पना त्याच्या अंमलबजावणीसाठीची यंत्रणा आर्थिक तरतूद योजनेची उपयुक्तता व परिणामकारकता या विषयाबाबत माहिती घेण्यासाठी विभागीय आयुक्त पातळीवर एका अभ्यासगटाची स्थापना करण्यात येईल. या अभ्यासगटाच्या अहवालानुसार ती योजना संपूर्ण राज्यात लागू करण्याबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल.हे पाहिल्यानंतर एक अतिशय चांगला उपक्रम चालू आहे, असे समजले. अशी कामे सर्व ग्रामीण स्तरावर होणे आवश्यक आहे. ही योजना कोणत्या अधिका-यांनी राबविलेली आहे, जिल्हास्तरीय एचओडी, एबीडीओ श्रीमती उषा मोरे, बीडीओ श्रीमती सोमवंशी यांनी ही योजना राबविलेली आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, कर्मचा-यांनी चांगले काम केले तर त्यांना वाढीव वेतन देऊन त्यांचे कौतुक करणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदेने त्या अधिकाऱ्यांची चांगले काम केल्याबद्दल शिफारस करुन पाठवावी. त्यांचा सन्मान होणे आवश्यक आहे. या अधिकाऱ्यांची सेवा पुस्तीकेमध्ये नोंद घ्यायला पाहिजे. यावर समितीने अशी विचारणा केली की, त्यांनी चांगले काम केल्याबद्दल त्यांचा सन्मान कशा पद्धतीने करता येऊ शकतो. यावर श्री. गगराणी यांनी समितीस सांगितले की, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद येथील चांगल्या अधिकाज्यांचा आम्ही दर वर्षी सत्कार करतो. तसेच चांगल्या अधिकाज्याला पारितोषिकही दिले जाते. यावर सदरहू अधिकाज्याचा चांगले काम केल्याबद्दल सन्मान करण्यात यावा, अशी समितीने शिफारस केली. यावर समितीने असेही सूचित केले की, अधिकाऱ्याकरिता योजनेची तरतूद वाढवून दिल्यास त्यातून अधिक चांगले काम केले जाईल. तसेच त्यामुळे इतर अधिकाऱ्यांना प्रोत्साहन मिळेल. त्यांना मुंबईला बोलावून सचिव पातळीवर सत्कार केल्यास त्यांच्याकडून अधिक चांगले काम होऊन इतर अधिकाऱ्यांना प्रोत्साहन मिळेल. हलगर्जीपणा करणे, गैरकारभार करणे इत्यादीबाबत समिती अनेकवेळा कारवाई प्रस्तावित करते. परंतु चांगले अधिकारी असतील तर त्यांचा सन्मान झाला पाहिजे, असे देखील समितीचे मत आहे. त्यांचा जाहीर सत्कार करण्यात यावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, औरंगाबाद यांनी समितीला आश्वासित केले की, त्यांचा सर्वसाधारण सभेमध्ये सन्मान करण्यात येईल.

**अभिप्राय व शिफारशी**

समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेला भेट देवून मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. समितीच्या पैठण पंचायत समिती भेटीच्या वेळी समितीने पंचायत समितीच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांबद्दल माहिती घेतली असता तेथे "पिंक पैठण" हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात येत असल्याबाबत माहिती प्राप्त झाली. ग्रामपंचायती अंगणवाड्या इत्यादी शासकीय इमारतींना गुलाबी रंगाने रंगविणे एवढा मर्यादीत उपक्रम नसून यात विकास विषयक, सामाजिक सलोखा, स्वच्छता, खेळ, कर वसूली, आरोग्य, गरोदर मातांचे आरोग्य, महिलांचे सशक्तीकरण व त्यांचा सन्मान, पिण्याचे स्वच्छ पाणी, कचरा व्यवस्थापन इत्यादी अत्यंत महत्वाच्या क्षेत्रात लोकसहभागातून अत्यंत स्पृहनीय कार्य पंचायत समिती, पैठण द्वारा झालेले आढळून आले. **विभागीय सचिवांचे साक्षीदरम्यान सदर योजनेची संकल्पना त्याच्या अंमलबजावणीसाठीची यंत्रणा, आर्थिक तरतूद, योजनेची उपयुक्तता व परिणामकारकता या विषयाबाबत माहिती घेण्यासाठी विभागीय आयुक्त पातळीवर एका अभ्यासगटाची स्थापना करण्यात येईल.या अभ्यासगटाच्या अहवालानुसार ती योजना संपूर्ण राज्यात लागू करण्याबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन समितीस देण्यात आले आहे. शासनाने असा अभ्यासगट लवकर स्थापन करावा व तीन महिन्यात त्यांचेकडून अहवाल प्राप्त करुन घेऊन असा स्तुत्य उपक्रम संपूर्ण राज्यात राबविता येईल याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा अशी समितीची शिफारस आहे.**

**समिती विविध जिल्हा परिषदांना भेट देवून मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेते. साक्षीदरम्यान त्या अधिकाज्यांनी कर्तव्यात कसूर, हलगर्जीपणा, अनियमितता, गैरव्यवहार, भ्रष्टाचार केला असेल तेथे त्यांचेविरुध्द नियमानुसार कारवाई करण्याबाबत शिफारस करते. परंतू "पिंक पैठण" यासारखे उपक्रम स्वत:हून राबविण्याऱ्या अधिकाऱ्यांचा उचित सन्मान झाला पाहिजे असे समितीचे मत आहे. जेणेकरुन अशा अधिकाज्यांकडून इतर अधिकारी प्रेरणा घेतील व संपूर्ण राज्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये शासन आपल्या चांगल्या कामाची दखल घेते असा संदेश जाईल. त्याकरीता सहाय्यक गटविकास व इतर संबंधित अधिकारी यांचा उचित सन्मान शासनाने करावा अशीही समितीची शिफारस आहे.**

प्रकरण तेवीस

# जिल्हा परिषद, औरंगाबाद (प्रशासन)

## वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात होत असलेल्या विलंबाबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १५ ते १७ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत औरंगाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १७ ऑक्टोबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने सिल्लोड पंचायत समिती येथील वैयक्तिक लाभाच्या योजनांची यादी विलंबाने का पाठविण्यात आली असा मुद्दा उपस्थित केला असता समाजकल्याण अधिकारी (प्र) यांनी विदीत केले की, सदरची यादी दिनांक ०३/०८/२०१५ रोजी पाठविली आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, सन २०१२-२०१३ या वर्षातील लाभार्थ्यांची यादी जिल्हा परिषदेने सन २०१५ मध्ये पाठविली आहे, ही अतिशय गंभीर बाब आहे. या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी.राज्यातील बहुतांश जिल्ह्यामध्ये वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात दोन ते तीन वर्षाचा विलंब झालेला आहे. यावर समाजकल्याण अधिकारी (प्र) यांनी समितीस विदित केल की, जिल्हा परिषदेने दिनांक २८/०४/२०१५ च्या बैठकीत आढावा घेतला होता व रेकॉर्ड घेतले होते. त्यानंतर लाभार्थी निवडीची प्रक्रिया सुरु केली व ती आता पूर्ण झाली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, समितीला पंचायत समितीमध्ये झालेल्या बैठकीत तेथील अधिकाऱ्यांनी तर असा खुलासा केला आहे की, जिल्हा परिषदेकडून यादी प्राप्त न झाल्यामुळे त्यांना योजना राबविता आली नाही. दोन्ही बाजूचे खुलासे समितीने ऐकून घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सविस्तर चौकशी करावी आणि त्यांचा अहवाल समितीला सादर करावा असे निदेश दिले.

**समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

समितीने औरंगाबाद जिल्ह्यासह इतर जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असता प्रत्येक जिल्ह्यामध्ये वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात २ ते ३ वर्षाचा विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा योजना वेळापत्रकाप्रमाणे राबविणे बंधनकारक करण्याकरीता शासनाने कोणते उपाय योजले आहेत.

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबादमार्फत जिल्हा परिषदउपकर अंतर्गत सन २००८-०९,२०११-१२ आणि सन २०१२-१३ मधील योजनांची अंमलबजावणी बाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे. सन २००८-०९ मधील ५ योजनांपैकी ३ योजनांची अंमलबजावणी करण्यात आली. उर्वरीत २ योजनांना पुरवठा आदेश देण्यात आला होता.परंतु साहित्याचा पुरवठा झाला नाही म्हणून उर्वरित २ योजनेचा निधी सन २००९-१० मध्ये वर्ग करण्यात येऊन योजनांची अंमलबजावणी पुर्ण होऊन लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.सन २०११-१२ मध्ये एकूण ११ योजनांची अंमलबजावणी करण्यात आली.उर्वरित ४ योजनांकरिता निविदा अंतिम न झाल्याने पुरवठा आदेश देता आला नाही म्हणून सदरील योजनांचा निधी सन २०१२-१३ मध्ये वर्ग करण्यात येऊन योजनांची अंमलबजावणी पुर्ण होऊन लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

सन २०१२-१३मध्ये एकूण १० योजनांपैकी २ योजनांची अंमलबजावणी करण्यात आली उर्वरित ८ योजनांकरिता निविदा अंतिम न झाल्याने दर निश्चित होऊ शकले नाही. तसेच लाभार्थी निवड वेळेवर न झाल्याने पुरवठा आदेश देण्यात आला नाही. म्हणून सदरील योजनांचा निधी सन २०१३-१४ मध्ये वर्ग करण्यात येऊन ५ योजनांची अंमलबजावणी पुर्ण होऊन लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

शासनाच्या वेळापत्रकाप्रमाणे जि.प.उपकराअंतर्गत मागासवर्गीयासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचे प्रस्ताव ३१ मे अखेर जि.प.स्तरावर गटविकास अधिकारी यांचे कार्यालयाकडून प्राप्त होणे अपेक्षित आहे. मागासवर्गीय कल्याणकारी योजनांसंबधीत प्रपत्रातील माहिती उदा. जातीचे,उत्पन्नाचे,रहीवासी,तलाठी यांचे आवश्यक प्रमाणपत्र इ. सह प्रस्ताव ३१ मे अखेर पंचायत समिती कडून प्राप्त होत नाही. पंचायत समिती स्तरावरील प्राप्त प्रस्ताव अपुर्ण असल्याने कागदपत्रांची पूर्तता करण्यामध्ये विलंब होतो. योजनेनुसार शासन दरकरार त्या त्या कालावधीत उपलब्ध होत नाही.तसेच निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यामध्ये ३ ते ४ महिने वेळ जातो. समाजकल्याण विषय समिती स्तरावर चालू अर्थिक वर्षाकरिता मंजूर योजनांमध्ये सतत बदल होतो त्यास जि.प. सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यामध्ये विलंब होतो. समाजकल्याण विषय स्तरावर

योजनांचे दर निश्चित करणे, लाभार्थी करण, लाभार्थी निवड करणे या योजनांबाबतच्या प्राथमिक बाबी पुर्ण करण्यास कालावधी लागतो. त्यामुळे योजनांचे पुरवठा आदेश देणे,साहित्य पुरवठा होवून देयक अदा करणे या बाबी अर्थिक वर्ष अखेर पुर्ण होवू शकत नाही. सदरील निधी पुढील आर्थिक वर्षात वर्ग करण्यात येतो.

योजनांची अंमलबजावणी करणेकरिता शासनाने ठरवून दिलेले वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करण्याचा पुर्ण प्रयत्न विभागाच्या स्तरावर करण्यात येतो. शासनाच्या निर्धारीत केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे योजनांची अंमलबजावणी करणे करीता योजनांचे अर्ज परिपूर्ण माहितीसह कागदपत्रासह ऑनलाईन स्विकारल्यास त्रुटी राहणार नाही. तसेच वेळेचे बंधन राहील. आणि लाभार्थी निवड दाखल झालेल्या प्रस्तावाप्रमाणे करणे सोईचे होवून वेळेत पुर्ण होईल.

**समितीस ग्रामविकास विभागाकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणीबाबत ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९, दिनांक २० जून, २००८ अधिक्रमित करण्यात येऊन सुधारित शासन परिपत्रक काढण्याची बाब शासनाच्या विचारधीन आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २४ मे, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,समितीने औरंगाबाद जिल्ह्यासह इतर जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असता प्रत्येक जिल्ह्यामध्ये वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात २ ते ३ वर्षाचा विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा योजना वेळापत्रकाप्रमाणे राबविणे बंधनकारक करण्याकरिता शासनाने कोणते उपाय योजले आहेत, या समितीच्या प्रश्नावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना काही कारणांमुळे विलंब होत होता, त्याबाबत नमूद करण्यात येते की, लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी पंचायत समिती स्तरावर अर्ज मागविले जातात. कागदपत्रांचीछाननी होऊन ते समितीपुढे येते. कागदपत्रांची पुर्तता करण्याकरिता विलंब लागत असल्यामुळे अर्ज पूर्ण कागदपत्रांसह प्राप्त होण्यास वेळ लागतो. तसेच खरेदी करताना शासनाचे रेट्स कॉन्ट्रॅक्ट नसतात, हा दुसरा विषय होता. या वेळेस इ-टेंडरिंग प्रक्रिया राबविली परंतु त्याला देखील काही अवधी लागतो. बऱ्याच वेळेस प्रोसेस सुरु असताना समितीकडून योजना बदलली जाते. त्यामुळे वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना थोडा विलंब होतो व शासनाच्या त्या वेळापत्रकाप्रमाणे होऊ शकत नाही. परंतु जिल्हा परिषद या वेळेस कालबद्ध कार्यक्रम राबवून त्या योजना राबविलेल्या आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, अनेकदा व्यक्तीगत लाभाच्या योजनेचा लाभ ५० लाभार्थ्यांना द्यायचा असतो, परंतु १०० किंवा त्यापेक्षा अधिक अर्ज प्राप्त होतात. त्यामुळे लाभार्थी निवडीमध्ये अडचण निर्माण होते. पंचायत समिती स्तरावर देखील असे असते. यावर यांनी समितीस अशी माहिती दिली की, प्रचंड मागणी असलेल्या योजनांकरिता लॉटरी पद्धत करता येऊ शकते काय, ते पहाण्यात येईल. यावर समितीने अशी विचारणा केली की, घरकूल योजना असेल किंवा कृषी विभागाशी संबंधित योजना असेल, त्यांना मोठ्या प्रमाणात मागणी असते. बरेच जण नियमामध्ये बसत असतात. परंतु सर्वांना लाभ देता येत नाही. सम कॅटेगिरीतील व्यक्तींची लॉटरी केल्यास चालू शकते, पूर्वी जिल्हा परिषद सदस्यांद्वारे किंवा लोकप्रतिनिधी यांच्या शिफारशीनुसार योजना वाटप होत होती. त्यानंतर आलेल्या शासन निर्णयानुसार थेट लोकांद्वारे अर्ज मागविण्यात येतात. परंतु ज्यांना माहिती आहे, असेच ठराविक लोक अर्ज करतात व लाभ घेतात. बऱ्याच जणांना कोणती योजना केव्हा आली, हे माहीत नसते. यामध्ये प्रतिनिधींचा शिरकाव होतो. त्यामुळे गरजुंना लाभ मिळत नाही. त्यामुळे जिल्हा परिषद सदस्य किंवा लोकप्रतिनिधींच्या शिफारसीनुसार योजनेतील साहित्याचा लाभ मिळाला पाहिजे, असे समितीने मत व्यक्त करुन पुढे विचारणा केली की, लेखी माहितीत नमुद केलेले आहे की, २०१२-२०१३ मध्ये १० योजनांपैकी एकूण २ योजनेची अंमलबजावणी करण्यात आली. उर्वरित ८ योजनांकरिता निविदा अंतिम न झाल्यामुळे दर निश्चित झाले नाही. तर या निविदा अंतिम का होऊ शकल्या नाहीत. यावर समाजकल्याण अधिकारी (प्र) यांनी समितीस सांगितले की, दर निश्चित न झाल्यामुळे निविदा अंतिम होऊ शकल्या नाही. समितीचे या उत्तरावर समाधान झाले नसल्याने समितीने पुढे विचारणा केली की, ८ योजना लॅप्स होण्याचे कारण काय आहे, या प्रश्नावर समाजकल्याण अधिकारी (प्र) यांनी समितीस विदित केल की, उपलब्ध अभिलेखांमध्ये निविदा अंतिम न झाल्यामुळे त्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही असे दिलेले आहे. या उत्तरावर असमाधान व्यक्त करित समितीने आणखी विचारणा केली की, साक्षीस समितीसमोर हजर होताना अधिकाऱ्यांस सर्व माहीत असणे आवश्यक आहे.

यावर समाजकल्याण अधिकारी (प्र) यांनी समितीस माहिती दिली की, निविदा दिल्यानंतर आपल्याकडे ३ सप्लायर आले पाहिजे. बऱ्याच वेळेस असे होत नाही. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ही २०१२-२०१३ मधील बाब आहे. १० योजनांपैकी ८ योजना लॅप्स होण्याची कारणे काय आहेत, यामध्ये अधिकाऱ्यांनी हलगर्जीपणा केलेला आहे. यासंदर्भात कारवाई प्रस्तावित करण्याची आवश्यकता आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, हा निधी पुढील वर्षी खर्च करण्यात आला आहे. यावर समाजकल्याण अधिकारी (प्र) यांनी समितीस अशी माहिती दिली की, या ८ योजनांचा राहिलेला निधी खर्च झालेला आहे.यावर समितीने असमाधान व्यक्त करत पुढे विचारणा केली की, निधी खर्च झाला असेल. सदरहू निधी त्याच वर्षी त्या योजनेवर खर्च होणे आवश्यक होते. त्या वर्षी या योजनेचे लाभार्थी लाभापासून वंचित राहिलेले आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, खरेदीची प्रक्रिया पूर्वीपेक्षा सोपी कशी करता येईल, त्याबाबत पहाण्यात येईल. याकरिता आणखी आवश्यक बाबी काय करता येईल ते पहाण्यात येईल. इ-टेंडरिंगचा वेटींग कालावधी कमी आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले की, २०१५-२०१६ करिता इ-टेंडरिंग करुन वर्क ऑर्डर देण्यात आल्या आहेत. वाटप सुरु केलेले आहे. यावर समितीने असमाधान व्यक्त करीत विचारणा केली की, अशा पद्धतीने योजना राबविल्या जात असतील तर ही बाब योग्य नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे मत प्रतिपादन केले की, योजनेचा निधी वेळेवर खर्च करणे आवश्यक आहे.योजना लॅप्स होण्याचे कारणे प्रामुख्याने अर्ज प्राप्त करणे, त्यांची छाननी करणे याला विलंब लागतो.२०१५-२०१६ मध्ये ४ कोटी ५६ लाख रुपये खर्च केलेले आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २०१२-१३, सन २०१३-१४ व सन १४-१५ या वर्षातील प्राप्त निधी कधी खर्च करण्यात आला, या प्रश्नावर समाजकल्याण अधिकारी (प्र) यांनी अशी माहिती दिली की, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद मार्फत उपकर अंतर्गत सन २००८-०९ मध्ये ५ योजनांपैकी ३ योजनांची अंमलबजावणी करण्यात आली होती व दोन योजनांसाठी साहित्य पुरवठा करण्यात न आल्यामुळे सदरहू योजनेचा निधी सन २००९-१० मध्ये वर्ग करुन योजनेची अंमलबजावणी पूर्ण करण्यात आली असून लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. सन २०११-१२ मध्ये ११ पैकी ७ योजनांची अंबमलबजावणी करण्यात आली असून उर्वरित ४ योजनांच्या निविदा अंतिम न झाल्याने पुरवठा पूर्ण झाला नसून सदरहू निधी पुढील वर्षामध्ये वर्ग करुन त्या वर्षात योजनांची अंमलबजावणी पूर्ण करुन लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदरहू योजनांसाठी किती निधी होता,प्रत्येक वर्षी योजनेचा निधी पुढील वर्षात वर्ग करण्यात आला आहे. या समितीच्या प्रश्नावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, मागील वर्षी वित्त विभागाने शासनाच्या योजनांचा अखर्चित निधी एक वर्षा पेक्षा अधिक कालावधीपासून अखर्चित असेल तर तो समर्पित करण्याचे आदेश काढले होते. त्यानुसार एक विशेष मोहीम राबवून आम्ही एक वर्षापेक्षा जास्त कालावधी अखर्चित असलेला १२०० कोटी रुपये निधी शासनास समर्पित केला आहे. जिल्हा परिषदेला देण्यात आलेला निधी २ वर्षात खर्च करण्यात येतो. यावर समितीने अशी विचारणा केली की, समाज कल्याण विभागाने न राबविलेल्या योजनांचा एकूण अखर्चित निधी किती आहे, या समितीच्या प्रश्नावर समाजकल्याण अधिकारी (प्र) यांनी समितीस विदित केले की, सन २००८-०९ मध्ये ५०.०५ लक्ष रुपये, सन २०११-१२ मध्ये ३८ लक्ष रुपये निधी अखर्चित होता.जिल्हा परिषदेतील उत्पन्नाच्या २० टक्के निधी समाज कल्याण विभागासाठी दरवर्षी राखीव ठेवावा लागतो. सदरहू निधी योग्य नियोजन करुन त्याच वर्षी खर्च केला नाही तर तो अनुशेष पुढील वर्षात वर्ग करावा लागतो. समाज कल्याण विभागाने सदरहू निधी त्या वर्षी खर्च केला नाही तर तो अनुशेष पुढील वर्षात घ्यावा लागतो.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, मागासवर्गीयांच्या योजनांचा निधी अखर्चित ठेवण्यास जबाबदार कोण आहे, सदरहू प्रकरणी संबंधितावर जबाबदारी निश्चित करावी,सदरहू योजनांचा निधी खर्च न करण्यास कोणती अडचण होती, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, मागासवर्गीयांच्या योजना राबविण्याकरिता अनेक अडचणी येतात. अनेक योजनांसाठी लाभार्थी मिळत नाही, मागासवर्गीय प्रवर्गाचे प्रमाणपत्र वेळेत उपलब्ध होत नाही. उदाहरण द्यावयाचे झाले तर समाज कल्याण विभागाकडून सायकल वाटप योजनेकरिता मागासवर्गीय प्रमाणपत्र द्यावे लागते व ते लाभार्थींना वेळेत न मिळाल्याने प्रस्ताव सादर करु शकत नाही. सदरहू अट शिथील करण्याची आवश्यकता आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, समाज कल्याण विभागामार्फत मागासवर्गीयांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ लाभार्थींना जलद गतीने देण्याची आवश्यकता आहे. यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, यावर्षी १६ योजनांपैकी ४ योजनांसाठीच लाभार्थी उपलब्ध झाले आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, समाज

कल्याण मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी प्रस्ताव न येण्याकरिता जिल्हा परिषदच जबाबदार आहात. समाज कल्याण मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुक लाभार्थींची संख्या प्रचंड आहे. लोकांपर्यंत योजना न पोहोचविणे व त्या त्याच वर्षात न राबविणे हे समाज कल्याण विभागाचे अपयश आहे. समाज कल्याणच्या मागासवर्गीयांच्या योजना प्राप्त करुन घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात लाभार्थी इच्छुक आहेत. आपण कोणत्याही पंचायत समितीच्या कार्यालयात गेलो तर तेथे पाय ठेवण्यासाठी जागा नसते इतके लोक तेथे रोज आलेले दिसून येतात. परंतु समाज कल्याणचे अधिकारी सांगतात की समाज कल्याणच्या योजनांना प्रतिसाद मिळत नाही. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, शासन सर्व बाबींचा, लोकांचा व लोकसंख्येचा विचार करुन लाभार्थ्यांसाठी योजना निश्चित करीत असते, अनेक योजनांचा लाभ दरवर्षी तेच तेच लाभार्थी घेत असतात त्यामुळे त्यांचा लाभ सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचत नाही. लोकांना योजनांचा लाभ मिळावा याकरिता ग्रामपंचायत कार्यालयात सूचना लावली तसेच दवंडी दिली तरच लोकांना योजनांची माहिती होईल. एकाच कुटुंबातील सदस्यांना दरवर्षी योजनांचा लाभ देण्यात येतो, लाभार्थ्यांना योजनांची माहिती देण्याकरिता प्रसिध्दी दिली पाहिजे, सदर जबाबदारी ही ग्रामसेवकापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांची आहे, जिल्हा परिषदेतील एखाद्या विभागातील योजनेचा निधी का खर्च होत नाही, याचा आढावा घेण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आहे, मागासवर्गीयांच्या योजनांसाठीचा सर्व निधी खर्च होणे जिल्हा परिषदेकडून अपेक्षित आहे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व योजनांच्या निधीचा आढावा वेळोवेळी घेतला पाहिजे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सन २०१५-१६ या कालावधीमध्ये मागासवर्गीयांच्या सर्व योजनांचा अनुशेष व निधी खर्च करण्यात आला आहे. सदरहू अखर्चित निधी हा सन २०१२-१३ आर्थिक वर्षातील असून तो सन २०१३-१४ या आर्थिक वर्षामध्ये खर्च करण्यात आला आहे. सदरहू प्रकरणी योजनांचा अखर्चित निधी पुढील वर्षी का खर्च केला याबाबतची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नसून सदरहू माहिती कारणासह समितीस सादर करण्यात येईल.सदरहू योजनेचा निधी कोणत्या कारणास्तव अखर्चित राहिला तर त्याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अनुसूचित जाती व जमातींच्या लाभार्थींना योजनांपासून वंचित ठेवणाऱ्यावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी.भविष्यामध्ये असे घडू नये याकरिता सदरहू प्रकरणी संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन त्याबाबतचा अहवाल १ महिन्याच्या आत समितीस सादर करण्यात यावा असे निदेश समितीने दिले.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेला भेट देऊन सन २०१२-२०१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावर मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, अहवाल वर्षात औरंगाबाद जिल्हापरिषद व त्याअंतर्गत पंचायत समित्यांनी आपल्या उत्पन्नाच्या किमान २० टक्के रकमेतून मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी १० योजना हाती घेतल्या. परंतु त्यातील केवळ २ योजनांवरील खर्च पूर्णपणे होवून त्यांची अंमलबजावणी झाली. परंतु उर्वरित ८ योजनांकरीता (१) निवीदाच अंतिम झाल्यानसल्यामुळे (२) दर निश्चित होवू शकले नसल्यामुळे तसेच (३) लाभार्थी निवड न झाल्यामुळे पुरवठा आदेश देता आलेले नसल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणी विशिष्ट मुदतीमध्ये पूर्ण करण्यासाठी निर्गमित केलेल्या दिनांक २० जून, २००८ रोजीच्या परिपत्रकात (परिशिष्ट ४.१)सुधारणा करण्याची समितीला माहिती दिली. यासंदर्भात समिती समाधान व्यक्त करते.समिती राज्यांतील विविध जिल्हा परिषदांना भेट देत असताना मागासवर्गीयांच्या कल्याणाच्या २० टक्के निधीचा विनियोग वेळेवर होत नसल्याची बाब वारंवार दृगोच्चर झाली आहे. **विशेष घटक योजनेखाली मागासवर्गीयांच्या विविध विकास योजना राबविण्यात येत असल्यामुळे जिल्हा परिषदांनी त्यांच्या सेस फंडातून २० टक्के निधी प्रामुख्याने मागासवर्गीयांच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांवर भर द्यावा असे शासनाचे आदेश आहेत. शासनाने वेळोवेळी वेळापत्रक आखून दिलेले असले तरी जिल्हापरिषद स्तरावर त्याचे पालन केले जात नाही. परिणामी मागासवर्गीय लोक अशा योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. याप्रकरणी शासन निर्णयानुसार मागासवर्गीयांसाठी जिल्हा परिषदेच्या एकूण उत्पन्नापैकी(भांडवली खर्च वगळून) २०% रक्कम मागासवर्गीयांच्या विविध कल्याणकारी योजना राबवून मागासवर्गीयांचे जीवनमान उंचावणे आवश्यक आहे. या जिल्हा परिषदेने नमुद वर्षात २०% निधी शासन निर्णयानुसार खर्च केला नसल्याबाबत संबंधितांची चौकशी करावी व त्यात दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करावी तसेच यासंदर्भात ग्रामविकास विभागाने साक्षीदरम्यान आश्वासित केल्याप्रमाणे दिनांक २० जून, २००८ रोजीच्या परिपत्रकात सुधारणा करावी व २० टक्के निधीच्या संदर्भातील शासन निर्णयात पुरेशी स्पष्टता आणावी तसेच याबाबत कालबध्द रितीने आढावा घ्यावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण चोवीस

## जिल्हा परिषद, औरंगाबाद (प्रशासन)

### शिक्षण संचालकानी ईको फ्रेंडली पॉलीमर बेंचेस खरेदीचे दर निश्चित केल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १५ ते १७ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत औरंगाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली. सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक १ वर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. शासकीय अनुदानातून घेतलेल्या योजनांवर अहवाल वर्षात शासकीय अनुदानाची रक्कम खर्च होवू शकली नाही त्याची कारणे काय आहेत. याबाबत समितीने सर्वसाधारण शिक्षण विभागांतर्गत "जिल्ह्यातील शाळांना नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत बेंचेस पुरविणे" या योजनेसंदर्भात विचारणा केली की, सदर बाबींवरील खर्च सन २०१४ मध्ये केलेला आहे. सन २०१४ मध्ये किती आणि कोठून बेंचेस खरेदी करण्यात आले होते आणि त्याचा दर किती होता याचा तपशील दिलेला नाही. यावर प्रभारी शिक्षणाधिकाऱ्यांनी समितीस विदीत केले की, या विषयी शासन स्तरावरील एक पत्र आहे. शिक्षण संचालक यांनी राष्ट्रीय स्तरावर निविदा मागवून बेंचेसचे दर निश्चित केले होते. जिल्हा परिषदेला बेंचेस खरेदी करावयाचे असतील तर त्यांनी शिक्षण संचालक, प्राथमिक यांच्याकडून माहिती घेऊन पुढील बेंचेस खरेदी करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार शिक्षण संचालक यांनी दिनांक २७-१२-२०१२ रोजी बेंचेस खरेदीचे दर जिल्हा परिषदेला कळविले होते. यामध्ये ए, बी, सी आणि डी टाईप अशी पॉलीमर बेंचसचे दर होते आणि त्यानुसार ते खरेदी करण्यात आले आहेत. यावर समितीने पुढे विचारणा केली की, संचालक स्तरावर दर ठरविले जातात काय, संचालकांनी निश्चित केलेले दर जिल्हा परिषदेला बंधनकारक आहेत काय, लेखा संहितेत याबाबत काय तरतूद आहे. यावर शिक्षणाधिकारी यांनी खुलासा केला की, शासनाने शिक्षण संचालकांना असे कळविले आहे की, राष्ट्रीय स्तरावर निविदा मागवून दर निश्चित करण्यात आले आहेत. शिक्षण संचालकांना संबंधित एजन्सीजकडून बेंचेस खरेदी करण्याबाबतचे निर्देश दिले आहेत. ज्या शिक्षणाधिकारी यांना बेंचेस खरेदी करावयाचे असतील तर त्यांनी त्यांची मागणी शिक्षण संचालकांकडे देणे अभिप्रेत आहे. अशा प्रकारचे एक पत्र आहे. यानुसार शिक्षण संचालकांनी दोन एजन्सी नियुक्त केल्या होत्या. यामध्ये दोन साईजचे बेंचेस निश्चित केले होते. शिक्षण संचालकांनी हे दर सुमोटो निश्चित केलेले नाहीत. दर निश्चिती शिक्षण संचालकांच्या स्तरावरुन झालेली आहे. पत्र हे शासनाचे आहे. यावर समितीने शंका उपस्थित केली की, शासनाचे पत्र बंधनकारक असते काय, शासनाने बेंचेसचा दर करार करुन घ्यायला हवा होता. त्यानंतर दर कराराचे दर जिल्हा परिषदेला बंधनकारक होतात. यावर पुन्हा शिक्षणाधिकारी यांनी हे पत्र शासनाचे असून, त्यानुसार कार्यवाही केलेली असल्याचे स्पष्ट केले. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अधिक स्पष्ट केले की, राष्ट्रीय स्तरावर निविदा मागवून दर निश्चित करण्यात आले आहेत. शिक्षण संचालकांना संबंधित एजन्सीजकडून बेंचेस खरेदी करण्याबाबतचे निर्देश दिले आहेत. ज्या शिक्षणाधिकारी यांना बेंचेस खरेदी करावयाचे असतील तर त्यांनी त्यांची मागणी शिक्षण संचालकांकडे देणे अभिप्रेत आहे. अशा प्रकारचे एक पत्र असून ते समितीला वाचून दाखविण्यात आले ते पुढील प्रमाणे "जिल्हापरिषद, महानगरपालिका स्तरावर शासनाच्या विविध योजनांतर्गत इको फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्था आवश्यकतेनुसार खरेदी करावयाची असल्यास शिक्षण संचालक प्राथमिक व महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडून इको फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्थेचे निर्देश प्राप्त करुन घेण्यात यावे. इको फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्था खरेदी करताना परिच्छेदमधील २ नुसार जास्त खरेदी होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच वस्तुची खरेदी करताना वित्तीय नियमावली खरेदीचे नियमाबाबतचें पालन करुन खरेदी करण्यात यावेत. जिल्हापरिषद, महानगरपालिका स्तरावर शासनाच्या विविध योजनांतर्गत इको फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्था आवश्यकतेनुसार खरेदी करावयाची असल्यास शिक्षण संचालक प्राथमिक व महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडून इको फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्थेचे निर्देश प्राप्त करुन घेण्यात यावे."

सदर पत्रात राज्यातील प्राथमिक शाळांना इको फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्था (ड्युअल डेस्क) पुरविण्याकरिता तेराव्या वित्त आयोगामधून निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. सदर निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर ड्युअल डेस्क खरेदी करण्याकरिता शिक्षण संचालनालयाने राष्ट्रीय स्तरावर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. या निविदेमध्ये मेसर्स ओंकार शॉपी यांची निविदा रुपये ३१८६ (स्टँडर्ड साईज) आणि मेसर्स अथर्व ट्रेडिंग कंपनी यांची रुपये ३०५१ (स्मॉल साईज) एवढी निविदा दर मान्य करण्यात आलेली आहे.

समितीने विचारणा केली की, यासंदर्भात निविदा काढल्या होत्या काय, दर मागविले होते काय आणि त्यापेक्षा वेगळे इतर दर आले होते काय तसेच जनरल बॉडीमध्ये ठराव घेण्यात आला होता काय, जिल्हा परिषदेच्या स्तरावर शिक्षण संचालकाकडून सदर बेंचेस घ्यायचे म्हणून घेतले आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदीत केले की, जिल्हा परिषदेच्या स्तरावरुन निविदा काढण्यात आली नाही. त्यांच्या स्तरावर जे दर निश्चित झाले होते, त्यानुसार खरेदी केलेली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सदर पत्रात बेंचेस अमुक एजन्सीकडून खरेदी करण्यात यावे असे कोठेही लिहील्याचे दिसून येत नाही. सदर पत्रात फक्त दर नमूद केले असल्याचे समितीने स्पष्ट करुन परिच्छेद २ मधील दरापेक्षा जास्त दराने खरेदी होणार नाही. याची दक्षता घेण्यात यावी याचा अर्थ काय आहे अशी विचारणा केली. परंतू समितीस समाधानकारक उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे समितीने यासंदर्भात चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश दिले.

**समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

(१) शिक्षण संचालक यांनी दिनांक २७ डिसेंबर, २०१२ रोजी इको फ्रेंडली पॉलीमर बेंचेस खरेदीचे दर निश्चित करुन सर्व जिल्हा परिषदांना पत्राव्दारे कळविले असून महाराष्ट्र शासनाच्या उप सचिवांनी दिनांक ७ जुलै, २०११ रोजी मेसर्स ओमकार शॉपी यांच्याकडून बेंचेस घेण्यात यावे असे पत्र शिक्षणाधिका-यांना दिले असल्याची माहिती समितीस देण्यात आली व त्यानुसार औरंगाबाद जिल्हा परिषदेमध्ये बेंचेस खरेदी करण्यात आले आहेत. सदरहू प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश समितीने दिले असून त्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले ?

(२) महाराष्ट्र शासनाच्या उप सचिवांनी आपल्या पत्रात अमुक एका एजन्सीकडून खरेदी करण्यात यावे असे सुचविल्याचे दिसुन येत नाही. परंतू पत्रातील संदिग्धतेचा फायदा घेऊन जिल्हा परिषद स्तरावर खरेदीमध्ये अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे अशा अनियमितता टाळण्याकरीता शासन स्तरावरुन कोणती उपाययोजना करण्यात येत आहे ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

(१) शिक्षण संचालक यांनी दिनांक २७ डिसेंबर, २०१२ रोजी ईको फ्रेंडली पॉलीमर बेंचेस खरेदीचे दर निश्चित करुन सर्व जिल्हा परिषदांना पत्राद्वारे कळविले असून महाराष्ट्र शासनाच्या उप सचिवांनी दिनांक ७ जुलै, २०११ रोजी मेसर्स ओमकार शॉपी यांच्याकडून बेंचेस घेण्यात यावे असे पत्र शिक्षणाधिकाऱ्यांना दिले असल्याची माहिती समितीस देण्यात आली व त्यानुसार औरंगाबाद जिल्हा परिषदेमध्ये बेंचेस खरेदी करण्यात आले आहेत. सदरहू प्रकरणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या स्तरावरुन चौकशी करण्यात आली. सदर चौकशीमध्ये उपलब्ध अभिलेख्यानुसार मा. उपसचिव, महाराष्ट्र राज्य यांचे पत्रानुसार शिक्षण संचालनालय, पुणे दिनांक २९ जुलै, २०११ अन्वये ज्या जिल्हा परिषद/ महानगर पालिका शासनाच्या विविध योजनेअंतर्गत इको फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्था आवश्यकतेनुसार खरेदी करावयाची असल्यास शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून इको फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्थेचे विनिर्देश प्राप्त करुन घ्यावेत अशा सुचना दिलेल्या आहे. त्यानुसार मा.शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांचे पत्र क्रमांक प्राशिस/बशिहका/६००/EPSA/२०११ दिनांक १२/७/२०११ अन्वये इको-फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्था (EPSA-DESK) स्टँडर्ड साईज मॉडेल खरेदीबाबत विनिर्देश दिले असल्यामुळे त्यानुसार खरेदी करण्यात आली आहे. त्यामध्ये मे.ओंकार शॉपी यांची निविदा रुपये ३१८६/- (स्टँडर्ड साईज) आणि मे. अथर्व ट्रेडिंग कंपनी यांची रुपये ३०५१/- (स्मॉल साईज) एवढा निविदा दर मान्य करण्यात आल्याचे नमुद केले होते. त्यानुसार जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी त्यावेळी मे.ओंकार शॉपी, बीड, शॉप नं.८ स्टेडीयम कॉम्प्लेक्स बीड यांना दिनांक १/३/२०१२ रोजी रुपये २४,९७,८२४/- चे इको फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्था (स्टँडर्ड साईज) मॉडेल पुरवठा करणेबाबतचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार जिल्ह्यातील पात्र शाळांना इको फ्रेंडली डयुअलडेस्क चे वाटप करण्यात आले व त्याचे शाळा स्तरावर नमुना नं. ३२ वर नोंदी घेण्यात येवून शाळेकडून उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यात आलेले आहेत. त्यानुसार संबंधितास देयके अदा करण्यात आलेली आहेत असे चौकशी अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.) यांनी अभिलेख्यांची तपासून अहवाल दिलेला आहे.

(२) महाराष्ट्र शासनाच्या उप सचिवांनी आपल्या पत्रात अमुक एका एजन्सीकडून खरेदी करण्यात यावे असे सुचविल्याचे दिसुन येत नाही. परंतु त्यांनी निविदेमध्ये मे.ओंकार शॉपी, यांच्या राष्ट्रीय स्तरावर निविदा मागविण्यात आल्या होत्या या निविदेमध्ये मे.ओंकार शॉपी, यांची निविदा रुपये ३१८६/- (स्टँडर्ड साईज) आणि मे. अथर्व ट्रेडिंग कंपनी यांची रुपये ३०५१/- (स्मॉल साईज) एवढा निविदा दर मान्य करण्यात आला आहे. सदरील डयुअलडेस्क चा पुरवठा इयत्ता ५ वी ते १० वी च्या मुलांना करावयाचा असल्याने त्यासाठी इको फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्था (स्टँडर्ड साईज मॉडेल) याची निवड करुन मे.ओंकार शॉपी, शॉप नं.८ स्टेडीयम कॉम्प्लेक्स, बीड यांना दिनांक १/३/२०१२ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.

शासनाच्या विविध योजनेअंतर्गत इको फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्था आवश्यकतेनुसार खरेदी करावयाची असल्यास मा.शिक्षण संचालक (प्रा.), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून दिनांक १२/०७/२०११ चे पत्रान्वये विनिर्देश प्राप्त करुन घेवून इको फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्थेची खरेदी करण्यात आली आहे. सद्य:स्थितीमध्ये महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५ नुसार ई-निविदा प्रक्रियेव्दारे खरेदी प्रक्रियेव्दारे खरेदी प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

**समितीस शालेय शिक्षण विभागाकडून उपरोक्त मुद्यांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

याबाबत जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २४ मे, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शिक्षण संचालक यांनी दिनांक २७ डिसेंबर, २०१२ रोजी इको फ्रेंडली पॉलीमर बेंचेस खरेदीचे दर निश्चित करुन सर्व जिल्हा परिषदांना पत्राद्वारे कळविले असून महाराष्ट्र शासनाच्या उप सचिवांनी दिनांक ७ जुलै, २०११ रोजी मे.ओमकार शॉपी यांच्याकडून बेंचेस घेण्यात यावे असे पत्र शिक्षणाधिकाऱ्यांना दिले असल्याची माहिती समितीला देण्यात आली व त्यानुसार औरंगाबाद जिल्हा परिषदेमध्ये बेंच खरेदी करण्यात आले आहेत. समितीने पुढे विचारणा केली की, सदरहू प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश समितीने दिले असून त्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले. यावर विभागीय सचिवांनी समितीस विदीत केले की, या मुद्याबाबत शालेय शिक्षण विभागाचा संबंध एवढयापुरता येतो की, शिक्षण विभागाने राज्य स्तरावर त्या वर्षात खरेदी केली होती. राष्ट्रीय स्तरावर टेंडर काढले होते त्यामध्ये जो रेट आला तो सर्व जिल्हयांना कळविला गेला होता. त्या रेटने सर्व जिल्हयांनी खरेदी करावी असे शिक्षण विभागाने केव्हाही पत्र दिलेले नाही. शिक्षण विभागाचे पत्र माझ्याकडे उपलब्ध आहे. त्यात म्हटले आहे की, "जिल्हा परिषद, महानगरपालिका स्तरावर शासनाच्या विविध योजनांतर्गत आपल्याकडून इको फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्था आवश्यकतेनुसार खरेदी करावयाची असल्यास शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून दिनांक १२.७.२०११ च्या पत्रान्वये विनिर्देश प्राप्त करुन घ्यावेत. इको फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्था खरेदी करताना परिच्छेद २ मध्ये दिलेल्या दरापेक्षा जास्त दराने खरेदी होणार नाही याची दक्षता घ्यावी. खरेदीबाबत असलेल्या प्रचलित वित्तीय नियमावलीचे पालन करुन खरेदी करण्यात यावी." याबाबत शिक्षण विभागाकडून अशी खरेदी करण्याबद्दल कोणतेही निर्देश दिलेले नव्हते. जिल्हा परिषदेने आपल्या सेस फंडातून ही खरेदी केली आहे.

यावर समितीने पुढे आणखी विचारणा केली की, शासन निर्णय सेस फंडातून करावयाच्या खरेदीसाठी बंधनकारक आहे, शासनाने दर करार केला आहे, रेट निश्चित केलेले आहेत असे कॅफो सांगतात. शिक्षण विभागाने आदेश दिले नसतील तर निविदा न काढता खरेदी कशी केली. यावर विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, दर करार करण्याचे अधिकार फक्त उद्योग विभागाला आहेत. इतर विभागाकडून दर करार केले जात नाहीत. शिक्षण विभागाने आपल्या स्तरावर जेवढा निधी उपलब्ध होता त्या प्रमाणात खरेदी करण्यासाठी निविदा काढली होती आणि त्यानुसार खरेदी केली आणि सर्व जिल्हयांना पुरवठा केला. आता ज्या खरेदीबद्दल चर्चा सुरु आहे त्याबद्दल शिक्षण विभागाने काढलेल्या निविदेशी काहीही संबंध नाही.

समितीने पुन्हा विचारणा करुन खात्री केली की, शिक्षण विभागाच्या निधीकरिता शासनाने दर निश्चित केला असेल तर जिल्हा परिषदेला तो दर बंधनकारक होता का, **यावर विभागीय सचिवांनी पुन्हा स्पष्ट केले की, याच पुरवठादारांकडून खरेदी करावे असे बंधनकारक केलेले नाही.** समितीने नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, जिल्हा परिषदेने निविदा न काढता सेस फंडातून खरेदी का केली, निविदा काढणे आवश्यक होते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासनाकडून राष्ट्रीय स्तरावर निविदा निघाली त्यामध्ये रेट निश्चित केला होता. शासनाच्या पत्रात म्हटले आहे की, जिल्हा परिषदेला खरेदी करावयाची असेल तर शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून विनिर्देश प्राप्त करुन घ्यावेत. संचालकांकडून एक पत्र दिनांक १२.७.२०११ रोजी दिले गेले, त्यामध्ये रेट नमूद केले होते व कोणाकडून खरेदी करु शकता याबाबत उल्लेख केला होता. त्या पत्राच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेने खरेदी केली असल्याचे स्पष्ट केले.

जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून करावयाच्या खरेदीसाठी शासनाचे आदेश बंधनकारक आहेत असे वाटत नाही. जिल्हा परिषदेच्या सेसची कस्टोडियन जिल्हा परिषदेची बॉडी आहे. शासन त्याबाबत आदेश देऊ शकत नाही असे स्पष्ट करुन समितीने विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीच खुलासा करावा की, शिक्षणाधिकाऱ्यांनी सभागृहाला नक्कीच सांगितले असेल की, उपसचिव (शिक्षण) यांच्याकडून पत्र आले आहे ते मान्य करावे लागेल किंवा त्यांनी निश्चित केलेल्या एजन्सीकडून खरेदी करावी लागेल. जे आदेश प्राप्त होतात ते नेहमीच अध्यक्षांना दाखविले जातात असे नाही. याचा सोक्षमोक्ष लागला पाहिजे. शासन म्हणते की, वित्तीय नियमावलीनुसार खरेदी करावी. परंतु खरेदी करणारे त्या नियमावलीचे उल्लंघन करतात. नियमाविरुध्द खरेदी होते हे आपल्याला ज्ञात आहे. जिल्हा परिषदेच्या बॉडीने काय ठराव केला होता, तो वाचून दाखवा. मे.ओमकार शॉपी यांची निविदा रु ३१८६/- व मे.अथर्व ट्रेडिंग कंपनी यांची निविदा रु ३०५१ ची होती. दोन्ही निविदाकारांच्या दरामध्ये १३५ रु?पयांचा फरक आहे. कोणी चौकशी केली, जिल्हा परिषदेचा ठराव काय होता याचा कुठेही उल्लेख केलेला नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यासंदर्भात शिक्षणाधिकारी यांनी चौकशी केली असल्याचे विदीत केले असता समितीने ज्या विभागामध्ये अनियमितता झाली तो शिक्षण विभाग आहे. त्याच विभागाचे प्रमुख चौकशी कशी करू शकतात असा आक्षेप घेतला. शिक्षणाधिकारी या शब्दाला महत्व आहे. तेव्हा कोण कार्यरत होते हे महत्वाचे नाही. वरिष्ठ पातळीवरु?न या मुद्याची पुन्हा चौकशी करावी. शिक्षण विभागाचे आदेश बंधनकारक नसतील तर ते कोणी लागू केले हे कळले पाहिजे. सभागृहाला शासनाचे निर्देश आहेत असे सांगितले जाते. समितीच्या या मताशी सहमत होवून विभागीय सचिवांनी प्रस्तुत प्रकरणात शासनाकडे अहवाल आला तर शालेय शिक्षण विभाग दोषींवर कारवाई करेल असे समितीस आश्वस्त केले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, यासंदर्भात जिल्हा परिषदेचा ठराव काय होता. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस पुढे विदीत केले की, जिल्हा परिषद उपकर अनुदान सन २०११-१२ या वर्षासाठी जिल्हा परिषद, औरंगाबाद अंतर्गत जिल्हा परिषदेने २५ लाख रु?पये तरतूद ठेवण्यात आली आहे. माननीय शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र दिनांक १२.७.२०११ अन्वये ड्युएल डेस्क इको फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्था स्टॅण्डर्ड साईज मॉडेल मे.ओमकार शॉपी यांच्यामार्फत निश्चित केलेल्या रु?.३१८६/- या दराने खरेदी करावयाची आहे. सदर खरेदीस क्रमांक १२५ व १२६ नुसार परवानगी देण्यात येत आहे. मालमत्ता संपादनासाठी १२८ नुसार परवानगी देण्यात येत आहे.

समितीने पुढे आणखी विचारणा केली की, शिक्षण विभागाचे आदेश लागू नव्हते तर त्याचा उल्लेख ठरावामध्ये कसा झाला. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, शासनाचे पत्र आहे की, जिल्हा परिषद महानगरपालिका स्तरावर शासनाच्या विविध योजनांतर्गत इको फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्था आवश्यकतेनुसार खरेदी करावयाची असल्यास शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून दिनांक १२.७.२०११ च्या पत्रान्वये विनिर्देश प्राप्त करुन घ्यावेत. इको फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्था खरेदी करताना परिच्छेद २ मध्ये दिलेल्या दरापेक्षा जास्त दराने खरेदी होणार नाही याची दक्षता घ्यावी. खरेदीबाबत असलेल्या प्रचलित वित्तीय नियमावलीचे पालन करुन खरेदी करण्यात यावी. शासनाच्या पत्राच्या अनुषंगाने संचालकांनी खरेदीसंबंधीचे पत्र जिल्हापरिषदेला पाठविले होते. संचालकांच्या पत्राच्या अनुषंगाने जिल्हापरिषदेने ही खरेदी केलेली आहे. या संदर्भातील दोन्ही पत्रांमध्ये नियमांचे पालन करण्यासंदर्भात म्हटलेले आहे. या दोन पत्रांच्या आधारे ही खरेदी करण्यात आलेली आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, या खरेदीसंबंधीचे जर खुल्या निविदा काढल्या असल्या, तर यापेक्षाही कमी किंमतीमध्ये ही खरेदी करता आली असती. पत्राच्या अनुषंगाने ठराविक किंमतीच्या वर खरेदीची किंमत असू नये, असे म्हटले होते. परंतु त्याच ठराविक किंमतीपेक्षा कमी किंमतीमध्ये खरेदी करु नये, असे तर त्यात म्हटले नव्हते. शासनाचा जर फायदा होत असेल तर खुल्या निविदा काढून कमीत कमी किंमतीमध्ये ही खरेदी करण्याचा का प्रयत्न केला गेला नाही. यावर विभागीय सचिवांनी ही खरेदी राज्य स्तरावरील नसून जिल्हा पातळीवरील खरेदी होती. या जिल्हापातळीवरील खरेदीमध्ये खुल्या निविदा पध्दत जरी अवलंबविली असती तरी यापेक्षा कमी किंमत आली नसती असे समितीस स्पष्ट केले. यावर समितीने प्रस्तुत प्रकरणातील चौकशी अहवालाशी व खरेदीसंबंधी समिती समाधानी नसून या खरेदीची चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी पातळीवर होणे आवश्यक आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संदर्भातील सविस्तर अहवाल मागवून त्याची काटेकोर चौकशी करावी असे निदेश दिले.

**अभिप्राय व शिफारशी**

समितीने औरंगाबाद जिल्हापरिषदेला भेट देवून सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावर जिल्हापरिषदेस योजनानिहाय शासनाकडून प्राप्त व अपेक्षित अनुदान व उक्त वर्षात योजनानिहाय संपूर्ण रक्कम खर्च झाल्याबाबत आढावा घेतला असता समितीस सर्वसाधारण शिक्षण विभागांतर्गत "जिल्ह्यातील शाळांना नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत बेंचेस पुरविणे" या बाबींवरील खर्च उशीराने म्हणजेच सन २०१४ मध्ये केल्याची माहिती प्राप्त झाली. शिक्षण संचालक यांनी दिनांक २७ डिसेंबर, २०१२ रोजी इको फ्रेंडली पॉलीमर बेंचेस खरेदीचे दर निश्चित करुन सर्व जिल्हा परिषदांना पत्राव्दारे कळविले असून महाराष्ट्र शासनाच्या उप सचिवांनी दिनांक ७ जुलै, २०११ रोजी मेसर्स ओमकार शॉपी यांच्याकडून बेंचेस घेण्यात यावे असे पत्र शिक्षणाधिका-यांना दिले असल्याची माहिती समितीस देण्यात आली. यासंदर्भात चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत समितीने सूचित करुनही जिल्हापरिषदेने संपूर्ण प्रकरणाची नियमानुसार चौकशी करुन अहवाल सादर केलेले नाहीत. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.

सदरहू प्रकरणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या स्तरावरुन चौकशी करण्यात आली. सदर चौकशीमध्ये उपलब्ध अभिलेख्यानुसार मा. उपसचिव, महाराष्ट्र राज्य यांचे पत्रानुसार शिक्षण संचालनालय, पुणे ज्या जिल्हा शासनाच्या विविध योजनेअंतर्गत इको फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्था आवश्यकतेनुसार खरेदी करावयाची असल्यास शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून इको फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्थेचे विनिर्देश प्राप्त करुन घ्यावेत अशा सुचना दिलेल्या आहे. त्यानुसार मा.शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांचे पत्र क्रमांक प्राशिस/बशिहका/६००/EPSA/२०११ दिनांक १२/७/२०११ अन्वये इको-फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्था (EPSA-DESK) स्टँडर्ड साईज मॉडेल खरेदीबाबत विनिर्देश दिले असल्यामुळे त्यानुसार खरेदी करण्यात आली आहे अशी माहिती समितीस प्राप्त झाली.

महाराष्ट्र शासनाच्या उप सचिवांनी आपल्या पत्रात मे.ओमकार शॉपी याच एजन्सीकडून खरेदी करण्यात यावे असे सुचविल्याचे दिसुन येत नाही. परंतु शासनाकडून राष्ट्रीय स्तरावर निविदा मागविण्यात आल्या होत्या. या निविदेमध्ये मे.ओमकार शॉपी, यांची निविदा रुपये ३१८६/- (स्टँडर्ड साईज) आणि मे. अथर्व ट्रेडिंग कंपनी यांची रुपये ३०५१/- (स्मॉल साईज) एवढा निविदा दर मान्य करण्यात आला होता. परंतू इको फ्रेंडली पॉलीमर बेंच खरेदी करताना जिल्हापरिषदेने खुल्या निविदा प्रक्रियेचा अवलंब करुन स्पर्धात्मक दरातून जिल्हा परिषदेचा फायदा करण्याबाबत या क्षेत्रातील लघुउद्योजकांना आजमावणे आवश्यक होते असे समितीचे मत आहे. शासनाने केवळ दरांना मान्यता दिलेली होती. शासनाचे अमुक एका खरेदीदाराकडून खरेदी करण्यात यावी असे बंधनकारक आदेशही नव्हते. त्यामुळे शालेय शिक्षण विभागाच्या व शिक्षण संचालक कार्यालय यांच्या संदिग्ध पत्रांमुळे अशी परिस्थिती उद्‌भवल्याचेही समितीचे मत आहे. **यापुढील काळात महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५ नुसार (परिशिष्ट ५.१)ई-निविदा प्रक्रियेव्दारे खरेदी प्रक्रियेव्दारे खरेदी प्रक्रिया राबविण्यात येत असल्याची माहिती समितीला प्राप्त झाली. याबाबत समिती समाधान व्यक्त करते. त्यानुसार यापुढील काळात अशा प्रकारच्या खरेदी ई-निविदेद्वारे करण्याबाबतच्या दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयाचे काटेकोर अंमलबजावणी करावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण पंचवीस

## जिल्हा परिषद, औरंगाबाद (प्रशासन)

### पंचायत समिती गंगापुर अंतर्गत अपहारीत रक्कमेच्या वसुली संदर्भात

पंचायती राज समितीने दिनांक १५ ते १७ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत औरंगाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली. सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक १ मधील जिल्हापरिषदेतील अपहाराच्या व गैरव्यवहाराच्या प्रलंबित प्रकरणांबाबत समितीने जिल्हा परिषदेमध्ये अफरातफर तसेच गैरव्यवहारासंबंधात ३१ मार्च, २०१४ अखेरपर्यंत किती प्रकरणे केव्हापासून व कोणत्या कारणाने प्रलंबित आहेत. सदर प्रकरणात किती रक्कम वसुल व्हावयाची आहे व त्यापैकी आतापर्यंत किती रक्कमेची वसुली झाली आहे. वा किती रक्कम वसुल व्हावयाची आहे. वसुली न होण्याची कारणे काय आहेत. सदर प्रकरणामध्ये किती व्यक्ती दोषी असल्याचे आढळून आले आहे. व त्यांच्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे. प्रलंबित प्रकरणाचा निपटारा करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदेने काय उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे अशी विचारणा केली असता जिल्हा परिषद औरंगाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

**उपरोक्त प्रश्नासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या कडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

जिल्हा परिषदेच्या विविध विभागामध्ये अफरातफरीचे एकूण (१२६) प्रकरणे प्रलंबित आहेत. विभाग निहाय तपशिल खालील प्रमाणे.

**पंचायत विभाग :**

जिल्हा परिषदेमध्ये अफरातफर तसेच गैरव्यवहारासंबंधात ३१ मार्च, २०१४ अखेरपर्यंत एकूण १०९ प्रकरणे १९६२/६३ पासून प्रलंबित होती. सदर प्रकरणापैकी ग्रामनिधीच्या ५७ प्रकरणामध्ये रु. ७,४८,५८७/- एवढी रक्कम गुंतलेली होती. त्यापैकी आतापर्यंत ५१ प्रकरणांमध्ये रु. ५,८४,४७३/- रक्कमेची वसुली करण्यात आलेली आहे व ६ प्रकरणामध्ये रुपये १,६४,११४/- एवढी रक्कम वसूल होणे बाकी आहे. तसेच जरोयो ची ५२ प्रकरणे प्रलंबित होती व त्यात रु.१५,९६,५९६/- रक्कम गुंतलेली होती. सदरील प्रकरणापैकी २४ प्रकरणात संपूर्णत: वसूली झाली असून एकूण वसुली रु ८,२५,६१०/- करण्यात आलेली आहे. उर्वरीत २८ प्रकरणात रु,७,७०,९८६/- रक्कम गुंतलेली असुन वसुल होणे बाकी आहे. सदर पैकी उपरोक्त नमुद प्रकरणांमध्ये १५६ ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी (४५ कार्यरत, ९० सेवानिवृत्त व २१ मयत) तसेच ५६ सरपंच दोषी असल्याचे आढळून आल्याचे आहे.

दोषी आढळून आलेल्या कार्यरत ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांचे कडुन वसुल करण्याकरिता या स्तरावरुन दि. ०३-०९-२०१०, २७-०९-२०१०, ११-०१-२०११ (अ.शा.पत्र) २९-०८-२०१२ (का.दा.नो) व ०७-०७-२०१५ (का.दा.नो.)व्दारे गटविकास अधिकारी यांना वारंवार कळवुन वसुल पात्र रक्कमा वसुल करण्यासंबंधी सक्त निर्देश दिलेले आहेत. तसेच विस्तार अधिकारी (पंचायत) यांच्या जिल्हा परिषद स्तरावरील आढावा बैठक दि. २०-०३-२०१५, ०६-०६-२०१५, ३०-०६-२०१५, ०९-०७-२०१५ रोजी अपहार प्रकरणातील रक्कमा वसुल करुन प्रकरणे निकाली काढण्याबाबत आदेशीत करण्यात आलेले आहेत प्रकरणात दोषी आढळुन आलेल्या कार्यरत ४५ ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांची १ वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात या कार्यालयाचे आदेश दि.२९/०९/२०१५ अन्वये बंद करण्यात आली आहे. तसेच उर्वरीत वसुल पात्र रक्कमा वसुल होण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

(१) कार्यरत ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांचेकडुन वसुलपात्र रक्कमा वसुल करण्यात आलेल्या आहेत.

(२) दोषी आढळुन आलेल्या सरपंच यांचे मालमत्तेवर वसुलपात्र रक्कमा वसुल होण्यास्तव बोजा चढविण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(३) दोषी असलेल्या परंतु सेवा निवृत्त व मयत असलेल्या ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांच्या सेवानिवृत्ती वेतन/कुटुंब निवृत्ती वेतनातुन वसुलीचे आदेश काढण्यात आले आहेत.

तसेच नियमित वसुलीसाठी पाठपुरावा करण्यात येत असुन उपरोक्त प्रमाणे वसुली बाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

**शिक्षण विभाग :**

(१) श्री. व्ही. पी. खैरनार, प्रभारी मुख्याध्यापक, प्रा. शा. नांदगांव तांडा, केंद्र तिडका, ता.सोयगांव यांचेकडे सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमातील रक्कम रुपये ३८७९०/- किचनशेड बांधकामातील रक्कम रुपये ७१३७/- व शालेय पोषण आहारातील रक्कम रुपये ६९९३२/- असे एकूण रुपये ११५८५९/- वसुलपात्र होती.

(२) संबंधितांची विभागीय चौकशी करण्यात आली असुन चौकशीअंती चौकशी अहवालाच्या आधारे संबंधितांच्या तीन वार्षिक वेतनवाढी दिनांक ७/९/२०१३ च्या आदेशान्वये कायमस्वरुपी बंद करण्यात आलेल्या आहेत.

(३) संबंधिताकडून एकूण वसुलपात्र रक्कम रुपये ११५८५९/- वसूल करणे बाबत दिनांक ७/९/२०१३ रोजी आदेश पारीत करण्यात आले आहे.

धारकाने या कार्यालयाचे आदेश दिनांक ७/९/२०१३ विरुध्द मा. अप्पर आयुक्त, औरंगाबाद येथे अपील दाखल केले आहे. अपीलावरील निर्णय प्रलंबित आहे.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना :**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत जिल्हा परिषदेमध्ये अफरातफर तसेच गैरव्यवहारासंबंधात ३१ मार्च, २०१४ अखेरपर्यंत प्राप्त तक्रारीचा चौकशी करण्यात आली असुन चौकशी अहवालानुसार १३ प्रकरणात अनियमितता झालेली आहे. त्या अनुषंगाने ६ गट विकास अधिकारी, (८) ग्राम सेवक, ७ शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता यांच्या विरुध्द संवर्ग नियंत्रण अधिका-यामार्फत विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली असुन विभागीय चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संवर्ग नियंत्रण अधिका-यांमार्फत कार्यवाही केली जाईल.

तसेच आगार कानडगांव प्रकरणामध्ये मा.जिल्हाधिकारी यांनी नेमलेल्या संयुक्त चौकशी समितीने रु. २७२५९८/- (अक्षरी दोन लक्ष बाहत्तर हजार पाचशे अठयाण्णव रुपये मात्र) एवढी रक्कम वसुली साठी निश्चित केलेली आहे. चौकशी अहवालानुसार जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाहीसाठी अहवाल मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अग्रेषित करण्यात आलेला आहे.

**वित्त विभाग :**

पंचायत समिती गंगापूर अंतर्गत सन २००६-०७ ते २०१०-२०११ या कालावधीत इंदिरा आवास योजनेत मोठया प्रमाणात अपहार झाल्याचे चौकशी दरम्यान उघडकीस आले. त्यानुसार श्री.ए.डी.राणे, कनिष्ठ लेखाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर यांना दि. १८८/१०/२०१० रोजी निलंबित करण्यात आलेले आहे. सदर अनियमिततेच्या अनुषंगाने प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचेमार्फत पोलीस स्टेशन गंगापूर येथे श्री.ए.डी.राणे, कनिष्ठ लेखाधिकारी व इतर कर्मचारी यांच्या विरुध्द दिनांक ५/१२/२०१० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने संबंधित कनिष्ठ लेखाधिकारी यांना पोलीस कोठडी व न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आलेले होते.

तसेच प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, औरंगाबाद यांनी दिनांक २८/१२/२०१० अन्वये शासनास सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने श्री.ए.डी.राणे, निलंबित कनिष्ठ लेखाधिकारी यांचेकडील वसुलपात्र रक्कमेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचाज्याचे नाव व पदनाम | वसुलपात्र रक्कम | वसुल झालेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| (१) | श्री.ए.डी.राणे, कनिष्ठ लेखाधिकारी | १,६१,१७,८५०/- | निरंक | संबंधिताकडील वसुलपात्र रक्कम रु.१,६१,१७,८५०/-जमीन महसूला प्रमाणे वसूल करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. |

उपरोक्त निलंबित कनिष्ठ लेखाधिकारी यांचेविरुध्द या कार्यालयाचे आदेश दि.३०-७-२०१३ अन्वये विभागीय चौकशी करण्यात आलेली आहे. चौकशी अधिकारी यांचे पत्र दि.८-१२-२०१४ अन्वये चौकशी अहवाल प्राप्त असून त्यानुषंगाने संबंधितांस सेवेतून बडतर्फ का करण्यात येऊ नये याबाबत अंतिम कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. संबंधितांचे पत्र दि.१८-३-२०१५ अन्वये त्यांनी खुलासा सादर केला असून संबंधिताचा खुलासा असमर्थनीय असल्याने अमान्य केला आहे. तसेच या कार्यालयाचे आदेश दि.९/६/२०१५ अन्वये संबधितास महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ४ (सात) अन्वये जिल्हा परिषद सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.

**वित्त विभाग :**

पंचायत समिती, सिल्लोड कार्यालयाची सन २०१०-११ ते सन २०१२-१३ या कालावधीत श्री.व्ही.व्ही.देवळाणकर, वरिष्ठ सहायक लेखा व श्री.डी.डब्ल्यू. गावंदे, वरिष्ठ सहायक यांनी वरिष्ठांची दिशाभूल करुन ६ व्या वेतन आयोगाचे वेतन फरक, सेवा बाह्य कालावधी, इतर देयके दुबार तयार करुन श्री.आर.के. खोतकर, सेवा निवृत्त कनिष्ठ सहायक यांना रुपये ७,४१,३७६/- व रुपये १,३०,७९४/- अशी एकूण रक्कम रु.८,७२,१७०/- एवढी रक्कम जाणिवपुर्वक जास्तीची अदाई करुन अपहार केल्याचे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड यांचे पत्र दि.११-१२-२०१३ अन्वये कळविण्यात आले होते.

त्यानुषंगाने वरिष्ठ लेखाधिकारी यांचा चौकशी अहवाल दि.४-१-२०१४ नुसार सदर बाब सिध्द झाल्याने श्री.व्ही.व्ही.देवळाणकर, वरिष्ठ सहायक लेखा यांना या कार्यालयाचे आदेश दि.३-६-२०१४ नुसार निलंबित करण्यात आले आहे. तथापि वरिल कालावधीतचे विशेष लेखा परिक्षण करणेबाबत सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, लेखा व कोष भवन, औरंगाबाद यांना कळविण्यात आले आहे. संबंधिताकडील वसुलपात्र रक्कमेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र.<br>(१) | कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम<br>(२) | वसुलपात्र रक्कम<br>(३) | वसुल झालेली रक्कम<br>(४) | शेरा<br>(५) |
|---|---|---|---|---|
| (१) | श्री.व्ही.व्ही. देवळाणकर,<br>वरिष्ठ सहायक लेखा | ८,७२,१७०/- | निरंक | |

या कार्यालयाचे आदेश दि.१४/१/२०१५ अन्वये संबंधितास शासन निर्णय दि.१४ ऑक्टोबर, २०११ मधील परि.७-अ मधील तरतूदीनुसार चौकशी अहवाल व विशेष लेखा परिक्षण अहवालावरील निर्णयाचे अधिन राहून त्याचे निलंबन रद्द करुन त्यांना पुर्नस्थापित करण्यात आले आहे. तसेच श्री.व्ही.व्ही. देवळाणकर, वरिष्ठ सहायक लेखा यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु असून विभागीय चौकशी अहवालाच्या अधिन राहून कार्यवाही करण्यात येईल.

**सामान्य प्रशासन विभाग:**

पंचायत समिती, सिल्लोड कार्यालयाची सन २०१०-११ ते सन २०१२-१३ या कालावधीत श्री.डी.डब्ल्यू. गावंदे, वरिष्ठ सहायक यांनी वरिष्ठांची दिशाभूल करुन ६ व्या वेतन आयोगाचे वेतन फरक, सेवा बाह्य कालावधी, इतर देयके दुबार तयार करुन श्री.आर.के. खोतकर, सेवा निवृत्त कनिष्ठ सहायक यांना रुपये ७,४१,३७६/- व रुपये १,३०,७९४/- अशी एकूण रक्कम रु.८,७२,१७०/- एवढी रक्कम जाणिवपुर्वक जास्तीची अदाई करुन अपहार केल्याचे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड यांचे पत्र दि.११-१२-२०१३ अन्वये कळविण्यात आले होते.

त्यानुषंगाने वरिष्ठ लेखाधिकारी यांचा चौकशी अहवाल दि.४/१/२०१४ नुसार सदर बाब सिध्द झाल्याने श्री.डी.डब्ल्यू. गावंदे, वरिष्ठ सहायक यांना या कार्यालयाचे आदेश दि.१० जून, २०१४ नुसार निलंबित करण्यात आले आहे. तथापि वरिल कालावधीतचे विशेष लेखा परिक्षण करणेबाबत सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, लेखा व कोष भवन, औरंगाबाद यांना कळविण्यात आले आहे. संबंधिताकडील वसुलपात्र रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. (१) | कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम (२) | वसुलपात्र रक्कम (३) | वसुल झालेली रक्कम (४) | शेरा (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | श्री. डी. डब्ल्यू गावंदे, वरिष्ठ सहायक | ८,७२,१७०/- | निरंक | |

श्री. डी. डब्ल्यू. गावंदे, वरिष्ठ सहायक यांची विभागीय खाते चौकशी या कार्यालयाचे आदेश दि.३/६/२०१५ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे.

**इंदिरा आवास योजना :**

सन २००६-०७ ते २००९-१० या कालावधीमध्ये पंचायत समिती, गंगापूर येथे इंदिरा आवास योजनेंतर्गत घरकुलाच्या रकमा अदा करण्यामध्ये प्राथमिक चौकशी केली असता रु.३.३३ कोटी अपहार झाल्याचे निदर्शनास आले. यामध्ये खालील अधिकारी व कर्मचाज्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली.

| अ.क्र. (१) | कर्मचाज्याचे नाव व पदनाम (२) | वसुलपात्र रक्कम (३) | वसुल झालेली रक्कम (४) |
|---|---|---|---|
| (१) | श्री.व्ही.एल.राठोड, तत्कालिन गट विकास अधिकारी (सद्या सेवानिवृत्त) | १,२९,६५,२८४/- | निरंक |
| (२) | श्री.ए.डी.राणे, कनिष्ठ लेखाधिकारी (बडतर्फ) | १,६१,१७,८५०/- | निरंक |
| (३) | श्री.व्ही.व्ही.निकम, उपअभियंता (सेवानिवृत्त) | १,६५,६२३/- | निरंक |
| (४) | श्री.डी.आर. भालकीकर, शाखा अभियंता | ४,८५,०५४/- | निरंक |
| (५) | श्री.एम.व्ही.देशपांडे, शाखा अभियंता | २६,३०९/- | निरंक |
| (६) | श्री.यु.आर. पाटील | १७,९४,४९२/- | निरंक |
| (७) | श्री.व्ही.एस. सरकटे | ९९,०००/- | निरंक |
| (८) | श्री.वाय.आर.आधुडे, शाखा अभियंता | ३१,०५३/- | निरंक |
| (९) | श्री.एस.बी.कांबळे, स्थापत्य अभि. सहाय्यक (सद्या निलंबित) | ४३,५६,६६३/- | निरंक |
| (१०) | श्री.व्ही.आर. काटकर, स्थापत्य अभि. सहाय्यक (सद्या निलंबित) | ४,३१,३७९/- | निरंक |
| (११) | श्री.बी.एन.चव्हाण, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती, गंगापूर | ३७,०००/- | २८,४००/- |

गट विकास अधिकारी श्री.राठोड यांची विभागीय चौकशी अद्याप सुरु असून उर्वरित सर्व कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी पूर्ण करण्यात आलेली आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यामुळे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. श्री.ए.डी.राणे यांचेकडील वसुलीसाठी जिल्हाधिकारी, धुळे यांना आर.आर.सी. खाली वसुलीसाठी पत्रव्यवहार केला आहे. तथापि जिल्हाधिकारी, धुळे यांचे दि.३०/११/२०१२ च्या पत्रानुसार संबंधितांकडे वसुलबाबत अवलंबिता येईल अशी मालमत्ता नसल्याने संबंधितांकडून

वसुलीची कार्यवाही करता येत नाही असे कळविले आहे. अ.क्र.३ ते १० मध्ये नुमद केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्याविरुध्द अपहारीत रक्कम वसुल करणेबाबत नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. तसेच संबंधितांच्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना त्यांचे वेतनातून अपहारीत रक्कम वसुल करणेबाबत कळवले आहे. श्री.डी.आर.भालकीकर व श्री.एम.व्ही.देशपांडे या कर्मचाऱ्यांनी वसूलीचे ओदशाविरुध्द मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे अपील दाखल केले आहे तथापि संबंधित अपील मा.न्यायालयाने निकाली काढून अपर विभागीय आयुक्त यांना दोन महिन्याच्या आत निकाल देण्याबाबत सुचित केले होते. त्यानुसार त्यांनी कर्मचाऱ्यांचे अपिल फेटाळल्यामुळे संबंधित कर्मचाज्यांच्या वेतनातून समान हप्त्यामध्ये वसुली करण्यासाठी आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार माहे ऑक्टोबर, २०१५ च्या मासिक वेतनातून वसुलीची कार्यवाही सुरु होईल. श्री.व्ही.व्ही. निकम, सेवानिवृत्त झाले असून त्यांचे सेवानिवृत्ती वेतनातून प्रतिमहा रक्कम वसूल करणेबाबत आदेशित करण्यासाठी महालेखापाल, नागपूर यांना कळविण्यात आले आहे.

श्री.व्ही.एस.सरकटे, श्री.वाय.आर.आधुडे, श्री.व्ही.आर.काटकर यांच्या वसुलीसाठी माहे ऑक्टोबर, २०१५ चे मासिक वेतनातून प्रतिमहा रक्कम वसुल करणेबाबत आदेशीत केले आहे. श्री.यु.आर.पाटील, श्री.एस.बी.कांबळे, यांचकडील वसुलीची रक्कम अनुक्रमे रु.१७,९४,४९२/- व रु.४३,५६,६६३/- आहे. तथापि श्री.यु.आर.पाटील हे नजीकच्या कालावधीत सेवानिवृत्त होत असल्याने व श्री.एस.बी.कांबळे अद्याप निलंबित असल्याने ही अपहारीत रक्कम संपूर्णत: वेतनातून वसुल करणे शक्य नाही. त्यामुळे त्यांचेकडून आर.आर.सी. खाली वसुली बाबत जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना कळविण्यात आले आहे. श्री.बी.एन. चव्हाण यांचेकडे अपहारीत रु.३७,०००/- पैकी रु.२८,४००/- आज अखेर वसुल झाले असून बाकी रक्कम रुपये ८,६००/- माहे मार्च २०१६ अखेर पूर्ण वसुली होईल.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १७ ऑक्टोबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी समितीला अशी माहिती दिली की, १९६२-१९६३ पासूनची प्रकरणे प्रलंबित आहेत. अपहाराची प्रकरणे आहेत. जवाहर रोजगार हमी योजनेतील एकूण ५२ प्रकरणांपैकी १३ प्रकरणांमध्ये संबंधित सरपंचांवर एफआयआर नोंदविलेला आहे. करंजखेडामधील १९६३-१९६४ मधील प्रकरण आहे. त्यावेळी संबंधितांवर गुन्हा दाखल केलेला आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, श्री. ए.डी.राणे, कनिष्ठ लेखाधिकारी यांनी १ कोटी ६१ लाख १७ हजार ८५० रुपयांचा अपहार केलेला आहे. परंतु, त्यांच्याकडून अद्यापपर्यंत ती रक्कम वसूल न होण्याची कारणे काय आहेत, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विदित केले की, पंचायत समिती गंगापूर अंतर्गत सन २००६-२००७ ते सन २०१०-२०११ या कालावधीत इंदिरा आवास योजनेंतर्गत मोठया प्रमाणात अपहार झाल्याचे चौकशी दरम्यान उघडकीस आले आहे. त्यानुसार श्री. ए.डी.राणे, कनिष्ठ लेखाधिकारी यांना दिनांक १८-१०-२०१० रोजी निलंबित करण्यात आले आहे. श्री. ए.डी.राणे, कनिष्ठ लेखाधिकारी यांची दिनांक ३०-७-२०१३ रोजी विभागीय चौकशी पूर्ण झालेली आहे. चौकशी अधिकारी यांच्या चौकशी अहवालानुसार त्यांना सेवेतून बडतर्फ का करण्यात येऊ नये याबाबत अंतिम कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली होती. श्री. ए.डी.राणे, कनिष्ठ लेखाधिकारी यांना दिनांक ९-६-२०१५ अन्वये जिल्हा परिषद सेवा नियम (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ४ (७) अन्वये जिल्हा परिषदेतून बडतर्फ केले आहे. सद्य:स्थितीत वसुलीची कारवाई त्यांच्याकडे असलेल्या मालमत्तेतून करण्यात येत आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, ते मुख्य कार्यकारी अधिकारी असताना श्री. ए.डी.राणे, कनिष्ठ लेखाधिकारी यांना बडतर्फ केलेले आहे. सद्य:स्थितीत वसुलीची कारवाई त्यांच्याकडे असलेल्या मालमत्तेतून करण्यात येत आहे. यावर प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. यांनी समितीस विदित केले की, पंचायत समिती गंगापूर अंतर्गत सन २००६-२००७ ते सन २०१०-२०११ या कालावधीत इंदिरा आवास योजनेंतर्गत मोठया प्रमाणात अपहार झाल्याचे चौकशी दरम्यान उघडकीस आहे. इंदिरा आवास योजनेत मंजुर लाभार्थ्यांना देय अनुदानापेक्षा जास्तीचे अनुदान देणे, मंजुर नसलेल्या लाभार्थ्यांना जास्तीचे अनुदान देणे आणि प्रमाणकाशिवाय खर्च करणे, अनोळखी सहीवर पेमेंट करणे, झेरॉक्स सहीवर पेमेंट करणे, वगैरे बाबी निदर्शनास आल्या असून, त्याची चौकशी उप अभियंता आणि उपलेखापाल यांनी केलेली आहे. सदर चौकशी अहवाल ५ डिसेंबर, २०१० रोजी जिल्हा परिषदेकडे आलेला होता. याच दिवशी संबंधितांवर एफआयआर दाखल झालेला आहे. यामध्ये ज्यांचा संबंध होता अशा एकूण ११ जणांना अटक झाली होती. या सर्वांना निलंबित केले होते. यामध्ये ३ कोटी ३३ लाख रुपये गुंतलेली आहे. त्यानंतर सर्वांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. यामध्ये अनोळखी व्यक्तीच्या नावे पेमेंट केले आहे. सन २०१० मध्ये चार्जशिट दाखल केले. न्यायालयामध्ये सुनावणी सुरु झालेली नाही. वसुलीच्या नोटीसा दिलेल्या आहेत. तत्कालीन

गटविकास अधिकारी श्री.व्ही.एल.राठोड सेवानिवृत्त झाले आहेत. या प्रकरणामुळे त्यांना सेवानिवृत्ती वेतन मंजूर झालेले नाही. विभागीय चौकशी अद्याप पूर्ण झालेली नाही. विभागीय चौकशी पूर्ण झालेली नसल्यामुळे व ते सेवानिवृत्त झाले असल्यामुळे वसुली करता आली नाही. या प्रकरणात एकूण ११ अधिकारी, कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. या ११ अधिकारी, कर्मचारी यांची आस्थापना वेगवेगळ्या विभागात आहे. ही डी.आर.डी.अे.ची योजना होती. संबंधित अभियंता हे पाटबंधारे विभागातून प्रतिनियुक्तीवर होते. त्यामुळे त्यांची विभागीय चौकशी पाटबंधारे विभागाकडून सुरु आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, केवळ एका व्यक्तीकडून १ कोटी ६१ लक्ष रुपये वसूल करता येणार नाहीत. या साखळीमध्ये जे जे अधिकारी, कर्मचारी असतील त्या सर्वांकडून ही वसुली झाली पाहिजे. ही फार मोठी रक्कम आहे व अपहाराची रक्कम देखील मोठी आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संपूर्ण प्रकरणाची वस्तुस्थिती, सद्य:स्थिती, करण्यात आलेली कारवाई व इतर माहिती समितीला सादर करावी,या प्रकरणातील एक कनिष्ठ लेखाधिकारी श्री.ए.डी.राणे यांच्याकडून रक्कम रुपये १,६१,१७,८५०/- वसूल करावयाचे आहेत. अद्याप १ रुपयादेखील वसूल करण्यात आलेला नाही. एक कनिष्ठ सहाय्यक श्री.बी.एन.चव्हाण यांच्याव्यतिरिक्त एकाही आरोपीकडून रक्कम वसूल झालेली नाही. या सर्वांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला आहे का, या प्रश्नावर प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. यांनी समितीस विदित केले की, दिनाक ५ डिसेंबर, २०१० मध्ये फौजदारी गुन्हा दाखल झाला आहे. रकमा वसुलीसाठी नोटीसा दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणे त्यांची मालमत्ता जप्त करावी, यासाठी जिल्हाधिकारी धुळे यांना कळविलेले आहे. कारण, त्यांचा रहिवासाचा पत्ता धुळे येथील आहे. त्यांच्याकडे कोणतीही मालमत्ता आढळून येत नाही, असे जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे. त्यांची आस्थापना वित्त विभागाकडे आहे. त्यांच्याकडूनही माहिती घेतली आहे. सेवापटामध्ये मालमत्ता दिसून येत नाही, असे त्या विभागाने कळविले आहे. समितीने आणखी अशी विचारणा केली की, जर त्यांच्याकडे मालमत्ताच नाही तर आपण वसुली कशी करणार आहात, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी विदित केले की, आरआरसीव्दारेच जिल्हा परिषद वसुली करते. या प्रकरणामधील १,२९,६५,२८४/-, १,६१,१७,८५०/- या रकमा वसूल झाल्या नाहीत. परंतु, २६,३०९/-, १,६५,६२३/-, अशा छोट्या रकमा वसूल करण्यात कोणती अडचण आहे, हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. या प्रकरणातील वसुलपात्र रकमा फार मोठ्या आहेत. जिल्हा परिषदेच्या वकिलांनी न्यायालयाला अर्ली हिअरिंगची विनंती करावयास हवी होती. शासनाच्या रकमा अडकून पडल्या आहेत, हे सिध्द झाले आहे. सरकारी वकिलांच्या माध्यमातून अशा प्रकारची विनंती न्यायालयाला करण्यात आली होती का, या प्रकरणात ११ अधिकारी दोषी आहेत व ते वेगवेगळ्या विभागाचे आहेत. श्री.व्ही.एल.राठोड हे अधिकारी हिंगोलीला सुध्दा होते व त्या ठिकाणी देखील त्यांच्याविरुध्द काही प्रकरणे सुरु आहेत. या गैरव्यवहाराचा निर्णय कोणा एका अधिकाऱ्याने घेतलेला नाही. सर्वांनी मिळून एकत्रितरित्या नियोजनबध्द पध्दतीने गैरव्यवहार केलेला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या सर्व ११ अधिकाऱ्यांच्या संदर्भातील अनियमिता आणि इतर माहिती समितीला सादर करावी. तसेच, त्यांनी अन्य कोणाला हाताशी धरुन हे कृत्य केले असेल तर त्यांचाही अहवाल समितीला सादर करावा.

**समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

पंचायत समिती गंगापूर अंतर्गत अपहारीत रक्कमेच्या वसुली संदर्भात समितीने तातडीने कार्यवाही करुन अपहारीत रक्कमेची वसुली करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार अपहारीत रक्कमेची वसुली झाली आहे काय ? नसल्यास विलंबाची कारणे ?

सन २००६-०७ ते २००९-१० या कालावधीमध्ये पंचायत राज समिती, गंगापूर येथे इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुलांच्या रक्कमा अदा करताना रू.३.३३ कोटीचाअपहार झाल्याचे निदर्शनास आले. यास जबाबदार तात्कालीन गटविकास अधिकारी पंचायत समिती गंगापूर व इतर १० जणांवर १८८/२०१० नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी भारतीय दंड विधानचे कलम १२०(ब),४०६,४०९,४६५,४६८,४२०,२०१ व (३४) अन्वये दिनांक ०५/१२/२०१० अन्वये गुन्हा दाखल करून घेऊन सर्व जबाबदार अधिकारी व कर्मचा-याना अटक करण्यात आलेली होती. सर्वाना सेवेतून निलंबीत करण्यात

आलेले होते.सध्या या प्रकरणी पोलिस विभागा मार्फत मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.जबाबदार अधिकारी/कर्मचा-यांवर केलेली प्रशासकीय कार्यवाही व वसूली बाबतची कार्यवाही खालील प्रमाणे.

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्यांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे अभिप्राय (आस्था-७) :----**

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव व पदनाम | वसुलपात्र रक्कम | वसूल झालेली रक्कम | विवरण |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | श्री. व्ही. एल. राठोड तत्कालीन ग.वि.अ. (सध्या सेवानिवृत) | १२९६५२८४ | निरंक | तत्कालीन गटविकास अधिकारी श्री. व्ही. एल.राठोड हे गोंदिया येथून सेवानिवृत झालेले असून यांची विभागीय चौकशी अद्याप सुरू आहे.सदर प्रकरणी पोलिस गुन्हा दाखल होवून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे त्यामुळे अद्याप वसुली झालेली नाही. तथापि, त्यांचे सेवानिवृती विषयक लाभ स्थगीत ठेवण्यात आलेले आहेत. |
| २ | श्री. ए. डी. राणे कनिष्ठ लेखा अधिकारी | १२९६५२८४ | निरंक | श्री.राणे यांची विभागीय चौकशी पुर्ण झाली असून त्याना सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले आहे.जिल्हाधिकारी धुळे यांना आर.आर.सी. अंतर्गत वसुलीसाठी पत्रव्यवहार केला आहे. जिल्हाधिकारी, धुळे यांनी पत्र दि.३०/११/२०१२ नुसार संबधीताकडे रक्कम वसूल करता येईल अशी मालमत्ता नसल्याने संबधीताकडून वसुलीची कार्यवाही करता येत नाही असे कळविले आहे. |
| ३ | श्री. व्ही. व्ही. निकम उप अभियंता (सेवानिवृत) | १६५६२३ | निरंक | मा.सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय यांनी या कार्यालयाचे पत्र जाक्र.जिग्राविय़ं/लेखा/कावि/१३४६, दि.२२/०९/२०१५ अन्वये संबंधीताचे सेवानिवृती वेतनातून सदर रक्कम वसूल करणेबाबत कळविलेले आहे. अद्याप सेवानिवृती प्रकरण अंतिम झालेले नाही. |
| ४ | श्री. डी आर. भालकीकर, शाखा अभियंता | ४८५०५४ | निरंक | उप अभियंता, जि.प, उपविभाग औरंगाबाद यांनी संबधीताकडून वेतनातून वसुलीबाबत आदेश काढले होते,परंतू श्री.भालकीकर यांना उपअभियंता या पदावर पदोन्नती मिळाल्यामुळे त्यांना उपविभाग औरंगाबाद येथून कार्यमुक्त करण्यात आले असून त्यांच्या अंतिम वेतन प्रमाणपत्रावर वसुली दर्शवली आहे.सध्या ते प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेकडे कार्यरत असून कार्यकारी अभियंता(प्र.ग्रा.स.यो.) यांना वसुली बाबत कळविणेत आलेले आहे. |
| ५ | श्री. एम. व्ही. देशपांडे | २६३०९ | निरंक | उप अभियंता, जि.प, उपविभाग पैठण व कार्यकारी अभियंता, बांधकाम, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना वसुली सुरू करण्याबाबत आदेश देण्यात आले असून वेतनातून वसूली सुरू करण्यात आलेली आहे. |

**कार्यवाहीचा तक्ता.----**चालू

| (१) | (२) | (३) | | (४) |
|---|---|---|---|---|
| ६ | श्री.यु.आर. पाटील शाखाअभियंता | १७९४४९२ | निरंक | संबधीत हे दि.३१/०३/२०१६ रोजी उपअभियंता या पदावरून सेवानिवृत्त झाले असून जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील वसुली विषयक नियम १९६७ चे नियम १७ (२) प्रमाणे वसुली करण्याकरीता या कार्यालयाचे पत्र जाक्र.जिग्राविंयं/ लेखा / कावि / १३५१, दि.२२-०९-२०१५ अन्वये कळविले आहे. अद्याप मा.जिल्हाधिकारी यांचेकडून अहवाल प्राप्त नाही. तथापि, पाठपुरवा करण्यात आलेला आहे. |
| ७ | श्री.व्ही.एस.सरकटे शाखा अभियंता | ९९००० | निरंक | उपअभियंता, जि.प, उपविभाग वैजापूर व कार्यकारी अभियंता, बांधकाम, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना वसुली सुरू करण्याबाबत आदेश देण्यात आले असून वेतनातून वसुली सुरू करण्यात आलेली आहे. |
| ८ | श्री.वाय.आर.आघूडे शाखा अभियंता | ३१०५३ | १०३५२ | संबधीत हे पंचायत समिती, कन्नड अंतर्गत कार्यरत असून संबधीताकडून दर महा ५१७६/- वसूली, करण्यात आली असून दोन हप्ते वसूल झाले आहे. |
| ९ | श्री.एस.बी.कांबळे स्था.अभियंता सहाय्यक | ४३५६६६३ | निरंक | संबधीतास नुकतेच सेवेत पुर्नस्थापित करून पैठण येथे पदस्थापना दिली आहे. मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील वसूली विषयक नियम, १९६७ चे नियम १७(२) प्रमाणे वसुली करण्याकरीता पत्र दिलेले आहे, अद्याप मा.जिल्हाधिकारी यांचे कडून अहवाल प्राप्त नाही. तथापि, संबधीत कर्मचारी सेवेत पुर्नस्थापित झाल्याने वेतनातुन वसुली सुरू करण्यात येत आहे. |
| १० | श्री.व्ही.आर. काटकर, स्था.अभियंता सहाय्यक | ४३१३७९ | निरंक | संबधीतास नुकतेच सेवेत पुर्नस्थापित करून सिल्लोड येथे पदस्थापना दिली आहे. मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील वसुली विषयक नियम, १९६७ चे नियम १७(२) प्रमाणे वसुली करण्याकरीता पत्र दिलेले आहे. अद्याप मा.जिल्हाधिकारी यांचे कडून अहवाल प्राप्त नाही. तथापि संबधीत कर्मचारी सेवेत पुर्नस्थापित झाल्याने वेतनातून वसुली सुरू करण्यात येत आहे. |
| ११ | श्री. बी. एन. चव्हाण कनिष्ठ सहाय्यक | ३७००० | ३७००० | संबधीताकडून वसुल पात्र रक्कम वसुल करण्यात आलेली असून सदर रक्कम कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा यांनी कार्यकारी अभियंता, जि.प, बांधकाम यांचेकडे वर्ग केलेली आहे. |

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २४ मे, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, समितीने दिलेल्या निर्देशाप्रमाणे अपहारीत रक्कमेची वसुली करण्यात आली आहे काय, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत, या समितीच्या प्रश्नावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सन २००६-०७ ते सन २००९-१० या कालावधीमध्ये पंचायत समिती, गंगापूर येथे इंदिरा आवास योजने अंतर्गत घरकुला संबंधिच्या रकमा अदा करताना अपहाराचे सदरहू प्रकरण आहे. सदर प्रकरणी गट विकास अधिकारी यांचेसह १० अधिकारी/ कर्मचारी यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना निलंबीत करण्यात आले आहे व सदरहू प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. सदर प्रकरणातील तत्कालीन गट विकास अधिकारी हे सेवानिवृत्त झालेले असून त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे व त्यांचे सेवानिवृत्ती विषयक लाभ स्थगित ठेवण्यात आले आहेत. समितीने पुढे विचारणा केली की, अपहार कोणत्या योजनेत केला आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी समितीस माहिती दिली की, इंदिरा आवास योजनेतील सदरहू अपहार आहे. गंगापूर पंचायत समिती येथे सन २००६-०७ ते २००९-१० या कालवधीमध्ये इंदिरा आवास योजनंतर्गत घरकुलाच्या रकमा अदा करताना ३.३३ कोटी रुपयांचा अपहार झालेला आहे. सदरहू प्रकरणी तत्कालीन प्रकल्प संचालक व लेखापाल यांनी प्राथमिक चौकशी केली होती. त्यानुसार सदरहू अपहार निदर्शनास आला आहे. सदरहू प्रकरणी गट विकास अधिकारी यांचेसह शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, सहायक कनिष्ठ अभियंता अशा एकूण ११ अधिकारी / कर्मचाऱ्यांना जबाबदार धरण्यात आले आहे. सदरहू अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली होती. सदरहू अधिकारी / कर्मचारी यांना सेवेतून निलंबित करण्यात आले असून त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. सदरहू प्रकरणातील कनिष्ठ लेखापाल यांची विभागीय चौकशी पूर्ण झाली असून त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. तसेच, सदरहू प्रकरणातील तत्कालीन गट विकास अधिकारी श्री.राठोड हे सेवानिवृत्त झाले असून त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे यावर समितीने अशी विचारणा केली की, सदरहू प्रकरणातील संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची विभागीय चौकशी पूर्ण होण्यासाठी अजून किती वर्षांचा कालावधी लागेल, कारण प्रस्तुत प्रकरणी सन २०१० मध्ये एफआयआर दाखल करण्यात आला असून ६ वर्षांचा कालावधी पूर्ण झाला तरी अद्याप चौकशीची कार्यवाही पूर्ण झालेली नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी समितीस माहिती दिली की, विभागीय चौकशीचा अहवाल आला होता त्यामध्ये न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून विभागीय चौकशी करण्यात आली होती. वसूल पात्र रक्कम निश्चित करण्यात आलेली असून वसुलीची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.सदरहू प्रकरणी विभागीय चौकशी अधिकारी यांचेमार्फत चौकशी सुरु आहे. सदरहू प्रकरणी पोलिसांनी सर्व रेकॉर्ड जप्त केले असून सर्व कागदपत्रे त्यांच्या ताब्यामध्ये होती व सन २०१२ पर्यंत त्यांच्यामार्फत चौकशी सुरु होती. त्यानंतर समितीने अशी विचारणा केली की, सन २०१२ नंतर कोणती कार्यवाही करण्यात आली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, सन २०१२ मध्ये सदरहू प्रकरणी पोलिसांनी चार्जशीट दाखल केले. पोलिसांकडून जप्त करण्यात आलेले रेकॉर्ड सन २०१३ मध्ये हस्तगत करण्यात आले. समितीने पुढे विचारणा केली की, श्री.एस.बी.कांबळे, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक रु ४३,५६,६६३/- इतकी वसुली आहे. संबंधितास नुकतेच सेवेत पदस्थापित करुन पैठण येथे पदस्थापना दिली आहे. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील वसुली विषयक नियम, १९६७ चा नियम १७(२) प्रमाणे वसूल करण्याकरिता पत्र दिलेले आहे. अजून वसुली सुरु झालेली नाही. ही कोणती पध्दत आहे वेतनातून वसुली केव्हापर्यंत पूर्ण होईल यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी समितीला विदित केले की, न्यायालयीन निर्णयाच्या आधीन राहून विभागीय चौकशी होती, त्या आधारे त्यांना पुनर्स्थापित केले आहे. रक्कम मोठी असल्यामुळे बोजा चढविण्यासाठी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना आरआरसीप्रमाणे कारवाई करण्यासाठी प्रस्तावित केले. यावर समितीने त्यांनी रक्कम भरणा केली नाही. श्री.कांबळे यांनी ४३ लाख रुपयांचा भ्रष्टाचार करुनही त्यांना पुन्हा सेवेत कसे घेण्यात आले, रक्कम व्याजासह वसूल झाली पाहिजे. पहिल्या प्रकरणात जे चौकशी अधिकारी होते त्यांची चौकशी करावी असे निदेश दिले असता यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला माहिती दिली की, हे चौकशी अधिकारी याच विभागापुरते नाही. त्यांच्याकडे टार्गेट दिलेले असते. त्यांच्या चौकशीची प्रक्रिया ही ज्युडिशियल कार्यप्रणाली आहे. चार्जशीट दाखल करणे, अपचारी कर्मचाऱ्याला म्हणणे मांडण्याची संधी देणे, यामध्ये निश्चितपणे काही कालावधी जातो. यावर समितीने विचारणा केली की, एका प्रकरणाच्या चौकशीला ६-६ वर्षे लागतात का या प्रश्नावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी

समितीस विदित केले की, २०१२-१३ मध्ये चार्जशीट दाखल झाली.  चार्जशीट केव्हा इश्यू झाली तेव्हापासून कालावधी गणला पाहिजे. ६ वर्षे लागली नसावी. तरी देखील मी माहिती उपलब्ध करुन देतो.

समितीने सदरहू मुद्दा स्थगित ठेवून पुन्हा दिनांक १ जून, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात यामध्ये वेगवेगळ्या प्रकारची कारवाई सुरु केलेली आहे. श्री. व्ही. एल. राठोड, तत्कालीन गटविकास अधिकारी यांची चौकशी सुरु आहे. आवश्यक ती कागदपत्रे दिलेली नसल्याने कारवाई करण्यास विलंब होत आहे. तरी १५ दिवसात फायनल निर्णय घेण्यात येईल. त्यांच्याकडे १ कोटी, २९ लाख रुपये अडकले आहेत. आता सदर अधिकारी निवृत्त झालेले आहेत. त्यामुळे त्यांचे उपदान व पेन्शन थांबविलेले आहे.

दिनांक २८.१२.२०१२ पासून त्यांची चौकशी सुरु झालेली आहे. यासाठी तीन चौकशी अधिकारी नेमलेले आहेत. सन २०१२ ते २०१५ मध्ये श्री. व्ही.एल.गुजर हे चौकशी अधिकारी होते आणि आता दिनांक जून, २०१५ पासून श्री. वानखेडे हे चौकशी अधिकारी आहेत. यावर समितीने पुढे विचारणा केली की, ह्या ज्या काही चौकशा चालतात याला टाईम लिमिट नसते काय? अधिकारी व कर्मचारी निवृत्त होतात तरी त्याचा निकाल लागत नाही. याचा काहीतरी सोक्षमोक्ष लागायला पाहिजे. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदीत केले की, सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ७ एप्रिल, २००८ पर्यंत काही मेजर इनक्वायरी केलेल्या आहेत. कोणत्याही विभागाकडे चौकशी सुरु करा असे सांगितल्यानंतर कागदपत्रे गोळा करण्याकरिता त्याला थोडा वेळ लागतो. ४-५ अधिकाऱ्यांची संयुक्तपणे चाकशी करण्यासाठी कागदपत्रे गोळा करावी लागतात. चौकशी अधिकाऱ्यांकडे सुध्दा कामाचा प्रचंड भार असल्याने वस्तुस्थितीत ८ ते ९ महिन्यात चौकशी होत नाही. यासाठी दोन-दोन वर्षे लागतात. अशा चौकशीसाठी शासनाने निवृत्त झालेल्या काही लोकांना नेमले होते. परंतू ते शक्य होऊ शकले नाही. श्री. राठोड यांची चौकशी अंतिम टप्प्यात आलेली आहे. श्री. निकम हे सार्वजनिक बांधकाम विभागाचे इंजिनिअर आहेत. ते विभागाकडे आले होते, त्याचा देखील आम्ही पाठपुरावा करीत आहोत. इतर ९ जिल्हा परिषद कर्मचारी आहेत. पोलीस केस दाखल केलेली असल्याने आणि मूळ कागद पत्रे त्यांच्याकडे असल्याने इनक्वायरी करता येत नाही. सदर कागदपत्रांच्या आधारावर विभागीय चौकशी आणि पोलीस केस वेगळी आहे. कारण पोलीस केस ही क्रिमिनल असते. काही शिक्षा करुन जाऊ शकतो. या दोघांच्या प्रक्रिया वेगळ्या आहेत. सीओने चौकशी सुरु केलेली आहे. आपण परवानगी दिली तर या ८-९ केसेसबाबत काय परिस्थिती आहे हे ते सांगू शकतील. तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आणखी खुलासा केला की, यामध्ये जिल्हा परिषदेचे लेखाधिकारी श्री. राणे, कनिष्ठ लेखाधिकारी यांना दोषी मानलेले असल्याने नोकरी मधून बडतर्फ केलेले आहे. श्री.भालकीकर, श्री.काटकर, श्री.कांबळे, स्थापत्य सहाय्यक अभियंते आणि कांबळे या स्थापत्य अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी ओपन केली होती. यामध्ये ते दोषी आढळले होते. त्यामुळे त्यांना अंतिम बडतर्फीची नोटीस पाठविलेली आहे. उर्वरित जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची पुन्हा विभागीय चौकशी ओपन करण्यासाठी प्रस्ताव पाठविलेला आहे.

विभागीय चौकशी प्रदिर्घकाळ सुरु असतात याबाबत समितीने साक्षीकरीता सचिव (सेवा) यांना पाचारण केले व विचारणा केली की, १०-१० वर्षे या प्रकरणांच्या चौकशा चालू असतात. एवढी वर्षे लोक पैसे वापरतात. परंतू त्यांच्यावर काहीही कारवाई होत नाही. पंचायत राज समिती आपल्याला काय करणार?  त्यामुळे या विभागीय चौकशीमधून काहीही होत नाही असे भ्रष्ट लोकांचे म्हणणे आहे. त्यामुळे विभागीय चौकशी तीन महिन्यामध्ये संपली पाहिजे. आपल्याकडे यंत्रणा नसेल तर तशा प्रकारची मागणी करण्यात यावी. समिती सभागृहामध्ये हा विषय माडून मागणी करणार आहे. तशा प्रकारचे इन्फ्रास्ट्रक्चर ताबडतोब उपलब्ध झाले पाहिजे. त्यामुळे तीन महिन्याच्या आत इनक्वायरी संपल्या पाहिजेत. त्यानंतर त्यांच्यावर तातडीने कारवाई झाली तर अशाप्रकारे ज्याच्या पैशाची आपण सर्वसामान्य माणसासाठी तरतूद करतो. या पैशामध्ये भ्रष्टाचार करण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही. हे प्रकरण सन २००६-२००७ मध्ये घडलेले आहे. याला १० वर्षे झालेली आहेत. परंतु त्याच्यावर कोणतीही कारवाई होत नाही. कागदावर कागद ठेवून आपण चौकशी करीत असतो. परंतु यातून काहीही निष्पन्न होत नाही. कारवाई होत नसेल तर शासनाच्या एवढ्या मोठ्या यंत्रणेचा काय उपयोग आहे. याबाबत कारवाई करण्यासंदर्भात काय आराखडा तयार केलेला आहे? याची माहिती समितीला देण्यात यावी. यावर प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (सेवा) यांनी समितीस विदीत केले की, मी आताच १५ दिवसापूर्वी चार्ज घेतलेला आहे. या विषयाबाबत माझ्याकडे जी काही माहिती आहे त्याप्रमाणे जेवढे राज्य कर्मचारी आहेत त्या सर्वांची विभागामार्फत चौकशी करीत असतो. याबाबत सन १९९१ ची एक नियमावली आहे. विभागीय चौकशी करण्याची नियमात तरतूद आहे. ती थोडीशी अपडेट करण्याची आवश्यकता आहे. माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या. त्या अनुषंगाने मॅन्युअल अपडेट करण्याची गरज आहे. याला २५ वर्षे पूर्ण झालेली आहेत. आता हे काम सामान्य प्रशासन विभागाने हाती घेतलेले आहे. सुटसुटीत मॅन्युअल व्याख्या कोर्टाने दिलेली आहे. यावर

कॉम्प्लीकेशन्स वाढतात ते आपल्याला सरळ वाचता आणि समजता यावे यासाठी एक मॅन्युअल तयार करण्याचे काम यावर्षी हाती घेतलेले आहे. जलद गतीने नॉन टर्म कामकाजासाठी उपयोगी पडेल. मेजर पेनॉल्टीसाठी कलम ८ खाली चौकशीची कालमर्यादा ६ महिन्यांची ठेवलेली आहे आणि मानीव पेनॉल्टीसाठी ३ महिन्यांची कालमर्यादा ठेवलेली आहे. ६ महिन्यांच्या कामकाजामध्ये ग्रामविकास सचिवांनी जो उल्लेख केला त्यात सर्वात म्हणजे कागदपत्रे गोळा करणे, त्यानंतर वेळोवेळी प्रोसडिंग तयार करुन न्यायिक प्रकारची कारवाई करतो. जेणेकरुन यामध्ये कॉम्प्लीकेशन्स निर्माण होणार नाहीत यासाठी काळजी घ्यावी लागते. सर्वात महत्वाचे म्हणजे यामध्ये एक तपासणी सूची चौकशी अधिकाऱ्यांकडे असते. सर्व कागदपत्रे आपल्याकडे पोहचली आहेत की नाही हे या सूचीवरुन आपल्याला कळते. तोपर्यंत हे प्रकरण सुरु झाले असे आपल्याला म्हणता येणार नाही. या कामाकडे जेवढे लक्ष द्यायला पाहिजे तेवढे दिले जात नाही. सदर काम निगेटिव्ह स्वरुपाचे असल्यामुळे तरतूदीनुसार प्रादेशिक चौकशी करणारे अधिकारी जाण्यास तयार नसतात. त्यासाठी आपण कंत्राटी पध्दतीने किंवा निवृत्त लोकांना घेऊन हे काम केले जाते.

सदर कामकाज करुन ग्रॅव्हीटी कमी करण्याचा तसेच मॉनेटरिंग करण्याचा प्रयत्न केला जातो. आपण ज्या काही सूचना दिलेल्या आहेत त्याप्रमाणे सर्व कामे सामान्य प्रशासन विभागाकडून होतात असे नाही. गाईड लाईनप्रमाणे संबंधित विभागाने काम करणे अपेक्षित आहे. याचे मॉनेटरिंग नियमीत होत असते. तरी देखील त्यांची मॉनेटरिंग करुन ही संख्या वेळोवेळी कमी करण्याचा प्रयत्न करीत असतो. यामध्ये थोडासा आयसीपीचा उपक्रम हाती घेतलेला आहे. कोणत्या स्टेजवर किती प्रकरण आहेत आणि कोणते कामकाज मुद्दाम वाढत नाही. वर्ग-१ आणि वर्ग-२ ची संख्या मोठ्या प्रमाणात कमी होत चालली आहे. तरी देखील काही कॉम्प्लीकेटेड केसेस आहेत त्यांचा कालावधी थोडा जास्त आहे असे आपल्याला म्हणावे लागेल. प्रेझेंटेशनमध्ये ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी जे सांगितले त्याप्रमाणे जेव्हा जास्त लोक असतात तेव्हा चौकशी करण्यासाठी विलंब होतो. यावर आपण लक्ष देण्याची गरज आहे. आयसीटीच्या माध्यमातून काम करणे जास्त संयुक्तिक होईल. मी एकच सांगेल की, मॅन्युअल अपडेट करण्याचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. आयसीटीच्या माध्यमातून मॉनेटरिंग पध्दती सुदृढ करणे. या गोष्टींचा आपल्याला उपयोग होईल आणि डिस्पॉजलची गती वाढलेली दिसेल.

विभागीय चौकशी नियमपुस्तिका, १९९१ ची एक प्रत समितीला उपलब्ध करुन द्यावी असे निदेश देवून समितीने पुढे विचारणा केली की, सदर नियमावली अद्ययावत करण्याची प्रक्रिया चालू केलेली आहे ती प्रक्रिया साधारणपणे किती महिन्यात पूर्ण होईल. त्यावर सदर प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न करु व संबंधित प्रकरणाची चौकशी करण्याचे काम चालू असून पुढच्या महिन्यात चौकशी पूर्ण होईल. मार्च, २०१७ पर्यंत चौकशी पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले. समितीने आणखी विचारणा केली की, जे चौकशी अधिकारी असतात ते जिल्हा, तालुका क विभागीय स्तरावर नेमलेले आहेत. यावर सामान्य प्रशासन विभाग (सेवा), प्रधान सचिव यांनी विदीत केले की, डिव्हीजनल ऑफिसमध्ये एक विभागीय चौकशी अधिकारी असतो. जिल्हा स्तरावर एक अधिकारी असतो. त्यावर ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव यांनी अधिक खुलासा केला की, जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांसाठी एक सहाय्यक आयुक्त चौकशीकरिता पूर्ण वेळ डिव्हीजनल सीओ दर्जाचा अधिकारी आहे. वर्ग-१ आणि वर्ग-२ मध्ये सर्व विभागामध्ये विभागीय अधिकारी असतो. अफरातफरीच्या तक्रारी तालुका स्तरावर मोठ्या प्रमाणावर असतात. हे सर्व राबवित असताना ग्रामपंचायत स्तरावर कारभार दिलेला आहे. त्यामुळे विभागीय स्तरावर मराठवाड्याचा विचार केला तर ८ जिल्ह्यांमध्ये बरेच तालुके आहेत. तक्रारी एवढ्या मोठ्या असताना त्यासाठी असलेली यंत्रणा अतिशय तोकडी आहे. समितीने पुढे विचारणा केली की, ही सर्व यंत्रणा तालुका स्तरावर नेमता येणार नाही काय? कंत्राटी पध्दतीवर जे लोक नियुक्त केले जातात त्यांचे यामध्ये काय उत्तरदायित्व असेल. यामध्ये नेमकी कोणती लोक असणार आहेत. निवृत्त न्यायाधीश किंवा निवृत्त अधिकारी असतील तर त्यांना जाण असेल की, नेमके कोणत्या पध्दतीने काम करावे. या संदर्भातही आपण या ठिकाणी माहिती द्यावी. यावर सामान्य प्रशासन (सेवा), प्रधान सचिव यांनी समितीस विदीत केले की, सुरुवातीलाच उल्लेख केला की, यामध्ये मॉनेटरिंगचा पार्ट आहे. कोणत्या स्टेजवर, कोणत्या कारणामुळे चौकशी अडकलेली आहे, चौकशी बंद पडलेली आहे. त्यावर वेळीच लक्ष दिले तर गतिमानता येऊ शकते. दुसरी गोष्ट अशी की, हे काम निवृत्त न्यायाधिशांकडून करायला पाहिजे का निवृत्त अधिकाऱ्यांनी केले पाहिजे. विभागीय चौकशी करतो याचे जे मापक आहे त्यात काय प्रूफ केले पाहिजे. उलट यामध्ये काही वकील देखील ॲड करायला पाहिजे. जे काही प्रशासकीय गाईड लाईन्स डिपार्टमेंट चौकशीसाठी केलेल्या आहेत. अपेक्षा हीच आहे की, वेळेवर आणि टप्प्यावर चौकशी झालीच पाहिजे. याला मॉनेटरिंगशिवाय पर्याय नाही. टप्प्याटप्प्याने आपण खालच्या स्तरापर्यंत जाऊ. संबंधित विभाग आणि विभाग प्रमुख आहेत. जिल्हा परिषदेचे सीओ आहेत. त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा बैठकीमध्ये आढावा होत असेल तर आणि जी काही अडकलेली प्रकरणे आहेत त्याला गती देणे, सन २००९ चे आपण जे उदाहरण दिले. चौकशी

करण्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी लागत नाही. तरीही आपण सहा महिन्यांचा कालावधी ठेवलेला आहे. ज्या ठिकाणी आवश्यकता असेल त्याठिकाणी कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने लोक उपलब्ध करून दिले जातात.

समितीने गंगापूर पंचायत समिती अंतर्गत झालेल्या अफरातफरीचे नेमके स्वरुप काय अशी विचारणा केली असता ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव यांनी विदीत केले की, यामध्ये जे मंजूर लाभार्थी होते. त्यांना मंजूर अनुदानापेक्षा जास्तीचे अनुदान दिले गेले. सन २००६-२००७ पासून सन २००९-२०१० पर्यंत अनुदान होते. यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झालेला आहे. काही लाभार्थ्यांनी प्रमाणाबाहेर खर्च केल्याचा अहवाल आहे. सन २००६ ते २०१० हे झाले. सन २०१० मध्ये लोकशाही दिनामध्ये काही तक्रारी आल्या. त्यावेळी सीओ साहेबांनी ईडीने हा अहवाल सादर केला. त्यात लेखाधिकारी, सहाय्यक लेखाधिकारी होते. त्यांनी जवळ जवळ तीन महिने चौकशी केली. बँकांचे स्टेटमेंट घेऊन हा अहवाल तयार केला. यात ४३,५०० रुपये किंवा ४८,५०० रुपये अशा प्रकारची घरकुलांसाठी अनुदाने होती. काही ठिकाणी ७०,००० हजार रुपये अनुदान दिलेले होते. वरच्या पैशांचा यात अपहार केला असे गृहीत धरण्यात आले होते. सदरहू प्रकरणी घरकुल लाभार्थ्यांच्या यादीमध्ये बोगस लाभार्थ्यांचा समावेश करण्यात आला होता, लाभार्थ्यांच्या सह्या नाहीत, अनोळखी स्वाक्षरीने धनादेश वटवण्यात आल्याने बँक अधिकाऱ्यांची नावे चौकशी अहवालामध्ये समोर आली आहेत. याप्रकरणात पंचायत समितीचे लेखाधिकारी मुख्य आरोपी असून त्यांना बडतर्फ करण्यात आले आहे. सदरहू प्रकरणी श्री.भालकीकर, शाखा अभियंता यांचेकडून वसूली सुरु केली असून त्यांचेकडून वसूलपात्र रक्कम दरमहा १६ हजार रुपये प्रमाणे वसूल करण्यात येत आहे. यावर समितीने आतापर्यंत सदरहू प्रकरणी एकूण किती वसूल करण्यात आली आहे अशी विचारणा केली असता सदरहू प्रकरणातील सर्व वसुलीची एकूण बेरीज केलेली नसल्याने ती करुन समितीला माहिती देण्यात येईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदीत केले.

सदरहू प्रकरणातील तत्कालीन गट विकास अधिकारी श्री.राठोड हे सेवानिवृत्त झाले असून त्यांचे सेवानिवृत्ती विषयक लाभ स्थगित ठेवण्यात आले आहेत. त्यांचेकडून वसूलपात्र १ कोटी २९ लाख रुपये रक्कम येणे आहे अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली असता समितीने श्री.राठोड यांच्या सेवानिवृत्तीच्या लाभातून एवढी मोठी वसूलपात्र रक्कम मिळू शकेल का अशी विचारणा केल्यावर श्री.राठोड यांचेकडून वसूलपात्र रक्कम वसुलीकरिता आरआरसी प्रक्रिया राबवावी लागणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदीत केले. तद्नंतर ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव यांनी अधिक खुलासा केला की, सदरहू प्रकरणातील कनिष्ठ लेखाधिकारी श्री.राणे यांना बडतर्फ करण्यात आले आहे. यावर समितीने श्री.राणे यांचेकडील वसूली संदर्भात त्यांचेकडे मालमत्ता नसल्याने वसुलीची कार्यवाही करता येत नाही असे शासनाने विवरणामध्ये म्हटले असल्यामुळे लक्ष वेधले असता विभागीय चौकशीच्या माध्यमातून कोणती शिक्षा करता येऊ शकते याची एक यादी असल्याचे उत्तर ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव यांनी दिले. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अधिक खुलासा केला की, श्री. राणे यांचेकडून वसूलपात्र रक्कमेच्या वसूलीची कारवाई सुरु केली होती. श्री.राणे यांच्या आरआरसी प्रकरणी जिल्हाधिकारी धुळे यांनी "संबंधिताकडे रक्कम वसूल करता येईल अशी स्थावर मालमत्ता नसल्याने वसुलीची कार्यवाही करता येत नाही", असे कळविले आहे. त्यामुळे सदरहू प्रकरणी शासनाकडून पुढील मार्गदर्शन घेण्यात येईल. यावर समितीने आक्षेप घेतला की, संबंधितांविरुध्द विभागीय चौकशी सुरु केल्यानंतर त्याची प्रॉपर्टी जप्त करण्यात येईल याची शंका आल्यामुळे त्याने त्याची प्रॉपर्टी हस्तांतरीत केलेली असू शकते. परंतू यावर समितीस खुलासा प्राप्त होवू शकला नाही परंतू ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव यांनी शासकीय कर्मचाऱ्याने केलेल्या अपहार प्रकरणी पोलीस केस आणि तुरुंग हे दोन उपाय आहेत. सदरहू अपहार प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच संबंधितांची विभागीय चौकशी करण्यात येत आह. सदहू चौकशीनुसार संबंधिताना शिक्षा करता येऊ शकते. सदरहू प्रकरणातील श्री. राठोड विभागीय चौकशी पूर्ण झालेली नसून ती अंतिम टप्प्यात आहे. विभागीय चौकशी अहवाल श्री. राठोड यांच्या बाजूने जरी निर्णय देण्यात आला तरी तो शासनाने स्विकारावयाचा किंवा नाही त्याबाबतचे अधिकार विभागाच्या सचिवांना आहेत. अनेक वेळा विभागीय चौकशीतील निर्णय शासन स्वीकारत नाही तसेच संबंधित कर्मचाऱ्यास बडतर्फ करण्याचे अधिकार शासनास आहेत. वसुली प्रकरणी सर्व्हीस रुलमध्ये दंड संदर्भात काही मर्यादा आहेत. सदरहू प्रकरणी १ कोटी रुपयांपेक्षा अधिक रुपयांचा अपहार झालेला असून ती रक्कम वसूल करता येते किंवा कसे, याबाबत खात्री करुन घेण्यात येईल, असे आश्वासन समितीस दिले.

सदरहू प्रकरणातील कोणा कोणाची प्रॉपर्टी सील केली पाहिजे अशी विचारणा समितीने केली असता सामान्य प्रशासन विभाग, प्रधान सचिव यांनी विदीत केले की, अपहार प्रकरणातील वसुलीपात्र अधिकारी / कर्मचारी यांची मालमत्ता सील करता येते, रिकव्हरी प्रकरणी प्रॉपर्टी जप्त करण्याचे अधिकार माननीय न्यायालयास आहेत. सदरहू प्रकरणी दाखल करण्यात

आलेल्या गुन्ह्यामध्ये संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द ४२० कलम लावण्यात आले असून माननीय न्यायालयाकडून सदरहू प्रकरणी रिकव्हरी करण्याचे आदेश प्राप्त झाले तर अपहाराची वसूलपात्र रक्कम वसूल करण्यात येईल. तसेच, वसूलपात्र रकमेची वसूली करण्याकरिता संबंधितांची मालमत्ता आरआरसी करता येते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अधिक खुलासा केला की, सदरहू प्रकरणी श्री.राठोड यांना दिनांक २३ सप्टेंबर, २०१३ रोजी निलंबित करण्यात आले असून त्यांची विभागीय चौकशी दिनांक २८ डिसेंबर, २०१२ रोजी सुरु झाली आहे व त्यास ४ वर्षांचा कालावधी झाला आहे. सदरहू चौकशी अंतिम टप्प्यात असून अंतिम चौकशी अहवाल १५ दिवसामध्ये प्राप्त होईल. समितीने सदरहू प्रकरणी ४ वर्षापासून विभागीय चौकशी सुरु असून सदरहू विलंबाप्रकरणी विभागीय चौकशी अधिकारीदेखील दोषी आहेत, ही बाब विभागाच्या सचिवांच्या निदर्शनास आणली असता ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव यांनी खुलासा केला की, सदरहू प्रकरणी घटना घडल्यानंतर चार्जशीट दाखल करण्यासाठी अधिक वेळ लागला होता त्यानंतर विभागीय चौकशी प्रकरणी गतीने काम करण्यात आले आहे. विभागीय चौकशी करण्यासाठी सांगितल्यानंतर प्रत्यक्षात ती सुरु करण्यासाठी वेळ लागतो, हे योग्य आहे असे मी म्हणत नाही. अनेक वेळा अधिकारी / कर्मचारी यांना निलंबित करण्यात येते. चार्जशीट दाखल करण्यासाठी एका विशिष्ट स्कीलची आवश्यकता आहे. अनेक वेळा अधिकारी व्यस्त असल्याने त्यांच्या हाताखालील कनिष्ठ लिपिकास चार्जशीट दाखल करण्याचे काम देतात. चार्जशीट दाखल करणे प्रकरणी आरोप, पुरावा, साक्षीदार यासर्व प्रक्रिया पार पाडाव्या लागतात व त्यासाठी बराच वेळ लागतो. ती सोपी करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने नवीन नियमावलीमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करावा, अशी माझी विनंती आहे. मी हे सर्व सांगत आहे याचा अर्थ असा नाही की सदरहू प्रकरणी झालेला विलंब योग्य आहे.

समितीने सदरहू प्रकरणी कनिष्ठ लिपीक दर्जाच्या कर्मचाऱ्याने चार्जशीट तयार केले असल्याबाबत आश्चर्य व्यक्त करुन त्यामुळे संबंधितांची जामिनावर लवकरात लवकर सुटका होऊ शकते. याप्रकरणी संबंधितास केवळ ४ दिवसांची पोलीस कोठडी भोगावी लागली असून निकाल त्यांच्याच बाजूने लागण्याची शक्यता आहे. चार्जशीट व्यवस्थित दाखल केले नाही तर ती बाब अडचणीची ठरु शकते ही भिती व्यक्त केली. ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव यांनी पुढे त्यावर खुलासा केला की, याबाबत तत्काळ कारवाईची प्रक्रिया करीत असताना या संदर्भात दोन समांतर कारवाई करीत असल्याचे आढळून आले. विभागीय कारवाई व कोर्ट कारवाई या प्रक्रियेदरम्यान विभागीय चौकशी अहवाल हाही एक मुद्दा होता. विभागीय कारवाई व पोलीसी कारवाई या दोन्ही समांतर प्रक्रिया एकाच वेळी चालू असल्याकारणाने या संदर्भातील चार्जशीट दाखल करण्यास विलंब लागला.

समितीने पुढे विचारणा केली की, समितीसमोर हा जो भ्रष्टाचाराचा मुद्दा लोकांनी केलेल्या तक्रारींच्या माध्यमातून आलेला आहे. तो मुद्दा ऑडिट आक्षेप परिच्छेदांच्या माध्यमातूनही समितीच्या बैठकीमध्ये चर्चेला येणे अपेक्षित होते. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी खुलासा केला की, जिल्हापरिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून या इंदिरा आवास व इतर केंद्र शासनाच्या योजना डीआरडीएच्या माध्यमातून राबविल्या जातात. या संदर्भातील ऑडिटचे काम शासकीय लेखापरीक्षण विभागाकडे येत नसून त्यांचे ऑडिट हे खाजगी सी. ए. एजन्सी यांच्याकडून करून घेतले जाते. आम्ही या संबंधीचे लेखापरीक्षण केलेले नाही म्हणून आमच्या परिच्छेदांमध्ये हा पॅरा दिसणार नाही. त्यावर समितीने त्या वेळेस या योजनेचे ऑडिट ज्या एजन्सीकडून करून घेतले होते, त्यांच्यावर यातील अपहाराची जबाबदारी चौकशी करून निश्चित का केली नाही अशी विचारणा केली असता ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव यांनी खुलासा केला की, डीआरडीएचे अकाऊंट्सची माहिती खाजगी सीए फर्म यांच्याकडे दिलेली असते. आता मात्र विभागाने इंदिरा आवास योजनेची प्रणाली पूर्णपणे बदललेली आहे. जिल्हापरिषदेकडे आता या योजनेचे अकाऊंट ठेवण्यात आलेले नाही. त्यानंतर सामान्य प्रशासन विभाग (सेवा), प्रधान सचिव यांनी खुलासा केला की, या समितीच्या माध्यमातून आपण जिल्हापरिषदा व पंचायत समितीच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या डीआरडीए व केंद्र शासनाच्या योजनांचे ऑडिटही शासकीय लेखा परीक्षकांकडून झाले पाहिजे, अशी शिफारस करु? शकतो. या योजनांच्या लेखापरीक्षणाचा काही भाग हा सीएजी यांच्याकडून होणे आवश्यक आहे, अशी शिफारस समितीच्या माध्यमातून केली जाऊ शकते. अशा प्रकारे ही पध्दत सुरु करता येऊ शकते.

डीआरडीए च्या माध्यमातून योजनांकरिता वापरला जाणारा निधी केंद्र शासनाचा असल्यामुळे राज्य शासनाच्या माध्यमातून त्याचे ऑडिट केले जात नाही. अनेक गावांमध्ये आज अनेक पाणीपुरवठ्याच्या योजना प्रभावी अंमलबजावणी व दक्ष कारभाराअभावी बंद पडलेल्या आहेत. अनेक पाणीपुरवठा योजना अयशस्वी होऊन नुकसानीमध्ये जात आहत. ज्या ज्या

ठिकाणी केंद्र शासनाच्या योजनांचे ऑडिट खाजगी सीए फर्मकडून होत असते त्या त्या ठिकाणी पैशांची गडबड होत असते. या ऑडिटकडे व केंद्र शासनाच्या निधीच्या प्रभावी अंमलबजावणीकडे गांभीर्याने कोणीही लक्ष देत नाही. डीआरडीएच्या योजनांमध्ये केंद्र शासनाचा निधी जरी असला तरीही २५ टक्के मॅचिंग गँट राज्य शासन देते. या मॅचिंग ग्रँटचा वापर योग्य पध्दतीने होत आहे का व अनुषंगाने सर्वच निधीचा वापर काटेकोर पध्दतीने विहित उद्देशाकरिता होत आहे का? हे पाहण्याची जबाबदारी राज्य शासनाची पर्यायाने आहेच. या संदर्भातील फिगर्स राज्य शासनालाही ऑडिटच्या माध्यमातून जाणून घेण्याचे अधिकार आहेत काय? अशी समितीने विचारणा केली असता सामान्य प्रशासन विभाग (सेवा), प्रधान सचिव यांनी खुलासा केला की, केंद्र शासनाचा पैसा हा राज्य शासनाकडे काही विशिष्ट गरजांकरिता येत असतो, तो विनाविलंब विहित उद्देशाकरिता खर्च करणे अपेक्षित असते. याकरिता हा पैसा तत्काळ रिलीज करण्यात येतो. याकरिता राज्य शासनाकडून मॅचिंग ग्रँट प्राप्त होत असली तरीही हा पैसा वापरण्याकरिता संदर्भित वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये कोणत्याही प्रकारच्या निधीची किंवा इतर बाबींची तरतूद करण्याची आवश्यकता नसते. हा निधी विहित उद्देशाकरिता लवकरात लवकर खर्च करण्यात यावा, एवढीच यामध्ये अट असते. या निधीचा वापर टेंडर ॲण्ड ऑडिट,रॅण्डम पध्दतीने करण्याची पध्दत रूढ झालेली आहे.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेला भेट देवून सन २०१२-२०१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावर मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक एक (ई) मधील जिल्हा परिषदेमधील अफरातफर तसेच गैरव्यवहारासंबंधात प्रलंबित प्रकरणांची संख्या व त्याद्वारे वसूल व्हावयाची रक्कम याचा आढावा घेतला. जिल्हा परिषदेच्या विविध विभागांमध्ये अफरातफरीची एकूण १२६ प्रकरणे प्रलंबित असल्याचे समितीस आढळून आले. विशेषत: सन २००६-२००७ ते २००९-२०१० या कालावधीमध्ये पंचायत समिती, गंगापूर येथे इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुलाच्या रकमा अदा करण्यामध्ये ३.३३ कोटी रुपयांचा अपहार झाल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. सदरहू प्रकरणी ११ अधिकारी व कर्मचाऱ्यांवर जबाबदारी व वसुलपात्र रक्कम निश्चित करण्यात येवून त्यापैकी कनिष्ठ सहाय्यक श्री.बी.एन.चव्हाण यांची वसूलपात्र रक्कम ३७,०००/- पैकी २८,४००/- रुपये वसूल झाले आहे. तसेच १० अधिकारी व कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी पूर्ण करण्यात आली परंतू सद्या सेवानिवृत्त असलेले तत्कालिन गटविकास अधिकारी श्री.व्ही.एल. राठोड यांची विभागीय चौकशी अद्याप सुरु असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली.

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी अधिकारी श्री.ए.डी.राणे, कनिष्ठ लेखाधिकारी यांच्यावर वसूलपात्र रक्कम १,२९,६५,२८४/- रुपये एवढी असून त्यांची विभागीय चौकशी पूर्ण झाली असून सद्यस्थितीत त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले आहे. **श्री.ए.डी.राणे यांच्याकडून वसुल करावयाची रक्कम महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील वसुली विषयक नियम, १९६७ चा नियम १७ (२) प्रमाणे (आर.आर.सी.) वसुल करण्याकरीता जिल्हाधिकारी, धुळे यांच्याकडे पत्रव्यवहार केला असता जिल्हाधिकारी, धुळे यांनी श्री.ए.डी.राणे यांच्याकडे मालमत्ता नसल्याने संबंधितांकडून वसुलीची कार्यवाही करता येत नसल्याबाबत दिनांक ३० नोव्हेंबर, २०१२ रोजीच जिल्हा परिषदेला कळविले आहे. सुमारे १ कोटी ३० लक्ष रुपयांची वसुली सदर अधिकाऱ्याकडून करण्यास शासनाला अपयश आलेले आहे. सन २००६ ते २०१० या चार वर्षाच्या कालावधीत घेतलेल्या रकमेबाबत दिनांक ५ डिसेंबर, २०१० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. परंतू संबंधित अफरातफर करणाऱ्या कर्मचाऱ्याकडून पुढील दोन वर्षात आपल्या मालमत्ता हस्तांतरीत करण्यास आल्या असण्याची शक्यता आहे. सबब, अशा सिध्दापराध कर्मचाऱ्याच्या कुटुंबियाच्या तसेच जवळच्या नातेवाईकांच्या मालमत्तेतून देखील अपहारीत रक्कम वसूल करण्याच्या दृष्टीने विभागाने पावले उचलावित अशी समितीची शिफारस आहे.**

तत्कालिन गटविकास अधिकारी श्री.व्ही.एल.राठोड यांची विभागीय चौकशी अद्याप सुरु आहे. सुमारे ६ वर्षांचा कालावधी उलटूनही सदर विभागीय चौकशी सुरु असल्याप्रकरणी समिती तीव्र नापसंती व्यक्त केली. यासंदर्भात समितीने विभागीय सचिवांची साक्ष स्थगित ठेवून त्यावर अधिक माहिती जाणून घेण्यासाठी प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (सेवा) यांना पाचारण केले. सचिवांच्या साक्षीमध्ये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ अंतर्गत विहित करण्यात आलेली विभागीय चौकशी चालविण्याची कार्यपध्दती मॅन्यूअल ऑफ डिपार्टमेन्टल एन्क्वायरीज अर्थात विभागीय चौकशी नियम पुस्तिका, १९९१ यामध्ये देण्यात आलेली असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली.

सदरहू नियमाप्रमाणे सरकारी पैशांची अफरातफर केल्याची बाब प्रारंभिक तपासात उघडकीस आल्यानंतर शक्य तितक्या लवकर विभागीय चौकशी पूर्ण करुन संबंधित कर्मचाऱ्याकडून घेतलेली रक्कम वसुल करण्यात यावी अशी तरतूद करण्यात आलेली आहे. प्रस्तुत प्रकरणात विलंब होत असल्यास याबद्दलही पर्यवेक्षी अधिकाऱ्याची व तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक होते. प्रस्तुत विभागीय चौकशीचे प्रकरण सूचना व विहित कालमर्यादेचे पालन करुन विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन शीघ्रतेने पूर्ण करणे आवश्यक होते. यासंदर्भात लोकलेखा समितीने चौथ्या विधानसभेच्या कालावधीत आपल्या तेराव्या अहवालात केलेल्या शिफारशीनुसार अफरातफरीच्या प्रकरणामधील विभागीय चौकश्या पूर्ण करण्यामध्ये विलंब टाळण्यासाठी शासनाने तपशिलवार सूचना देणारे परिपत्रक दिनांक ७ ऑगस्ट, १९८२ **(परिशिष्ट ६.१**)रोजी निर्गमित केलेले आहे. सदर परिपत्रकास अनुसरुन विभाग प्रमुखांनी कार्यवाही केल्याचे समितीस आढळून येत नाही. अफरातफरीच्या प्रकरणांच्या प्रगतीचे मासिक पूनर्विलोकन करुन आवश्यक कार्यवाहीला वेग देण्यासाठी विभाग प्रमुखांनी उपाययोजना केली नसल्याचे समितीस आढळून आले. **एवढेच नव्हे तर संबंधित ग्रामविकास विभागातील मंत्रालयीन उप सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची अफरातफरीच्या प्रकरणाच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी होती. याबाबत विभागीय चौकशी मधील विलंबाची सामान्य प्रशासन विभागाने स्वतंत्रपणे चौकशी करावी. सदर विभागीय चौकशीमध्ये आढळून आलेल्या त्रुटी व त्यास जबाबदार असलेल्या पर्यवेक्षी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी व त्याबाबतचा अहवाल समितीस पाठवावा अशी समितीची शिफारस आहे. तसेच राज्यातील इतर जिल्हा परिषदांमधील अफरातफर व गैरव्यवहाराची अनेक प्रकरणे प्रदिर्घ कालावधीपासून प्रलंबित आहेत. या सर्व प्रकरणांचा आढावा शासनाने घ्यावा व कालबध्द कार्यक्रम हाती घेऊन ती सर्व विभागीय चौकशीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत व वसुलपात्र रकमांची वसुली करावी व त्याचा जिल्हापरिषद निहाय अनुपालन अहवाल सहा महिन्यांच्या आत समितीस उपलब्ध करुन द्यावा तसेच विभागीय चौकशी नियम पुस्तिका १९९१ अंमलता येऊन २० ते २५ वर्षाचा कालावधी उलटून गेला आहे. दरम्यानच्या काळात प्रशासकीय न्यायाधीकरणे उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे या संबंधातील निवाडे यांच्या अनुषंगाने सदर नियम पुस्तिकेत विभागीय चौकशी लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने सुधारणा करण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.**

प्रस्तुत प्रकरणातील श्री.व्ही.व्ही.निकम, उप अभियंता (सेवानिवृत्त) यांच्यावरील रु. १,६२,६२३/-ची वसुली त्यांचे सेवानिवृत्ती वेतनातून करण्याकरीता जिल्हा परिषदेने दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ पर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाला कळविलेले नव्हते, याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. श्री.डी.आर. भालकीकर, शाखा अभियंता यांना शासनाने उपअभियंता पदावर पदोन्नती देऊन जिल्हा परिषदेने त्यांना कार्यमुक्त देखील केले आहे. परंतू अद्याप त्यांचेवरील ४ लक्ष ८५ रुपयांची वसुली अद्यापी सुरु झालेली नाही. श्री.एम.व्ही.देशपांडे, श्री.व्ही.आर.काटकर व श्री.एस.बी.कांबळे हे औरंगाबाद जिल्हा परिषदेअंतर्गत सेवेत पुर्नस्थापित होऊनही विभागीय सचिवांचे साक्षीपर्यंत त्यांच्यावर निश्चित केलेली वसुलपात्र रकमेची वसुली सुरु झाली नसल्याबाबत समिती तीव्र खेद व्यक्त करते. **प्रस्तुत प्रकरणाचे गांभीर्य, त्यात गुंतलेली सुमारे ३.३३ कोटी एवढी मोठी रक्कम आणि अफरातफरीत गुंतलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर विभागीय चौकशीअंती सिध्द झालेला अपराध या पार्श्वभुमीवर जिल्हा परिषद प्रशासनाने वेळकाढूपणा केल्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे. अत: प्रस्तुत प्रकरणातील सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेकडून अफरतफरीत गुंतलेली रक्कम सहा महिन्याच्या आत वसुल करावी तसेच प्रलंबित असलेली फौजदारी प्रकरणे त्वरीत निकाली काढण्यासंदर्भात पाठपुरावा करावा व त्याबाबतचा अनुपालन अहवाल समितीस सादर करावा, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण सव्वीस

## सर्वसाधारण शिफारशी

**१. गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्याबाबत :-**

समितीने राज्यातील जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असताना विशेषतः नांदेड व औरंगाबाद जिल्हा परिषदेत गैरव्यवहार व अपहाराच्या मोठ मोठ्या रकमा वसुलीविना प्रलंबित आहेत. अशी अनेक प्रकरणे समितीसमोर तपासणीसाठी आली असताना समितीने या प्रकरणात सदरच्या रकमा शासन खाती जमा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेशित केले आहे. सदर गैरव्यवहाराची/अपहाराची अनेक प्रकरणे असून ती जुनी आहेत. जिल्हा परिषदांनी वेळीच कार्यवाही केली असती तर शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी या प्रकरणांमध्ये अडकून पडला नसता व तो वेळीच वसूल झाला असता. जिल्हा परिषदांनी सदरच्या रकमा संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करुन वसुल केल्या असत्या तर या रकमा केंव्हाच शासन खाती जमा झाल्या असत्या. शासनाचा विविध योजनांवरील निधी हा गैरव्यवहाराने जेव्हा हडपला जातो तेव्हा त्या त्या योजना राबविताना त्यात निश्चितच मोठ्या प्रमाणावर अनियमितता होऊन योजनेच्या फलनिष्पत्तीवर त्याचा मोठा परिणाम होतो असे समितीला आढळून आले आहे. जिल्हा परिषदांकडून त्यांच्या कर्मचा-यांवर कारवाई करण्यात विलंब होत असल्यामुळे जिल्हा परिषदा अशा कर्मचा-यांना पाठीशी घालत असून त्याद्वारे एकप्रकारे शासनाचा निधी वेळीच वसूल होत नसल्यामुळे याबाबत मोठ्या प्रमाणात प्रशासकीय अनियमितता होत असल्याचे समितीला आढळून आले आहे. **याप्रकरणी समिती अशी शिफारस करते की,जिल्हा परिषदेची योजना राबविताना संबंधित योजनेत एखादा गैरव्यवहार अथवा अपहार उघडकीस आला असल्यास त्या गैरव्यवहारासंदर्भात कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात दोषारोपपत्र दाखल करुन असे प्रकरण सहा महिन्यात निकाली काढण्यासंदर्भात शासनाने निश्चित अशी भूमिका घ्यावी त्याचप्रमाणे अशी कार्यवाही मुदतीत पूर्ण करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या संबंधित विभाग प्रमुखांवर सोपविण्यात यावी व असे विभाग प्रमुख गैरव्यवहाराच्या अथवा अपहाराच्या रकमा सहा महिन्यात शासन खाती जमा करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचेविरुध्द ती जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर या प्रकरणी शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत विभागाने ठोस भूमिका घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

शासनाकडून एखादी योजना राबविताना कोट्यवधी रुपयांचा निधी तरतूदी करुन मिळविला जातो व असा निधी वेळेत खर्च केला जात नाही व तो शासन खाती जमादेखील केला जात नाही. त्यामुळे वित्तीय बाबीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असून संबंधित अधिका-यांकडून रकमा वेळीच खर्च करण्याबाबत कमालीचा हलगर्जीपणा करण्यात येतो. कोट्यवधी रुपये अखर्चित ठेवल्यामुळे शासनाला असा निधी आवश्यक असणा-या अत्यंत महत्वाच्या योजनांवर खर्च करता येत नाही. पर्यायाने विविध भौगोलिक भागातील निधी वाटपातील असंतोष वाढतो. खर्चाच्या बाबतीतील अनियमितता व योजना राबविण्याच्या कामातील अधिका-यांद्वारा होत असलेला हलगर्जीपणा हा प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत गंभीर असून त्यामुळे अखर्चित निधी राहून तो दुस-या महत्वाच्या योजनांवर खर्च केला जात नाही. **म्हणून एखाद्या योजनेसाठी मागितलेला निधी त्या योजनेची उपयुक्तता तसेच जनसामान्यांच्या हिताचा विचार करुन राबविणे आवश्यक आहे. जनतेला देय असलेल्या सुविधा योजना राबवून वेळीच मिळत नसल्याने जनतेत नैराश्य व संतापाच्या भावना वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता अखर्चित रकमांवर बंधन टाकण्यासंदर्भात शासनाने यासंदर्भात कडक धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात जिल्हा परिषदांना एका परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे अशीही समितीची शिफारस आहे.**

**गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्यासंदर्भात समितीने उपरोक्तप्रमाणे केलेल्या शिफारशीनुसार यासंदर्भात शीघ्रतेने कार्यवाही करुन नांदेड व औरंगाबाद जिल्हा परिषदांमधील रकमा शासन खाती जमा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व पंचायती राज समितीने तपासणी केलेल्या अहवालासंदर्भात एकूण किती रकमेची शासन खाती वसुली केली याबाबीची माहिती समितीला कळविण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

**२. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे :-**

समितीने नांदेड व औरंगाबाद जिल्हा परिषदांना भेट दिली असताना अनेक लेखा परिच्छेदांमध्ये लेखा परिक्षकांना संबंधित लेख्यांवरील कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नसल्याने त्याबाबतचा अंतिम अभिप्राय लेखा परिक्षकांस व्यक्त करता आला नाही.

याबाबत समितीने असे लेखे विचारात घेतले असता अनेक प्रकरणात लेखा परीक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध नव्हती आता उपलब्ध आहेत असे समितीला सांगण्यात आले. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध नव्हती त्याची कारणे काय या शोधात समितीला अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या. **मुळात कागदपत्रे उपलब्ध असतानाही ते लेखा परिक्षणास न दाखविणे हे गंभीर आहे. तो सरळ शिस्तभंगाचा प्रकार आहे. लेखा परीक्षक सुरुवातीला चार महिन्यांचा कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यासाठी वेळ देतात व त्यानंतर पुन्हा दोन महिन्यांचा कालावधी संबंधितांना दिला जातो. असे असूनदेखील संबंधित अधिकारी लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन देत नाहीत. मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ मध्ये सन २०११ पूर्वी लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करुन देणा-या अधिका-यास केवळ १०० रुपयांचा दंड आकारण्यात येत असे. कदाचित त्यामुळे लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध होत नसतील अशी समितीने भावना व्यक्त केल्यानंतर शासनाने सन २०११ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ७ मध्ये सुमारे २५,००० रुपये (पंचवीस हजार रुपये) दंडाच्या रकमेची तरतूद केली आहे. समितीने या प्रकरणी जिल्हा परिषदांना ज्या कोणी लेखा परीक्षणाचे वेळी लेखा परिक्षकांस कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाहीत अशा जबाबदार असणा-या सर्व संबंधितांना अधिनियमातील तदतुदीनुसार रु.२५,०००/- इतका दंड आकारण्याची शास्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार नांदेड व औरंगाबाद जिल्हा परिषदांमध्ये अशा किती व्यक्तींना प्रत्येक प्रकरणी दंड करण्यात आला व एकूण किती रक्कम शासन खाती जमा करण्यात आली याची संपूर्ण माहिती प्रकरणनिहाय समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**३. नियमानुसार व नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन दोषीतांवर कारवाई करण्याबाबत :-**

संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीततेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, प्रभावी व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे म्हणून कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी या समितीची रचना करण्यात आली. समितीला अधिकार मिळाल्यावरून समितीने अनेक प्रकरणात दोषीतांवर कार्यवाही करण्याबाबत शासनाला निर्देश दिले आहेत. असे निर्देश देत असतांना समितीने एखाद्या अधिकारी/कर्मचा-यांची प्रथमदर्शनी चूक आढळून देखील संबंधीत दोषींविरुध्द जाणीवपूर्वक निलंबनाची कारवाई प्रस्तावित केलेली नाही. भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान संधी देण्याचे धोरण दिल्याने कारवाई करतानादेखील दोषीताने तो निर्दोष असल्याचे अभिकथन करणे आवश्यक आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर दोष लादले जाणे न्याय तत्त्वाला अनुसरून नाही असे समितीला वाटते. म्हणून प्रशासनाने कार्यवाही करताना कोणतयाही निर्दोष व्यक्तीला शास्ती करू नये आणि दोषी व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत शास्तीविना सोडू नये असे समितीला वाटते. भेटीच्या वेळी संबंधित प्रकरणाची निष्पक्षपणे चौकशी करुन चौकशी अहवालामध्ये दोषीविरुध्द कार्यवाही करुन त्यास शिक्षा करणे योग्य आहे. **तथापि, एखाद्या निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही केल्यास त्यात समितीच्या सूचनेनुसार कार्यवाही केली ही बाब समाजाचे लोकशाही व्यवस्थेवरील विकास उडवणारी आहे. जनमानसात समितीची भूमिका ही प्रशासनाने केलेल्या चांगल्या व वाईट बाबींना शोधून काढून त्यातून जनतेप्रती महत्वाची कामे कशी केली जातील याबाबतची प्रतिमा उभी करणे हे संसदीय लोकशाहीने दिलेले एक कर्तव्य आहे. समितीची नाहक बदनामी काही कर्तव्यपारायणवता व सचोटी नसलेले अधिकारी निर्माण करतात आणि जाणीवपूर्वक वैयक्तिक द्वेषापोटी, हेवेदाव्यापोटी निर्दोष व्यक्तींवर कार्यवाही करुन समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सतर्क राहणे आवश्यक असून एखादा गुन्हेगार सुटत असताना त्यास नैसर्गिक न्याय मिळेल परंतु एखाद्या निर्दोष व्यक्तीला शिक्षा होता कामा नये ही समितीची भूमिका असल्यामुळे समितीने ज्या ज्या प्रकरणांमध्ये चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. अशा सर्व प्रकरणांमध्ये दोषारोपांची चौकशी करताना सर्व संबंधित व्यक्तीला नैसर्गिक न्याय तत्वानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार संपूर्ण वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतरच निःपक्षपातीपणे कार्यवाही करुन दोषींना शास्ती तर निर्दोषींना मुक्ती या तत्वानुसार कारवाई करण्यात यावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

# परिशिष्ट

## शासनाचे आदेश व परिपत्रके आणि
## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

परिशिष्ट १.१

अखर्चित निधी खर्च
करण्याबाबतची कार्यप्रणाली

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ६ जून, २००८

वाचा:- शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दिनांक: २६ सप्टेंबर २००५.

**प्रस्तावना:-**

उपरोक्त संदर्भांधिन शासन निर्णयाद्वारे वित्त विभागाने विभागांतर्गत वर्ष अखेर अखर्चित राहिलेल्या रकमा खर्च करण्याची कार्यप्रणाली विषद केली आहे. शासनाने जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका, प्राधिकरणे यांना एखाद्या आर्थिक वर्षात मुक्त केलेला निधी पूर्णपणे खर्च करतांना येणा-या अडचणी लक्षात घेऊन उपरोक्त शासन निर्णयात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

शासनाने जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका, प्राधिकरणे यांना एखाद्या आर्थिक वर्षात मुक्त केलेला व अखर्चित राहीलेला निधी खर्च करण्यासाठी दिनांक ३० जून पूर्वी अनुमती घेण्याची अट शिथिल करण्यात येत आहे. आता सदर अखर्चित निधी लगतच्या पुढील आर्थिक वर्षअखेर पर्यंत खर्च करण्याची अनुमती देण्यात येत आहे. सदर अनुमती सन २००७-०८ व त्यापुढील अखर्चित रकमांसाठी राहील. मात्र सन २००७-०८ या आर्थिक वर्षाच्या आधी मुक्त केलेल्या व पुढील एका आर्थिक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अखर्चित राहीलेला निधी स्वायत्त संस्थांनी शासनाकडे परत करणे बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०६०६१४२१५७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सु.प्र.कानडे )
शासनाचे उप सचिव, वित्त विभाग

(कृ.मा.प.)

प्रतिः

१. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग)

२. सर्व उप सचिव, अवर सचिव, वित्त विभाग,/ सर्व व्यय कार्यासने, वित्त विभाग.

३. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.

४. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा परीक्षा), मुंबई.

५. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.

६. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा परीक्षा), नागपूर.

७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/ वांद्रे

८. निवासी लेखा अधिकारी, मुंबई

९. निवड नस्ती, अर्थोपाय

परिशिष्ट १.२

अंगणवाडी इमारत बांधकामासाठी जिल्हा परिषद, नांदेड यांना सन २००७-०८ ते २०१३-१४ (राष्ट्रीय समविकास योजना, मानव विकास मिशन, जिल्हा वार्षिक योजना, ग्रामीण पायाभूत विकास निधी, जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना, १३ वा वित्त आयोग) मध्ये प्राप्त झालेल्या निधीपैकी अखर्चित निधी सन २०१५-१६ मध्ये खर्च करण्यास मान्यता देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०१५/प्र.क्र.२९१/का.६**
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २१ नोव्हेंबर, २०१५

**वाचा :-** १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दि.६ जून, २००८
२) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचे पत्र क्र.एबाविसेयो/का-७/२०१५-१६/२७०१/दिनांक ३०/०९/२०१५
३) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल विकास), जिल्हा परिषद, नांदेड यांचे पत्र क्र.जिपना/एबाविसेयो/सांख्यिकी/६७१/२०१५, दिनांक १६/०९/२०१५ चे पत्र.
४) शासन निर्णय वित्त विभाग, क्र.संकीर्ण-१०.१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय, दिनांक २५/०८/२०१५

**प्रस्तावना :-** वित्त विभागाच्या संदर्भाधिन क्र.१ च्या दिनांक ६ जून, २००८ च्या शासन निर्णयानुसार अखर्चित अनुदान हे लगतच्या एक वर्षापर्यंत खर्च करण्यास अनुमती आहे. जिल्हा परिषद, नांदेड यांना राष्ट्रीय समविकास योजना, ग्रामीण विकास मिशन, जिल्हा वार्षिक योजना, ग्रामीण पायाभूत विकास निधी, जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना, १३ वा वित्त आयोग अंतर्गत रु.५७,४१,७६,०००/- (अक्षरी रुपये सत्तावन्न कोटी एकेचाळीस लाख श्याहत्तर हजार फक्त) इतका निधी सन २००७-०८ ते सन २०१३-१४ या वर्षात अंगणवाडी बांधकामासाठी उपलब्ध करुन देण्यात आला होता. तथापि नांदेड जिल्हा परिषदेकडे सदर निधीपैकी रुपये २१,९३,८३,११५/- (अक्षरी रुपये एकवीस कोटी त्र्याण्णव लाख त्र्याऐंशी हजार एकशे पंधरा फक्त) इतका निधी अखर्चित राहिला होता. सदर अखर्चित निधी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात खर्च करण्यास परवानगी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-** सन २००७-०८ ते सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषद, नांदेड यांना राष्ट्रीय समविकास योजना, ग्रामीण विकास मिशन, जिल्हा वार्षिक योजना, ग्रामीण पायाभूत विकास निधी, जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना, १३ वा वित्त आयोग अंतर्गत रु.५७,४१,७६,०००/- (अक्षरी रुपये सत्तावन्न कोटी एकेचाळीस लाख श्याहत्तर हजार फक्त) इतका निधी सन २००७-०८ ते सन २०१३-१४ या वर्षात अंगणवाडी बांधकामासाठी उपलब्ध करुन देण्यात आला होता. तथापि नांदेड जिल्हा परिषदेकडे सदर निधीपैकी रुपये २१,९३,८३,११५/- (अक्षरी रुपये एकवीस कोटी त्र्याण्णव लाख त्र्याऐंशी हजार एकशे पंधरा फक्त) इतका निधी अखर्चित राहिला होता. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी वरील सर्व स्त्रोतामधून प्राप्त झालेला निधी व शिल्लक निधीबाबत आढावा घेतला आहे

या अटीच्या अधिन राहून उपरोक्त नमूद अखर्चित निधीपैकी पुर्ण झालेल्या अंगणवाडी बांधकामासाठी देय रक्कम रुपये ३,४८,२८,१३८/- व प्रगतीपथावरील कामांसाठी देय असलेला निधी रुपये ७,२६,७९,८९९/- अशाप्रकारे एकूण १०,७५,०८,०३७/- इतका निधी (सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात दिनांक ३१/०३/२०१६ पर्यंत खर्च करण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ) जी कामे भौतिकदृष्टया पुर्ण झाली आहेत व खर्चाच्या परवानगी अभावी देयकाचे प्रदान होऊ शकत नाही अशा कामावर निधी खर्च करण्यात यावा. तसेच त्या कामावर इतर स्त्रोतातून खर्च न झाल्याची खात्री मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी करावी.

आ) जी कामे सुरु होऊन भौतिकदृष्टया अपुर्ण आहेत ती कामे पुढील दिनांक ३१/०३/२०१६ पर्यंत पुर्ण होतील असे नियोजन करुन सदर निधी दिनांक ३१/०३/२०१६ पर्यंत खर्च करण्यात येईल याची दक्षता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी घ्यावी.

इ) जी कामे अद्याप सुरु झालेली नाहीत त्या कामांचा निधी तात्काळ शासनास समर्पित करावा.

२. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०.१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय, दिनांक २५/०८/२०१५ अन्वये अखर्चित निधी खर्च करण्यास मान्यता देण्याबाबत प्रशासकीय विभागांना दिलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५११२११५००२३६२३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vasave Vijesing F

Digitally signed by Vasave Vijesing F
DN: c=IN, o=Govt of Maharashtra, ou=Women and Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Vasave Vijesing F
Date: 2015.11.23 15:26:43 +05'30'

(वि. फ. वसावे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १ / २, मुंबई नागपूर
२) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई
३) जिल्हाधिकारी, नांदेड
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद, नांदेड
६) वित्त विभाग, व्यय-६ व अर्थोपाय शाखा, मंत्रालय, मुंबई
७) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८) जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड
९) महिला व बाल विकास विभाग, कार्या.४, मंत्रालय, मुंबई
१०) निवड नस्ती / का.६

शासन निर्णय क्र.एबावि-२०१५/प्र.क्र.२९१/का.०६, दिनांक २१/११/२०१५ सोबतचे विवरणपत्र

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | मंजूर निधी | पूर्ण झालेल्या कामासाठी आवश्यक निधी | प्रगतीपथावरील कामासाठी आवश्यक निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय समविकास योजना | २००७-०८ | २५,६५,०००/- | १,०९,०००/- | १,४०,०००/- |
| २ | मानव विकास मिशन | २००७-०८ | ७९,८०,०००/- | १,९१,०६३/- | ------ |
| ३ | मानव विकास मिशन | २००९-१० | १,३२,००,०००/- | १३,९४,४८७/- | ----- |
| ४ | मानव विकास मिशन | २०११-१२ | ३,३९,३०,०००/- | ५,५०,३०१/- | ३५,८९,१४९/- |
| ५ | मानव विकास मिशन | २०१२-१३ | १,१७,००,०००/- | ----- | ९,९०,७३०/- |
| ६ | मानव विकास मिशन | २०१३-१४ | ४,८८,४०,०००/- | ७४,५३,६६६/- | ६९,२४,३३४/- |
| | | **एकूण** | **११,८२,१५,०००/-** | **९६,९८,५१७/-** | **१,१६,४४,२१३/-** |

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | मंजूर निधी | पूर्ण झालेल्या कामासाठी आवश्यक निधी | प्रगतीपथावरील कामासाठी आवश्यक निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा वार्षिक योजना | २००८-०९ | ६६,०१,०००/- | २,४२,५४५/- | ५,०१,०००/- |
| २ | जिल्हा वार्षिक योजना | २००९-१० | २,०२,००,०००/- | ३,५४,७८९/- | १६,३०,४०४/- |
| ३ | जिल्हा वार्षिक योजना | २०१०-११ | ९,४२,७५,०००/- | ९९,४५,५८८/- | १,७०,३५,२९१/- |
| ४ | जिल्हा वार्षिक योजना | २०११-१२ | ५,५३,०५,०००/- | ३४,४८,०२४/- | १,०१,०६,४९१/- |
| ५ | जिल्हा वार्षिक योजना | २०१२-१३ | ४,४४,६०,०००/- | ६,५६,१३८/- | ४७,३५,२४३/- |
| ६ | जिल्हा वार्षिक योजना | २०१३-१४ | १,२१,५०,०००/- | ५,३५,२२२/- | ८,१०,०००/- |
| | | **एकूण** | **२३,२९,९१,०००/-** | **१,५१,८२,३०६/-** | **३,४८,१८,४२९/-** |

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | मंजूर निधी | पूर्ण झालेल्या कामासाठी आवश्यक निधी | प्रगतीपथावरील कामासाठी आवश्यक निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामीण पायाभूत विकास निधी | २०१०-११ | ६,१६,२५,०००/- | ५७,८६,४३२/- | १,१२,२३,६८४/- |
| २ | ग्रामीण पायाभूत विकास निधी | २०११-१२ | ९०,००,०००/- | १,६३,३८९/- | १४,५०,२१२/- |
| | | **एकूण** | **७,०६,२५,०००/-** | **५९,४९,८२१/-** | **१,२६,७३,८९६/-** |

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | मंजूर निधी | पूर्ण झालेल्या कामासाठी आवश्यक निधी | प्रगतीपथावरील कामासाठी आवश्यक निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना | २०१०-११ | २,३९,००,०००/- | ३४,८६,५८०/- | ११,१३,४९७/- |
| २ | जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना | २०११-१२ | १,४४,००,०००/- | १३,६३४/- | २७,२०,८७४/- |
| ३ | जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना | २०१२-१३ | १,२८,७०,०००/- | १,१२,३२३/- | १४,३२,७४७/- |
| ४ | जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना स्टेट | २०१३-१४ | ५,६७,६०,०००/- | ५५,५६०/- | ४१,८६,११५/- |
| ५ | जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना डीपीडीसी | २०१३-१४ | १,३३,६५,०००/- | १,४३,७५१/- | ६,४४,७७८/- |
| | | **एकूण** | **१२,१२,९५,०००/-** | **३८,११,८४८/-** | **१,०६,९८,०११/-** |

शासन निर्णय क्रमांकः एबाविे-२०१५/प्र.क्र.२९१/का.०६,

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | मंजूर निधी | पूर्ण झालेल्या कामासाठी आवश्यक निधी | प्रगतीपथावरील कामासाठी आवश्यक निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १३ वा वित्त आयोग | २०११-१२ | १,६६,५०,०००/- | ५०,०००/- | २५,७५,३५०/- |
| २ | १३ वा वित्त आयोग | २०१२-१३ | १,४४,००,०००/- | १,३५,६४६/- | २,७०,०००/- |
| | | एकूण | ३,१०,५०,०००/- | १,८५,६४६/- | २८,४५,३५०/- |

पुर्ण झालेल्या कामांसाठी एकूण देय रक्कम रुपये :- ३,४८,२८,१३८/-

प्रगतीपथावरील कामांसाठी एकूण देय रक्कम रुपये :- ७,२६,७९,८९९/-

एकूण रुपये :- १०,७५,०८,०३७/-

Vasave Vijesing F

Digitally signed by Vasave Vijesing F
DN: c=IN, o=Govt of Maharashtra, ou=Women and Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Vasave Vijesing F
Date: 2015.11.23 15:27:03 +05'30'

(वि. फ. वसावे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

परिशिष्ट १.३

अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामासाठी
निश्चित नमुना आराखडा (Type Plan)
प्रमाणे बांधकामाचा खर्च वाढविणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र. एबावि-२००८/प्र.क्र.१७३ (भाग-१)/का-६
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २० एप्रिल, २०११

**वाचा :-** १) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र.एबावि-२००८/प्र.क्र.१७३/का.६, दिनांक १५ जानेवारी, २०१०

**प्रस्तावना :-** वाचा येथील शासन निर्णयासोबतच्या नमुना आराखडयाप्रमाणे एका अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम जास्तीत जास्त रु.४.०० लाख या मर्यादेत करण्याची परवानगी देण्यात आली आहे. या खर्चाच्या मर्यादेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** या शासन निर्णयानुसार नमुना आराखडयाप्रमाणे एका अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम आता रु.४.०० लाख ऐवजी जास्तीत जास्त रु.४.५० लाखापर्यंत खर्च करण्यास परवानगी याद्वारे देण्यात येत आहे. सुधारित खर्चाची मर्यादा सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासून हाती घ्यावयाच्या बांधकामांना लागू राहील. दिनांक १५ जानेवारी, २०१० च्या शासन निर्णयातील अन्य अटी व शर्ती पूर्वीप्रमाणेच कायम आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०११०४२०१२४११२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(ज. कि. मगर)
सह सचिव

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री /राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, (नियोजन) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
सर्व मंत्रालयीन विभाग.
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र मुंबई / नागपूर
आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
महासंचालक, राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन, औरंगाबाद
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (बाल कल्याण),
महिला व बाल विकास विभागातील सर्व उप सचिव,
अवर सचिव व कार्यासने
निवड नस्ती (कार्यासन ६)

परिशिष्ट १.४

अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामासाठी निश्चित नमुना आराखडा (Type Plan) प्रमाणे बांधकामाचा खर्च वाढविणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

महिला व बाल विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक-एबाविं-२०१३/प्र.क्र.१५८/का. ६

नवीन प्रशासन भवन,३ रा मजला,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ३२.

दिनांक :- २९ जानेवारी, २०१४

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र.एबाविं-२००८/प्र.क्र.१७३/का.६, दिनांक १५ जानेवारी, २०१०

२) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र.एबाविं-२००८/प्र.क्र.१७३(भाग-१)/का.६, दिनांक २० एप्रिल, २०११

<u>प्रस्तावना</u> :- वाचा क्र.१ येथील शासन निर्णयासोबतच्या नमुना आराखडयाप्रमाणे एका अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम जास्तीत जास्त रु.४.५० लाख या मर्यादेत करण्याची परवानगी वाचा क्र.२ नुसार देण्यात आली आहे. सध्या या खर्चाच्या मर्यादेत अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम होत नसल्यामुळे अंगणवाडी केंद्र इमारत बांधकाम खर्चाच्या वित्तीय मर्यादेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :- या शासन निर्णयानुसार नमुना आराखडयाप्रमाणे एका अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम आता रु.४.५० लाख ऐवजी बिगर आदिवासी क्षेत्रात जास्तीत जास्त रु.६.०० लक्ष व आदिवासी क्षेत्रात जास्तीत जास्त रु.६.६० लक्ष पर्यंत खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सुधारित खर्चाची मर्यादा नव्याने मंजूरी देण्यात येणा-या अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामासाठी लागू राहील. दिनांक १५ जानेवारी, २०१० च्या शासन निर्णयातील अन्य अटी व शर्ती पूर्वीप्रमाणेच कायम आहेत. तसेच प्रि-फॅब्रिकेटेड स्ट्रक्चर टेक्नॉलॉजीचा वापर करुन अंगणवाडी केंद्र इमारत बांधकाम करण्यासाठी सुध्दा बिगर आदिवासी क्षेत्रासाठी रु.६.०० लक्ष पर्यंत व आदिवासी क्षेत्रासाठी रु.६.६० लक्ष पर्यंत ही मर्यादा निश्चित करण्यात येत आहे. तथापि, प्रि-फॅब्रिकेटेड स्ट्रक्चर टेक्नॉलॉजीचा वापर करुन अंगणवाडी केंद्र इमारत बांधकाम करताना ई-निविदेद्वारे प्रस्ताव मागवून अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम करावे.

सदर शासन निर्णय वित्त विभाग क्र.विअप्र-१००८/प्र.क्र.७०/२००८/विनियम, दिनांक १५.०५.२००९ च्या शासन निर्णयात भाग-१ उपविभाग-५ अनुक्रमांक -३ नुसार विभाग प्रमुखांना असलेल्या अधिकाराअन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१४०२०४१२१५१८९५३० असा आहे.

हा आदेश या शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दि. बा. पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री /राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, (नियोजन) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
सर्व मंत्रालयीन विभाग.
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र मुंबई / नागपूर
आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
महासंचालक, राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन, औरंगाबाद
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (बाल कल्याण),
महिला व बाल विकास विभागातील सर्व उप सचिव, अवर सचिव व कार्यासने
निवड नस्ती (कार्यासन ६)

परिशिष्ट २.१

७३ व्या घटना दुरुस्तीनुसार नव्याने जिल्हे, परिषदांकडे विषय व योजना यांचे हस्तांतरण अर्थिक व्यवस्थापन, लेखांकन, कार्यपद्धती इ.

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-जिपयो-१०/२०००/प्र.क्र. ११३/४७,
मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२,
दिनांकः- २८ सप्टेंबर २०००

वाचा :- (१) शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग क्रमांक - डब्ल्युएमए-१०७९/४७२३/६८५/ मंत्रालय, मुंबई -४०० ०३२. दिनांक २७ डिसेंबर, १९७९

(२) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्रमांक-झेडपीए- १०९०/सी आर-१६५२/२४, मंत्रालय, मुबई ४०० ०३२ दिनांक ७ जानेवारी १९९२.

<u>प्राश्र्वभुमी</u> :- ७३ व्या घटना दुरूस्तीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांना भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ (जी) च्या अनुसुची ११ मध्ये दर्शविलेल्या २९ विषायांचे हस्तांतरण करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन असुन आता याबाबत राज्य शासनाकडील कांही विषय जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. तसेच कांही योजना जिल्हा परिषदांकडे महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम १२३ अन्वये अभिकरण तत्वावर सोपवण्यात आल्या होत्या. त्या सदर योजना आता कलम १०० खाली हस्तांतरितं करावयाचे बाबत कांही प्रशासकीय विभागाच्या संदर्भात निर्णय झाला आहे. तसेच राज्य स्तरावरील कांही योजना कलम १०० खाली तर कांही कलम १२३ खाली वर्ग करण्याबाबत निर्णय झालेला आहे. दिनांक २ आक्टोंबर २००० पासुन अंमलात आणावयाच्या या बदलाबाबत प्रशासकीय विभाग त्यांचे आदेश निर्गमीत करतील. या संदर्भात आर्थिक व्यवस्थापन लेखाकंन अर्थसंकल्प इ. बाबत कोणत्या सूधारणा कराव्या लागतील याचे मार्गदर्शन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u> :- त्यास अनुसरुन शासन आता जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत होणा-या योजनांसाठी आर्थिक व्यवस्थापन, लेखांकन अर्थसंकल्प इत्यादी बाबत खालील पध्दतीप्रमाणे कार्यवाहीस मान्यता देत आहे.

...... या शासन प्रत्येक योजना सुधारित आदेश... कोणत्या कलमान्वये दिली आहे याची खात्री करुन त्या प्रमाणे प्रथम कलम १०० व १२३ कलम याबाबत स्वतंत्र यादी बनविण्यात यावी. सदर यादी संबंधीत प्रशासकीय विभागाने तयार करावी व ग्राम विकास विभाग, सर्व विभागीय आयुक्त, महालेखापाल, मुख्य लेखा परिक्षक, संबधीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संचालक, लेखा व कोषागारे, वित्त विभाग यांना पाठविण्यात यावी. जिल्हा परिषदेने त्यांना वर्ग केलेल्या योजनांबाबत आदेश क्रमांक नमुद करुन कलम १०० व कलम १२३ खाली सुची तयार करुन मुख्य लेखा परिक्षणास उपलब्ध करुन द्यावी.

२. जिल्हा परिषदेकडे महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम १२३ खाली योजना सुपुर्द करतांना, सबंधीत प्रशासकीय विभागांनी जिल्हा परिषदांना योजनेच्या अंमलबजावणी सबंधी सविस्तर व स्पष्ट सुचना द्याव्यात.

. कलम १२३ खालील अभिकरण योजना या अधिनियमातील तरतुदीनुसार जिल्हा परिषदांकडे सुपुर्द केल्या असल्याने या योजना राबविण्याची जबाबदारी महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम ९५ नुसार जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांची असेल. अधिनियमातील या तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखांना/गट विकास अधिका-यांना आणि कर्मचा-यांना या संबधात योग्य त्या सुचना देतील. अभिकरण योजना राबविण्यासंबंधी द्यावयाच्या सुचना, शासनाच्या प्रशासकीय विभागांनी अथवा नियंत्रक अधिका-यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांना दिल्या पाहिजेत. अशा कोणत्याही सुचना नियंत्रक अधिका-यांनी जिल्हा परिषदांच्या विभाग प्रमुखांना व अधिका-यांना परस्पर देणे हे अधिनियमातील संबंधीत तरतुदीना बाधा आणणारे ठरेल.

वेतन इत्यादी बाबीवर तसेच योजनांच्या बाबतीत अनुदान अपुरे पडणार नाही याची जबाबदारी जिल्हा परिषद विभाग प्रमुखांनी घ्यावयाची आहे. यासाठी योग्य तो प्रस्ताव मुळ अर्थसंकल्पाच्या वेळी, सुधारीत अर्थसंकल्पाच्या वेळी दिला जाणे ही ज्या-त्या विभाग प्रमुखाची जबाबदारी आहे. अशा प्राप्त प्रस्तावावर अर्थसंकल्पिय तरतुद करुन घेण्याच्या दृष्टीने प्रशासकीय

विभागाने प्रयत्न करणे राहील. आर्थीक वर्षाच्या शेवटी अतिरीक्त रक्कम अथवा प्रत्यार्पित करावयाची रक्कम याबाबतची खबरदारी जिल्हा परिषद व प्रशासकीय विभाग दोन्हीही समन्वयाने घेणे अपेक्षीत आहे. कोणत्याही परिस्थितीत अर्थसंकल्पिय अनियमितता होणार नाही याची दक्षता दोन्ही स्तरावर आवश्यक आहे.

५. प्रशासकीय विभागांनी सुधारीत लेखांकन पध्दतीच्या अनुषंगाने अनुदान वितरण, अर्थोपाय आगाऊ रक्कमांचे समायोज्य अनुदान आदेश, खर्चाची विवरणपत्रे, योजनांवर नियंत्रण, अनुदानांचे निर्धारण व येणे-देणे रक्कमा निश्चीत करणे या संदर्भात विभाग प्रमुखांना/नियंत्रक अधिका-यांना आवश्यक त्या सुचना तात्काळ काढाव्यात.

६. नव्याने वर्ग होणा-या योजनांवरील खार्चाचे अंतर्गत व पुर्व लेखा परिक्षण हे जिल्हा परिषदेच्या वित्त विभागामार्फत करण्यांत येईल.

७. वित्तीय व्यवस्थापनाच्या दृष्टीने दिनांक २ ऑक्टोबर, २००० पासुन दिनांक ३१ मार्च, २००१ या कालावधीसाठी पुढील प्रमाणे कार्यवाही करावी :-

महाराष्ट्र शासनाचे २०००-२००१ या आर्थीक वर्षाचे अर्थसंकल्पात राज्य स्तरीय योजनांसाठी खालील प्रमाणे तरतुद प्रधानशिर्ष निहाय केलेल्या आहेतः-

अ) राज्य स्तरीय अस्थापना विषयक खर्च,
ब) राज्य स्तरीय योजना कार्यालयीन खर्च,
क) स्थानिक संस्थांना सहाय्यक अनुदाने.

यापैकी स्थानिक संस्थांना सहाय्यक अनुदाने या प्रवर्गातील तरतुदीच्या संदर्भात कोणताही बदल झालेला नाही.

अ) शासनाच्या विविध विभागाच्या आस्थापनेवरंती जे कर्मचारी दिनांक २ ऑक्टोंबर २००० पासुन जिल्हा परिषदांकडे वर्ग केले जातील त्यांचे वेतन भत्ते इ. आहरण करण्यासाठी खालील पध्दतीचा अवलंब करावा.

अशा कर्मचाऱ्यांची देयके जिल्हा कोषागारातुन/उप कोषागारातुन जिल्हा परिषदेच्या संबधीत विभाग प्रमुखांनी/आहरण अधिकाऱ्यांनी आहरित करावयाची आहेत. हा खर्च अर्थसंकल्पातील राज्य स्तरीय अस्थापना विषयक तरतुदीतुन करावयाचा आहे. अशा तरतुदी संबधीत प्रशासकीय विभागाच्या नियंत्रण अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदांना व कोषागाराला तसेच महालेखापालांना कळवाव्यात. प्रशासकीय विभागाखालील याबाबतचा कोणताही निधी जिल्हा निधीमध्ये वर्ग करता येणार नाही.

ब) अर्थसंकल्पातील राज्यस्तरीय योजना कार्यान्वयनाच्या दिनांक २ ऑक्टोबर २००० रोजीच्या अखर्चित तरतुदी संबंधीत प्रशासकीय विभागाच्या नियंत्रक अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदनिहाय कळवाव्यात. या तरतुदीमधुन या कालावधीतील खर्चाची देयके जिल्हा परिषदेच्या संबधीत विभाग प्रमुखांनी कोषागारामधुन आहरित करावी या प्रयोजनार्थ संबंधीत प्रशासकीय विभागांनी जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखास आहरण अधिकारी म्हणुन घोषीत करावे. तसेच आवश्यकतेनुसार उप कोषागार स्तरावर आहरण अधिकारी घोषीत करता येतील. कोषागारातुन आहरण करणेसाठी महालेखापालाकडुन प्राधिकारपत्र व संचालक लेखा व कोषागारे यांचेकडुन संगणक संकेतांक त्वरीत प्राप्त करुन घेण्याची व्यवस्था करावी.

) जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखांनी उपरोक्त ७ (अ) व (ब) प्रकारे केलेल्या खर्चाची ासिक विवरणपत्रे संबधीत लेखाशिर्षाच्या नियंत्रक अधिकाऱ्यांना सादर करावीत. सदरहु र्चाच्या ताळामेळाची जबाबदारी संबंधीत नियंत्रक अधिकाऱ्यांची राहील. हा खर्च जिल्हा रेषदेच्या नियमित लेख्यात यावर्षी समाविष्ट केला जाणार नसला तरी, सबंधीत जमाखर्चाची

माहिती मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी संकलित करुन मुख्य कार्यकारी अधिकारी व संबधीत समित्यांच्या निदर्शनास आणावी.

९) योजना कार्यान्वयन करण्यासाठी आवश्यक त्या मान्यता जिल्हा परिषद कायद्यास अनूसरून सक्षम प्रधिका-यांकडुन घेण्यात यावी व त्यासाठी मान्यता घेण्याची कार्यपध्दत महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पचांयत समित्या अधिनियम, १९६१ व महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता १९६८ प्रमाणे राहील. ही कार्यपध्दती दि. २ आक्टोबर २००० पासुन

आवश्यक ते फेरबदल केल्यानंतर दिनांक १ एप्रिल २००१ पासुन करावयाच्या खर्चाबाबत स्वतंत्र आदेश निर्गमीत करण्यात येतील.

उपरोक्त आदेशाचे सुवस्थीतपणे पालन हाणे बाबत आदेश मुख्य कार्यकारी अधिका-यांनी मुख्यलेखा व वित्त अधिकारी यांच्या सल्ल्याने सर्व आहरण अधिंका-यांना दिनांक १५ आक्टोबर २००० पर्यंत निर्गमीत करावे.

सदर शासन निर्णय हा वित्त विभाग/नियोजन विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रं. प्रक्र ७७६/व्यय-१५ दि. २७ सप्टेबर २००० अन्वये निर्गमीत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(चंद्रा अय्यंगार)
सचिव ग्रामविकास

// सत्यप्रत //

एस.एस. जाधवर
वकील.

EXHIBIT "B'

कृषि विभाग

कृषि विभागाकडील जिल्हा परिषदेकडे वर्ग करावयाच्या योजना
कलम १०० खाली

अक्र अ) पीक संवर्धन

राज्य योजना

१. विदर्भासाठी ऊस उत्पादनाचा विशेष कार्यक्रम
२. राष्ट्रीय पीक विमा योजना
३. सुशिक्षित बेरोजगारांसाठी स्वंयशेतीसाठी अर्थसहाय्य
४. अन्नधान्य उत्पादनाचा विशेष कार्यक्रम (भात)
५. तेलबिया उत्पादनाचा विशेष कार्यक्रम
६. राज्य पुरस्कृत तुषार व ठिबक सिंचन योजना
७. नील हरित शेवाळ पिकास योजना
८. दारिद्रय रेषेच्या वर आणण्यासाठी आदिवासींना शेतीसाठी सहाय्य
९. दारिद्रय रेषेच्या आणण्यासाठी अनुसूचित जाती व नवबौध्दांना शेतीसाठी सहाय्य
एकुण ९

कलम १२३ खाली

१. एकात्मीक तृणधान्य विकास कार्यक्रम.
२. राष्ट्रीय कडधान्य विकास कार्यक्रम.
३. राट्रीय तेलबिया उत्पादन कार्यक्रम
४. गतिमान मका विकास कार्यक्रम
५. सधन कापुस विकास कार्यक्रम.
६. उसावर अधारित पीक पध्दतीच्या श्राश्वत विकासाची योजना.
७. कृषी यांत्रीकीकरणाचा विस्तार-ट्रक्टरचे वितरण
८. कृषी क्षेत्रात महीलांचा सहभाग
९. मिनीफीटचे वाटप.
एकुण ९.

विशेष केंद्रीय सहाय्यित योजना

१. आदिवासी उपयोजना क्षेत्र तसेच उपयोजना क्षेत्राबाहेरील शेतक-यांना खते, बियाणे इ. साठी अथसहाय्य.
२. आदिवासी उपयोजना क्षेत्र तसेच उपयोजना क्षेत्राबाहेरील साठा व मिर्नमाडा क्षेत्रातील आदिवासींना कृषी विकास विषयक निरनिराळया कार्यक्रमांसाठी अर्थसहाय्य.
एकुण-२

// सत्यप्रत //

एस.एस.जाधवर
वकील.

परिशिष्ट २.२ — **कृषि विभागाच्या राज्य शासन राबवित असलेल्या काही योजना जिल्हा परिषदामार्फत कलम १२३ खाली राबविणे--**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक आकृवि-१२००/प्र.क्र.४७४(२)/१५-अे,**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : ०१ फेब्रुवारी, २००१.**

वाचा :- (१) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्रमांक जिपअ-१०९२/प्र.क्र.३४०/०४ दिनांक २ जून,१९९२.
(२) शासन निर्णय,कृषि व पदुम विभाग क्र.आकृवि-१२९८/प्र.क्र.६१/१५-अे, दिनांक २९ मे, १९९८.
(३) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,क्रमांक - जिपयो-१०/ २०००/प्र.क्र.११३/४७, दिनांक २८ सप्टेंबर,२०००.
(४) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र. जिपयो-१०२००० /प्र.क्र.११३ /४७, दि. १६ ऑक्टोबर, २०००.
(५) शासन निर्णय, कृषि, पशुसंवसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्र.आकृवि १२००/प्रक्र ४७४(३)/१५-अे, दिनांक ०१ फेब्रुवारी २००१.

**प्रस्तावना-**

कृषि विभागाची पुनर्रचना शा.नि.दि. २९/५/१९९८ अन्वये दिनांक ०१ जुलै, १९९८ पासून करण्यात आली व या पुनर्रचनेत कृषि विस्तार, फलोत्पादन व मृद संधारण या तीनही यंत्रणांचे एकत्रीकरण करण्यांत आले आहे. त्यानुसार, तीनही यंत्रणेशी संबंधीत योजना एकत्रित हाताळल्या जावू लागल्या होत्या.भारतीय संविधानाच्या ७३ व्या दुरुस्ती नंतर पंचायत राज संस्थांना सक्षम व लोकाभिमुख करण्याकरिता राज्य शासनाच्या अधिनस्त असलेल्या विविध योजना जिल्हा परिषदामार्फत राबविणे आवश्यक झाले आहे.

**शासन निर्णय -**

कृषि विभागाच्या पीक संवर्धन व फलोत्पादन विकासाच्या विवरणपत्र १ मध्ये दर्शविलेल्या एकूण ३७ योजना महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनीयम, १९६१ च्या कलम १२३ खाली अभिकरण शुल्काशिवाय राबविण्यास शासन मान्यता देण्यांत येत आहे. सदर कलमाखाली योजना राबविण्यासाठी सुपुर्द करण्याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे शासन आदेश, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग क्रमांक आकृवि १२००/प्रक्र ४७४(१)/१५-अे, दिनांक ०१ फेब्रुवारी,२००१ अन्वये निर्गमित करण्यांत आले आहेत.

२. वरील परिच्छेद-१ मध्ये नमूद केल्यानुसार कृषि विभागाच्या योजना जिल्हा परिषदामार्फत प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी विविध स्तरावर या परिच्छेदात पुढे नमुद केल्याप्रमाणे कर्मचारी आकृतिबंध विहित करण्यात येत आहे. शासन निर्णय, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग क्रमांक आकृवि-१२९८/प्रक्र.६१/१५-अे, दिनांक २९ मे, १९९८ व त्यानंतर वेळोवेळी सुधारणा करण्यांत आलेल्या शासन निर्णयान्वये कृषि खात्याची पुनर्रचना करतेवेळी विहित करण्यात आलेला जिल्हा पातळीपासून क्षेत्रिय पातळी पर्यंतचा यापूर्वीचा आकृतीबंध आता अस्तित्वात राहणार नाही.

सुधारित आकृतीबंधानुसार आता जिल्हा परिषदेकडील कृषि विकास अधिकारी कार्यालय अस्तित्वात असणार नाही. कृषि विभागाच्या योजना जिल्हा परिषदामार्फत राबविण्यासाठी जिल्हा परिषद स्तरावरील सुधारित कर्मचारी आकृतिबंध पुढीलप्रमाणे राहील:-

| अ.क्र. | पदनाम | १० पेक्षाकमी तालुके असलेल्या जिल्ह्या साठी | | १०पेक्षा जास्त तालुके असलेल्या जिल्ह्यासाठी पदे | | एकूण पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पद संख्या | एकुण पद | पद संख्या | एकूण पद | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | तांत्रिक | | | | | |
| १ | अधिक्षक कृषि अधिकारी ( म.कृ.से. गट-अ ) | १ | १६ | १ | १७ | ३३ |
| २ | कृषि उप संचालक ( म.कृ.से. गट-अ ) | २ | ३२ | ३ | ५१ | ८३ |
| ३ | कृषि अधिकारी ( म.कृ.से. गट-ब कनिष्ठ )/कृषि अधिकारी (जिल्हा परिषद) | ३ | ४८ | ३ | ५१ | ९९ |
| ४ | कृषि पर्यवेक्षक /विस्तार अधिकारी (कृषि) (गट-क) | ३ | ४८ | ३ | ५१ | ९९ |
| ५ | कृषि सहाय्यक (गट-क) | ३ | ४८ | ३ | ५१ | ९९ |
| ६ | आरेखक (गट-क) | १ | १६ | १ | १७ | ३३ |
| ७ | अनुरेखक (गट-क) | १ | १६ | १ | १७ | ३३ |
| | अतांत्रिक | | | | | |
| ८ | सहाय्यक प्रशासन अधिकारी ( सा.रा.सं. गट-ब) | १ | १६ | १ | १७ | ३३ |
| ९ | लेखा अधिकारी ( गट-ब ) | १ | १६ | १ | १७ | ३३ |
| १० | अधिक्षक / कक्ष अधिकारी (गट-क) | १ | १६ | १ | १७ | ३३ |
| ११ | वरिष्ठ लिपीक / वरिष्ठ सहाय्यक (गट-क) | ५ | ८० | ५ | ८५ | १६५ |
| १२ | कनिष्ठ लिपीक / कनिष्ठ सहाय्यक (गट-क) | २ | ३२ | २ | ३४ | ६६ |
| १३ | लघुलेखक ( निम्नश्रेणी ) (गट-क) | १ | १६ | १ | १७ | ३३ |
| १४ | लघुटंकलेखक (गट-क) | १ | १६ | १ | १७ | ३३ |
| १५ | वाहन चालक (गट-क) | ३ | ४८ | ३ | ५१ | ९९ |
| १६ | नाईक (गट-ड ) | १ | १६ | १ | १७ | ३३ |
| १७ | शिपाई (गट-ड ) | ३ | ४८ | ३ | ५१ | ९९ |
| | एकुण | ३३ | ५२८ | ३४ | ५७८ | ११०६ |

२.(अ)१ जिल्हा परिषदामार्फत राबविण्यात येणा-या विवरणपत्र-१ मधिल राज्य व केंद्र पुरस्कृत योजनांतील (प्रचार आणि फलोत्पादन ) प्रात्यक्षिक व प्रशिक्षण हे घटक राज्य शासनाच्या जिल्हा स्तरावरील कृषि अधिकाऱ्यांमार्फत राबविण्यात येतील. यामध्ये निधी वितरण संनियंत्रण आणि समन्वयासंबंधी मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत.

२.(अ)२ जिल्हा परिषद स्तरावरील अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयांकरीता लेखा अधिकारी ( गट-ब ) यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक व एक कृषि अधिकारी यांना कृषि निविष्ठांचे गुण नियंत्रणाचे कामाप्रित्यर्थ निरीक्षक म्हणून घोषित करण्यात येत आहे. जिल्हा परिषद स्तर व राज्य शासन जिल्हास्तरावरील कार्यालयाकडील गुणनियंत्रणाच्या कामाच्या वाटपाचे आदेश वेगळ्याने काढण्यांत येतील.

२.(अ)३ अधिक्षक कृषि अधिकारी हे थेट जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अधिपत्याखाली काम करतील व त्यांना कृषि विभागाचे प्रशासकीय अधिकार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिका-याच्या आहरण अधिकाराशी समकक्ष राहतील.

२.(ब) <u>तालुका (पंचायत समिती) स्तर</u> : -

जिल्हा परिषद अंतर्गत तालुका (पंचायत समिती ) स्तरावर पंचायत समितीच्या गट विकास अधिका-याच्या समकक्ष कृषि विभागाचे कृषि विकास अधिकारी श्रेणी-१ व श्रेणी-२ चे कार्यालय प्रमुख असलेले अशा दोन प्रकारचे आकृतिबंध तालुका स्तरावर विहीत करण्यांत येत आहेत. ज्या ठिकाणी जिल्हा परिषदांच्या पंचायत समित्यांकडील गट विकास अधिकारी गट-अ संवर्गातील असेल त्या ठिकाणी कृषि विभागाकडील कृषि विकास अधिकारी हे महाराष्ट्र कृषि सेवा गट-अ संवर्गातील राहील. ज्या ठिकाणी पंचायत समित्यांकडील गट विकास अधिकारी गट ब संवर्गातील असेल त्या ठिकाणी कृषि विभागाकडील कृषि विकास अधिकारी महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब संवर्गातील राहील. ज्या-ज्या वेळी जिल्हा परिषदेच्या गट विकास अधिकारी या पदांची श्रेणीवाढ होईल त्यावेळी तालुका (पंचायत समिती) पातळीवरील कृषि विकास अधिकारी यांच्या पदाचीही स्वाभाविक श्रेणी वाढ करण्यात येईल. तसेच, तालुका स्तरावर नियुक्त करण्यांत येणा-या कृषि विभागाच्या श्रेणी-१ मधील अधिका-याचे पदनाम कृषि विकास अधिकारी गट-अ तर श्रेणी-२ मधील अधिका-याचे पदनाम कृषि विकास अधिकारी गट-ब असे राहील.

२.(ब)१ तालुका स्तरावर कृषि विभागाचा कृषि विकास अधिकारी हा कृषि विभागाच्या कामाकरिता पूर्णत: जबाबदार राहील व समन्वय अधिकारी म्हणून गट विकास अधिकारी काम पहातील.

२.(ब)२ तालुका स्तरावरील कार्यालयांचा (विवरण पत्र -२ मधिल रकाना ३ व ४) एकूण ३४९ तालुक्यांसाठी (शहरी तालुके वगळून) कृषि विकास अधिकारी श्रेणी-१ (२०२ तालुके) व श्रेणी-२ (१४७ तालुके) चा आकृतिबंध खालीलप्रमाण राहील.

<u>तालुका स्तर श्रेणी - १</u>

| अ.क्र. | पदनाम | प्रति तालुका पद संख्या | एकुण पद संख्या |
|---|---|---|---|
| | तांत्रिक | | |
| १ | कृषि विकास अधिकारी ( म.कृ.से. गट-अ ) | १ | २०२ |
| २ | तंत्र अधिकारी ( म.कृ.से. गट-ब ) | १ | २०२ |
| ३ | कृषि अधिकारी म.कृ.से. गट ब (कनिष्ठ ) | १ | २०२ |
| ४ | कृषि पर्यवेक्षक (म.कृ.से.गट-क)/विस्तार अधिकारी (कृषि) | २ | ४०४ |
| ५ | अनुरेखक ( गट क ) | २ | ४०४ |
| | अतांत्रिक ( आस्था. व लेखा ) | | |
| ६ | सहाय्यक अधिक्षक (सा.रा. से. गट-क) | १ | २०२ |
| ७ | वरिष्ठ लिपिक / वरिष्ठ सहाय्यक ( गट-क ) | २ | ४०४ |
| ८ | कनिष्ठ लिपिक / कनिष्ठ सहाय्यक ( गट-क ) | २ | ४०४ |
| ९ | वाहन चालक ( गट-क ) | १ | २०२ |
| १० | शिपाई ( गट-ड ) | २ | ४०४ |
| | एकुण | १८ | [illegible] |

| अ.क्र. | पदनाम | प्रति तालुका पद संख्या | एकुण पद संख्या |
|---|---|---|---|
| | तांत्रिक | | |
| १ | कृषि विकास अधिकारी ( म.कृ.से. गट-ब ) | १ | १४७ |
| २ | कृषि अधिकारी म.कृ.से. गट-ब (कनिष्ठ) / कृषि अधिकारी (जिल्हा परिषद) | २ | २९४ |
| ३ | कृषि पर्यवेक्षक / विस्तार अधिकारी (कृषि) ( गट-क ) | २ | २९४ |
| ४ | अनुरेखक (गट क ) | २ | २९४ |
| | अतांत्रिक ( आस्था. व लेखा ) | | |
| ५ | सहाय्यक अधिक्षक ( गट-क) | १ | १४७ |
| ६ | वरिष्ठ लिपिक / वरिष्ठ सहाय्यक ( गट-क) | २ | २९४ |
| ७ | कनिष्ठ लिपिक / कनिष्ठ सहाय्यक ( गट-क) | २ | २९४ |
| ८ | वाहन चालक ( गट-क) | १ | १४७ |
| ९ | शिपाई ( गट-ड) | २ | २९४ |
| | एकुण | १५ | २२०५ |

२.(ब)३ कृषि विकास अधिकारी पंचायत समिती क्षेत्रामध्ये योजना अंमलबजावणी योग्य प्रकारे होण्यासाठी कृषि विभागाने निर्धारित केलेल्या प्रमाणात कामांची तपासणी करतील. तालुका स्तरावर कृषि विकास अधिकारी (श्रेणी-१/श्रेणी-२) यांच्या अधिनस्त असलेले अनुक्रमे तंत्र अधिकारी,महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब व तंत्र अधिकारी,महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब(कनिष्ठ)/कृषि अधिकारी (जिल्हा परिषद) यांना तालुका स्तरावरील कार्यालयाचे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यांत येत आहे. कृषि निविष्ठांचे गुणवत्ता नियंत्रण करण्याकरिता तालुका स्तरावरील कृषि विकास अधिकारी श्रेणी-१ व श्रेणी-२ आणि त्यांच्या अधिपत्याखाली असलेले तंत्र अधिकारी (गट-ब आणि गट-ब(कनिष्ठ)) यांना निरिक्षक म्हणून घोषित करण्यात येत आहे.

## २.(क) मंडलस्तर :-

राज्यातील जिल्हानिहाय व तालुका निहाय मंडल कार्यालयाची संख्या सोबतच्या विवरणपत्र २मधील रकाना ६ प्रमाणे विहीत करण्यांत येत आहे. या कार्यालयातील कार्यालय प्रमुख महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब(कनिष्ठ)/ कृषि अधिकारी (जिल्हा परिषद) हे अधिकारी राहतील. त्यांना मंडल कृषि अधिकारी असे संबोधण्यात येईल. मंडल कृषि अधिकारी यांना कार्यालय प्रमुख म्हणून घोषित करण्यात येत आहे.बारा कृषि सहाय्यकांचे कार्यक्षेत्र मिळून एक मंडल कार्यालय स्थापन करण्यात यावे. मंडल कृषि अधिकाऱ्यांच्या अधिनस्त योजना अंमलबजावणी, पर्यवेक्षणासाठी सहा कृषि सहाय्यकांमागे एक कृषि पर्यवेक्षक/विस्तार अधिकारी (कृषि) याप्रमाणे एकुण दोन कृषि पर्यवेक्षक/विस्तार अधिकारी (कृषि) राहतील. प्रत्येक मंडल कार्यालयासाठी खालीलप्रमाणे कर्मचारी आकृतीबंध विहीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | प्रति मंडल पद संख्या | एकूण पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | मंडल कृषि अधिकारी (म.कृ.से.गट ब (कनिष्ठ)) /कृषि अधिकारी (जि.प.) | १ | ८८५ |
| २ | कृषि पर्यवेक्षक/विस्तार अधिकारी (कृषि)(गट क ) | २ | १७७० |
| ३ | कृषि सहाय्यक ( गट क ) | १२ | १०६२० |
| ४ | शिपाई ( गट ड ) | १ | ८८५ |
| | एकुण | १६ | १४१६० |

२.(क)१ मंडल कृषि अधिकारी यांचे कार्यालय तालुक्याच्या मुख्यालयी कृषि विकास अधिकारी (श्रेणी-१/श्रेणी-२)यांच्या कार्यालयात राहील. मंडल कृषि अधिकारी यांना संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यास शासन मान्यता देण्यात येत असून मंडल कृषि अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या कृषि पर्यवेक्षक/ विस्तार अधिकारी यांचेमार्फत विहीत पध्दतीने निधीचे वाटप करावे.

२.(क)२ <u>क्षेत्रिय स्तर</u> -

मंडल स्तराअंतर्गत ग्रामपातळीवर सरासरी ३ ते ५ गावांच्या समुहाकरिता १ कृषि सहाय्यक राहील. कृषि सहाय्यकांचे व पर्यवेक्षकांचे मुख्यालय व अनुषंगिक बाबी या करीता निर्णय घेण्यास आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य,पुणे यांना प्राधिकृत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. <u>नवनिर्मित गोंदिया व हिंगोली जिल्ह्यांसाठी आणि तालुक्यांसाठी पद निर्मिती</u>

हिंगोली व गोंदिया हे दोन नवनिर्मित जिल्हयांसाठी विहित आकृतिबंधानुसार व जिल्हा परिषदेच्या जिल्हास्तरासाठी अनुक्रमे परिच्छेद-२(अ) मधील आकृतीबंधानुसार पदे निर्माण करण्यात येत आहेत. तसेच नवनिर्माण तालुक्यांसाठी परिच्छेद-२.(ब) २ मधील आकृतिबंधानुसार पदे विहीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे .

४. <u>महाराष्ट्र कृषि सेवा गट - अ मधील पदनिर्मिती</u>

कृषि विभागाच्या योजना जिल्हा परिषदांमार्फत राबविण्यासाठी सुधारित आकृतिबंधानुसार महाराष्ट्र कृषि सेवा गट-अ (वेतनश्रेणी रु.८०००-१३५००) मधील मंजूर पदांव्यतिरिक्त आवश्यक असलेली महाराष्ट्र कृषि सेवा गट-अ ची १५३ पदे निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

४.१ कृषि विभागाच्या योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत असतांना महाराष्ट्र कृषि सेवा, गट अ मधील पदांना असलेले विशेष वेतन हा आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून रद्द करण्यांत येत आहे.

५. <u>स्थावर, जंगम मालमत्ता इत्यादी बाबी</u>

जिल्हा परिषदांमार्फत राबविण्याच्या कृषि विभागाच्या योजनांशी निगडीत राज्य शासनाकडील वाहने, फर्निचर, फॅक्स, झेरॉक्स मशिन्स, संगणक , अनुषंगिक सामुग्री , दूरध्वनी यंत्रणा इत्यादी तसेच जडवस्तु संग्रह, ग्रामस्तरापर्यंतची प्रशिक्षण व भेट योजनेत बांधकाम केलेली निवासस्थाने आणि तद्नुषंगिक इतर स्थावर व जंगम मालमत्ता इत्यादी जिल्हा परिषदांकडे यथाप्रमाण ( Pro-rata basis) सुपूर्द करण्याबाबत तसेच कमी होणारे उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालये, स्थलांतरीत होणारी मंडल कृषि अधिकारी कार्यालये रिक्त करुन [illegible], कर्मचारी यांना पदस्थापना देणे इत्यादी बाबत संबंधितांना मार्गदर्शक सूचना / आदेश देण्याकरिता आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

६. <u>आर्थिक व्यवस्थापन, लेखांकन कार्यपध्दती इत्यादी</u>

या निर्णया सोबतच्या विवरणपत्र-१ मधील योजना जिल्हा परिषदांमार्फत [illegible] योजना राबविण्याबाबतचा खर्च दिनांक ३१/३/२००१ पर्यंत प्रचलित [illegible] २००१-२००२ या वर्षापासून कृषि विभागाच्या जिल्हा परिषदांमार्फत राबविण्याच्या [illegible] कर्मचारी यांच्या पदांसाठी वेतन व [illegible] बाबींकरीता आवश्यक असलेली [illegible]

जलसंधारण विभागाने विहित केलेल्या पध्दतीनुसार कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास [illegible] विभागामार्फत करण्यात येईल. याबाबत मार्गदर्शक सूचना व आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

७. नियंत्रण, आहरण व संवितरण प्राधिकारी इत्यादी

सुधारित आकृतिबंधानुसार खालील अधिका-यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच प्रतिस्वाक्षरी अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | आहरण व संवितरण अधिकारी | प्रतिस्वाक्षरी अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | अधिक्षक कृषि अधिकारी | लेखा अधिकारी (गट-ब) | अधिक्षक कृषि अधिकारी |
| २ | कृषि विकास अधिकारी (श्रेणी १) २०२ कार्यालये | तंत्र अधिकारी (म.कृ.से.गट ब) | कृषि विकास अधिकारी (श्रेणी १). |
| ३ | कृषि विकास अधिकारी (श्रेणी२) १४७ कार्यालये | कृषि अधिकारी (म.कृ.से.गट ब कनिष्ठ) / कृषि अधिकारी (जि.प.) | कृषि विकास अधिकारी (श्रेणी-२) |
| ४ | मंडल कृषि अधिकारी | फक्त संवितरण अधिकारी<br>मंडल कृषि अधिकारी | --- |

८. कर्तव्ये व जबाबदा-या

सुधारित आकृतीबंधातील सर्व पदांवरील कर्मचारी/अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदा-या निश्चित करून त्याबाबत सविस्तर आदेश/सूचना निर्गमित करण्यासाठी आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

८.१ जिल्हापरिषद स्तर, तालुका (पंचायत समिती) स्तर आणि मंडल स्तरावर आकृतिबंधानुसार गट ब , गट ब (कनिष्ठ) च्या पदावर आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच गट - क आणि गट ड च्या पदावर त्या त्या विभागाचे विभागीय कृषि सहसंचालक पदस्थापना करतील.

८.२ जिल्हा परिषदामार्फत कृषि योजना राबविण्यासाठी यापूर्वी निर्माण करण्यांत आलेली जिल्हा परिषदेकडील कृषि ग्राम विस्तारक / ग्राम सेवक ही कृषि विभागाची पदे याव्दारे रद्द करण्यांत येत आहेत. कृषि विभागाने निर्माण केलेली इतर पदे सुधारित आकृतीबंधामध्ये समायोजित करण्यांत येतील.

९. कृषि विभागाच्या योजना जिल्हा परिषदामार्फत राबवितांना कृषि विभागाचे कर्मचारी/अधिकारी फक्त कृषि विभागाशी संबंधीत काम करतील.

१०. संदर्भाधीन दिनांक २९ मे, १९९८ च्या शासन निर्णयानुसार झालेल्या कृषि विभागाच्या पुर्नरचनेनंतर मृद संधारण यंत्रणेचे कृषि विभागात विलीनीकरण झाले आहे. त्यानुसार मृद व जलसंधारणाची कामे सुध्दा सर्व स्तरांवर कृषि विभागाच्या कर्मचारी /अधिकारी यांच्या मार्फतच करण्यात येत आहेत. कृषि विभागाच्या योजना व अधिकारी / कर्मचारी जिल्हा परिषदेकडे सुपुर्द करण्यात येत असल्यामुळे मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापनाची कामे देखील त्याच यंत्रणेमार्फत करण्यात येतील.मृदसंधारणाच्या योजना जिल्हा परिषदामार्फत राबविण्यासंबंधीचे आदेश ग्राम विकास व जलसंधारण विभागामार्फत वेगळ्याने निर्गमित करण्यांत येत आहेत.

११. जिल्हा स्तरावर देण्यात आलेल्या गट क कर्मचा-यांचा प्रादेशिक संवर्ग असल्यामुळे सदर कर्मचा-यांच्या सेवा जिल्हा परिषदेकडे सुपुर्द केल्या तरी नियुक्ती अधिकारी या नात्याने प्रशासकीय व सेवाविषयक तथा [illegible] बाबींसाठी विभागीय कृषि सह संचालक हे नियंत्रण अधिकारी राहतील.

जिल्हा परिषदेकडे सुपुर्द केलेल्या गट-क व गट-ड मधील कर्मचा-यांच्या आस्थापना विषयक सर्व बाबी अधिक्षक कृषि अधिकारी हाताळतील.

१२. कृषि विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा जिल्हा परिषदेकडे सुपुर्द केल्या तरी गट अ, गट ब व गट ब (कनिष्ठ) या अधिका-यांचे नियंत्रण म्हणजे बदल्या, बढती, ज्येष्ठता सुची व शिस्तभंग विषयक कार्यवाही इत्यादी सेवाविषयक बाबी राज्य शासनाच्या कृषि विभागाच्या अखत्यारित राहतील .मात्र, गट ब आणि गट ब (कनिष्ठ ) च्या अधिकाऱ्यांच्या जिल्हा अंतर्गत बदलीचे अधिकार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे राहतील. त्याचप्रमाणे गट अ ते गट ड च्या अधिकारी / कर्मचारी यांच्या शिस्तभंग विषयक कार्यवाहीसाठी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील ) नियम, १९७९ मधील नियम १४ अन्वये जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे सक्षम राहतील.

१३. कृषि विभागाचा अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा जिल्हा परिषदांकडे सुपुर्द करतांना काही बदल्या करणे आवश्यक होणार आहे. या बदल्या कृषि विभागाच्या दिनांक ७ मार्च, २००० व त्याअनुषंगाने त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या अधिन राहून करण्यात याव्यात. या बदल्या करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २७ नोव्हेंबर, १९९७ च्या शासन निर्णयामधील अटी शिथिल करण्यास तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २६ जून, २००० व २६ जुलै, २००० च्या शासन निर्णयानुसार बदल्यांवर असलेली बंदी शिथील करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१४. हा शासन निर्णय, आदेश निर्गमित केलेल्या दिनांकापासून अंमलात येईल.

१५. हा शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग आणि वित्त विभागाच्या सहमतीने, वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र. ६७/२००१/व्यय-१, दिनांक ३० जानेवारी, २००१ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( शिवाजीराव देशमुख )
सचिव ( कृषि )

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मंत्री (कृषि )
मंत्री (फलोत्पादन)
मंत्री (जलसंधारण )
राज्यमंत्री ( कृषि ) / (जलसंधारण )/ ( फलोत्पादन)
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव,
अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग
प्रधान सचिव, वित्त विभाग
प्रधान सचिव, नियोजन विभाग
सचिव (ग्रामविकास), ग्रामविकास व जलसंधारण विभाग

... प्रधान सचिव/ सचिव

सदस्य सचिव, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे

आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे ( १० प्रती )

संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

संचालक (मृदसंधारण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

संचालक ( विस्तार), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

संचालक (नि. व गु. नि.), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

कृषि सहसंचालक (आस्थापना), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

सर्व विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी

संचालक, महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणिकरण यंत्रणा, अकोला

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, मुंबई

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला

तंत्र अधिकारी, वसंतराव नाईक राज्य कृषि व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर

सर्व विभागीय कृषि सहसंचालक / जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

सर्व उप विभागीय कृषि अधिकारी / सर्व तालुका कृषि अधिकारी/सर्व मंडल कृषि अधिकारी

महालेखापाल महाराष्ट्र -१ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता ) मुंबई

महालेखापाल महाराष्ट्र-२ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता ) नागपूर

मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.वाशी

उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

उप संचालक, लेखा व कोषागारे, कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई

आयुक्त साखर, महाराष्ट्र राज्य, पुणे

आयुक्त सहकार, महाराष्ट्र राज्य, पुणे

कुलगुरु, सर्व कृषि विद्यापीठे

मंत्रालयातील सर्व विभाग

सर्व कार्यासने. कृषि व पदुम विभाग,

निवड नस्ती

शासन निर्णय, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांक - आकृवि १२००/प्रक्र ४७४(२)/१५-अे. दिनांक १ फेब्रुवारी २००१ चे सहपत्र

## विवरण पत्र - १

### कृषि विभागाकडील जिल्हा परिषदेमार्फत राबविण्याच्या योजना

| अ.क्र | योजनेचे नांव | राज्य / जिल्हा / केंद्र पुरस्कृत |
|---|---|---|
| | (अ) राज्य योजना -- पीक संवर्धन | |
| १ | विदर्भासाठी ऊस उत्पादनाचा विशेष कार्यक्रम | राज्य |
| २ | राष्ट्रीय पीक विमा योजना | राज्य |
| ३ | सुशिक्षीत बेरोजगारांसाठी स्वयंशेतीसाठी अर्थ सहाय्य | राज्य |
| ४ | अन्न धान्य उत्पादनाचा विशेश कार्यक्रम (भात) | जिल्हा |
| ५ | तेलबिया उत्पादनाचा विशेष कार्यक्रम | जिल्हा |
| ६ | राज्य पुरस्कृत तुषार व ठिबक सिंचन योजना | जिल्हा |
| ७ | नील हरित शेवाळ विकास कार्यक्रम | जिल्हा |
| ८ | दारिद्र्य रेषेच्या वर आणण्यासाठी आदिवासींना शेतीसाठी सहाय्य | जिल्हा |
| ९ | दारिद्र्य रेषेच्या वर आणण्यासाठी , अनुसूचित जाती व नवबौध्दांना शेतीसाठी सहाय्य | जिल्हा |
| १० | एकात्मिक तृणधान्य विकास कार्यक्रम | राज्य /केंद्र (२५:७५) |
| ११ | राष्ट्रीय कडधान्य विकास कार्यक्रम | राज्य / केंद्र (२५:७५) |
| १२ | राष्ट्रीय तेलबिया उत्पादन कार्यक्रम | राज्य / केंद्र (२५:७५) |
| १३ | गतिमान मका विकास कार्यक्रम | राज्य /केंद्र (२५:७५) |
| १४ | सघन कापूस विकास कार्यक्रम | राज्य /केंद्र (२५:७५) |
| १५ | ऊसावर आधारित पीक पध्दतीच्या शाश्वत विकासाची योजना | केंद्र (२५:७५) |
| १६ | कृषि यांत्रिकीकरणाचा विस्तार - ट्रॅक्टरचे वितरण | केंद्र (१०० %) |
| १७ | कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग | केंद्र (१०० %) |
| १८ | मिनीकिटचे वाटप | केंद्र (१००%) |
| | विशेष केंद्रिय सहाय्यित योजना | |
| १९ | आदिवासी उप योजना क्षेत्र तसेच उपयोजना क्षेत्राबाहेरील शेतकऱ्यांना खते, बियाणे इ. साठी अर्थ सहाय्य | केंद्र (१००%) |
| २० | आदिवासी उप योजना क्षेत्र तसेच उपयोजना क्षेत्राबाहेरील माडा, व मिनीमाडा क्षेत्रातील आदिवासींना कृषि विकास विषयक निरनिराळ्या कामासाठी अर्थ सहाय्य | |

| अ.क्र. | योजनेचे नांव | राज्य/जिल्हा/केंद्र पुरस्कृत |
| --- | --- | --- |
| | ब) फलोत्पादन | |
| | राज्य योजना | |
| २१ | मेळघाट विकास कार्यक्रम . | राज्य |
| २२ | कोकण विभागासाठी कृषि उत्पादनाची शीतसाखळी. | राज्य |
| २३ | कोकणातील फलोत्पादन निर्यातीस प्रोत्साहन . | राज्य |
| २४ | कोकणातील काजू उद्योगास कर्जाच्या व्याज दरात सूट देणे. | राज्य |
| २५ | कोकणातील फळ प्रक्रिया उद्योगास प्रोत्साहन . . | राज्य |
| २६ | फलोत्पादन पिकांचे रोप संरक्षण | जिल्हा |
| | क) केंद्र पुरस्कृत योजना | |
| २७ | फलोत्पादन विकासासाठी ठिबक सिंचन योजना. | राज्य/ केंद्र (१०:९०) |
| २८ | काजू विकास व काजू रोप संरक्षण योजना . | केंद्र (१००%) |
| २९ | मसाला पिक विकास योजना . | केंद्र (१०० %) |
| ३० | आळंबी विकास योजना | केंद्र (१०० %) |
| ३१ | मुळे व कंद वर्गीय पिकाच्या विकासाची योजना | केंद्र (१००%) |
| ३२ | भाजीपाला विकास योजना | केंद्र (१००%) |
| ३३ | औषधी व सुगंधी वनस्पती विकासाची योजना | केंद्र (१००%) |
| ३४ | उष्ण कटिबंधीय व रुक्ष प्रदेशातील विकासासाठी योजना | केंद्र (१००%* |
| ३५ | भाजीपाला बियाणे उत्पादनाची योजना | केंद्र (१००%) |
| | नियोजन विभाग (कृषि विभागामार्फत अंमलबजावणी ) | |
| ३६ | पश्चिम घाट विकास कार्यक्रम | केंद्र पुरस्कृत (१००%) |
| ३७ | रोजगार हमी योजनेशी निगडीत फलोत्पादन कार्यक्रम | ९०%अनुदान१०% कर्ज राज्य |
| | एकूण ( अ+ब+ क) ३७ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | नंदूरबार | नंदूरबार | -- | नंदूरबार-१, नंदूरबार-२, धानोरा, कोरीट | ४ |
| | | नवापूर | -- | नवापूर, चिंचपाडा, मिसरवाडी, खांटबारा | ४ |
| | | शहादा | -- | शहादा, म्हसावद, कैठंबु, मंदाणे | ४ |
| | | तळोदा | -- | तळोदा, सोमावल | २ |
| | | अक्राणी | -- | धडगांव-१, धडगांव-२ | २ |
| | | अक्कलकुवा | -- | अक्कलकुवा, मोलगी, खापर | ३ |
| | एकुण : | ६ | -- | | १९ |
| ८ | जळगाव | जळगाव | -- | जळगांव-१, जळगांव-२ | २ |
| | | यावल | -- | यावल, फैजपूर, किनगांव | ३ |
| | | भुसावळ | -- | भूसावळ, वरणगांव | २ |
| | | -- | बोदवड | बोदवड | १ |
| | | -- | मुक्ताईनगर | मुक्ताइनगर, कु-हे | २ |
| | | रावेर | -- | रावेर, सावदा, पाल | ३ |
| | | अमळनेर | -- | अमळनेर, मारवाड, पातोंडा | ३ |
| | | चोपडा | -- | चोपडा, अडावद, [illegible] | ३ |
| | | एरंडोल | -- | एरंडोल, कासोदा | २ |
| | | -- | धरणगांव | धरणगांव | १ |
| | | -- | पारोळा | पारोळा-१, पारोळा-२, तामसवाडी | ३ |
| | | पाचोरा | -- | पाचोरा, पिंपळगाव (हरेश्वर), नगरदेवळा | ३ |
| | | चाळीसगाव | -- | चाळीसगांव-१, चाळीसगांव-२, मेहूणवारे, तळेगांव | ४ |
| | | -- | भडगाव | भडगाव-१, कजगांव | २ |
| | | जामनेर | -- | जामनेर, पहूर, फत्तेपूर, नेरी दिगर | ४ |
| | एकुण : | १० | ५ | | ३८ |
| एकुण नासिक विभाग: | | ३२ | ८ | | ११५ |
| ९ | पुणे | हवेली | | हडपसर, वाघोली, मांजरी, हवेली | ४ |
| | | | मुळशी | माले, पौड, पिरंगुट | ३ |
| | | वडगाव-मावळ | -- | वडगाव मावळ, खडकाळा, काळेकॉलनी | ३ |
| | | भोर | -- | नसरापूर, भोर-१, भोर-२ | ३ |
| | | -- | वेल्हा | वेल्हा, पानशेत | २ |
| | | इंदापूर | -- | इंदापूर, बावडा, भिगवण, सणसर | ४ |
| | | बारामती | -- | उंडवडी-सुपे, बारामती, सुपे, वडगांवनिंबाळकर | ४ |
| | | दौंड | -- | दौंड, पाटस, [illegible], राहू | ४ |
| | | पुरंदर | -- | सासवड, परिंचे, जेजुरी, पिसर्वे | ४ |
| | | राजगुरुनगर | -- | खेड, चाकण, वाडा, घाईट | ४ |
| | | जुन्नर | -- | जुन्नर, ओतुर, बेल्हा, नारायणगांव | ४ |
| | | आंबेगाव | -- | मंचर, निरगुडसर, पारगाव, डिंभा | ४ |
| | | शिरुर | -- | शिरुर, न्हावरा, शिक्रापूर, पाबळ | ४ |
| | एकुण : | ११ | २ | | ४७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | अहमदनगर | अहमदनगर | -- | अहमदनगर, अकोळनेर, जेऊर, वाळकी | ४ |
| | | पाथर्डी | -- | करंजी, तिसगांव, पाथर्डी, टाकळी-मानूर | ४ |
| | | पारनेर | -- | निघोज, पारनेर, सुपा, टाकळी ढोकेश्वर | ४ |
| | | कर्जत | -- | कर्जत, कुळधरण, राशीन, मिरजगाव | ४ |
| | | -- | जामखेड | जामखेड, नान्नज, खर्डा | ३ |
| | | श्रीगोंदा | -- | श्रीगोंदा, बेलवंडी, कोळेगांव | ३ |
| | | श्रीरामपूर | -- | श्रीरामपूर, टाकळीभान | २ |
| | | नेवासा | -- | नेवासा, [illegible], चिलेखनवाडी, सलाबतपूर | ४ |
| | | राहुरी | -- | वांबोरी, राहुरी, राहुरी फॅक्टरी, देवळाली-प्रवरा | ४ |
| | | शेवगाव | -- | शेवगांव, ढोरजळगांव, बोधेगाव, चापडगाव | ४ |
| | | संगमनेर | -- | संगमनेर, [illegible], [illegible], साकूर | ४ |
| | | अकोले | -- | राजूर, अकोले, कोतूळ, समशेरपूर | ४ |
| | | कोपरगाव | -- | कोपरगाव, [illegible], [illegible] | ३ |
| | | -- | राहाता | राहाता, लोणी | २ |
| | एकूण : | १२ | २ | | ४९ |
| ११ | सोलापूर | -- | सोलापूर (उत्तर) | सोलापूर, नान्नज | २ |
| | | सोलापूर (दक्षिण) | -- | मंद्रूप, वळसंग, सोलापूर (दक्षिण), बोरामणी | ४ |
| | | अक्कलकोट | -- | अक्कलकोट, मैंदर्गी, वडवळ, वागदरी | ४ |
| | | मोहोळ | -- | मोहोळ, पेनूर, कामती, नरखेड | ४ |
| | | पंढरपूर | -- | पंढरपूर, करकंब, तुंगत, भाळवणी | ४ |
| | | -- | मंगळवेढा | मंगळवेढा, मरवडे, नंदेश्वर, आंधळगांव | ४ |
| | | सांगोला | -- | सांगोला, महूद, [illegible], जवळा | ४ |
| | | माळशिरस | -- | माळशिरस, नातेपुते, अकलूज, पिलीव | ४ |
| | | बार्शी | -- | बार्शी, वैराग, पांगरी, पानगांव | ४ |
| | | माढा | -- | माढा, कुर्डुवाडी, टेंभुर्णी, मोडनिंब | ४ |
| | | करमाळा | -- | करमाळा, केम, जेऊर, केत्तूर | ४ |
| | एकूण : | ९ | २ | | ४२ |
| एकूण पुणे विभाग: | | ३२ | ६ | | १३८ |
| | सातारा | सातारा | -- | आरफळ, परळी, नागठाणे, अंगापूर | ४ |
| | | कोरेगांव | -- | कोरेगांव, [illegible], वाठारस्टेशन, रहिमतपूर | ४ |
| | | खटाव | -- | पुसेगांव, वडूज, औंध, मायणी | ४ |
| | | कराड | -- | कराड, सैदापूर, उंडाळे, उंब्रज | ४ |
| | | पाटण | -- | पाटण, मल्हारपेठ, तारळे, ढेबेवाडी | ४ |
| | | फलटण | -- | फलटण, बरड, बिडणी, तरडगाव | ४ |
| | | दहिवडी | -- | दहिवडी, [illegible], म्हसवड, [illegible] | ४ |
| | | वाई | -- | वाई, पाचवड, भुईंज | ३ |
| | | -- | जावळी | तापोळा, कुडाळ, मेढा | ३ |
| | | -- | खंडाळा | खंडाळा, लोणंद | २ |
| | | -- | महाबळेश्वर | महाबळेश्वर | १ |
| | एकूण : | ८ | ३ | | ३७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सांगली | मिरज | -- | मिरज, सांगली, कुपवाड, आरग | ४ |
| | वाळवा | -- | इस्लामपूर, कुरळप, आष्टा, कासेगाव | ४ |
| | शिराळा | -- | शिराळा, कोकरूड | २ |
| | जत | -- | जत, शेगाव, माडग्याळ, उमदी | ४ |
| | -- | कवठेमहांकाळ | कवठेमहांकाळ, रांजणी, ढालगांव | ३ |
| | विटा (खानापूर) | -- | विटा, कडेगांव, खानापूर | ३ |
| | -- | आटपाडी | आटपाडी, खरसुंडी, दिघंची | ३ |
| | तासगाव | -- | तासगांव, सावळज, विसापूर | ३ |
| | -- | पलुस | पलुस, चिंचणीअंप | २ |
| एकूण : | ६ | ३ | | २८ |
| कोल्हापूर | शाहूवाडी | -- | शाहूवाडी, मलकापूर, बांबवडे | ३ |
| | हातकणंगले | -- | हातकणंगले, हुपरी, वडगांव | ३ |
| | शिरोळ | -- | जयसिंगपूर, कुरुंदवाड | २ |
| | पन्हाळा | -- | पन्हाळा, कळे | २ |
| | करवीर | -- | करवीर, कळंबा, धीड | ३ |
| | राधानगरी | -- | राधानगरी, सरवडे, कौलव | ३ |
| | कागल | -- | कागल, कापशी, मुरगुड | ३ |
| | -- | गगनबावडा | साळवण | १ |
| | गडहिंग्लज | -- | गडहिंग्लज, महागांव | २ |
| | -- | भुदरगड | गारगोटी, कडगांव | २ |
| | -- | आजरा | आजरा, उत्तूर | २ |
| | चंदगड | -- | चंदगड, तुर्केवाडी, कोवाड | ३ |
| एकूण : | ९ | ३ | | २९ |
| ण कोल्हापुर विभाग: | २३ | ९ | | ९४ |
| लातूर | लातूर | -- | लातूर, मुरुड, गातेगाव | ३ |
| | औसा | -- | औसा, बेलकुंड, किल्लारी, लामजना | ४ |
| | निलंगा | -- | निलंगा, कासारशिरसी, औराद | ३ |
| | -- | शिरूरअनंतपाळ | शिरूर-अनंतपाळ | १ |
| | रेणापूर | -- | रेणापूर, पानगाव | २ |
| | उदगीर | -- | उदगीर, वाढवणा, देवर्जन | ३ |
| | -- | देवणी | देवणी | १ |
| | -- | जळकोट | जळकोट | १ |
| | चाकूर | -- | चाकूर, घरणी | २ |
| | अहमदपूर | -- | अहमदपूर-१, शिरूर (टि), किनगाव | ३ |
| एकूण : | ७ | ३ | | २३ |
| उस्मानाबाद | उस्मानाबाद | -- | उस्मानाबाद, बेंबळी, तेर, येडशी | ४ |
| | तुळजापूर | -- | तुळजापूर, काटी, नळदुर्ग, अणदूर | ४ |
| | उमरगा | -- | उमरगा, मुरुम | २ |
| | -- | लोहारा | लोहारा, सास्तूर | २ |
| | -- | भूम | भूम, ईट | २ |
| | -- | वाशी | वाशी,मांडवा | २ |
| | कळंब | -- | येरमाळा, कळंब, शिराढोण | ३ |
| | | परांडा | परांडा, जवळा(नि), आनाळा | ३ |
| एकूण : | ४ | ४ | | २२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७ | परभणी | परभणी | -- | परभणी, झरी, पिंगळी, दैठना | ४ |
| | | जिंतूर | -- | जिंतूर, बोरी, अडगांव, चारठाणा | ४ |
| | | गंगाखेड | -- | गंगाखेड, राणीसावरगाव | २ |
| | | -- | सोनपेठ | सोनपेठ, वडगाव | २ |
| | | पाथरी | -- | पाथरी, हादगांव | २ |
| | | -- | मानवत | रामेटाकळी, मानवत | २ |
| | | सेलू | -- | सेलू, चिकलठाणा | २ |
| | | -- | पालम | पालम, चाटोरी | २ |
| | | पुर्णा | -- | पुर्णा, ताडकळस | २ |
| | एकुण : | ६ | ३ | | २२ |
| १८ | हिंगोली | हिंगोली | -- | हिंगोली, नर्सी, शिरसंम | ३ |
